# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.विशेष महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २७

## सभावृत्तांत

दिनांक – २४.२.२०१४ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची विशेष मा.महापालिका सभा सोमवार दि.२४.०२.२०१४ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.थोरात वनिता एकनाथ
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेट्टी
17. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
18. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
19. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
20. मा.पवार संगीता शाम
21. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
22. मा.तानाजी विठ्ठल खाडे

23. मा.बो-हाडे शुभांगी संजय
24. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
25. मा.भारती फरांदे
26. मा.आर.एस.कुमार
27. मा.जावेद रमजान शेख
28. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
29. मा.पांढरकर निलेश शंकरराव
30. मा.नेटके सुमन राजेंद्र
31. मा.तरस बाळासाहेब जयवंत
32. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
33. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
34. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
35. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
36. मा.लोंढे गणेश नारायण
37. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
38. मा.†|›|.संदीप गुलाब चिंचवडे
39. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
40. मा.अपर्णा निलेश डोके
41. मा.प्रसाद शेट्टी
42. मा.अविनाश (दादा) टेकावडे
43. मा.काळभोर वैशाली जालिंदर
44. मा.शेख अस्लम शैकत
45. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
46. मा.वाबळे संजय मल्हारराव
47. मा.मडिगेरी वर्षा विलास
48. मा.सुपे आशा रविंद्र
49. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
50. मा.अजित दामोदर गव्हाणे
51. मा.गोफणे अनुराधा देविदास
52. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
53. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

54. मा.महेशदादा किसन लांडगे

55. मा.श्रद्धा बाजीराव लांडे

56. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

57. मा.लोंढे शुभांगी संतोष

58. मा.सावळे सिमा रविंद्र

59. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

60. मा.भोसले राहूल हनुमंतराव

61. मा.पालांडे सुजाता सुनिल

62. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

63. मा.कदम सदगुरु महादेव

64. मा.गिता सुशिल मंचरकर

65. मा.कैलास महादेव कदम

66. मा.छाया जगन्नाथ साबळे

67. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

68. मा.वाघेरे सुनिता राजेश

69. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

70. मा.काळे विमल रमेश

71. मा.पाडाळे निता विलास

72. मा.विनोद जयवंत नढे

73. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

74. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

75. मा.विमलताई सुरेश जगताप

76. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

77. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

78. मा.ओव्हाळ शेखर अशोक

79. मा.यमुनाताई रमणनाना पवार

80. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

81. मा.कलाटे स्वाती मयुर

82. मा.नांदगुडे विलास एकनाथ

83. मा.चौंधे आरती सुरेश

84. मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे

**85.** मा.बोकड रामदास गेणभाऊ

**86.** मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

**87.** मा.जगताप राजेंद्र गणपत

**88.** मा.शितोळे शैलजा बाबुराव

**89.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

**90.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

**91.** मा.जम सोनाली पोपट

**92.** मा.प्रशांत शितोळे

**93.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

**94.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम

**95.** मा.गायकवाड संध्या सुरदास

**96.** मा.शेंडगे आशा सुखदेव

**97.** मा.मोटे किरण बाळासाहेब

**98.** मा.संजय केशवराव काटे

**99.** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

**100.** मा.पाटील सुजित वसंत

**101.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव–महापालिका आयुक्त, मा.झुरे-सहा.आयुक्त, मा.टेकाळे, मा.डॉ.माने,मा.कुलकर्णी,मा.खांडकेकर,मा.गायकवाड,मा.थोरवे–सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.दुधेकर-कार्य.अभियंता,मा.साळुंके–मुख्य उद्यान अधिक्षक, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनतासंपर्क), मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.शमिम पठाण –** मा.महापौर साहेब, खालील मान्यवरांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. माजी उपमहापौर शरद बो-हाडे यांचे पुत्र प्रीतम बो-हाडे यांच्यासह चाकण येथे झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींना तसेच ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रा.डॉ.पी.बी.पाटील, ज्येष्ठ साहित्यिक म.श्री.दीक्षित, थेरगांव येथील धाईंजे शिक्षण संस्थेचे संस्थापक चंद्रकांत मोतीराम धाईंजे, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व माजी आमदार रामभाऊ तुपे,समाजसेविका इंदूबाई नामदेव लांडे, केशव दत्तात्रय

झेंडे आणि श्रीमती धोंडाबाई हरीभाऊ नढे यांना आजच्या महापालिका सभेत श्रद्धांजली वाहण्यात यावी. ही सभा दुपारी १.३५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर** – उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेऊन त्यांच्या संमतीप्रमाणे ही सभा दुपारी १.३५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.विशेष महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २७**

**सभावृत्तांत**

**(दि.२४.२.२०१४ रोजी दु.१.०० वा. ची तहकुब सभा)**

दिनांक – २४.२.२०१४ वेळ – दुपारी १.३५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २०१४ ची सोमवार दि.२४.०२.२०१४ रोजी दुपारी १.०० वा. ची विशेष मा.महापालिका सभा दि.२४.०२.२०१४ रोजी दुपारी १.३५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.थोरात वनिता एकनाथ
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेट्टी
17. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
18. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
19. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
20. मा.पवार संगीता शाम

21. मा.ऊबाळे सुलभा रामभाऊ
22. मा.तानाजी विठ्ठल खाडे
23. मा.बो-हाडे शुभांगी संजय
24. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
25. मा.भारती फरांदे
26. मा.आर.एस.कुमार
27. मा.जावेद रमजान शेख
28. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
29. मा.पांढरकर निलेश शंकरराव
30. मा.नेटके सुमन राजेंद्र
31. मा.तरस बाळासाहेब जयवंत
32. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
33. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
34. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
35. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
36. मा.लोंढे गणेश नारायण
37. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
38. मा.†|›|.संदीप गुलाब चिंचवडे
39. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
40. मा.अपर्णा निलेश डोके
41. मा.प्रसाद शेट्टी
42. मा.अविनाश (दादा) टेकावडे
43. मा.काळभोर वैशाली जालिंदर
44. मा.शेख अस्लम शैकत
45. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
46. मा.वाबळे संजय मल्हारराव
47. मा.मडिगेरी वर्षा विलास
48. मा.सुपे आशा रविंद्र
49. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
50. मा.अजित दामोदर गव्हाणे
51. मा.गोफणे अनुराधा देविदास

52. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
53. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
54. मा.महेशदादा किसन लांडगे
55. मा.श्रद्धा बाजीराव लांडे
56. मा.†|›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
57. मा.लोंढे शुभांगी संतोष
58. मा.सावळे सिमा रविंद्र
59. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
60. मा.भोसले राहूल हनुमंतराव
61. मा.पालांडे सुजाता सुनिल
62. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
63. मा.कदम सदगुरु महादेव
64. मा.गिता सुशिल मंचरकर
65. मा.कैलास महादेव कदम
66. मा.छाया जगन्नाथ साबळे
67. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
68. मा.वाघेरे सुनिता राजेश
69. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
70. मा.काळे विमल रमेश
71. मा.पाडाळे निता विलास
72. मा.विनोद जयवंत नढे
73. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
74. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
75. मा.विमलताई सुरेश जगताप
76. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
77. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
78. मा.ओव्हाळ शेखर अशोक
79. मा.यमुनाताई रमणनाना पवार
80. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
81. मा.कलाटे स्वाती मयुर
82. मा.नांदगुडे विलास एकनाथ

**83.** मा.चौंधे आरती सुरेश

**84.** मा.बापू उर्फ शत्रुध्न सिताराम काटे

**85.** मा.बोकड रामदास गेणभाऊ

**86.** मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

**87.** मा.जगताप राजेंद्र गणपत

**88.** मा.शितोळे शैलजा बाबुराव

**89.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

**90.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

**91.** मा.जम सोनाली पोपट

**92.** मा.प्रशांत शितोळे

**93.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

**94.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम

**95.** मा.गायकवाड संध्या सुरदास

**96.** मा.शेंडगे आशा सुखदेव

**97.** मा.मोटे किरण बाळासाहेब

**98.** मा.संजय केशवराव काटे

**99.** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

**100.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव–महापालिका आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त, मा.गावडे, मा.टेकाळे, मा.डॉ.माने,मा.कुलकर्णी,मा.खांडकेकर,मा.गायकवाड,मा.माछरे, मा.फुंदे, मा.थोरवे–सहा.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.कांबळे-प्र. शहर अभियंता, मा.पाटिल, मा.चव्हाण,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.तांबे,मा.सवणे,मा.चव्हाण, मा.शरद जाधव,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.दांगट, मा.बरशेट्टी-कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशा.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके–मुख्य उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, कमिश्नर साहेब पहिल्यांदा सभागृहात आले आहेत. सगळ्या नगरसेवकांच्या वतीने मी सांगू इच्छिते की, त्यांचा सत्कार घेण्यात यावा अशी विनंती करते.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

(नवनिर्वाचित आयुक्त मा.राजीव जाधव यांचा मा.महापौर यांच्या हस्ते, सन्मा.सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात आला.)

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.नगरसचिव** – मा.महापौर यांनी विहीत केल्याप्रमाणे विशेष सभेतील कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे असेल.

१) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" संबंधिचे मा.सभापती, स्थायी समिति यांचे निवेदन,

२) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावर चर्चा,

३) चर्चा समाप्तीनंतर अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावरील ठराव मांडणे – अनुमोदन देणे,

४) अंदाजपत्रकावरील ठरावास सुधारणा/फेरबदलच्या सूचना मांडल्या गेल्यास त्यांची वैधता-ग्राह्य-अग्राह्यता तपासण्याकरीता किमान पूर्ण २ दिवस सभा कामकाज तहकूब करणे –

५) एका सदस्यास एकच सुधारणा/फेरबदल सूचना मांडता येईल किंवा त्यांस अनुमोदन देता येईल. मांडण्यात येणारी सूचना कितीही मोठी असू शकेल.

६) अंदाजपत्रकातील खर्चाची तरतूद वाढवावयाची असेल किंवा नवीन तरतूद करावयाची असेल तर कोणत्या खर्चाची तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करावयाची किंवा कोणत्या जमेत वाढवावयाची हे फेरबदलाची सूचना ग्राह्य होण्यासाठी नमूद असणे आवश्यक राहील.

**मा.नगरसचिव :-** विषय क्र.१ : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०१३–१४ चे सुधारित व सन २०१४–१५ चे मुळ अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच जेएनएनयुआरएम अंतर्गत महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक "प" विचारासाठी - मा.सभापती स्थायी समिती अंदाजपत्रकावरील निवेदन/मनोगत व्यक्त करतील.

(मा.सभापती स्थायी समिती यांच्या वतीने मा.विनया तापकीर, स्थायी समिती सदस्या यांनी अंदाजपत्रक " अ" व "क" वरील निवेदन सादर केले.)

**मा.महापौर** – अंदाजपत्रकावर चर्चा चालू करण्यात यावी.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०१३–१४ चे सुधारित व सन २०१४–१५ चे मुळ अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच जेएनएनयुआरएम अंतर्गत महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक "प" मा.सभापती स्थायी समिती यांच्या वतीने मा.विनया तापकीर यांनी सभागृहासमोर सादर केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे हे ३२

वे अंदाजपत्रक आहे. हे अंदाजपत्रक रु.२१०६ कोटी रुपयांचे असून जेएनएनयूआरएमचे रु.१२९४ कोटी असून एकूण अंदाजपत्रक रु.३४०० कोटींचे आहे. आर्थिक वर्षांत अंदाजपत्रकात येणा-या आर्थिक वर्षांत वेगवेगळ्या विभागांकडून कररुपाने कसा जमा होणार आहे, आणि येणा-या आर्थिक वर्षात कशा पद्धतीने खर्च होणार आहे याचा ताळेबंद म्हणजे हा अर्थसंकल्प अशी त्याची ढोबळ व्याख्या आहे. याठिकाणी मी अनेक वर्षांपासून बघतोय, प्रामुख्याने अंदाजपत्रकात दाखवलेला भांडवली खर्च होतो का नाही याकडे कोणाचेच लक्ष जात नाही. अर्थसंकल्पात ज्या तरतूदी समाविष्ट केल्या जातात, त्यांची पुढे तंतोतंत अंमलबजावणी होणे हे प्रशासनाचे काम आहे. पुढे मी आपल्याला काही गोष्टी निदर्शनास आणून देणार आहे. या अर्थसंकल्पात ज्या गोष्टींची तरतूद केली होती त्या खर्च झालेल्या नाहीत. मा.आयुक्तांनी जमा बाजूत ९० कोटी शिल्लक व जेएनएनयूआरएमचे ६८३ कोटी शिल्लक दाखवली आहे. म्हणजे महापालिकेचे ९० कोटी, जेएनएनयूआरएमचे ६८३ कोटी म्हणजे जवळजवळ ७७३ कोटी आरंभीची शिल्लक दाखवली आहे. याचाच अर्थ आहे, मागील बजेटमधील ७७३ कोटी खर्च झालेले नाहीत. सन २०१३-१४च्या अंदाजपत्रकात २०२४ कोटी भांडवली खर्च होता. या अंदाजपत्रकात अखेरची शिल्लक फक्त रु.२,३८,००,०००/- एवढीच दाखवली होती. टोटल अंदाजपत्रक पाहताना मागील अंदाजपत्रकात फक्त रु.२,३८,००,०००/- शिल्लक राहीले असे सांगितले आहे. परंतू महापालिकेच्या अंदाजपत्रकातील ९० कोटी व जेएनएनयूआरएममधील ६८३ कोटी असे जवळजवळ ७७३ कोटी खर्चच झालेले नाहीत. मग अंदाजपत्रकात भांडवली खर्चाची तरतूद कशासाठी करतो. पैसे खर्च झाली नाही म्हणून शिल्लक वाढली आहे. हे अंदाजपत्रक केवळ लोकप्रतिनिधी सभासद यांच्या डोळ्यात धूळ फेकणारे आहे. नेमेचि येतो पावसाळा याप्रमाणे तीच लेखाशिर्ष, तीच उपलेखाशिर्ष परंतू तरतूद खर्ची होत नाही. अंदाजपत्रकाची दुसरी जमेची बाजु स्थानिक संस्था कर किंवा एल.बी.टी. ही आहे. एल.बी.टी.तून रु.१०२९ कोटी मिळतील अशी अपेक्षा धरली आहे. गेल्या वर्षाच्या सन २०१३-१४ च्या बजेटमध्ये स्थानिक संस्था कर किंवा एल.बी.टी.मधून रु.१२०० कोटी मिळतील अशी अपेक्षा ठेवली होती. आजपर्यंत फक्त ७६० जमले आहेत. मार्च महिनाअखेर साधारण ९०० कोटी जमले तरी जवळजवळ ३०० कोटी रुपयांची तूट यातून येणार आहे. पूर्वी जकात हा महापालिकेचा मुख्य आर्थिक स्त्रोत होता. पूर्ण अर्थसंकल्पाच्या जवळजवळ ७० टक्के उत्पन्न हे जकातीतून मिळत होते. परंतू आज ही परिस्थिती राहीलेली नाही. गेल्यावर्षी १२०० कोटी मिळणार असे गृहित धरले होते. परंतू ९०० कोटीच मिळणार म्हणजे टक्केवारी हिशोबात ५९ टक्के मिळणार आहेत. यावर्षी अंदाजपत्रकात एल.बी.टी.तून १००० कोटी मिळणार अशी तरतूद केली आहे. म्हणजे ४९ कोटी होतात. म्हणजे जकातीच्या उत्पन्नाच्या १० टक्के उत्पन्न कमी होऊ लागले आहे. जी ३०० कोटी तूट येणार आहे, त्याचा परिणाम विकास कामांवर होणार आहे. म्हणजे ३०० कोटी कमी विकास कामे होणार आहेत. याकडे जास्त लक्ष द्यावे लागणार आहे. अजूनही काही लोक एल.बी.टी. भरत नाहीत. परदेशी साहेबांनी नगरसेवकांना विश्वासात घेतले नाही. सभागृहाला विश्वासात घेतले नाही आणि परस्पर व्यापा-यांबरोबर मिटींग घेतली. त्याच ठिकाणी गोंधळ सुरु झाला. वास्तविक पाहता व्यापा-यांकडूनच मागणी झाली होती की, जकात बंद करा. जकात भरण्यात नाहक वेळ घालवतात, वाहने खोळंबतात, चो-या मोठ्या प्रमाणात होतात. म्हणून पर्यायी व्यवस्था करा अशी व्यापा-यांची अनेक वर्षांपासून शासनाकडे मागणी होती. म्हणून शासनाने एल.बी.टी सुरु केली. परंतु केवळ परदेशी साहेबांच्या धोरणामुळे

व्यापा-यांमध्ये गोंधळ झाला. त्यामुळे काही लोक एल.बी.टी. भरायला तयार नाहीत. त्यामुळे आपल्याला एल.बी.टी.चे उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. वास्तविक पाहता, काही महापालिकांमध्ये औरंगाबाद, कोल्हापूर येथे एल.बी.टी.तून महापालिकेचे उत्पन्न वाढले आहे. त्याच पद्धतीने आपल्याकडे देखील उत्पन्न वाढले पाहीजे. अंदाजपत्रकाची दुसरी जमेची बाजु करसंकलन. यातून जास्तीत जास्त ४०० कोटी जमा होतील अशी अपेक्षा धरली आहे. सन २०१३-१४च्या बजेटमध्ये २५० कोटी जमतील अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात २८० कोटी जमले आहेत. म्हणजे जवळजवळ ३० कोटी रुपये मिळकत करात वाढ झाली आहे. फेब्रुवारी अखेर शहरात एकूण २,८३,५७३ मिळकती आहेत. यात १,३४,००० अनधिकृत मिळकती आहेत. २००८ पासून ४३,३९२ मिळकतींना शास्ती कर लावला आहे. यातून रुपये ३७,५८,००,०००/- जमा केले आहेत. मला सांगावेसे वाटते, हा शास्ती कर अन्यायकारक व अतिशय चुकीचा शासनाने लावलेला कर आहे. तो रद्द करावा म्हणून सभागृहाने शासनाकडे ठराव करुन पाठवला होता. तो महाराष्ट्र शासनाने विखंडीत केला आहे. हा शास्ती कर आजदेखील चालू आहे. शहर अध्यक्ष मा.योगेश बहल यांनी देखील शासनाचा निषेध केला आहे. शास्ती कर कोणत्याही परिस्थितीत वसूल केला जाऊ नये. फक्त मिळकत कर घेतला जावा असा मा.महापौर यांनी इथे आदेश दिला होता. परदेशी साहेबांनी जाता-जाता हे चांगले काम केले. या शहरात मिळकतींबाबत सर्वेक्षण केले, ते शंभर टक्के पूर्ण झाले आहे. नवीन बांधकामे व वाढीव बांधकामे अश्या ८१,००० मिळकती सापडल्या आहेत. निश्चितपणे या ८१,००० मिळकतींना बिले पाठवणार आहेत. त्यामुळे उत्पन्नात वाढ होणार आहे. त्याची वसूली मोठ्या प्रमाणात झालीतर ४०० कोटींपेक्षा जास्त उत्पन्न मिळणार आहे. दुसरी जमेची बाजू म्हणजे बांधकाम परवानगी विभाग आहे. या विभागातून रु.३५५ कोटी उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा ठेवली आहे. गेल्या वर्षी २०१३च्या अंदाजपत्रकात बांधकाम परवानगीतून रु.२५१ कोटी, अर्बन ट्रान्सपोर्टमधून ५१ कोटी असे ३०१ कोटींचे टार्गेट देण्यात आले होते. हे टार्गेट पूर्ण झाले आहे. आजमितीला रु.३६० कोटी जमा झाले आहेत. बांधकाम परवानगी विभाग हा चांगल्या पद्धतीने उत्पन्न देणारा विभाग आहे. पिंपरी चिंचवड हे आता महानगर होऊ लागले आहे. रस्ते, उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, पाणी-ड्रेनेज व्यवस्था, इन्फ्रास्ट्रक्चर शहरामध्ये इतक्या चांगल्या पद्धतीने विकसित झाले आहे. पुणे-मुंबईतले मोठ मोठे बिल्डर इथे यायला लागले आहेत. मोठमोठ्या टाऊनशिपस्, टॉवर्स होऊ लागले आहेत. त्यामुळे बांधकाम परवानगी विभागाचे उत्पन्न देखील वाढले आहे. परदेशी साहेबांनी अनधिकृत बांधकामे पाडायचा धडाका लावला होता. त्यामुळे लोकांनी धास्ती घेतली आहे. आज कोणीही अनधिकृत बांधकाम करायच्या फंदात पडत नाही. जास्तीत जास्त नागरीक अधिकृत घरात जाण्याचाच विचार करीत आहेत. तरीदेखील इथे सांगावेसे वाटते, छोटे प्लॉटधारक एक/दीड गुंठ्यांच्या जमिनी आहेत. अधिकृतपणे बांधकाम परवानगी घेण्यासाठी अनेक अडचणी येतात. साईड मार्जिन, प्लॉट मोजणीसाठी बराच खर्च येतो. गावठाणात डबल एफ.एस.आय. देतो. तिथे साईड मार्जिन ठेवत नाहीत. अशा परिस्थितीत डी.सी. रुलमध्ये बदल केलातर निश्चितपणे छोटे-छोटे प्लॉटधारक ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले ते भविष्यात करणार नाहीत. निश्चितपणे परवानगी घेऊन बांधकाम करतील. त्यामुळे चांगल्या पद्धतीने उत्पन्न मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाणीपट्टी व इतर करांपासून रु.६० कोटी उत्पन्न मिळेल असे गृहित धरले आहे. वास्तविक पाहता, गेल्या वर्षी रु.५८,३०,००,०००/- धरले होते.

आजमितीला फक्त रु.२७ कोटी जमले आहेत. रु.५८ कोटी जमणार अशी अपेक्षा केली होती. फक्त रु.२७ कोटी जमा झाले आहेत. पन्नास टक्के रक्कम कमी झाली आहे. शहरात १,३०,००० अनधिकृत नळ कनेक्शन्स् आहेत. झोपडपट्टीत २०,००० कनेक्शन्स आहेत, सर्वेत २२,००० कनेक्शन्सला मिटर बसवले नाहीत. १७,००० मीटर बसवले परंतू नंबरींग केले नाही. हे सर्वेमध्ये सापडले आहे. त्यांना बिल देणे चालू केले आहे. त्या प्रमाणात पाणीपट्टी वसूल होईल असे वाटते आहे. पाण्याचे बील वसूल का होत नाही याची विचारणा केली गेली तेव्हा समजले, सन २००९-१० पासून काही मिळकत धारकांना दुप्पट/तिप्पट पाणीपट्टी आकारल्यामुळे त्यांनी पाणी बिलच भरले नाही. म्हणून परदेशी साहेबांनी अभय योजना आणली. त्याचा काही प्रमाणांत फायदा झाला. परंतू म्हणावा तसा फायदा झाला नाही. जास्तीत जास्त पाणीपट्टी कशी वसूल होईल याकडे लक्ष दिले पाहीजे. गेल्या वर्षी घोषणा केली होती, या शहरातील काही भागांत टप्याटप्याने ४० टक्के भागांत २४X७ दिवस पाणीपुरवठा करणार आहोत. यासाठी जेएनएनयूआरएमचे १४० कोटी मंजूर आहेत. हिच घोषणा गेल्यावर्षी परदेशी साहेबांनी केली होती. त्याचा उल्लेख अंदाजपत्रकात झाला होता. परंतू कोणत्याही भागात २४X७ दिवस पाणी देऊ शकलेलो नाही. माझी आपल्याला विनंती आहे, आपण या गोष्टीचा जरुर विचार करावा. जेएनएनयूआरएम अंतर्गत १४० कोटी मंजूर झाले आहेत. त्याचा लाभ घेऊन शहरातील ४० टक्के भागात २४X७ दिवस पाणीपुरवठा करावा अशी विनंती आहे. अनुदाने, गुंतवणुकीवरील व्याज, भांडवली व्याज हे एकूण मिळून रु.२०६ कोटी इतके जमा होणार आहेत.

खर्चाच्या तपशीलात महसुली खर्च रु.११६५ कोटी प्रस्तुत केला आहे. सन २०१३-१४ मध्ये ९११ कोटी होता. महसूल खर्च २५४ कोटींनी वाढला आहे. आस्थापना खर्च देखील वाढला आहे. हा खर्च कसा रोखता येईल याकडे देखील लक्ष दिले पाहीजे. प्रशासनाकडून महसूल खर्च शंभर टक्के खर्च केला जातो. तो जास्तीत जास्त होऊ नये याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भांडवली खर्च ८८२ कोटी, जेएनएनयूआरएम साठी १०८० कोटींची तरतूद अंदाजपत्रकात केली आहे. एकूण १९६२ कोटी इतकी भरीव तरतूद केली आहे. भांडवली खर्चात सगळ्या नगरसेवकांना ख-या अर्थाने इंटरेस्ट असतो. यातून शहरात विकासाची कामे होणार आहेत. यातून वॉर्डात विकास कामे होणार आहेत. यासाठी बजेटमध्ये तरतुदी केलेल्या आहेत. त्याची व्यवस्थितपणे अंमलबजावणी केलीतर निश्चितपणे या शहराचा विकास होणार आहे व बजेटदेखील खर्च होणार आहे. परंतू तसे काही होत नाही. इथे काही गोष्टी निदर्शनास आणून देणार आहे, याठिकाणी १९६२ कोटींच्या तरतूदी आहेत. स्थापत्यसाठी - ४९७ कोटी, पाणीपुरवठा- ४५ कोटी, जलनिःसारणसाठी ५५ कोटी, विद्युतसाठी – ४१ कोटी इतकी तरतूद केली आहे. परंतू खर्च होतो का नाही हे कोणी पाहत नाही. सन २०१३-१४च्या अंदाजपत्रकात भांडवली खर्चासाठी १०५४ कोटींची तरतूद केली आहे. विशेष योजनेत २४१ कोटींची तरतूद केली आहे. अनेक योजना फक्त कागदावर राहीलेल्या आहेत. कोणत्याही योजनेवर कार्यवाही झाली नाही, कोणताही पैसा खर्च झाला नाही. इथे उदाहरण देतो. गेल्या अंदाजपत्रकात कला क्रिडा केंद्र उभारणीसाठी १ कोटींची तरतूद केली होती. पुण्यातील गणेश कला क्रिडा केंद्राच्या धर्तीवर ४ ते ५ हजार लोक बसतील, सांस्कृतिक/मनोरंजनाचे कार्यक्रम होतील अशा पद्धतीने एक कलाक्रिडा केंद्र असावे यासाठी तरतूद केली आहे. एक रुपया सुद्धा खर्च झालेला नाही. मध्यवर्ती वाचनालय – शहरात मध्यवर्ती ठिकाणी वाचनालय उभारण्यासाठी रु.८५,००,०००/- तरतूद

अंदाजपत्रकात केली आहे. वाचन संस्कृती लोप पावली आहे. विद्यार्थ्यांना, नागरीकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, एमपीएससी/युपीएससीच्या पुस्तकांची माहिती व्हावी यासाठी रु.४५,००,०००/- तरतूद केली आहे. वाचनालय अस्तित्वात आले नाही. त्या संदर्भातील तरतुदीतील एक रुपयासुद्धा खर्च झाला नाही. शाळा, मैदान, क्रिडा संकुलसाठी रु.९,८७,००,०००/- तरतूद केली होती. काही ठिकाणी मैदाने नाहीत, काही ठिकाणी आहेत. ज्या-ज्या ठिकाणी मैदाने असतील ती विकसित करणे. जेणेकरुन खेळाची आवड निर्माण होईल. विद्यार्थी असतील तर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू तयार होतील. अशी यामागची भावना होती. ही तरतूद गेल्यावर्षी केली होती. ती देखील खर्ची झालेली नाही. वाहतूक शाखा सुधारणा – पार्किंगच्या जागा विकसित करणे – गेल्या वर्षाच्या बजेटमध्ये रु.४७ कोटी तरतूद आहे. जागा विकसित करणेसाठी केलेली तरतूद खर्च झालेली नाही. पिंपरी चिंचवड शहरात सुंदर, मोठमोठे रस्ते झाले आहेत. शॉपिंग सेंटर्स, मॉल्स् आहेत, थिएटर्स आहेत, अनेक गोष्टी आहेत. परंतू शहरात पार्किंग व्यवस्था नाही. लोकांनी गाड्या कुठे लावायच्या. पिंपरी चिंचवड आर.टी.ओ.मध्ये जवळजवळ ६ लाख वाहनांची नोंद झाली आहे. शहराची लोकसंख्या जवळजवळ २० लाख आहे. घरटी गाड्या आहेत. दुचाकी, चारचाकी. या गाड्या जेव्हा घराबाहेर पडतात व रस्त्यावर येतात त्यावेळी पार्किंगची व्यवस्था करणे महापालिकेचे कर्तव्य नाही का? याची फक्त जाणीव आपल्याला आहे. आपण फक्त बजेटमध्ये तरतूद करता, त्याची कार्यवाही करत नाहीत. अंदाजपत्रकात जवळजवळ ४७ कोटी तरतूद केली होती. पण एकही रुपया खर्च केला नाही. मगर स्टेडियमचा विकास करणे यासाठी रु.६०,९७,०००/- तरतूद केली आहे. मी १९९७ साली नगरसेवक झाल्यापासून बघतोय, प्रत्येक बजेटमध्ये आण्णासाहेब मगर स्टेडीयमचा विकास करणे अमुक अमुक रक्कम. आण्णासाहेब मगर स्टेडीयम हे शहरातील एकमेव मोठे स्टेडीयम आहे. आण्णासाहेब मगर स्टेडीयमसाठी एकाच वर्षी ५ ते १० कोटी खर्च करा पण त्याचा विकास करा. ही रक्कम खर्चच होत नाही परंतु प्रत्येक बजेटमध्ये त्याचा उल्लेख केला जातो. पर्यावरण विकास आराखडा – यासाठी रु.३४ कोटी खर्च केला आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीचे आर्किटेक्ट श्री.दास यांनी शहरातील जवळ जवळ १६ स्थळे निवडली होती. त्यांचा विकास करायचा. शहराच्या बाहेरुन राज्यातून परराज्यातून पर्यटक आकर्षित व्हावेत अशी योजना आहे. ऑटोक्लस्टर इथे प्रेझेंटेशन दिले आहे. मा.अजित पवार, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांनी देखील हे प्रेझेंटेशन पाहिले आहे. परंतू हे नुसतेच कागदावर राहीले आहे. यावर पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही, कुठलाही खर्च झाला नाही. इथे रु.३४ कोटींची तरतूद केली पाहीजे. ज्या वॉर्डातून आम्ही निवडून आलो, त्या वॉर्डचा मॉडेल वॉर्ड म्हणून विचार केला आहे. त्यासाठी रु.१ कोटी तरतूद केली होती. वॉर्डातली किरकोळ कामे करायची थांबवली आहेत. आज फूटपाथ केला. आम्हाला आनंद झाला, आमचा वॉर्ड मॉडेल वॉर्ड झाला. एक कोटी तरतूद केली आहे. आम्ही वर्षभर कोणतेही काम केले नाही. कारण डबल खर्च होऊ नये. पाथवे आहे, सायकल ट्रॅक आहे, खूप चांगल्या गोष्टी यात आहेत. रस्ता सुशोभिकरण करायचे तर परत किरकोळ किरकोळ कामे थांबवली होती. डबल डबल खर्च होऊ नये म्हणून वर्षभर वॉर्डात काहीच काम केले नाही. कारण याची काहीच कार्यवाही होत नाही. या १ कोटींतून एक रुपयादेखील आमच्या वॉर्डसाठी खर्च झाला नाही. शाहूनगरमध्ये निर्मळ केंद्र बांधण्यासाठी बजेटमध्ये रु.२५ लाख तरतूद केली. जागा उपलब्ध आहे. कोणतीही अडचण नाही तरी एक रुपयाचेसुद्धा काम नाही. याला काही अर्थ नाही. या सगळ्या गोष्टींचा खुलासा करावा.

दरवर्षी असेच होणार आहे. शाहूनगरमध्ये बहिरवाडे क्रिडांगण आहे तिथे प्रेक्षागॅलरीवर शेड मारण्यासाठी रु.१५,००,०००/- तरतूद केली, काही झाले नाही. कशासाठी करतो. ज्या तरतूदी केल्या त्याची अंमलबजावणी झाली नाही तर या बजेटला काहीच अर्थ नाही. १/२ योजना सोडल्यातर काही नवीन नाही. नाविण्याचा लवलेश नाही. इतके फसवे अंदाजपत्रक आहे. माझ्या व मंगलाताईंच्या वॉर्डात आम्ही जातीने तरतूद करुन ठेवली. आमचीच कामे होत नाहीत. आमची ही गत तर नवीन निवडून आलेल्या सदस्यांची काय अवस्था आहे. बहिरवाडे क्रिडांगणाची संपूर्ण माती काढायची, नवीन माती टाकायची, रोलिंग करणे यासाठी रु.५,००,०००/- तरतूद केली आहे. एक रुपया देखील खर्च झाला नाही. आम्ही शेवटी तिथे पाणी मारण्यासाठी पाईपलाईन केली. लोकांच्या डोळ्यात माती उडून जाऊ नये म्हणून बजेटमध्ये तरतूद ठेवली होती. परंतू त्यातला एक रुपयासुद्धा खर्च केला नाही.

राजर्षि शाहू उद्यानात स्थापत्यविषयक कामे यासाठी रु.१० लाख तरतूद केली गेली. हे उद्यान एकेकाळी शहराचा मानबिंदू होते. तत्कालिन मुख्यमंत्री मा.विलासराव देशमुख यांच्या हस्ते या उद्यानाचे उद्घाटन झाले. या उद्यानाला अनेक वेळा पारितोषिक सुद्धा मिळाले आहे. आज हे उद्यान एकदम भकास झाले आहे. कोणतेही काम झालेले नाही. बजेटमध्ये तरतूद असूनही तुम्ही काम करत नसाल तर त्याला अर्थ काय. हे मी माझ्या वॉर्डातले सांगितले आहे. संध्याकाळपर्यंत सभा चालणार आहे. इथे अनेक मान्यवर बोलणार आहेत. याचा देखील बारकाईने अभ्यास करावा. जी तरतूद केली आहे ती खर्ची करावी अशी विनंती करतो. चालू अंदाजपत्रकात विशेष योजनेसाठी तरतूद ठेवली आहे. गेल्या वर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतूद खर्च झालेली नाही. चालू वर्षी ३६० कोटींची तरतूद विशेष योजनेसाठी केली आहे. तेच तेच आले आहे. मगर स्टेडियमचा विकास – यासाठी रु.३१,००,०००/- तरतूद केली आहे. वाहतूक सुधारणा, पार्किंगची जागा विकसित करणे – यासाठी रु.७४,००,००,०००/- तरतूद केली आहे. शाळा मैदान, क्रिडा संकुल उभारणे यासाठी ७,५२,००,०००/-, सायन्स पार्क परिसरात तारांगण उभारणे ही नवीन योजना आहे, त्यासाठी अतिशय चांगली तरतूद केली आहे. शहरातील विद्यार्थ्यांना ओळख व्हावी. सूर्य तारे यांचा अभ्यास व्हावा. यासाठी पदाधिकारी प्रयत्न करतात. माझी सभागृहाच्या वतीने विनंती आहे, आपण निश्चितपणे तारांगणसाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो. बालनगरी विकसित करणे – यासाठी रु.३ कोटी तरतूद आहे. भोसरी इथे आरक्षण क्र.४५ इथे बालनगरी विकसित करणे. शहरातील मुलांसाठी मनोरंजन, खेळ नाविण्यपूर्ण गोष्टींसाठी चांगल्या पद्धतीने ही तरतूद केली आहे. मोरया गोसावी मंदीर परिसर विकसित करणे. हे शहर महान संत मोरया गोसावी यांच्या वास्तव्याने पुनित झालेले शहर आहे. या शहराला इतिहास आहे. गणपती मंदीर पेशवेकालीन मंदीर आहे. याचा विकास करणे, आजूबाजूचा परिसर सुशोभित करणे व अन्य गोष्टी करणार असाल तर ही निश्चितच चांगली बाब आहे. इथे चांगली तरतूद केली आहे. याची नेटाने अंमलबजावणी करण्याची नैतिक जबाबदारी तुमची आहे. आकुर्डी प्राधिकरण नाट्यगृहसाठी रु. १० कोटी तरतूद आहे. हा परिसर चांगला विकसित झाला आहे. उच्च वर्गापासून मध्यम वर्गापर्यंत वस्ती इथे आहे. या लोकांना देखील करमणुकीसाठी हे नाट्यगृह उपयोगी पडणार आहे. बर्ड व्हॅली समोर लेझर शो साठी पर्यटन विकास आराखड्यात रु.५०,००,०००/- इतकी तरतूद आहे. अतिशय चांगली तरतूद केली आहे. राजीव गांधी जिवनदायी योजना – ही अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. राज्याच्या आघाडी

सरकारला मी मनापासून धन्यवाद देतो. गोरगरीब जनतेच्या उपचारांसाठी ही योजना आहे. पिवळे व केशरी कार्डधारक यांच्यासाठी ही योजना आहे. यात ९७२ प्रकारचे आजार समाविष्ट आहेत. या आजारांवर मोफत उपचारासाठी ही योजना फक्त वाय.सी.एम. साठी नाही तर शहरातील इतर हॉस्पिटल्स् मध्ये ही योजना सुरु करावी अशी विनंती करतो. महापौर निधी – यात रु.२,००,००,०००/- इतकी तरतूद आहे. अनेक वर्षे फक्त २ कोटीच तरतूद आहे. शहर मोठे झाले आहे. बरेच गोरगरीब नागरीक आहेत. अडीअडचणीत असणारे नागरीक महापौरांकडे येतात. त्यामुळे दोन कोटी पुरत नाहीत. आपण २ कोटींऐवजी ५ कोटी निधी करावा. जेणेकरुन महापौरांना देखील सगळ्यांचे समाधान करता येईल. कमीत कमी रु.१०,०००/- तरी देण्यात यावेत. काही विभाग असे आहेत, तिथे करोडो रुपये खर्च करतो. आऊटकम काही मिळत नाही. पशुवैद्यकीय विभाग – यात रु.३,८५,००,०००/- तरतूद आहे. गेल्या वर्षी रु.३,९१,००,०००/- तरतूद केली होती. यात श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया – यात रु.५० लाख खर्च करतोय. कुत्र्यांच्या नसबंदीसाठी रु.५० लाख इतकी दरवर्षी तरतूद खर्च करतो. मग शहरातील मोकाट, भटक्या कुत्र्यांचे प्रमाण कमी झाले आहे का. सभागृहात कोणालाही विचारा, इतकी कुत्री शहरात झाली आहेत नको नको झाले आहे. डॉ.गोरे यांना किती वेळा फोन करायचा. त्यांच्यावर टिका करायची नाही. त्यांचे सुद्धा हात बांधले आहेत. त्यांचे काम चांगले आहे. मी सकाळी फिरायला जातो तेव्हा नागरीक रोज तक्रारी करत असतात. मी गार्डनमध्ये पाहतो तर कुत्रीच कुत्री. नागरीक एकदा कुत्र्याकडे बघतात, एकदा आमच्याकडे बघतात. नगरसेवकांना तरी किती वेळा सांगायचे. शहरात कचरा कुंड्या असतील, रस्त्यावर कचरा पसरलेला असतो याचा बंदोबस्त व्हायला पाहिजे आहे. सुप्रिम कोर्टाचे आदेश असतील पण भटकी कुत्री कमी झाली नाहीत. यावर ठोस उपाय करा. आपण मोशी इथे कचरा डेपोजवळ २/३ एकर जागा घ्या. शहरातील सगळी कुत्री तिथे नेऊन ठेवा. डॉ.गोरे यांना १०/१२ डॉक्टर्स बरोबर द्या व दिवसरात्र त्यांची ऑपरेशनस् करुन टाका. त्याशिवाय त्यांची संख्या कमी होणार नाही. सारथी वेबसाईटवर नागरीकांच्या सगळ्यात जास्त तक्रारी कुत्र्यांविषयी असतात. रस्त्यात येता-जाता नागरीक त्रस्त आहेत. शाहूनगरमध्ये कामगार लोक आहेत, शिफ्टमध्ये काम करणारे लोक असतात. रात्री १२.०० वा. घरी जाताना किंवा कामावर जाताना कुत्री त्यांच्या पाठीमागे लागतात. अनेक वेळा लोकांना कुत्री चावलेली देखील आहेत. त्यांचे अपघात झालेले आहेत. एम्पायर इस्टेट इथे पाच वर्षाच्या मुलीला चार/पाच कुत्री एका वेळेस चावली. मोकाट कुत्र्यांचा भटक्या कुत्र्यांचा इतका सुळसुळाट झाला आहे. त्यासाठी ठोस पाऊले उचलली पाहीजेत. याचा बंदोबस्त आपण केला पाहीजे. सार्वजनिक उद्याने – यासाठी रु.१७,६७,००,०००/- तरतूद ठेवली आहे. शहरात लहान/मोठी १५४ उद्याने आहेत. ही उद्याने शहरात चांगल्या स्थितीत रहावीत यासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करुन ठेवली आहे. परंतू सगळ्या उद्यानांत एकदा फेरफटका मारा, जेवढी तरतूद ठेवली आहे त्यामानाने ती सुस्थितीत आहेत का नाही ते पहा. रु.३,५०,००,०००/- खर्च करुन ठेकेदारी पद्धतीने चालवायला देतो. आपण एस्टिमेट करतो. या लोकांना टेंडर देताना ३०, ४० किंवा ५६ टक्यांपर्यंत बिलो राहते. माझ्या प्रभागातले शिवछत्रपती शाहू संभाजी उद्यान ५६% बिलो गेले आहे. हा ठेकेदार काय काम करणार. का आपले एस्टिमेट चुकले होते का. असे परदेशी साहेबांना पत्र दिले होते. ते म्हणाले तो ठेकेदार यांत्रिक पद्धतीने करणार आहे. मग टेंडर रक्कम कमी करु शकलो असतो. ५६

टक्के बिलो म्हणजे जवळजवळ निम्मी रक्कम फुगवली की काय अशी शंका यायला लागली आहे. हा जनतेचा पैसा आहे. ही कामगार नगरी आहे. कररुपाने पैसा गोळा करतो. त्याचा विनियोग व्यवस्थित झाला पाहीजे. प्रशासन व आम्ही आपण महापालिकेचे विश्वस्त आहोत. ही आपली नैतिक जबाबदारी आहे. उद्यानांतील खेळणींसाठी – रु.५०,००,०००/-, तीच खेळणी दुरुस्तीसाठी परत रु.३०,००,०००/-. ही खेळणी कधीच चांगल्या दर्जाची नसतात. महिना/दोन महिन्यांत ती नादुरुस्त होतात. तोच ठेकेदार ती दुरुस्त करतो. अशा पद्धतीने हा कारभार चालू आहे. याचे देखील ऑडीट झाले पाहीजे. तुम्ही खुर्च्या/बेंच पहा. घरात पंधरा/पंधरा, वीस/वीस वर्षे खुर्च्यांना अजिबात काही होत नाही. माझ्या आजोबांची खुर्ची आहे त्या स्थितीत आहेत. उद्यानातले बेंचेस लगेच खराब होतात. दरवर्षी ३० लाख, ५० लाख अशी पैशांची उधळपट्टी होते आहे. कार्यशाळा विभाग – यासाठी रु.५,४५,००,०००/- तरतदू केली आहे. यात वाहन निर्वाह, स्पेअर पार्टस् खरेदी रु.९८ लाख, इतर जेएनएनयूआरएम वाहने स्पेअर पार्टस् खरेदी रु.१,३०,००,०००/-, प्रशासकीय वाहने स्पेअर पार्टस् खरेदी रु.७०,००,०००/- म्हणजे वाहने तीच फक्त नावे वेगवेगळी दिलेली आहेत. जेएनएनयूआरएमखाली वेगळे, प्रशासकीय खर्च वेगळा, टोटल स्पेअर पार्ट खरेदीसाठी रु.२,५८,००,०००/-. आम्ही सुद्धा गाड्या चालवतो. माझ्याकडे ४ गाड्या आहेत. सहसा नवीन गाड्या खराब होत नाहीत. फक्त सर्वीसींगचा खर्च होतो. इतक्या चांगल्या गाड्या मार्केटमध्ये आल्या आहेत. स्पेअर पार्टची रिप्लेसमेंट ३/४ वर्षात होतच नाही. इथे मात्र रु.३ कोटी तरतूद ठेवली आहे. स्पेअर पार्ट दरवर्षी खरेदी करणार आहोत का. हे अत्यंत चुकीचे वाटते. नागरीकांच्या दृष्टीने काही योजनांमध्ये चांगली तरतूद केली आहे. शहरी गरीबांसाठी ६७९ कोटी, झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २९६ कोटी, महिलांच्या योजनांसाठी २९ कोटी आहे. या योजना खूप चांगल्या आहेत. नागरवस्ती विभाग – महिला बालकल्याण समितीच्या वतीने सन २०१०-११ मध्ये महिला भगिनी प्रशिक्षित झाल्या आहेत. त्यांना अजून देखील शिवण मशीन मिळाल्या नाहीत. हे २०१४ चालू आहे. अशी दिरंगाई होत असेल तर बजेटचा काय उपयोग. मशीन्स द्यायला लेट का झाला, असे चालणार नाही. नगरसचिव पूर्वी त्या विभागांत काम करत होते. सगळ्या गोष्टी वेळेवर व्हायला पाहीजेत. आपण याठिकाणी लक्ष द्यावे अशी अपेक्षा इथे व्यक्त करतो. मागासवर्गीय योजनांसाठी रु.४९ कोटी, अपंग कल्याणकारी योजनांसाठी रु.८ कोटी चांगल्या योजना आहेत. भारताबाहेरील प्रशिक्षणासाठी रु.३५,००,०००/- तरतूद केली आहे. या चांगल्या योजना आहेत. आमचे पदाधिकारी शेजारच्या देशांत, परदेशांत जातात. तिथल्या ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत त्या आपल्या शहरात आल्या पाहीजेत. स्वच्छता प्रामुख्याने आहे. जो मनुष्य परदेशांत जातो, त्याला काहीतरी व्हिजन मिळते. त्यासाठी केलेली रु.३५,००,०००/- तरतूद कमी पडणार आहे. त्याऐवजी रु.३,५०,००,०००/- करावेत. नुसतेच अधिका-यांच्या नाहीतर पदाधिका-यांच्या टिमस् परदेशांत पाठवाव्यात. जे परदेशांत आहे, ते आपल्याकडे कसे आणता येईल याचा विचार करावा. आयुक्त साहेब, आपण रत्नागिरीत जिल्हाधिकारी म्हणून काम करत असताना त्यावेळी शाळांतील मुलींचे एच.बी.चे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे शेंगदाणे लाडूच्या रत्नागिरी पॅटर्नची चांगली योजना राबविली. या योजनेचा फायदा निश्चितच शिक्षण मंडळाच्या शाळांतील मुलींना होईल. शहरातील मुलींचे एच.बी.चे प्रमाण कमी असते. शहरातील भगिनींचे सुद्धा एच.बी.चे प्रमाण कमी असते. आपण शेंगदाणा लाडू देणे चालू केलेतर त्याचा निश्चित फायदा होईल. सुलभाताईंचा महिला महासंघ आहे. त्यादेखील लाडू

पुरवू शकतील. जेणेकरुन शहरात स्वस्त दरात शेंगदाणा लाडू विक्री केंद्र केलेतर संपूर्ण शहरातील सर्व महिला आपल्याला दुवा देतील. आपण गेले २/३ वर्षांपासून या बजेटला एकत्रित प्रशासकीय मान्यता देतो आहोत. जेणेकरुन कामाला विलंब होऊ नये, बजेट वेळेवर संपावे, वेळेवर कामे पूर्ण व्हावीत म्हणून याला प्रशासकीय मान्यता द्यायला सुरुवात केली आहे. बजेटला डायरेक्ट प्रशासकीय मान्यता देणार आहोत. एकदा प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर बजेटमध्ये ज्या भांडवली तरतुदी आहेत, त्या खर्ची केल्यातर, बजेटची तंतोतंत अंमलबजावणी केलीतर या बजेटला काहीतरी अर्थ राहणार आहे नाहीतर हा नुसताच आकडेवारीचा खेळ राहणार आहे. दुसरे काही होणार नाही एवढेच सांगतो.

**मा.अपर्णाताई डोके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज सभागृहापुढे बजेट सादर करण्यात आले आहे ते निश्चितच नेहमीसारखे दरवर्षीप्रमाणे बजेट आहे. खरेतर एलबीटीमुळे आर्थिक स्त्रोत कमी झाला असलातरी या बजेटमधील ब-याचशा त्रुटी लक्षात आल्या आहेत. तरीपण हे बजेट तंतोतंत खर्च करण्याचा प्रयत्न करावा. निश्चितच बजेटचा वापर पूर्णपणे होईल जेव्हा त्याची अंमलबजावणी ख-या अर्थाने होईल. आज शहराच्या नावलौकिकात भर टाकणारे बरेचसे प्रोजेक्ट पूर्ण झाले आहेत. उड्डाण पूल असेल, ग्रेड सेपरेटर असेल, बीआरटीसारखा प्रोजेक्ट काही दिवसांनी सुरु होईल. पर्यटन विकास आराखड्यात नदी सुधार प्रकल्पाचा सुद्धा विचार करावा. शहरात मोजकीच नाट्यगृहे आहेत. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता या शहराची सांस्कृतिक शहर म्हणून सुद्धा एक ओळख निर्माण व्हावी म्हणून त्यानुसार मोठ्या क्षमतेचे नाट्यगृह असले पाहीजे. कलादालन असले पाहीजे. त्याचप्रमाणे एकावेळी १०० ते २०० व्यक्ती बसू शकतील असे ऑटोक्लस्टरप्रमाणे, जिथे जागा उपलब्ध असेल असे मोठे कलादालन किंवा नाट्यगृह उभे करण्यात यावे. सांस्कृतिक वारसा जपायला मदत होईल. २४ तास पाणी देणे हा आपला उद्देश्य आहे. पाणी वेळेवर मिळणेसुद्धा आवश्यक असून निश्चितच जास्त उपलब्ध होणे ही सगळ्यांचीच मागणी आहे. यात निश्चित उपाययोजना करावी. बघत बघता उन्हाळा सुरु होईल. पाण्याचे विघटन समतोल प्रमाणात झाले पाहीजे. सर्वांना पाणी मिळाले पाहीजे. अर्थसंकल्पात महिलांसाठी वेगळी तरतूद दिसत नाही. सालाबादप्रमाणे मागणी करत असतो. महिलांसाठी वेगळे बजेट असावे. महिला स्वच्छतागृहांचा प्रश्न गेली कित्येक वर्षांपासून आहे. यातून अंमलबजावणी होऊन शहरात कुठेही स्वच्छतागृहे निर्माण होत नाहीत. निश्चितच याला प्राधान्य देण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त करते. क्रिडा धोरण असेल, महीलांसाठी योजना असतील त्यात ब-याचशा योजना बंद होत चालल्या आहेत. विधवांना जी अनुदाने देतो, त्यात त्यांना पेंशन कशी देता येईल हे बघितले पाहीजे. बचत गटांना जी अनुदाने देतो त्यात २०१० सालापासुन अनुदान अजूनही दिले गेले नाही. शिवण यंत्र असेल तसेच महिलांसाठी वेगळी तरतूद करता येईल. आज शहरात महिला समुपदेशन केंद्राची अतिशय गरज आहे. अशी केंद्रे उभारली गेली पाहीजेत. निश्चितपणे बजेटमधून नागरीकांना डायरेक्ट काय देऊ शकतो हे सुद्धा महत्वाचे आहे. मुलभूत गरजा देत असताना, मोठे मोठे प्रोजेक्ट होत असताना आपल्याला डायरेक्ट काय देता येईल अशा गोष्टींचा सुद्धा विचार केला गेला पाहीजे. आज महापालिकेच्या ज्या मिळकती आहेत, इमारती आहेत त्या धूळ खात पडून आहेत. त्यांचा सुद्धा चांगला वापर करण्यासाठी, त्यांचा चांगल्या कामासाठी कसा उपयोग करता येईल याचा सुद्धा

याप्रसंगी विचार करावा. निश्चितच शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास होतो आहे. चांगल्या चांगल्या सोसायट्यांना डासांचा, घुशींचा सुद्धा त्रास वाढला आहे. शहरात येणा-या भिका-यांचा त्रास वाढतोय. त्यासाठी जे सहकार्य पाहीजे ते निश्चितच नगरसेवकांच्या माध्यमातून होईल. यावर उपाययोजना करावी. विद्यार्थ्यांसाठी परिपूर्ण काय देता येईल. सायन्स पार्क चांगले झाले आहे, त्याचे मेंटेनन्स होणे तितकेच गरजेचे आहे. ही तितकीच महत्वपूर्ण जबाबदारी आहे. बीआरटी प्रोजेक्ट पूर्ण होत असताना आज वाहतुकीचा प्रश्न, पार्किंग बहुतांशी गरजेचा प्रश्न आहे. चारचाकी, दुचाकींची संख्या वाढते आहे. पार्किंगसाठी बहुमजली इमारतींचा उपयोग करावा. निश्चितच हे बजेट खर्ची पडणे हे या बजेटचे खरेतर यश यात असणार आहे. आरोग्य विषय – बहुतांशी रुग्णालये अद्ययावत करण्याचा प्रयत्न करावा. कॅन्सरचे प्रमाण खूप वाढत चालले आहे. शहरात कॅन्सर युनिट व बर्न युनिट शहरात अजिबात नाही. त्यासाठी प्राधान्याने लक्ष द्यावे. कलासंस्कृती, क्रीडा, आरोग्य अशा बहुतांशी वेगवेगळ्या योजना असतील, महिलांसाठी योजना असतील, वृद्धांसाठी असेल नागरीकांसाठी असेल, नागरी सुविधांसाठी योजना असतील त्याचा परिपूर्ण विचार करावा. हे या प्रसंगी आवश्यक वाटते.

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज बजेटवर चर्चा करतोय. परंतू मागील वर्षाचे बजेट पास झाल्यानंतर आजपर्यंत किती कामे प्रत्यक्षात सुरु झाली त्याबाबत चर्चा होणे गरजेचे आहे असे मला वाटते. बजेटमध्ये कोटीच्या कोटी उड्डाणे घेतली. प्रत्यक्षात प्रभागात शहरात किती कामे सुरु झालीत हा चिंतनाचा विषय आहे. त्याबाबत चौकशी होऊन तपासणी होणे गरजेचे आहे. २०१४मधील लेखाशिर्षानुसार निविदा प्रक्रिया कधी सुरु झाली, वर्कऑर्डर कधी गेली. जवळपास नोव्हेंबर/डिसेंबरमध्ये वर्कऑर्डर दिल्या आहेत. आज रोजी पर्यंत २/३ महिने कामे होणार आहे का. फक्त बिलांसाठी काम होते. बजेटनंतर जून/जुलैपर्यंत निविदा प्रक्रिया झाली. डिसेंबर वर्षाअखेर कामे पूर्ण होतील. आजचे काम उद्या झालेतरी अधिका-यांना काही फरक पडत नाही. परंतू नगरसेवकांना नागरीकांना तोंड द्यावे लागते म्हणून मुलभूत सुविधांची कामे वेळेत सुरु करावीत अशी विनंती करते.

**मा.विनोद नढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज २०१४-१५चे बजेट सादर झाले आहे. बजेट सादर करण्यापूर्वी मा.आयुक्तांनी त्यांच्या कक्षात पक्षनेते असतील, महापौर असतील, विधी समितीचे सभापती असतील, सर्वांची एक मिटींग तिथे घेतली. त्या मिटींगमध्ये त्यांनी काही सूचना केल्या. निश्चितच आपण ज्या काही सूचना केल्या त्या स्वागतार्ह, अतिशय चांगल्या आहेत. निश्चित ज्या सूचना केल्या आहेत, त्यांवर योग्य ती कारवाई आपण करावी अशी आमची सर्वांची अपेक्षा आहे. एलबीटीतल्या त्रुटींमुळे सुमारे ३५० कोटींची आर्थिक तूट प्रशासनाने या वर्षी गृहित धरली आहे. याचा फटका वॉर्डातल्या तरतुदींना बसला आहे. यावर्षी दोन सदस्य असल्यामुळे वॉर्डचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यामुळे ३ १/२ कोटींची तरतूद निश्चितच अतिशय तुटपुंजी आहे. त्यामुळे विकास कामे होणार नाहीत. आत्ताच मा.नारायण बहिरवाडे यांनी विस्तृत विवेचन केले आहे. त्यांनी अनेक मुद्यांना हात घातलेला आहे. मागील बजेटमधल्या काही रकमा खर्ची झाल्या नाहीत.
त्या रकमा खर्ची व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. मा.महापौर साहेब,नदी सुधार प्रकल्पाबाबत महापालिकेने काही तरतूदी केल्या, योजना हाती घेतली आहे. या प्रकल्पाबाबतीत प्रशासनाने परवाने

असतील, इतर सक्षम बाबी पूर्ण केल्या आहेत का, याची देखील प्रामुख्याने माहिती घेतली पाहीजे. केवळ सल्लागार नेमून महापालिकेच्या पैशाची उधळपट्टी करणे अतिशय चुकीचे आहे. नदी सुधार प्रकल्पाला विरोध नाही परंतु मुळातच साधा गाळदेखील काढता आला नाही. प्रशासन चुकीच्या पद्धतीने भूलभुलैय्या करुन काम करते आहे. औद्योगिक मंदी व इतर कारणाने महापालिकेच्या उत्पन्नात दिवसेंदिवस घट होते आहे. मोठ्या प्रकल्पांवर लक्ष पुरविण्यापेक्षा वास्तवात राहून नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत. प्रामुख्याने फक्त प्रकल्पांवर लक्ष न देता वॉर्डातल्या तरतुदींवर लक्ष द्यावे अशी मागणी आहे. बंद नळ योजनेबाबत अर्थसंकल्पात ७६ कोटी तरतूद केली आहे. पिंपरी चिंचवड शहराला सुद्धा मुबलक पाणी मिळावे यासाठी बंद पाईपलाईंची गरज आहे. प्रत्येक प्रकल्प राबवित असताना प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली पाहीजे. आर्थिक दृष्ट्या प्रकल्प सक्षम आहे का. तसेच बंद पाईप योजनेच्या माध्यमातून अनेक वेळा त्यात झालेला भ्रष्टाचार आमचे पक्षनेते मा.भाऊसाहेब भोईर यांनी मोठ्या प्रमाणात सभागृहासमोर आणला होता. यावर सभागृहात भरपूर चर्चा झाली आहे. असे असताना बंद नळ योजनेसाठी अर्थसंकल्पात ३११ कोटी तरतूद केली आहे ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. राज्य शासनाकडे हा विषय प्रलंबित असल्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात तरतूद कशासाठी हा प्रश्न आहे. २४ तास पाणीपुरवठा मिळावा म्हणून आयुक्तांनी काही सूचना केल्या. या गोष्टीला आमचा निश्चितच पाठिंबा आहे. परंतू हे करत असताना पाण्याच्या टाक्यांची या बजेटमध्ये तरतूद आहे. शहरात पाण्याच्या ८५ टाक्या आहेत. त्यामुळे हे शहर पाण्याच्या टाक्यांचे शहर आहे का अशी शंका वाटायला लागली आहे. पाण्याच्या टाक्यांची संख्या कमी करण्यासाठी जास्तीत जास्त पाणीपुरवठा कसा करता येईल. आता आधुनिक तंत्रज्ञान कसे वापरता येईल यासाठी काही योजना केल्या होत्या.आहेत. या योजना अंमलात आणाव्यात. ज्याप्रमाणे डोके मॅडम यांनी महिलांसाठी काही योजना सांगितल्या. इथे जेंडर बजेट ठेवले आहे. रु.२९ कोटींची तरतूद ठेवली आहे. महिलांसाठी ज्या तरतूदी केल्या होत्या, त्या मुळात खर्ची झाल्या नाहीत. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा रु.२९ कोटी इतकी तरतूद करतोय. निश्चितच सामान्य नागरीकांना कसा फायदा होईल याचा विचार केला पाहीजे. ईडब्ल्यूएससाठी रु.१३३ कोटी तरतूद केली आहे. परंतू मुळातच १३,५०० घरांपैकी ६७२० घरे बांधून पूर्ण केली जात आहेत. हा प्रकल्प इथे अर्धवट अवस्थेत आहे. जी ३३३ कोटी तरतूद केली आहे. मग राहिलेल्या लोकांना इथे घरे देणार आहोत का याचा खुलासा करावा. केवळ लोकांना स्वप्न दाखवून फसवणूक केले जाणार आहे का याची माहिती आयुक्त साहेबांनी सभागृहाला द्यावी. बीएसयूपी – ही योजना शहरातील गरीबांसाठी आहे. त्यासाठी रु.६७८ कोटी तरतूद केली आहे. ही उद्योगनगरी आहे. इथे कामगार मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. बेस्ट सिटी हा पुरस्कार आपल्या शहराला मिळाला आहे. तरीसुद्धा आपल्याला अजूनही हे शहर झोपडपट्टी मुक्त शहर करता आले नाही. हे प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत त्यामुळे झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आपण तरतूद केली आहे. ही तरतूद आपण खर्ची करणार आहोत का नाही याची देखील माहिती द्यावी. परदेशी साहेब आयुक्त असताना आपण सांस्कृतिक धोरण राबवायचे ठरवले. त्यासाठी अंदाजपत्रकात रु. २५ लाख इतकी ढोबळ तरतूद केली होती. आपल्याकडे मंडप टाकण्यासाठी देखील पुरणार नाही, त्यामुळे शहरातील सांस्कृतिक चळवळ वाढणार नाही. सांस्कृतिक धोरण राबविताना सांस्कृतिक उदासिनता वाढून सांस्कृतिक चळवळ संपल्याशिवाय राहणार नाही. यासाठी मोठ्या प्रमॉणात बजेट द्यावे अशी विनंती

करतो. बीआरटीबाबत पिंपरी चिंचवड शहरात निगडी-दापोडी पर्यंत बीआरटी रस्ता याबाबत लोकमत पेपरमध्ये मोठी बातमी आली होती. तिथे काम चालू आहे. अतिशय संथ गतीने काम चालू आहे. मुळात हा प्रकल्प अतिशय चुकीचा आहे. मोठमोठ्या रस्त्यांवरुन लोकांना फिरायची सवय लावल्यानंतर रस्ता बीआरटीमुळे अरुंद होणार आहे. रस्त्याच्या कडेला फेरीवाले व इतर व्यावसायिक असतात. त्यामुळे रस्ता अरुंद होतो आहे. अपघातांचे प्रमाण वाढते आहे. बीआरटीत अपघात झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात वाहनांची कोंडी देखील होणार आहे. या बजेटच्या माध्यमातून इथे विनंती करतो की, वॉर्डातल्या विकास कामांकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे.

**मा.अरुण बो-हाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन २०१४-१५च्या बजेटच्या निमित्ताने ज्येष्ठ सदस्य नारायण बहिरवाडे यांनी विस्तृत विवेचन केले आहे. हे मुद्दे वगळून एकूण या बजेटकडे पाहीले तर नवीन काही गोष्टी यात आहेत असे वाटत नाही. हे सत्य देखील आहे. वर्षानुवर्षे करत आलेल्या भांडवली तरतुदी या पुर्णत्वास जात नाहीत. आणि हेच आकडे पुढे पुढे दिसतात. यात कधीतरी सुधारणा होणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब आपण नवीन आहात. या शहराचे ६ प्रभाग आहेत, पूर्वी ४ प्रभाग होते. वरवर पाहिलेतर सरासरी ज्या तरतुदी केलेल्या आहेत, त्या जवळपास प्रत्येक प्रभागाला सारख्याच तरतुदी दिसतात. तरीपण सखोल पाहिलेतर जुन्या पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर फार विशेष अशा तरतुदी किंवा योजना यात दिसत नाहीत. विशेषतः जी नवीन गावे समाविष्ट करण्यात आली, इंद्रायणीच्या पट्यातील तळवडे असेल, चिखली असेल, मोशी असेल, डुडुळगाव असेल, आपण पाहिलेतर या गावांसाठी काय तरतुदी आहेत. हा विकासाचा समतोल आपल्याला साधता येईल का नाही. मागील वर्षीदेखील या विषयावर हिच टिप्पणी आम्ही केली होती. या विभागांत दवाखान्याची तरतूद नाही. वाचनालयाची देखील तरतूद नाही. नाव घ्यावे असे विशेष काहीच नाही. पर्यटन विकास आराखडा, खरेतर आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्किटेक्ट श्री. पी. के. दास यांना काम दिले होते. त्यांना पिंपरी चिंचवड शहराच्या पूर्ण हद्दी दाखवल्यात का नाही. मागील वर्षी देखील आम्ही सांगितले होते, पत्र दिले होते, चर्चा केली होती की,आपल्याकडे काही ऐतिहासिक वारसा असलेली ठिकाणे आहेत. चिखली इथे ऐतिहासिक राजवाडा आहे. परवा भोसरी इथे सुंदर शिवसृष्टीचे उद्घाटन मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. परंतू ज्याठिकाणी ऐतिहासिक ठेवा आहे, त्याचा आपण काही उपयोग करणार का नाही. सरदार जाधव यांच्या घराण्याचा वाडा आहे. शासन व जाधव यांच्यात बोलणी केलीतर काहीतरी होण्यासारखे होईल. वास्तू जतन होईल. ज्यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे रचनाकारांना बोलवतो, त्यावेळी त्यांच्या दृष्टीकोणातून, सल्ल्याने तो परिसर विकसित करता येईल. मोशी इथे विश्वकल्याण सेंटर चालू आहे. आजुबाजूचा परिसर खूप निसर्गरम्य आहे. कै.प्रा.रामकृष्ण मोरे यांनी मोशी इथे सफारी पार्क करायची कल्पना मांडली होती. ती कुठे गेली. परंतू किमान त्या तळ्याचे आधुनिकीकरण कधी पाहिले तर जवळपास १२० वर्षांपूर्वी तिथे वेगवेगळ्या कुलूप किल्ल्यांची तरतूद केली आहे. इतके मेकॅनिझम आहे. त्यासाठी असे काही करता आले पाहिजे. सायन्स पार्कचा प्रकल्प स्वागतार्ह आहे. आरोग्याचा विषय असेल, सांस्कृतिक विषय असेल यासाठी सर्व भागांत तरतूद करणे गरजेचे आहे. हे करत असताना संपूर्ण पिंपरी चिंचवड शहर औद्योगिक शहर आहे. कामगार नगरी आहे. औद्योगिक मंदीचा सुद्धा आपण बजेटवर चर्चा करताना याचा विचार केला पाहीजे. लहान सहान

गोष्टी आहेत. करसंकलन बाबतीत परवादेखील या विषयावर चर्चा झाली आहे. मिळकत कर हस्तांतरण फी, करयोग्य मूल्य १ टक्यावरुन ५ टक्यावर केली आहे. थकबाकी रु.५/- वरुन रु.१००/- करायची तरतूद केली आहे. आकडा छोटा दिसत असलातरी वाढ कितीपट करावी. २० पट वाढ हे असमर्थनीय आहे. पूर्ण बाकी भरली म्हणून बाकी नाही हे सांगण्यासाठी रु.५/- वरुन रु.१०० रुपयावर उडी घ्यायची. प्रामाणिक माणसाच्या खिसा कापत असून तरी निश्चित समर्थन देऊन चालणार नाही. सर्वसामान्य प्रामाणिक माणसाच्या हिताचा विचार इथे करता आला पाहिजे. घनकचरा व्यवस्थापन – ही चांगली योजना आपण करतोय. ही योजना लवकरात लवकर अंमलात आणण्याची गरज आहे. मोशी कचरा डेपोवर बरीच वर्षे चर्चा झाली आहे. मा.नारायण बहिरवाडे मोशी इथे कुत्री पाठवावीत असे म्हणतात. तिथल्या नागरीकांना बाराही महिने किती त्रास होतो आहे. तिथेही चांगले प्रकल्प पाठवावेत. एक दिवस आमच्याकडे मुक्काम करा पाहुणचार घ्या, मग समजेल. मी भल्या पहाटे उठून चालायला जातो, तिथे मोकळ्या हवेत श्वास घ्यायला जातो. पण २/३ कि.मी.मध्ये दुर्गंधीशिवाय श्वास घ्यायला काहीच मिळत नाही. पावसाळा असेल तर अधिकारी सांगतात पावसाळा असल्यामुळे तसे होते. हिवाळा असेलतर हिवाळ्यात दव पडतात म्हणून तसे होते. पण उन्हाळ्यात सुद्धा तशीच परिस्थिती आहे. त्या परिसरात बाराही महिने माशा असतात. जगात इतके आधुनिक तंत्रज्ञान होत असताना कचरा डेपोकडे पाहताना केवळ डेपोचा विचार करु नका तर त्या परिसरातील नागरीकांच्याही आरोग्याचा विचार करा. त्यादृष्टीने तज्ञांची मदत घेऊन काही बदल करता आले, सुविधा देता आलीतर बघा. इंद्रायणी नदीत मोशीमध्ये बंधारा आहे. तिथे बोटींग क्लब करता आला असता. पर्यटनाचे दृष्टीने काही करता आले असते. अतिशय दुर्गंधी त्या पाण्यात येते. हे पाणी कुठे जाते. इंद्रायणी नदी ही पवित्र नदी मानली गेली आहे. आळंदीला अनेक भाविक महाराष्ट्रातून, बाहेरुन वारकरी येतात. ते श्रद्धेपोटी नदीत आंघोळ करतात. हे पाणी दिवसेंदिवस दुर्गंधीयुक्त होत चालली आहे. भाविक श्रद्धेपासून दूर जाऊ लागले आहेत. पाण्यापासून दुर्गंधी येणार नाही, यासाठी महापालिकेने त्यात लक्ष घालण्याची गरज आहे. महापालिकेने दिलेल्या पत्राचे नेमके काय होते. जे जे विषय इथे बोललो आहे. संबंधित विभागाला पत्र दिले आहे. आमच्या पत्रांचे उत्तर येत नाही. पत्र येऊ देऊ नका. पण आयुक्त साहेब, आपण यात जातीने लक्ष घालावे अशी अपेक्षा आहे. ई-गव्हर्नन्स – प्रशासनाच्या व नागरीकांच्या दृष्टीने ही खूप स्वागतार्ह योजना आहे. त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने सर्व कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. वॉर्डवाईज नागरी सुविधा केंद्राकडून सुविधा जेवढ्या लवकर देता येतील तेवढ्या द्याव्यात म्हणजे आधुनिक काळात वेळ वाचवण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल. उद्यानाबाबत – आपल्या शहरी भागात १५४ उद्याने आहेत. परंतू जवळपास १/४ क्षेत्रफळ मोशी, च-होली इथे आहे. त्याठिकाणची आरक्षणे ताब्यात घेऊन मोठ्या प्रमाणात उद्याने विकसित होणे गरजेचे आहे. च-होली, डुडुळगाव, मोशी इथे मोठ्या प्रमाणात कन्स्ट्रक्शन्स सुरु आहेत. कदाचित ४/५ वर्षांत तेथील लोकसंख्या एकदम वाढली असेल. दवाखाने, उद्याने, शाळा तिथे चांगल्या पद्धतीने सुरु होणे गरजेचे आहे. बो-हाडेवाडीत गेले २० वर्षांपासून पाठपुरावा करतोय. आरक्षणे ठेवली आहेत, तिथे शाळा, इमारती व गार्डनच्या दृष्टीने ही आरक्षणे विकसित होणे गरजेचे आहे. तिथे लक्ष घातलेले नाही. सभागृहाच्या समोर या गोष्टी लक्षात आल्या पाहीजेत. खूप अनुभवी तज्ञ नगरसेवक इथे बसले आहेत. विकासाचा वाटा समान झाला पाहीजे. सर्वत्र समान पद्धतीने विकास झाला पाहीजे. नवीन

भागात याचा वाढता जोर गरजेचा आहे. जाताजाता मला विनंतीवजा आवाहन करायचे आहे, शहराची रचना, स्थापना ज्यावेळी झाली, १९५२ साली देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या स्वप्नातून, कल्पनेतून एच.ए. हा औषध कारखाना निर्माण झाला. याला एक परंपरा आहे. आदरणीय कस्तुरबा गांधी यांना पेनिसिलिनचे औषध मिळाले नाही. त्यातच त्यांचा अंत झाला. देशातील गरीब जनतेला कमी दरात विशेषतः पेनिसिलिनचे औषध उपलब्ध व्हावे म्हणून यु.एस.ए.च्या सहकार्याने १९५९ मध्ये पेनिसिलिनचे उत्पादन सुरु झाले. या कंपनीने चांगल्या प्रकारे कामगिरी केली आहे. कुठे भुकंपाचे झटके असतील, चक्रीवादळ झाले असेल, दुष्काळ असेल या कामगारांनी व कंपनीने भरीव स्वरुपाचे योगदान दिले आहे. खरेतर हा राष्ट्रीय प्रकल्प आहे. हा कारखाना अडचणीत आला आहे. शहराची शान आहे. हिंदुस्थान एँटीबायोटिक्स पिंपरीमध्ये आल्यानंतर अनेक कारखाने इथे आले, उद्योगनगरी म्हणून शहराला रुप आले. आज असणारी हिंदूस्थान एँटीबायोटीक्सची परिस्थिती अतिशय दयनीय आहे. कृषिमंत्री मा.शरद पवार यांच्या माध्यमातून आम्ही केंद्र सरकारकडून मदतीसाठी प्रयत्न करतोय. या शहरात राहणारे सर्व नागरीक व महापालिका यांची नैतिक जबाबदारी ठरते की, या उद्योगनगरीचा पाया असलेल्या या कंपनीला वाचवण्यासाठी काही करता येईल का. या पूर्वीदेखील या कंपनीला वाचवण्यासाठी वेळोवेळी सहकार्य केले आहे. नेतेमंडळींनी देखील सहकार्य केले आहे. महापौर साहेब, मी थोड्या वेळात निवेदन देणार आहे. या महापालिकेच्या वतीने शहरातील औद्योगिक पाया असलेल्या एच.ए.साठी रु.२०० कोटी देण्याची महापालिकेकडून व्यवस्था झालीतर निश्चितच एका राष्ट्रीय प्रकल्पाला योगदान दिल्याचे, महतकार्य केल्याचे पुण्य मिळणार आहे. चांगल्या पद्धतीने, चांगल्या उद्योगनगरीचा पाया असलेल्या या कारखान्याला योगदान देण्यासाठी महापालिकेने आपली भूमिका बजावावी असे मी सर्वांना आवाहन करतो. मला बोलायची संधी दिलीत त्याबद्दल आभार मानतो.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बीआरटी रस्ता करुनही खोळंबा नसूनही खोळंबा आहे. तापकीर नगर इथे बसस्टॉप नाही. दोन वर्षे झाली कामेच होत नाहीत. बीआरटी रस्ता अजून चालू झालेला नाही. काळेवाडी ते पिंपरी पूल इथे डांबरीकरण नीट झाले नाही. ब-याच लोकांचे अपघात होऊन तिथे जीव गेला आहे. तापकीर गार्डन ते विमल गार्डन इथेही रस्त्यात खूप खड्डे आहेत. २ वर्षे झालीत वॉर्डात कामे झालेली नाहीत. ड्रेनेजबाबतीत पाहिले तर घुशींनी उकरलेली ड्रेनेज आहेत. आज इथे ड्रेनेज तुंबले आहे, उद्या इथे ड्रेनेज तुंबले आहे. ड्रेनेजच्या पाईपलाईन व दुरुस्तीचे काम केलेतर ते व्यवस्थित होईल. काही काही वॉर्डांत पाण्याची समस्या जाणवते. लाईटचे पोल बदलायला सांगितले होते ते अजूनही बदललेले नाहीत. बजेट खर्ची पडत नसेल, वॉर्डातली कामे होत नसतील तर बजेटचा काय उपयोग. अर्धा अर्धा तास पाणी येते. पाण्याचे बील मात्र किती येते. २४ तास पाणी देणार आहात, पण २४ तास पाणी कधी देणार ही एक समस्या निर्माण झाली आहे.

**मा.मंदा आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मोशी सारख्या समाविष्ट गावांसाठी पालिकेने दिलेले बजेट अतिशय कमी प्रमाणात दिले आहे. गेल्या वेळी आयुक्तसाहेब श्रीकर परदेशी यांनी सांगितले होते, समाविष्ट गावांना बजेट वाढवून देणार आहोत. त्यामानाने वाढीव बजेट अजिबात दिलेले नाही. ग्रामिण भागाला झुकते माप दिलेले नाही. शेतक-यांची भूमि असलेले हे

गाव आहे. याचा विचार करुन जवळजवळ रु.१० कोटींचे बजेट द्यावे. गावात खूप काही कामे करायची आहेत. झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम पडलेले आहे. बीआरटी रोडचे काम झालेले नाही. काहीच कामे होत नाहीत. पाच वर्षे अशीच निघून जातील. आम्हाला नागरीकांना तोंड द्यावे लागते. म्हणून महापौर साहेब आपण नागरीकांचा विचार करावा अशी विनंती आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रभाग क्र.१६ मध्ये आरक्षण क्र.१७१ मध्ये क्रिडांगण व उद्यानासाठी रु.५० लाखांची तरतूद करावी व आकुर्डी इथे नवीन हॉस्पिटल करायचा ठराव केला आहे. त्यासाठी दहा कोटी निधी मंजूर करावा. आपल्या गावात दवाखाना झाला तर खूप बरे होईल. हा विषय लवकर मंजूर करावा. रु.१० कोटी तरतूद करावी. खंडोबामाळ इथे बससाठी बसावे लागते. आकुर्डी गावात बसस्टॉप नाही. गावात मोकाट कुत्री फिरतात. त्यांचे प्रमाण खूप वाढले आहे. रोज आरोग्य अधिका-यांना फोन करावा लागतो. घुशींचे सुद्धा प्रमाण खूप वाढले आहे. माझा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आज बजेटच्या मिटींगमध्ये सभागृहात चर्चा चालू आहे. गेल्यावर्षी मा.श्रीकर परदेशी साहेब आयुक्त असताना आपण समाविष्ट गावांत मिटींग बोलवली होती. त्या मिटींगमध्ये समाविष्ट गावांना जास्त निधी देण्याचे ठरवले होते. परंतू गेले १२ महिन्यांत समाविष्ट गावांत काहीही काम झालेले नाही. कोणतेही आरक्षण ताब्यात घेतलेले नाही. कोणता रस्ता झाला नाही. जो निधी वाढवून दिला आहे तो निधी खर्च झालेला नाही. त्याठिकाणी हा निधी खर्च करत नाहीत. ज्यावेळी कररुपाने पैसे जमा करतो, त्यावेळी तुमचा निधी सुद्धा आम्हाला नको व आमच्याकडून टॅक्स सुद्धा घेऊ नका. पवार वस्तीतून भरघोस टॅक्स जमा करतो. परंतू त्याठिकाणी आपण किती रस्ते केले याची आपण पाहणी करावी. कुदळवाडीत मोठमोठ्या कंपन्या आहेत. महापालिकेकडे खूप मोठा टॅक्स जमा होतो. परंतू मार्केटमध्ये असेल किंवा पवार वस्ती असेल किती ठिकाणी रस्ते आहेत हे पहावे. नंतर निधी कसा द्यावा याचा आपण विचार करावा. पिंपरी चिंचवड महापालिकेत इंडस्ट्रीयल एरिया आहे. तिथे पवार वस्तीत बीआरटी रस्ता असला तरी तिथे रस्ता केलेला नाही. गावे महापालिकेत समाविष्ट होऊन १६ वर्षे झाली, परंतु मुख्य रस्त्याचे काम झाले नाही. एक गाडी आलीतर दुसरी गाडी पास होत नाही. विरंगुळा केंद्र, हॉस्पीटल, गार्डन तिथे नाही. ८५ एकरचे गायरान ताब्यात घेतले असते तर आज तिथे भविष्यात विविध प्रकल्प उभे करु शकलो असतो. आता हा विषय न्यायप्रविष्ट झाला आहे. हा विषय न्यायप्रविष्ट नव्हता त्यावेळी १४ वर्षांपूर्वी ही जागा ताब्यात घेतली असतीतर हा प्रकल्प उभा राहिला असता. इथे सर्व नगरसेवक सांगतात. आम्हाला नागरीकांना तोंड द्यावे लागते. स्टॉर्म वॉटरचा प्रॉब्लेम होतो, गटरचा प्रॉब्लेम होतो, ड्रेनेजचा प्रॉब्लेम आहे. मा.भाऊसाहेब भोईर यांनी एकदा सभागृहात सांगितले होते, अधिका-यांना रोजच सांगयचे,तिळगूळ घ्या,गोडगोड बोला. आम्हाला राग व्यक्त करायला आनंद वाटत नाही. आम्हाला नागरीकांना तोंड द्यावे लागते. नागरीक काय-काय बोलतात. यासाठीच यांना निवडून दिले आहे का. पहिले कसे दहा/दहा वेळा येत होते. आम्ही नवीन नगरसेवक आहोत. आमचा विचार आयुक्त साहेबांनी, महापौरांनी करावा. इथे जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा. इंद्रायणी नदीची परिस्थिती काय आहे. आपण तिथे व्हिजिट करावी. जो ओढा नदीला जातोय. मोरींची पाहणी करावी. चिखली स्मशानभूमीचा विषय असेल. पर्यावरण

विभागाचे कुलकर्णी साहेब काय करतात. हेच पाणी आळंदीला जाते आहे. तिथे खूप मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक असतात. समाविष्ट गावांत मोठ मोठी कामे आहेत. मी पुन्हा एकदा आवाहन करतो, जर आम्हाला निधी वाढवून द्यायचा नसेलतर समाविष्ट गावांत कोणतेही काम करु नका. आमच्या भागातून कररुपाने कोणताही निधी घेऊ नये.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी बजेट सादर करत असताना सर्वप्रथम नवीन आयुक्त श्री.राजीव जाधव साहेब हे पहिल्यांदा सभेत उपस्थित झाले आहेत. त्याबद्दल माझ्या वतीने, सदस्यांच्या वतीने त्यांचे सर्वप्रथम स्वागत करतो. आयुक्त साहेब नवीन आहेत. खरेतर थोडासा वेळ पाहिजे होता. परंतू त्यांचे आगमन अशा परिस्थितीत झाले आहे, पुढे ऐकून ठेवणे एवढेच त्यांच्या हातात राहीले आहे. ज्यांनी हे केले ते निघून गेले आहेत. हे बोलण्यापाठीमागे उद्देश्य हाच आहे की, नवीन समाविष्ट गावांतील सर्व सदस्यांनी इथे भावना व्यक्त केली. १९९७ साली महापालिकेत १७ गावे समाविष्ट झाली. जवळजवळ १७ वर्षांचा अनुशेष भरुन काढायचा राहीला आहे. सुरुवातीची ३ वर्षे महापालिका क्षेत्रात गावांचे विलिनीकरण करण्यासाठी कोकाटे समिती नेमली होती. ३ वर्षे त्यातच निघून गेली. नंतर निवडणूका लागल्या. मागील ५ वर्षांच्या कालावधीत आम्हाला झिरो बजेट मिळाले. ५ वर्षे अशीच गेली. त्यानंतर शेवटच्या २ वर्षांत अत्यंत अल्प असे बजेट मिळाले. सन २०११-१२ मध्ये मी निवडून आलो. सन्मा.श्रीकर परदेशी यांना मी मागील बजेटमध्ये सुद्धा सांगितले होते, या १७ गावांची भौगोलिक परिस्थिती आपण डोळ्यासमोर ठेवा. १७ वर्षांचा अनुशेष याठिकाणी राहीला आहे. साधा रस्ता, साधे गटार यासारख्या कोणत्याही प्रकारच्या मुलभूत नागरी सुविधा आजपर्यंत या १७ गावांना मिळालेल्या नाहीत. ते डोळ्यासमोर ठेवून आपण याठिकाणी बजेट करा. तशा पद्धतीची भावना स्विकारून चांगले बजेट देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. म्हणजे प्रत्येक भागाला उर्वरीत नवीन हद्दींना चांगले बजेट दिले. परंतू मागील वर्ष अनधिकृत बांधकामात गाजले. अनधिकृत बांधकामे पाडण्यात अधिकारी गुंतले होते. त्यांना कधीही विचारा ते सांगायचे, नंतर फोन करा. अधिका-यांचा सगळा वेळ अनधिकृतच्या गदारोळात, मिटींगमध्येच गेला. प्रत्यक्ष काम करायला संधी मिळाली नाही. एस्टिमेटसुद्धा दिवाळीनंतर ऑक्टोबरला सुरु झाले. प्रत्येक टेंडर डिसेंबर एण्डला ओपन होऊन फायनल झाले. आज सुद्धा हिच परिस्थिती आहे. जे बजेट दिले, त्यात ५० टक्के कामांची वर्कऑर्डरच मिळाली नाहीत. मी तिथे तुम्हाला बोललो. तुमच्या गेस्टहाऊसला मी जाऊन त्या फाईलींवर तुमच्याकडून साईन करायचे काम इथे केले. अधिका-यांत कोणत्याही प्रकारचे गांभिर्य नाही. समाविष्ट गावांतील नगरसेवकांची कामे थांबली आहेत. स्वतःहून कामे करुन घेण्याचा कोणत्याही प्रकारचा दृष्टीकोण त्यांच्यात दिसत नाही. प्रत्यक्षात किती काम झाले. ग्रामीण भागाला रु.१० कोटी बजेट देण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्षात एस्टिमेट मात्र दीड पट झाले. आत्तापर्यंत महापालिकेच्या इतिहासात दीड पट एस्टीमेट कधी झाले नाही. प्रत्येक वेळी दुप्पट एस्टिमेट केले जाऊन दुप्पट काम व्हायचे. आमच्या बजेटमधील काही रक्कम सन्मा.आयुक्तांनी ढापली. त्यानंतर ते कटाकट बोलले. माझ्या भागातले नागरीक सुद्धा मोठ्या प्रमाणात टॅक्स भरतात. त्यानंतर काय झाले, प्रत्यक्षात किती बजेट खर्च झाले तर ३० टक्के. ठेकेदाराचे बील त्याठिकाणी वाटले जाते. त्यापैकी ७० टक्के बजेट रिन्यू झाले व नवीन बजेटमध्ये समाविष्ट झाले. प्रत्येक ग्रामिण भागाला

फक्त अडीच ते तीन कोटी एवढेच बजेट मिळाले. जे पूर्वीच्या जुन्या हद्दीतल्या प्रभागाला मिळाले तेवढेच बजेट मिळाले. मला सांगा, नवीन समाविष्ट भागांत सुद्धा तीन ते साडेतीन कोटींमध्ये सुधारीत डीएसआर रेटप्रमाणे दीड कि.मी. रस्ता होऊ शकतो. यातून १७ वर्षांचा अनुशेष त्यातून खरेच भरुन निघणार आहे का. इतकी आर्थिक असमानता आहे. आयुक्तांनी सांगितले, या वर्षी एलबीटीचे उत्पन्न कमी आल्यामुळे ३०० कोटींची तूट येते आहे. म्हणून तिथे बजेट कमी ठेवले आहे. परंतू एकिकडे सांगतो, एलबीटीमुळे उत्पन्न कमी झाले आहे आणि मोठ-मोठ्या उपक्रमांना डोळ्यासमोर ठेवता. तिथे २००, ३००, ५०० कोटींची तरतूद ठेवता आणि आम्हाला १० कोटी सुद्धा देऊ शकत नाही. महापालिका ही स्वायत्त संस्था आहे. आपण कधीही आधी कर्ज घेतलेले नाही. केवळ ३०० कोटींसाठी आपण विकास थांबवणार असाल. मा.श्रीकर परदेशी प्रामाणिक, अभ्यासू, शिस्ताबद्ध पण त्यांचा विकासाचा दृष्टिकोण अजिबात चांगला नव्हता. त्यांची भूमिका प्रशासनात योग्य होती. लोकमानसात, परिसरात विकास झाला पाहीजे. हा दृष्टिकोण त्यांच्या डोळ्यासमोर कधीच दिसला नाही. हे प्रत्यक्ष बजेट पाहताना दिसते. रु.३ कोटी निधी ग्रामीण भागाला दिला आहे. त्यातून तिथे १ कि.मी. रस्ता होणार. म्हणून सतरा गावांची अतिशय दूरावस्था भविष्यात होणार आहे. महापालिकेने रु.३०० कोटींची तूट भरुन काढण्यासाठी कर्ज घेण्याची काहीच गरज नाही. महाराष्ट्र शासन कर्ज घेते. भारत सरकार, सगळ्या संस्था कर्ज घेतात. मग आपण ५०० कोटी कर्ज घेऊ शकत नाही का. आपण ही ३०० कोटी तूट भरुन काढली. प्रशासनाच्या दृष्टीने परदेशी साहेब योग्य वाटले, प्रामाणिक सुद्धा वाटले. परंतू शहराचा विकास होत असेल, शहर वाढतेय तर १२०० कोटींचे बजेट २,००० कोटींपर्यंत जायला पाहीजे होते. शहर वाढते आहे, लोकसंख्या वाढते आहे. बजेट मात्र कमी होते आहे. अत्यंत दूर्दैवी, संतापजनक गोष्ट आहे. याचा विचार इथे प्रशासनाने केला पाहीजे पण तसा विचार सुद्धा होत नाही. औद्योगिक मंदीचे कारण सांगितले जाते. परंतू यावर तोडगे काढले पाहिजे. ज्यावेळी अभ्यास करतो, त्यावेळी त्यावर कोणत्या प्रकारची उपाययोजना करता येईल, हे ख-या अर्थाने प्रशासक म्हणून, प्रशासकीय अर्थनीतीचे काम आहे. म्हणून प्रामुख्याने इथे कंपन्या राहतील. एलबीटी व बाकी टॅक्स मिळेल यासाठी आधुनिक क्षेत्रात कोणत्या प्रकारच्या सवलती कंपन्यांना दिल्या पाहीजेत, काय पॅकेज दिले पाहीजे. जर शंभर टक्के आर्थिक मंदी झालीतरी कमीत कमी पन्नास टक्के तरी बजेट मिळेल अशा उपाययोजना त्यांना दिल्या पाहीजेत. हि सगळी परिस्थिती सुधारायचे काम आपले आहे. आपण हे इथे करत नाही. मला सन्मा.आयुक्त साहेबांना सांगायचे आहे, आपण अत्यंत खालच्या पदापासून वरपर्यंत गेलेला आहात. रत्नागिरी इथे आपले काम अतिशय चांगले आहे. आपण अतिशय अभ्यासू आहात. महत्वाची गोष्ट म्हणजे अनुभवी आहात. एखादे काम चौकटीत बसवून कसे करायचे हे प्रश्न सोडवण्यासाठी महत्वाचे आहे. प्रत्येक गोष्टीत कायद्यावर बोट ठेवालतर कोणत्याही प्रकारचा विकास होणार नाही अशी विचित्र परिस्थिती तिथे होईल. विकास साधला जाणार नाही म्हणून माझी आपल्याला विनंती आहे, बफर झोनचा प्रश्न असेल, कचरा डेपोचा प्रश्न असेल, रेडझोनमध्ये सुविधा मिळत नाहीत. याचा याठिकाणी प्रामुख्याने विचार करावा. या १७ गावांसाठी विशेष पॅकेज आपण द्यावे अशी विनंती आहे. आपण महापौर साहेबांबरोबर या १७ गावांमध्ये दौरा करावा. स्थानिक नगरसेवकांबरोबर मोशीपासून सुरुवात करा. या १७ गावांत भेटी द्या. बघा किती वाईट परिस्थिती आहे. या गावांना विशेष पॅकेज द्यावे. जेणेकरुन हा १७ वर्षांचा अनुशेष पूर्ण केला जाईल ही खरेतर

फार मोठी अपेक्षा आहे. श्रीकर परदेशी यांनी केलेले हे बजेट आहे. खरेतर आम्ही अजिबात समाधानी नाही. तिथे संताप व्यक्त करतो. ग्रामिण नगरसेवक नवीन गावांच्या नगरसेवकांच्या वतीने तीव्र स्वरुपात निषेध करतो. पूर्णपणे असमाधानी आहे. महापौर साहेब, हा ग्रामिण पट्टा आमदार मा.विलास लांडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली, अधिपत्याखाली येतो. आपण विचार करावा. च-होलीसाठी रु.४ कोटी, मोशीसाठी रु.३ १/२ कोटी दिले आहेत. यातून १ कि.मी. सुद्धा रस्ता होणार नाही. खरेतर आपण यात लक्ष घाला. आयुक्त साहेब तिथे या. दौरा झाल्यानंतर विशेष पॅकेजची घोषणा करा. याच विषयी ख-या अर्थाने न्याय होईल नाहीतर नवीन गावांतील नागरीकांवर हा प्रचंड प्रमाणात आपल्या प्रशासनाने केलेला अन्याय होईल. आपण मला भावना व्यक्त करायला बोलायला संधी दिली त्याबद्दल आपले मनापासून धन्यवाद देतो.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज बजेटचा विषय चालला आहे. आयुक्त साहेब नवीन आहेत. त्यांनी अभ्यास करायचा होता. या तरतूदी खर्ची का होत नाहीत. प्रत्येक विभागात लक्ष दिले पाहीजे. कामे का होत नाहीत. पुढील वर्षापर्यंत पैसे शिल्लक राहीले नाही पाहीजेत. यात लक्ष दिले पाहीजे. तुमच्या हाताने नवीन घडो हेच सांगणार आहे. एच.ए. कंपनीची परिस्थिती नीट नाही. यात लक्ष द्या. मी प्रत्येक मिटींगला प्रभागातील कच-याचा प्रश्न काढते. आत्ता प्रत्येक नगरसेवकाला त्याच्या वॉर्डातल्या कुत्र्यांचे टेंशन आहे. त्यांची विल्हेवाट लावली पाहीजे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आम्हाला लोकांसमोर जावे लागते. कुत्र्यांचा तोच प्रश्न. फोन केल्यावर कचरा उचलायला गाडी एक दिवस येते नंतर येत नाही. आपण नवीन आला आहात. अभ्यास करा. लक्ष द्या. बजेटमध्ये केलेल्या तरतूदींपैकी किती तरतूद खर्च झाली यात लक्ष घालावे.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन २०१४-१५चे बजेट सभागृहात सादर केले आहे. विशेषतः यातून ग्रामीण भागावर अन्याय केला आहे. ग्रामीण भागातील सदस्यांच्या हे निदर्शनास आणून दिले आहे. या पिंपरी चिंचवड शहराला पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण, एमआयडीसी व आपण अशा तीन अथोरीटी मिळून डेव्हलप करतात. पूर्णतः प्राधिकरण व एमआयडीसी पूर्णतः आरक्षित क्षेत्र महापालिकेकडे जे अनेक ठिकाणी ओपन स्पेस देऊन जे भूखंड आरक्षित आहेत ते मिळेल त्या किंमतीला आपल्याकडे हस्तांतरीत करतात. साहजिकच त्या वॉर्डातले नगरसेवक हे प्लॉट डेव्हलप करण्यासाठी प्रयत्न करतात. अशी परिस्थिती असताना अनेक ठिकाणी प्लॉट आहेत म्हणून त्यांना बजेट देणे आणि बजेटमधील संतुलन बिघडवणे हे पिंपरी चिंचवड महापालिकेत जी समाविष्ट गावे आहेत, त्यांच्याबाबतीत हे कुठेतरी अन्यायकारक होते. महापालिकेतील ही आरक्षणे ताब्यात घेण्याची प्रोसेस लेन्दी आहे. वादविवाद घडतात. भरपाई देण्याच्या प्रोसेसच्या परिस्थितीत निधी तुटपूंजा पडतो. म्हणून फुकट ताबा घेणे अवघड जाते. जाधववाडीत सन्मा.नगरसेवक मा.राहूल जाधव यांना १६ वर्षे झाल्यानंतर प्राधिकरणाच्या सेक्टर क्र.१६ मधील गार्डन पहायला लागली. ही अतिशय दयनीय परिस्थिती आहे. जाधववाडीतील आबालवृद्धांनी, नागरीकांनी मोकळी हवा घेण्यासाठी तिथे २ कि.मी. येणे हे कितपत योग्य आहे. अशा ग्रामिण पट्ट्यातील आरक्षण क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी निधी वापरुन ती विकसित करणे गरजेचे आहे. जकात विभागाचे प्रमुख डॉ.माने यांनी मागील आठवड्यात बातमी दिली, एलबीटीचे

उत्पन्न दर न वाढवल्यामुळे घटत चालले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी औद्योगिक क्षेत्रातला एक लघु उद्योजक असल्यामुळे ज्यावेळी जकात समानीकरणाचा प्रस्ताव या सभागृहापुढे आला होता, त्यावेळी कोणतेही उत्पन्न घटणार नाही. दरवर्षाप्रमाणे जकातद्वारे उत्पन्न मिळणार आहे. असे आम्हाला चित्र स्पष्ट केले होते. त्यामुळे समानीकरणामुळे हे उत्पन्न आहे हा जकातीचा पार्ट झाला. पण एलबीटीमुळे जे उत्पन्न घटले आहे याला विविध कारणे आहेत. सध्या औद्योगिक मंदीचा जोर अतिशय आहे. केंद्र सरकारने बजेटमध्ये २ ते ६ टक्के एक्साईज ड्युटीत कपात केली आहे. हे केवळ उद्योग मंदीतून सावरण्यासाठी ही सवलत दिली आहे. पुढील वर्षी उद्योग मंदीतून पूर्णतः उद्योग बाहेर पडतील असे चित्र अजिबात नाही. त्यामुळे आपले सुद्धा एलबीटीचे उत्पन्न ५० ते १०० कोटी घटण्याची शक्यता निश्चित आहे. बाहेरुन माल येतो त्याला १२ टक्के एक्साईज होता तो आता १० टक्के येतो, त्यामुळे उत्पन्न निश्चित घटणार आहे. म्हणून इतर ठिकाणी उत्पन्नाचे स्त्रोत शोधावेत. अभियांत्रिकी क्षेत्रात फार खराब परिस्थिती आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रावर जादा बोजा टाकू नये. इतर मार्गांसाठी व्यापारी वर्ग असेल, औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधी असतील, व्यावसायिक प्रतिनिधी असतील स्वतंत्र बैठक घेऊन उत्पन्न कसे वाढवता येईल, विकासाचा समतोल कसा साधता येईल याचा निश्चित विचार करावा. यासाठी दर वाढ करुन उत्पन्न वाढवणे म्हणजे सोन्याची कोंबडी कापण्याइतके आहे. कारण विकास कामे प्रत्येक वॉर्डात व्हावीत अशी प्रत्येकाची इच्छा असते. आपल्याकडे मोठ मोठे प्रकल्प आहेत. या दृष्टीने आपले कलेक्शन वाढवणे गरजेचे आहे. परंतू औद्योगिक क्षेत्रातील परिस्थिती निश्चित आपल्या वॉर्डात असेल तर आपण अभ्यास करुन याबाबतीत काम करावे. आत्तापर्यंत काही कामांच्या वर्कऑर्डर बाकी आहेत, त्यामुळे कामाला विलंब होतो. म्हणून गती घेऊन पुढे आचारसंहिता लागणार म्हणून इलेक्शनच्या कामात कर्मचारी गुंतून पडतील म्हणून टेंडरींग प्रोसेस करुन कामांना कशी गती देता येईल. अद्याप वर्कऑर्डर आलेल्या नाहीत. आचारसंहितेत कामे अडकली तर आम्ही नागरीकांपुढे काय तोंड घेऊन जाणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आपल्याकडे टेंडर चालू करायचे आहे. त्याचे कामकाज तत्परतेने चालू करावे. साधारणतः मे, जून २०१४ पर्यंत वॉर्डातली विकास कामे कशी होतील याची दक्षता घ्यावी.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,संगणक प्रशिक्षणासाठी आपण ३ योजना लागू केलेल्या आहेत. त्यासाठी ४.८९ कोटी आहेत. ही रक्कम तशीच जाते. संगणक प्रशिक्षण होत नाही. दोन वर्षात एकदाही एमएससीआयटीचे प्रशिक्षण सुरु केले नाही. हे प्रशिक्षण सुरु करण्यासाठी खूप प्रयत्न केले. आयुक्त साहेबांनी यात नक्की लक्ष देऊन नागरीकांना प्रशिक्षणाचा लाभ होईल याकडे लक्ष द्यावे. एक हेक्टर क्षेत्रात उद्याने विकासित करणार आहेत. माझे असे मत आहे, पिंपरी चिंचवडमध्ये आमच्या १७/१८ वॉर्डांत उद्यानेच नाहीत. ज्या जागांवर आरक्षण असेल ती आरक्षेणे ताब्यात घेऊन लवकरात लवकर उद्याने विकसित करावीत. स्थापत्य विषयक – बीआरटी कस्पटे वस्ती ते रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी फ्लायओव्हर ब्रीज करणार आहोत. काळेवाडीत नवीन शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिकतात. बीआरटी रस्ता क्रॉस करायचा म्हटलेतर आत्ता सुद्धा खूप अपघात होतात. याचाही विचार करावा प्राधिकरणाची तिथे जागा आहे. त्यांना विनंती करुन तिथे फ्लायओव्हर किंवा उड्डाणपूल त्यांच्याकडून करता आलातर तिथे करावा ही आपल्याला विनंती

आहे. आपण बजेट केले आहे, ते खर्च झाले पाहीजे. आत्ताच आयुक्त साहेबांनी सांगितले, अजूनही वर्क ऑर्डर नाहीत. अजून कितीतरी कामे आहेत. प्रत्यक्षात पाहिलेतर वर्कऑर्डर झालेल्या नसतात. सद्या झालेल्या नसतात. आचारसंहिता लागली. सगळ्या वॉर्डातल्या वर्क ऑर्डर कराव्यात व कामाचा आदेश द्यावा एवढीच विनंती करते.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बजेटचा विषय बोलताना एवढेच सांगेल, कालच नाशिक फाटा उड्डाणपूलाचे उद्घाटन झाले. सगळे नागरीक म्हणतात, आम्हालाही वाटते, कुठे फॉरेनमध्ये चालल्यासारखे वाटते. पण च-होली, तळवडे इथे गेलोत तर रत्नागिरीत आल्यासारखे वाटते. आधीच्या आयुक्त साहेबांना सांगितले होते, तुम्ही आमच्या गावांना व्हिजिट द्या. आयुक्तांना पत्र देऊन देऊन कंटाळा आला. त्यांची बदली झालीतरी ते काही आले नाहीत. गेल्या वर्षी जे बजेट आपण आम्हाला दिले होते. नवीन गावांसाठी वाढीव दिले होते. वाढीव म्हणता येणार नाही. लो बजेट दिले होते. त्यातले फक्त १० टक्के खर्ची झाले आहेत. त्यातून मला वाटत नाही, कोणते मोठे काम झाले असेल. विनंती आहे. आम्हाला पूर्वीची ग्रामपंचायत दिली तर बरे होईल. इतकी बेकार परिस्थिती आहे. आमच्याकडे जाण्यासाठी रस्ते नाहीत. डांबरीकरणाची कामे नाहीत. बो-हाडेवस्तीवर जायला रस्ता नाही. च-होली इथे क्षेत्र एवढे आहे की, १० प्रभाग होतील. एवढ्या प्रभागांत त्यासाठी रु.३ कोटी कुठे पडले सांगता येणार नाही. माझी कळकळीची विनंती आहे, नगरसेवक होऊन आमचा काही उपयोग नाही. आम्ही पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आहोत असे वाटतच नाही. भोसरीला आल्यानंतर वाटते, आम्ही महापालिकेत आहोत. विषय करता येत नसेलतर आम्ही नवीन गावातील सर्वजण मांडी घालून बसणार. आम्हाला केवढा त्रास होतो, आमच्या भागांत काहीच प्रोजेक्ट नाहीत. एकही नवे काम नाही. मी परदेशी साहेबांना पुणे-आळंदी रस्ता होण्यासाठी तुम्ही फॉलोअप करा म्हणून सांगितले होते. ते सांगतात हा रस्ता आपल्याकडे नाही. पीडब्ल्यूडीकडे येतो. प्रत्येक वाहनाचा सर्वे करा. सगळ्यांत जास्त वाहने पुणे-आळंदी रस्त्याने जातात. सगळ्यात जास्त गरज पुणे-आळंदी रस्ता करायची होती. याचा कोणी पाठपुरावा करत नाहीत. आमदार साहेब प्रयत्न करत आहेत. पण महापालिकेकडून सुद्धा प्रयत्न झाले पाहीजेत. माझी आपल्याला विनंती आहे की, जोपर्यंत आम्हाला निधी वाढवून देत नाहीत, तोपर्यंत आम्ही इथे मांडी घालून बसणार. आम्ही बोलून बोलून थकलो आहोत. दोन वर्षे झाली. पहिले वर्ष बांधकामे पाडण्यात गेले. तुम्ही नवीन बजेट ठेवले. आमचे जुने बजेट घेऊन तेच फिगर वाढवून दिले आहे. आमची मूळ तरतूद असते. दुस-या ठिकाणी कामे झालेतर नवीन बजेटमध्ये तरतूद करुन दिली जाते. मग पूर्वीचे बजेट कुठे गेले, खर्ची झाले नाही. बजेटची सुद्धा पळवापळवी होते. आमच्या प्रभागातल्या बजेटची पळवापळवी होते असे झाले नाही पाहीजे. पहिल्या वर्षी नवीन असल्यामुळे आम्हाला काही समजलेच नाही, आमचेच बजेट झाले. आम्हाला इथे शब्द दिला पाहीजे, नाहीतर मी इथे मांडी घालून बसणार आहे. महापौर साहेब, तुम्ही आम्हाला शब्द द्या. आयुक्त साहेब, तुम्ही आम्हाला उत्तर द्यावे.

**मा.राजीव जाधव (मा.महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, जी १७ गावे आहेत, तेथे इमिजिएटली येत्या १० दिवसांत सगळी गावे नाही म्हणणार पण एक/एक गाव बघायला मी स्वतः सुरुवात करणार आहे. च-होली गावाला किती रक्कम दिलीतरी कमीच पडणार

आहे. मोठा एरिया आहे. या भागाचे दोन भाग करुन अत्यावश्यक कामे आधी घ्यावीत. जे फारच अडचणीचे आहे ते आधी घेऊ.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जागा ताब्यात नसतील तर त्या घेण्यासाठी तुम्ही प्रयत्न का करत नाहीत. रस्त्यांच्या जागा ताब्यात घेणार नाहीत का. विशेष पॅकजमधून ज्या निविदा दिल्या होत्या, त्यांची टेंडर का काढली गेली नाहीत. ते वर्ग करुन दुसरीकडे द्या असे सांगितलेतर ते म्हणतात, दुसरीकडे वर्ग होणार नाही. या तरतूदी खर्ची सुद्धा होत नाहीत. ठेकेदाराला सगळ्यात जास्त बिलो म्हणजे ३८ टक्के बिलो काम दिले, तो इथे काय काम करणार आहे. एका-एका ठेकेदाराने पन्नास कामे घेतली आहेत. अधिका-यांना आम्हाला फोन करावा लागतो. आम्हाला अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागते. लवकर काम करा सांगितले तरी, नऊ महिने कामाची मुदत होती असे तो ठेकेदार म्हणतो.

**मा.राजीव जाधव (मा.महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सन्मा. सदस्यांनी जो विषय मांडला, त्यावरुन दिसते, ग्रामिण भागात जास्त प्रश्न आहे. ग्रामिण भाग शहरी भाग अशी दुटप्पी भूमिका घेता येणार नाही. आधी सगळ्या भागांत तुमच्यासोबत फिरतो. शक्यतो महत्वाच्या गोष्टी लवकर करता येतील. आपल्याकडे विशेष तरतूद आहे. छोट्या छोट्या कामांसाठी काही हरकत येणार नाही.

**मा.अजय सायकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर गेल्यावर्षी मी समाधान व्यक्त केले होते. पण काहीही बजेट खर्ची झाले नव्हते. मी माझ्या प्रभागाबद्दल बोलणार आहे. सेक्टर २० मध्ये भाजी मंडई आहे. तिथे २ वर्षांपासून तरतूद केली जाते आहे पण ती खर्च होत नाही. त्याचे एस्टिमेट होत नाही, त्याची टेंडर प्रोसेस होत नाही. पुढे कामच होत नाही. प्र.क्र.४ मध्ये चिखली मैला शुद्धीकरण प्रकल्पात गार्डनचे काम चालू आहे. टप्पा १ व २ यासाठी तरतूद होते. पण काहीच एस्टीमेट नाही. काहीच काम होत नाही. आत्ता मा.सुरेश म्हेत्रे यांनी सांगितले, जर काही ठिकाणी प्लॉट असतात, तिथे बजेट दिले जाते. माझ्या वॉर्डात प्राधिकरण असल्यामुळे प्लॉट असतात, त्यांचे डिक्लेरेशनही झालेले असते. जागा ताब्यात घेण्यासाठी अडचण येत नाही म्हणून गेल्या वर्षी जास्त बजेट मिळाले होते. त्यातून तिथे गजानन म्हेत्रे उद्यान विकसित झाले होते. दवाखाना विकसित झाला होता. तुम्ही तुमचे प्लॉट ताब्यात घेण्यासाठी प्रशासनाला मदत करावी. गेल्या वर्षी बजेट मिटींगमध्ये बोललो होतो, सुलभ शौचालयासाठी स्पाईन रोड भागात जागा सुचवली होती. एक वर्ष झाले, त्यावर काहीच कारवाई झाली नाही. आमच्या भागात कुठेही सुलभ शौचालय नाही. या गोष्टीचा विचार करुन बजेटमध्ये समाविष्ट करुन घ्यावे.

**मा.संगिता भोंडवे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नव्याने विकसित रावेत भागात नागरी सुविधा नाहीत. रुग्णालय, शाळा, उद्यान, वाचनालय नाही. बजेटमधील तरतूद कमी आहे ती वाढवून मिळावी. विरोधी पक्षाचा वॉर्ड म्हणून आमच्यावर अन्याय होऊ नये. आयुक्तांनी लक्ष द्यावे. एक/एक गाव बघणार आहात तर पहिला १९ क्रमांकाचा वॉर्ड बघा. आयुक्त साहेबांनी यात लक्ष द्यावे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज आपण सगळेजण बजेटवर ऊहापोह करतोय. बजेट म्हटलेतर सर्वसामान्य नागरीकांना काय लागते या हिशोबाने ते झाले पाहीजे. या वर्षाचे बजेट व गेल्या वर्षीचे बजेट पाहिलेतर दोन्हीमध्ये काहीच फरक नाही. हे बजेट सर्वसामान्यांसाठी नाही. महिला व ज्येष्ठ नागरीकांसाठी यात कोणत्याही प्रकारच्या योजना नाहीत. बरेच जणांचा वॉर्ड विकसित वॉर्ड असला तरी ब-याचशा नगरसेवकांना जेणेकरुन नवीन नगरसेवकांना वाटते, अजून विकास कामे झाली पाहीजेत. ज्यावेळी शहरात विकास योजना राबवतो, विकास कामे करतो हा आपला मानबिंदू म्हणायला पाहिजे. हे करता करता छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. वायसीएमसारखे मोठे अद्ययावत हॉस्पीटल आपल्याकडे आहे. जर आपण बघितले तर आरोग्य हा पिंपरी चिंचवड नगरीचा कणा आहे. आरोग्य नीट असेल तर सर्वसामान्य नागरीक नीट राहणार आहे. ७०० बेडचे हॉस्पीटल असेलतर तिथे स्टाफ २५० आहे २५० स्टाफ कुठपर्यंत लोकांची सेवा करणार आहे. फॉरेन्सिक लॅब तिथे नाही. ज्या पद्धतीने लोक ये–जा करतात. ॲम्ब्युलन्ससाठी कोणतीही शेड बांधलेली नाही. वेटींग रुमचे काम करतोय. पार्किंग व्यवस्था व्यवस्थित नाही. वायसीएम समोरचा भाग बघितला तर तिथे दुतर्फा, समोर गाड्या लागल्यामुळे ट्रॅफिक जाम होते. वायसीएममध्ये बहुमजली अद्ययावत पार्किंग असणे महत्वाचे आहे. सगळे जण ओरडतात. आमच्याकडे विकास कामे होत नाहीत. असा प्रस्ताव मांडायला हरकत नाही की, आमच्या भागात,तुमच्या प्रभागातून ज्या पद्धतीने वसूली करता, कर गोळा करता. त्याच पद्धतीने त्या त्या प्रभागांत काम व्हावे. त्याप्रमाणे योजनांचे प्रस्ताव मांडा. आमच्या सगळ्या करदात्यांची ओरड असते, आम्ही कर देतो मग आमची कामे का होत नाहीत. ज्या पद्धतीने वसुली करणार असाल, त्या पद्धतीने विकास कामे व्हावीत. ब-याचशा वॉर्डांत आपल्या महिला साफसफाई कामगारांसाठी आरोग्य कोठ्या नाहीत. त्यामुळे या महिलांची कुचंबणा होते. या महिला कर्मचा-यांना कपडे बदलणे, त्यांच्या जेवणखाणाची, स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्यामुळे या आरोग्य महिला कर्मचा-यांच्या आरोग्याची फार कुचंबणा होते. या गोष्टी विचारात घ्याव्यात. त्या पद्धतीने आपण पुढील वर्षी बजेट तयार करताना सर्वसामान्यांचा विचार करावा ही विनंती करते.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मी आपले आभार मानते. मी स्थायी समितीमध्ये बोलताना सांगितले होते, बजेटमध्ये हेडला प्रोव्हिजन करा. मी विरोधी पक्षात असल्यामुळे मान्य केले जाणार नाही हे मला माहित होते. ख-या अर्थाने बजेट करत असताना बजेट असे असायला हवे होते, असे करायला पाहिजे होते. मग बजेट कोणी केले हा देखील प्रश्न पडतो. जसे पिंपरी चिंचवडमध्ये अनेक आयुक्त येऊन गेले. मा.दिलीप बंड यांच्यासारखे आयुक्त आले. त्यांनी बंड पुकारल्यासारखी वाट्टेल तशी कामे केली. नियम धाब्यावर बसवले. आर्थिक कोंडी केली. आपली आर्थिक गाडी इतकी घसरली की ती त्यांना सावरता आली नाही. लंडनमधून अर्थशास्त्राचे पदवीचे शिक्षण घेऊन आलेले मा.आशिष शर्मा यांना बोलवावे लागले. मा.आशिष शर्मा आले, त्यांनी अतिशय सुंदर पद्धतीने या शहराची पिंपरी चिंचवड महापालिकेची आर्थिक घडी व शहराचा विकास हा दुहेरी पाया चांगल्या पद्धतीने जपायचा प्रयत्न केला. त्यांनी त्यावेळी लॉकींग बजेटचा नवा पायंडा घातला. आर्थिक मंदी असताना निश्चितपणे सगळ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. गेले ३/४ वर्षांपासून अर्थसंकल्पात महापालिकेत काढलेल्या लॉकींग बजेटच्या पायंड्यामुळे

निश्चितपणे सर्व नगरसेवकांना समसमान न्याय देण्याचा प्रयत्न त्याठिकाणी करण्यात आला. त्यानंतर आलेले आयुक्त मा.श्रीकर परदेशी हे व्यवसायाने डॉक्टर असले तरी, आयएएस झालेले, महापालिकेची धुरा सांभाळल्यानंतर आज जरी ते बदली होऊन गेले असले तरी, त्यांनी विचार केला की, मा.आशिष शर्मा यांनी इथे लॉकिंग बजेट मांडले असेल, महापालिकेची रुळावरुन घसरलेली गाडी रुळावर आणण्यासाठी आपण त्यांच्या गोष्टीचे अनुकरण का करु नये. म्हणून निश्चितपणे डॉ.श्रीकर परदेशी यांनी त्यांच्या या गोष्टींचे अनुकरण केले आहे. ब-यापैकी नगरसेवकांना समान न्याय मिळाला आहे. इथे प्रत्येक नगरसेवकाकडून म्हटले गेले आहे की माझ्या प्रभागातील बजेट काहीच खर्ची झाले नाही. माझ्या प्रभागात पैसे आले नाहीत, माझ्याकडे तरतूद केली गेली नाही. परंतू मला हे कळाले नाही. मी लेखा विभागाला विचारले होते, शिल्लक किती राहीले आहे. बजेट किती कोटींचे होते. साधारणतः २०२४ कोटींचे बजेट होते. त्यातील फक्त ९० कोटी शिल्लक राहिले आहेत. ते सुद्धा १५ दिवस आधी. त्यातील ३०/३५ कोटी नक्कीच खर्च होतील. साधारण ३०/३५ कोटी शिल्लक राहतील. विकास कामे झाली नाहीत मग श्रीकर परदेशी बजेट घरी घेऊन गेलेत काय. त्यांचे २/४ महिने ट्रेनिंगमध्येच गेले. त्याची त्यांचा १८ महिने कालावधी पूर्ण करत असताना अत्यंत चांगले वाखाणण्याजागे प्रयत्न त्यांनी इथे केला. त्यांनी खरेतर कायदेशीर, अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी केली. हे सांगायला अत्यंत आनंद वाटतो, कायदा काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. ज्या बंड साहेबांनी कायदा तुडवला, त्यात महापालिकेत श्रीकर परदेशी साहेबांनी कायद्याची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे हे दाखवले. ज्यावेळी आयुक्त अंमलबजावणी करतो, हे त्यावेळी घेण्याजोगे आहे. त्यांची शिस्त, पारदर्शक कारभार, कामे वेळेत पूर्ण करणे हा स्वतःबरोबर इतर अधिका-यांना देखील शिस्त लावायचा प्रकार आहे. त्यांना कालावधी कमी मिळाला. ते कसे बळी पडले हे सर्वज्ञात आहे. तरीसुद्धा त्यांनी पिंपरी चिंचवड शहराची चांगली प्रतिमा संपूर्ण महाराष्ट्रात, राज्यात, देशात उभी केली की, जेणेकरुन अनेक राज्यांतील लोक पिंपरी चिंचवड महापालिकेकडे बघताना चांगला दृष्टीकोण ठेवून बघतात. श्रीकर परदेशी यांनी अत्यंत स्वच्छ, पारदर्शक काम करणारी महापालिका म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेने ओळख निर्माण केली आहे. अत्यंत श्रीमंत महापालिका असे म्हटले जायचे. त्याच महापालिकेला शिस्तप्रिय, पारदर्शक काम करणारी महापालिका म्हणून ओळखण्याचे कौतुकास्पद नाव लावले आहे. एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. एका व्यक्तीने काम करत असताना सामान्य नागरीकांचे सुद्धा ऐकले. सदस्यांचे सगळे ऐकतात. महापौर ऐकतात. एकमेकांच्या बरोबर काम करतो. परंतू आयुक्त म्हणून मी देखील करदात्यांचे काही करणे लागतो. माझे काही कर्तव्य आहे. यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. समाजातील उच्चभ्रू लोकांना नगरसेवकांबरोबर जाणे आवडत नाही. म्हणून त्यांनी आमच्या उंब-यापर्यंत त्यांनी आलेच पाहीजे असा हट्ट असण्याची गरज नाही. आयुक्त किंवा सन्मा.अधिकारी त्यांचे काम करत असतील, आपण सारथीसारखी हेल्पलाईन सुरु केलीत. आयुक्त साहेब, तुम्ही आयएएस आहात. तुमची डिग्री, पोस्ट हे तुम्हाला स्पर्धा परीक्षेतून मिळतात. पिंपरी चिंचवड शहरातील विद्यार्थी कुठेही स्पर्धा परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून बजेटमध्ये यूपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्रे यासाठी भरीव तरतूद केली आहे. तुम्ही कासारवाडीत स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करत आहात. आपण मुलांना १०वी पर्यंत मोफत शिक्षण देतो. मुलांना सवय लागावी त्यासाठी यशस्वी प्रयत्न करायला लागले आहे. त्यांच्यामाध्यमातून केला जाणार होता. त्यांनी चुकीच्या कामावर

चांगल्या पद्धतीने तुमचा ठसा उमटवला होता. कोणीही सदस्य १० वेळा चुकीचे काम घेऊन जात असेल तर आदरयुक्त भिती म्हणा किंवा शिस्तीने काम करायची पद्धत म्हणा चुकीच्या खर्चावर चांगल्या पद्धतीने आळा घातला होता. आज श्री.राजीव जाधव नवीन आयुक्त म्हणून आपल्यासमोर आलेत. प्रत्येक व्यक्ती परिपूर्ण कधीच नसतो. परदेशी साहेबांनी ठरवलेल्या गोष्टी केल्या नसतील त्या पूर्ण करता आल्या नसतील, त्या पूर्ण करण्यासाठी तुम्ही आमच्या समोर आहात. मा.महिला बालकल्याण विभागामध्ये महिलांच्या प्रशिक्षणावर रु.८ कोटी खर्च केला तरी आपल्या महापालिकेच्या हाती काय लागले याचा हिशोब, याचा विचार आपण कधीतरी केला पाहीजे. त्याचबरोबर संगणक प्रशिक्षणावर साधारणतः रु.४,८९,००,०००/- खर्च केला तरी खरेच किती लोकांना संगणक प्रशिक्षण दिले याचा देखील विचार करणे गरजेचे आहे. महिला बालकल्याणमध्ये अट टाकली होती, ज्या ज्या महिलांना प्रशिक्षण दिले आहे, त्यातील काही टक्के महिलांचे सक्षमीकरण करणार आहोत. त्यांना स्वतःच्या पायावर उभे करायचे काम करणार आहोत. नम्र विनंती करते, याचा नक्की आढावा घ्यावा. परंतू तसे करण्यात आलेले नाही. स्काडा योजना राबवायला आमचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. नागरीकांना २४ तास स्वच्छ पाणी मिळाले पाहीजे. त्यात होणा-या चुकीच्या गोष्टी, निविदा करत असताना कोणत्या प्रकारच्या अटी टाकल्या जातात, कशा प्रकारे एखाद्या व्यक्तीला समोर ठेवून कामकाज चालते याकडे लक्ष दिले पाहीजे. नागरीकांनाही सवय लागली आहे. २४ तास पाणी नसलेतरी चालेल, आधी प्रेशरने पाणी द्यायला सांगा. प्रेशरने पाणी द्या. तासन तास पाणी भरायचे काम महिलांना करावे लागते. नोकरी करणा-या महिला आहेत. आपण २४ X ७ चे स्वप्न दाखवतो. काही गावांत एक वेळ पाणी येत नाही. तर कुठे दोन वेळचे सुद्धा पाणी येत नाही. आणि आपण २४ X ७ चे स्वप्न दाखवतोय. स्वप्न बघायला हरकत नाही. स्वप्ने कायम उच्च असली पाहीजेत. परंतू ती पूर्ण करण्यासाठी कुठेतरी बेस असला पाहीजे. त्या दृष्टीने विचार करावा. आपण लोकांना २००६-२००७ मध्ये पाण्याचे नळांना मीटर लावत असताना रु.६५ कोटी खर्च केलात. परंतु सगळ्या प्रभागांतली अवस्था पहा. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकांना पाण्याची बीले येतात. चार माणसांच्या कुटूंबाला रु.६,०००/- बील येते. बील भरले नाहीतर मग नळ कनेक्शन कट करणार, हा तुमचा अधिकार असलातरी त्यांना योग्य बील देणे हा सुद्धा तुमच्या कर्तव्याचा भाग आहे. शिक्षण मंडळासाठी किती कोटी रुपये देतो यावर मला अजिबात बोलायचे नाही. वाट्टेल तेवढे बजेट देतो वर्षानुवर्षे हीच परंपरा आहे. आज तुमच्यासारखे आयुक्त आम्हाला लाभले आहेत. आपण यात अत्यंत बारकाईने लक्ष द्या. पुस्तके वाटा, ड्रेस वाटा, दप्तरे वाटा परंतू एकही काम वेळेत होत नाही. उन्हाळ्यात रेनकोट देतील, पावसाळ्यात स्वेटर दिले जातात. पूर्वीपासून शिक्षण मंडळाचे विसंगत चित्र समोर आणतेय. त्यांच्या दर्जाचा तपास करावा. यापुढील कालावधीत श्री.राजीव जाधव हे सुद्धा चांगले आयुक्त ठरावेत अशी अपेक्षा व्यक्त करते. २६ जानेवारी आलेतरी कित्येक मुलांना ड्रेसचे वाटप चालू होते. मुलांकडे २६ जानेवारीला ड्रेस नव्हते. याठिकाणी जुलै एण्डपर्यंत पूर्ण काम संपले पाहीजे. स्वेटरचे टेंडर कॅन्सल केले होते. परदेशी साहेबांनी सांगितले होते, डिसेंबरपर्यंत वाटप झालेतरच माझी मंजूरी आहे. तरच बील दिले जाईल. जे सामान्य नागरीक कर भरतात. त्यांना चांगल्या पद्धतीने योगदान देणे आपण लागतो. खेळाडू दत्तक योजना – यात आपण चांगल्या पद्धतीने पिकअप घेतला, त्याबद्दल शंका नाही. या योजनेत जी मुले दत्तक घेतो. त्यांना रु.२००/- भत्ता देतो

का एखाद्या कुत्र्याला बिस्कीट टाकतो. त्या खेळाडूला आवश्यक असणारा खुराक देण्यासाठी दोनशे रुपये भत्ता देतो तो सुद्धा कधीही वेळेवर देत नाही. स्टोअरला बील देण्यासाठी चौकशी करावी लागते. मग ते वेळेवर का दिले जात नाही. प्रदूषण – आयुक्त साहेब हा तुमच्या आवडीचा विषय आहे. मला आठवते आहे, मागे तुम्ही म्हणाला होता, पिंपरी चिंचवड शहराचा स्वर्ग बनवायचा आहे, त्यासाठी आधी प्रदूषण बाजूला काढावे लागणार आहे. वातावरणातील प्रदूषण तुम्ही आम्ही थांबवू शकत नाही. किमान नदी प्रदूषण तुम्ही ठरवले तर थांबवू शकता. त्यासाठी निर्धार केला असेलतर थांबवू शकतो. नवीन गावांतील नगरसेवकांनी सांगितले आहे, अनेकांना खरोखरच समस्या भेडसावते आहे. चिखली, च-होली गावात गेलोतर रत्नागिरीत आल्यासारखे वाटते, ही वस्तुस्थिती आहे. निसर्ग जरुर असावा, हिरवळ असावी, परंतू महापालिकेतील जी समाविष्ट गावे आहेत त्यांना सुद्धा चांगल्या सुविधा मिळाव्यात. कचरा डेपोच्या ठिकाणी ओला कचरा, सुका कचरा एकत्रित करतो. तो कचरा जमिनीत डम्प करतो. तिथे जे लिचड आहे ते जमिनीत मुरते व त्यामुळे नदी प्रदूषित होते आहे. नदीच्या पाण्याचे नमूने घेतले होते. त्यावेळी सांगितले होते, हे पाणी शेतीला वापरु शकत नाही. जनावरांसाठी पिण्यासाठी योग्य नाही, इतके दूषित पाणी आपण तयार करतोय. आपण एकिकडे अतिशय अद्ययावत सुविधा देतोय. आपण प्रगती केलीतरी दुसरीकडे आपण त्या पाण्यापाशी उभे राहू शकत नाहीत. इतकी दूर्गंधी त्या पाण्याला येते. या समस्या दूर झाल्याशिवाय राहणार नाही. मा.नितीन काळजे यांनी एकदा कळकळीने, काळजीने सांगितले होते, मी कंटाळलो, थकलो, आमचे गाव ग्रामपंचायतीत पुन्हा समाविष्ट करा. असे सत्ताधारी पक्षातील नगरसेवक म्हणतो. मग आमच्या नगरसेवकांची तर खूप दूरची बात आहे. आयुक्त साहेब, आपण आयुक्त म्हणून कारभार सांभाळत असताना चांगल्या पद्धतीने कारभार कराल यात शंका नाही. तुमच्यावर पुढे आरोप होऊ नयेत की, बजेट वापरले गेले नाही, बजेट खर्च झाले नाही. म्हणून बजेट खर्च करताना आपण निश्चित चांगल्या पद्धतीने खर्ची करावे म्हणून आपल्याला शुभेच्छा देते.

**मा.साधना जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमची नवीन गावे महापालिकेत समाविष्ट झाली आहेत. याचा बजेटमध्ये विचार करावा. सन २०१३-२०१४ चे बजेट गेल्या वर्षी दिले होते. ज्या गावांत काही सुधारणा झाल्या नाहीत, रस्ता असेल, ड्रेनेज असेल, गटर असेल, अंडरग्राऊंड गटर असेल या सर्व कामांना रु.१०,००,०००/- इतके बजेट दिले आहे. त्यातील काही बजेट खर्च का झाले नाही याचा मला अंदाज नाही. अधिकारी सांगतात. बजेट अजून मार्गी लागले नाही. सन २०१४-१५ मध्ये नवीन कामे, अंडरग्राऊंड गटर असेल, पालिकेच्या भूखंडाचे काम असेल, नवीन कामांत प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा, उद्यान, डि.पी. रस्ता ही कामे बजेटमध्ये दिली आहेत. त्यासाठी आरक्षणे ताब्यात घेऊन लवकरात लवकर कामे चालू करावीत. याला जास्तीत जास्त बजेट मिळावे अशी आशा करते. मागे ५/६ महिन्यांपूर्वी आयुक्त साहेबांनी माझ्या वॉर्डात भेट दिली होती. त्यांनी संपूर्ण वॉर्ड पाहिला आहे. व्हिजिट दिल्यानंतर थोडी बहुत कामे झालेली आहेत. बरीचशी कामे मार्गी लागली नाहीत. आपण नवीन आहात. आमच्या गावाला तुम्ही नक्कीच व्हिजिट द्या. मी प्रभाग कार्यालयात पत्रे दिलेली आहेत. सगळी कामे लवकरात लवकर मार्गी लागली पाहीजेत. कुदळवाडी शाळेचे आरक्षण आहे. ज्या गोष्टीसाठी आरक्षण आहे त्याचे काम लवकरात लवकर चालू करावे. जास्तीत जास्त निधी मिळवून लवकरात लवकर कामे व्हावीत अशी

मला आशा वाटते. प्राथमिक आरोग्य केंद्रे, शाळा, उद्यान यासाठी रु.१८ लाख बजेट दिले आहे. हे सर्व बजेट त्याचसाठी मार्गी लागावे अशी आशा करते.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज शहराचे अंदाजपत्रक सादर करत असताना आपल्या शहराकरीता रु.९१ कोटींचे बजेट पाणीपुरवठ्यासाठी दिले आहे. परदेशी साहेब गेलेतरी मी दरवर्षी बजेट मिटींगमध्ये पाणीपुरवठ्याबद्दल बोलतोय. बंड साहेब असताना, परदेशी साहेब असताना सुद्धा बोललो होतो. रहाटणी गावात पाण्याची समस्या आहे. गेले ७ वर्षांपासून तिथे एकवेळच पाणी येते. नागरीकांची ही तक्रार आहे, प्रत्येक वेळी सर्वप्रथम पाणी येत नाही मग बाहेरून पाणी घ्यावे लागते. आपण शहराला ९१ कोटींचे बजेट सादर करत असताना आपण शहराकडे दूरदृष्टीने बघत आहात. अनेक वर्षांपासून आम्हाला एक वेळच पाणी मिळतेय. आपण शहरात अनेक योजना राबविल्या आहेत. पाणी मीटर बसवले. त्यानंतर २ वेळ व्यवस्थित पाणी मिळेल असे सांगितले होते. कितीतरी कोटी खर्च करुनही काहीच निष्पन्न झाले नाही. नवीन स्काडा यंत्रणा आणली. किती किती कोटी खर्च केले. परंतू पाणीपुरवठ्यात काही बदल झाला नाही. मी अपेक्षा करतोय की, कमीत कमी रहाटणी परिसराला तरी २ वेळ पाणी द्यावे. अनेक दिवसांपासून तक्रारी करतोय, त्याची काही इंचापर्यंतही वाढ झालेली नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, कमीत कमी आमच्या भागाला सकाळी चार तास व संध्याकाळी चार तास असे पाणी द्यावे अशी अपेक्षा करतो. आपण नगररचना विभागावर रु.१०० कोटी खर्च करतोय. ७/८ वर्षांपासून रहाटणी मेनरोड इथे १० ते १५,००० स्क्वे. फूट जागा भूसंपादन करायची आहे. मी वारंवार नगररचना विभागात जातो व विचारपूस करतो. ही १० ते १५,००० स्क्वे. फूट जागा का भूसंपादन करत नाही. आम्हाला उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यांच्याकडून काहीही निष्कर्ष झालेला नाही. एकही रस्ता रहाटणी गावात पूर्ण झालेला नाही. महापालिका हद्दीत येऊन आम्हाला १८ वर्षे झालीतरी १२ मी. चा, १८ मी.चा एकही रस्ता पूर्ण झालेला नाही. आमचे विरोधक असतात. जोपर्यंत हे आहेत, तोपर्यंत रस्ता करुन देणार नाही अशी त्यांनी जिद्द बाळगली आहे. अनेक वेळा तक्रार करुनही याकडे दूर्लक्ष केले जाते आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण स्वतः यात लक्ष द्यावे. नगररचना विभागात गेल्यानंतर वेळोवेळी एकच आढळण्यात येते. भदाणे मॅडम यांना ३ ठिकाणचा चार्ज असताना आम्ही नगररचना विभागात गेल्यानंतर दिसून येतो. मॅडम नाशिक इथे आहेत. मॅडम पुण्यात मिटींगला आल्या आहेत. आपल्या नगररचना विभागासाठी सातही दिवस असेल असा अधिकारी बघावा. भदाणे मॅडम यांना दुसरीकडील चार्ज असेल तर तो कमी करण्यात यावा नाहीतर आपल्याला दुसरा अधिकारी देण्यात यावा. भूसंपादनाची कारवाई वेळेत कशी होईल याकडे लक्ष द्यावे. बीआरटी रस्त्यांना आपण प्राधान्य देतो. आतल्या रस्त्यांचा सुद्धा विकास झाला पाहीजे. नागरीक विचारणा करतात, गेले कित्येक वर्षे झाली तुम्ही नगरसेवक असताना तुम्हाला एकही रस्ता पूर्ण करता येत नाही. आम्ही प्रयत्न करतो पण आमच्या प्रयत्नांना यश येत नाही. रहाटणी मेनरोडवर मी अनेक नागरीकांना रिक्वेस्ट करुन त्या रस्त्यावरील अतिक्रमण होते ते काढून घेतले आहे. लोकांनी जागा सुद्धा ताब्यात दिली होती. आम्ही १० ते १५ फूट रस्त्याने जाऊ शकत नाही. विरोधक असतात त्यांना जाऊन रिक्वेस्ट करु शकत नाही. ही जागा लवकरात लवकर भूसंपादन ॲवार्ड करुन त्या ठिकाणी रस्ता करण्यात यावा. गेले ७ वर्षांपासून रहाटणी गावात शाळा

नाही. बजेटमध्ये शिक्षण मंडळाला १०६ कोटी बजेट देतो आहोत. पिंपरी चिंचवड शहरातील शाळा बघितल्यातर प्रत्येक वर्षी महापालिका शाळेत २ ते अडीच हजार मुले कमी होत आहेत. खाजगी शाळांत मुले वाढत चालली आहेत. मुलांना बसण्यासाठी रुम कमी पडत आहेत. माझ्या भागातील शाळेसाठी जागा संपादीत करुन रुम वाढवून देण्यात यावी. मुले पॅसेजमध्ये बसतात. एका रुममध्ये ३ वर्ग भरवले जातात याकडे आपण लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज मा.स्थायी समितीने ३२वे अंदाजपत्रक मा.महापालिका सभेसमोर मांडले आहे. यात काही चांगल्या गोष्टी आहेत. परंतू बजेटमध्ये ब-याचशा काही त्रुटी सुद्धा आहेत. ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत, त्याचे सर्व श्रेय हे मा.आयुक्त श्रीकर परदेशी यांना जाते असे म्हटलेतरी वावगे होणार नाही. कारण त्यांनी कमी कालावधीत महापालिकेचा कारभार कशा पद्धतीने केला हे सर्वांना माहित आहे. त्यामुळे ज्या काही चांगल्या गोष्टी त्याठिकाणी झाल्या आहेत, त्याचा सुद्धा ऊहापोह करणार आहे. एलबीटी – जकात बंद झाली असताना नवीन एलबीटी कर त्याठिकाणी लादला. त्यानंतर सत्ताधा-यांपासून विरोधक असतील त्यांनी त्याचे भांडवल केले. मोर्चे काढले. राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती अतिशय कठिण असताना सुद्धा एलबीटीच्या माध्यमातून श्रीकर परदेशी यांच्या टिमने ८९० कोटी जमवले ही सुद्धा उल्लेखनीय बाब आहे. दुसरे म्हणजे ज्या मिळकतींचे गेले १५ ते २० वर्षांपासून वाढीव बांधकाम काम केले होते. महापालिकेच्या सुविधा घेत असताना सुद्धा महापालिकेचा कर बुडवित होते, अशा लोकांना शोधून शोधून काढले. या जवळजवळ ८१,००० मिळकती आहेत. त्यांच्यावर सुद्धा कर लादला आहे. या करातून पुढील वर्षी ५० ते ६० कोटी मिळतील अशी अपेक्षा आहे, ही सुद्धा चांगली बाब आहे. श्रीकर परदेशी यांनी नवीन प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला. नदीसुधार प्रकल्प – यात श्रीकर परदेशी यांनी प्रयत्न केले. मुळा, पवना व इंद्रायणी या तिन्ही नद्या कशा चांगल्या होतील या दृष्टीकोणातून त्याचे संपूर्ण प्लॅनिग केले. ते लवकरात लवकर शासनाकडे पाठविले जावे. त्याची आपल्या कारकिर्दीत लवकरात लवकर मंजूरी आलीतर या तिनही नद्यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर सुंदर शहर होईल याबद्दल मनात शंका नाही. मेट्रो प्रकल्प – याचा सुद्धा प्रस्ताव आज केंद्र सरकारला पाठविला आहे. आपण त्याचा फॉलोअप लवकरात लवकर केला, नवीन टिमच्या कारकिर्दीत त्याचे भूमिपुजन झालेतर त्याचे संपूर्ण क्रेडिट आम्हाला सर्वांना मिळणार आहे. सारथी हा सुद्धा अतिशय चांगला प्रोजेक्ट आहे. आमचा एरिया एवढा मोठा आहे की प्रत्येक कानाकोप-यात नगरसेवक फिरु शकत नाही. एखाद्याने ई-मेलच्या माध्यमातून जर महापालिकेला तक्रार कळवली आणि त्या तक्रारीचे निवारण झाले तर ही सुद्धा चांगली कल्पना आहे. त्या माध्यमातून शहरातील अडीअडचणी सुधारायला उपयोग होतो. तुमच्या समोर ज्या गोष्टी मांडल्या आहेत, त्यातील त्रुटी, चुकीच्या गोष्टी त्या इथे सांगायच्या आहेत. आज पाहिले असेलतर बजेटचे पुस्तक दोन दिवसांपूर्वी दिले आहे. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी एका भाषणात सांगितले होते, प्रत्येक माणसाला वाटते, मुलाला वाटते आपण आयएएस व्हावे. एमपीएससी व्हावे. तो एमपीएससी झाला नाहीतर तो इंजिनिअर/डॉक्टर होतो. इंजिनिअर /डॉक्टर झाला नाही तर शेवटी तो पुढारी होतो. हजारो पुस्तके वाचल्यानंतरही लक्षात येत नाहीत. मग दोन दिवसांपूर्वी बजेटचे पुस्तक दिलेतर ते कसे लक्षात येईल. बजेट

पुस्तक कमीत कमी १५ दिवसांपूर्वी तरी मिळाले पाहीजे. पुढील वर्षी याकरिता काळजी घेतली पाहीजे. महसुली जमा रु.२१०६,३०,००,०००/- व महसुली खर्च रु.११६५,२८,००,०००/- म्हणजे २२ ते २८ टक्क्यांच्या आतमध्ये असला पाहीजे, तो जवळजवळ ५० टक्क्यांच्या आसपास महसुली खर्च होतो आहे. हा खर्च कमीत कमी होण्यासाठी प्रयत्न झाला पाहीजे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च होत असेलतर आपण कुठेतरी चुकतोय हे सर्वसामान्य माणसाच्याही लक्षात येईल. उत्पन्न वाढवण्यासाठी कोणताही नवीन मार्ग अवलंबला नाही. मग उत्पन्न वाढवण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांना कापतो, सर्वसामान्य माणसांचा कर वाढवतो. याव्यतिरिक्त भाड्यातून उत्पन्न निर्माण करणार नाही का. पे ॲण्ड पार्कसारख्या योजना राबविणार नाही का. महापालिकेच्या अधिकृत गोष्टींच्या माध्यमातून महापालिकेच्या उत्पन्नात कशी भर टाकली जाईल यासाठी कुठेही प्रयत्न होत नाहीत. हा प्रयत्न करता आलातर निश्चितच त्याचा उपयोग होणार आहे. थकबाकी नसल्याचा दाखला घ्यायचा असलातरी पाच रुपये फी होती ती एकदम शंभर रुपये केली आहे. हे अतिशय चुकीचे आहे. प्रशासकीय सेवाशुल्क पाच रुपयावरुन एकदम पंचवीस रुपये केले आहे. सर्वसामान्य माणसाला पाच रुपयावरुन शंभर रुपये देणे अवघड आहे. ते पंचवीस रुपये करता आलेतर सर्वसामान्य गरीब माणसाला त्याचा उपयोग होणार आहे. शास्ती कर – यात दि.३० सप्टेंबर पूर्वी पहिल्या सहा महिन्यांचा टॅक्स भरला नाहीतर लगेच दोन टक्के शास्ती कर लागतो. पुढील दि.३१ डिसेंबर आधी भरला नाहीतर लगेच दोन टक्के शास्ती कर लागतो हे अतिशय चुकीचे आहे. पठाणीपेक्षाही व्याज जास्त आहे. एका बाजुला शासन सावकारी, प्रायव्हेट फायनान्स बंद करतेय. निर्बंध आणतेय. आपण अशा पद्धतीने शास्तीकर लावलातर सर्वसामान्य माणसावर त्याचा बोजा पडणार आहे. सर्वसामान्य माणसावरील बोजा कमीत कमी कसा राहील या दृष्टीने त्याकडे पाहायचे आहे. नगररचना विभागासाठी रु.१०० कोटींची केलेली तरतूद अतिशय चांगली आहे. त्यांना जास्तीत जास्त तरतूद देऊन त्याचा निश्चितच फायदा होतो आहे. महापालिकेच्या आरक्षणांच्या जागा ताब्यात दिल्यातर त्यावर एफएसआय किंवा टिडीआर देता आला पाहीजे. तिथे जेवढी तरतूद असेल ती करणे अत्यंत गरजेचे आहे. ही तरतूद अभिनंदनीय आहे. तिथे गल्लत होते, आपण अनेक ॲक्विझिशनचे प्रस्ताव कलेक्टर कचेरीत पाठवितो. फायनल स्टेजला आलेले अनेक प्रस्ताव आहेत. ॲवार्ड देत होतो. अधिकारी बदलला की तो बाकी प्रस्ताव बाजुला टाकतो व नवीन प्रस्ताव आणतो. जे प्रस्ताव फायनल स्टेजला आले आहेत ते आधी घ्या. साध्या साध्या गोष्टींसाठी रिझर्वेशन ताब्यात घ्यायची राहत आहेत. आमच्याकडे फक्त ॲवार्ड डिक्लरेशन करायचे कोणीतरी सांगितले बीआरटीला आधी प्राधान्य द्या. ते कसे काय, प्रस्तावांचा अभ्यास केला पाहीजे. जे गरजेचे आहे ते आधी केले पाहीजे. इथे प्लॅनिंग होत नाही, यात लक्ष देण्याची गरज आहे. बंद पाईप लाईन – १५० कोटींचे बजेट होते ते ३१० कोटींवर आले आहे. प्रत्येक बजेटला तरतूद काढून ठेवावी लागते आहे. केवळ राजकारण आहे. त्यामुळे महापालिकेचा किती मोठा पैसा वाया जातो आहे. अजूनही ५ वर्षे झाले नाहीतर महापालिकेकडून ५००/६०० कोटी बाजुला काढावे लागतील. यात लक्ष घातलेतर प्रशासकीय लेवलवर व राजकीय लेवलवर तोडगा तुमच्या काळात सोडवता आलातर त्याचे निश्चितच क्रेडिट तुम्हाला मिळेल. यात तुम्ही लक्ष घालावे. ग्रामिण भागातले बरेच सदस्य सांगतील. बजेटमध्ये तुम्ही सर्वांना सारखे बजेट देतोय. प्रभागवाईज ३० ते ३२ कोटी देताय. जे नवीन वॉर्ड आहेत, त्यात जास्तीत जास्त पैसे द्यायला पाहीजेत. तिथला रस्ता ताब्यात घ्यायचा आहे, पाण्याची

टाकी असेल, पाईपलाईन असेल अनेक गोष्टी आहेत, तिथे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. आमचे गाव १९८३ साली महापालिकेत आले. आज २०१४ साल आहे. जवळजवळ ३१ वर्षे झाली आहेत. अजूनही तिथे चांगला रस्ता नाही. अजूनही रिझर्वेशनच्या जागा ताब्यात घेतल्या नाहीत. अजूनही प्रचंड कामे बाकी आहेत. हे कशामुळे होते. पार्सिलिटीमुळे होते. महापालिकेचा पैसा ठराविक लोकांच्या वॉर्डात जातो. नवीन माणसांच्या वॉर्डात पैसा खर्च होत नाही. जे सात/आठ लोक महापालिकेत आहेत, ते ब-याच प्रमाणात बजेट पळवतात. त्यामुळे या शहराचा विकास विचित्र पद्धतीने होतो आहे. एकिकडे विकास होतो आहे, एकिकडे अजिबात होत नाही. हे सुद्धा पहा. सगळ्यांना समान हक्क दिला पाहीजे. ज्याठिकाणी काहीही प्रोजेक्ट नाही तिथे प्राधान्य दिले पाहीजे. असे जर केलेतर निश्चितच सर्वांगीण विकास होईल. नाहीतर काही ठिकाणी नाशिक फाटा इथे गेलोतर खरोखर शांघाय झाल्यासारखे वाटते. ग्रामिण भागात गेलोतर मावळात गेल्यासारखे वाटतेय. आमच्या भागात गेलात तर धारावीसारखी परिस्थिती आहे. तुम्ही जागेवर व्हिजिट करा त्याशिवाय तुमच्या लक्षात येणार नाही. बीआरटीच्या जागांसाठी रु.३५ कोटी तरतूद केली आहे. ज्याठिकाणी लोकवस्ती कमी आहे म्हणून अशा ठिकाणी बीआरटी यशस्वी झाली आहे. आपल्याकडे इतकी लोकसंख्या वाढलेली आहे. रस्त्याला साईडबॅक नाही. रस्त्यात वाहनांची टकराटकरी होते, अपघात होत आहेत. अहमदाबाद हे बीआरटीसारखे प्रोजेक्ट असणारे शहर आहे. विचार करा. अहमदाबादची परिस्थिती व आपली परिस्थिती. तिथली लोकसंख्या व आपली लोकसंख्या तिथले रस्ते या सगळ्या गोष्टी पाहिल्यातर आपल्याकडे बीआरटी यशस्वी होऊ शकणार नाही. याचा पुर्नविचार करता आलातर निश्चित करावा. पर्यटन विकासासाठी आपण सायन्स पार्क परिसरात तारांगण सुरु करतोय. आपण रु.१६,२५,००,०००/- देतोय. मोरया गोसावी मंदीर परिसरासाठी साडे बारा कोटी देतोय, एमआयडीसीत बालनगरी उभी करण्यासाठी तीन कोटींचा प्रोजेक्ट करतोय व पिंपळे निलख येथील पर्यंटन केंद्रासाठी १८ एकर जागा ताब्यात घेण्यासाठी फक्त १० लाख तरतूद करतोय. माझी मिसेस नगरसेविका होती, त्याआधी मी सुद्धा नगरसेवक होतो. गेली दहा बारा वर्षांपासून हे पर्यटन केंद्र विकसित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करतोय. त्यासाठी तरतूद फक्त १० लाख ठेवली आहे. आम्हाला सुद्धा तरतूद वाढवून मिळाली पाहीजे. ही विसंगती आहे. आपण विशेष योजनेत ३६७,२०,००,०००/- इतकी तरतूद करतोय. औंध-रावेत रस्ता, औंध-हिंजवडी रस्ता पाहिला असेल, इथे जाण्यायेण्यासाठी प्रचंड गर्दी होते. औंध पासून वाय जंक्शनपर्यंत गेलाततर १५० फूट रस्ता व तिथून पुढे रस्ता २०च फूट आहे. सांगवी इथला फ्लायओव्हर पाहिलाततर तो ५६ लाखांचा फ्लायओव्हरचे प्लॅनिंग तयार झाले आहे. त्यासाठी १२ कोटी इतकी तरतूद आहे. वाय जंक्शनसाठी फक्त रु.१५ लाख तरतूद आहे. एवढा फ्लो जोरात तिथे येऊन थांबणार ही विसंगती आहे. तिथे २/३ कोटी आणखी दिलेतरच तो रस्ता व्यवस्थित होईल. पुढे हिंजवडीपर्यंत जाण्यासाठी तिथे व्यवस्थित रस्ता मिळणार आहे. म्हणून बजेटमध्ये जी काही विसंगती होते आहे, जो काही अन्याय होतो आहे. त्यावर नगरसेवकांनी बारकाईने लक्ष द्यावे. तिथे तरतूद कमी पडते आहे. अनेक ठिकाणी बजेट होण्याआधीच टेंडर होऊ दिले, ते काम थांबवले आहे. तिथे कामांना वाढीव तरतूद द्यावी.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज बजेटवर सभागृहात चर्चा होते आहे. एवढेच सांगू इच्छिते, ग्रामिण भागाला जास्तीत जास्त निधी मिळावा. शहरात ज्याप्रमाणे

मोठमोठे प्रकल्प होत आहेत, त्याप्रमाणे ग्रामिण भागात मुलभूत सुविधा मिळाल्या नाहीत. त्यांवर खर्च व्हावा, त्याविषयी विचार करावा ही विनंती करते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज स्थायी समिती चेअरमन यांनी सन २०१४-१५ चे बजेट सादर केले आहे. बजेट म्हटलेतर आत्ता सांगितले, मागील वेळी मा.नारायण बहिरवाडे यांचे कौतुक करते. त्यांनी विषयानुसार व्यवस्थित अभ्यासपूर्वक बजेट केले आहे. मागील वर्षाचा अनुभव पाहिलातर आपण पण सगळे मिळून बोलावे. बजेटमध्ये कोणताही नवीन प्रोजेक्ट नाही. एलबीटीचा धसका घेतल्यामुळे कदाचित तसे असेल. गरीब माणूस सुद्धा एखादी नवीन वस्तू दिवाळी आलीतर तो ती घेण्याचा प्रयत्न करतो. जरी आपल्या उत्पन्नाचा स्त्रोत कमी झाले असलेतरी आपण नवीन योजना आपल्या कल्पनेतून पिंपरी चिंचवडसाठी काही करता आलेतर ते नक्की करावे. खरेतर मागील वर्षी बजेट झाले होते त्यावेळी, मागच्याच्या मागील वर्षी आम्ही फेब्रुवारीमध्ये काही सूचना दिल्या होत्या. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. आम्ही मागील वर्षी सुद्धा ज्या सूचना दिल्या होत्या, काही अंमलात आल्या तर काही तशाच राहील्या. आम्ही अधिका-यांना आधीच सूचना दिल्यातर पुन्हा अशी उपसूचना द्यायची वेळ येत नाही. सूचना मागविल्या होत्या. परंतू लक्षात आले नसल्यामुळे उपसूचना द्यायच्या राहिल्या असतील किंवा काही अधिका-यांनी हे मुद्दाम केले असेल. सर्वसाधारण बघितले तर ३० टक्क्यांपेक्षा कमी बजेट खर्ची झाले आहे हे लक्षात घ्यावे. अधिकारी रात्री अकरा-अकरा वाजेपर्यंत प्रभागांत बसून हे संपूर्ण बजेट तयार करतात. जे.ई., डी.ई. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर या सगळ्यांनी त्रास घेऊन तयार केलेले बजेट जर खर्च होत नसेल तर त्यांच्या कष्टांचा उपयोग काय? आत्तापर्यंत विद्युत विभाग पाहीलातर ४० टक्के रक्कम खर्ची झाली आहे. पाणीपुरवठा विभागात आत्ताच माहिती घेतली तर रु.१५.७३ कोटी एवढीच रक्कम खर्ची झाली आहे. साधारणतः ७९.४५ कोटी एवढे त्यांचे बजेट आहे. मी एक-एक विभाग घेणारच आहे. सर्वप्रथम विद्युत विभाग घेते. हा विभाग म्हणजे चराईचे कुरण आहे. परदेशी साहेबांनी जाता-जाता असा शॉक दिला, आपणही त्यात थोडेसे लक्ष द्यावे. यात वायरलेससाठी रु.६,०२,०५,५९४/- इतकी बजेटमध्ये तरतूद ठेवली आहे. वायरलेस यंत्रणा कालबाह्य झाली आहे. त्यांनी सांगितले, आम्ही सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहेत म्हणून ही तरतूद केली आहे. लेखाशिर्ष असते ते सुद्धा तुम्हाला बदलात येत नाही. ११६० पानांचे बजेटचे हे पुस्तक आहे. कारण संपूर्ण बजेटमधील भांडवली खर्च, महसुली खर्च यात असे काही आकडे दिलेले आहेत, ते बुचकळ्यात टाकणारे आकडे आहेत. भांडवली खर्चातील काही आकडे महसुलीमध्ये दाखविले आहेत. मा.विलास नांदगुडे आत्ता म्हणाले, ५० टक्यांपेक्षा जास्त खर्च आस्थापना खर्चावर केला आहे. तसे नाही आहे. आपल्यालाही सांगते, त्यातील भांडवली खर्चातील किरकोळ दुरुस्ती खर्च व इतर खर्च महसुली खर्चात टाकला आहे. त्यामुळे तो खर्च वाढला आहे. तो खर्च तर वाढलाच आहे, ही पाने सुद्धा वाढली आहेत. पान क्रमांक ९५२, ९५३ या पानांवर सन २०१४-१५ चा भांडवली खर्च शून्य दाखवला आहे. पान क्र.९४६ पासून ९५१ पर्यंत जेवढा भांडवली खर्च दाखवला आहे, तो पान क्र. ९५२-९५३ वर दाखविलेला नाही. पान क्र.५२८ ते ५८८ पर्यंत विद्युतसाठी भांडवली खर्च दाखवायचा होता तो दाखवलेला नाही. सगळा घोळ झालेला आहे. एखाद्या कामासाठी २० लाख खर्च असेल तर काही भांडवली खर्च वेगळा, पाण्यासाठी १० लाख खर्च महसूली खर्चात टाकल्यामुळे तो वेगळया

पानावर दाखवला आहे. त्यामुळे डबल पाने झाली आहेत. एकच खर्च वेगवेगळ्या हेडवर टाकला आहे. मागील वर्षापर्यंत जे कॉलम होते, तेच ठेवायला काय झाले होते. आपण रत्नागिरीला चांगले काम केले असेल म्हणून तुम्हाला इथे काम करायला संधी दिली असेल असे मला वाटते. तसेच इतर अधिकारी सुद्धा इथे बोलवून घेता व आपण काम करता. तुम्ही तिथे सगळे काम करता म्हणजे ते सगळेच आदर्श असते असे नाही. तिथे काम करत होतो म्हणून तिथला तोच नियम इथे रेटायचा हे चुकीचे आहे. इथल्या नगरसेवकांनी व अधिका-यांनी सुद्धा इतके काम केले आहे म्हणून या शहराला बेस्टसिटी म्हणून अवॉर्ड मिळाला आहे. असे असताना दुस-या शहरातील काही योजना इथे राबवायची. त्यामुळे सगळ्या अधिका-यांना अशाप्रकारे वेठीस धरायचे हे चुकीचे आहे. यात भांडवली व महसुली खर्चाबाबतीत आपण देखील अभ्यास करावा. पाणीपुरवठ्यामध्ये माझ्या वॉर्डात २४ तास पाणीपुरवठा होतो आहे. आपल्याकडे ७५पेक्षा जास्त झोपडपट्टया आहेत. काही घोषित आहेत, काही अघोषित आहेत. तरीसुद्धा मी तुम्हाला जाता जाता हात जोडून विनंती करते की, कुठल्याही झोपडपट्टीत जा, ज्यावेळी पाणी येते, त्यावेळी सर्व नळ चालू होतात. पाणी जाईपर्यंत पाणी वाया जाऊन वाहत असते. झोपडपट्या काय, चाळी काय, तिथेही हिच परिस्थिती आहे. इतक्या भयानक प्रमाणात पाणी वाया जाते. त्याकडे दूर्लक्ष करुन कोणतीही योजना कितीही कोटी खर्च करुन राबविलीतरी ती यशस्वी होणार नाही. लोकांना पाणी वाया जाते यावर न बोलता २४ तास पाणीपुरवठा कसा करता येईल. ज्यांनी अनधिकृत मिटर बसविले आहेत. तुम्हाला माझ्या प्रभागातील अनुभव सांगते, अनधिकृत घर बांधले. ग्राऊंडफ्लोअरवाल्या लोकांनी नळ कनेक्शनसाठी अर्ज केला. लगेच नळ कनेक्शन दिले. अभय योजनेत नळ कनेक्शन कायदेशीर झाले. सेकण्डफ्लोअरवाल्यांनी पण अर्ज केला, आम्हालाही नळ कनेक्शन द्या. तिथे तुमचा माणूस म्हणाला, सेकण्ड फ्लोअरवाल्यांना नळ कनेक्शन देता येत नाही. माझा प्लंबर गेला तर मी कनेक्शन देतो. अभय योजनेत तुमचे कनेक्शन कायदेशीर करुन घेतो. अशा प्रकारे संपूर्ण प्रशासन अभय देत आहे. इथे एका कंपनीला काम दिले आहे. कॅनबेरी ही कंपनी फक्त त्यांनी मिटरचा फोटो काढायचा व तिथे सबमिट करायचा. मग जे काही रिडींग असेल तेवढे बील. दोन/दोन वर्षांचे बील सबमिट केले. माझे बील याच्या नावावर, याचा फोटो दुस-याच्या नावावर असा प्रकार केला. बीलात इतक्या चुका केल्या की गेली दोन वर्षे लोक त्यांच्याकडे सतत पाठपुरावा करत होते. गर्दी होत होती. मागील महिन्यात त्यांना जमले नाही. शेवटी आपल्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिका-यांना, आपले मीटर निरीक्षक यांना त्यात लक्ष घालावे लागले. त्यानंतर बीलांत सुधारणा केल्या गेल्या. अनेकांना २/२ वर्षे पाण्याचे बील येत नाही. मग या कंपनीला कशाचे पैसे देतो. फक्त फोटो काढायचे पैसे देतो का. ओरड झाली म्हणून त्यांचे काम बंद झाले असलेतरी त्यांनी प्रत्येक प्रभागात स्वतःचे दुकान उघडले आहे. ठेकेदाराने सुद्धा त्यात लक्ष घालावे. आपले हजारो मीटर निरीक्षक आहेत, त्यांच्याकडून काम करुन घ्यायला काहीच हरकत नाही. प्रत्यक्ष मोबाईलने फोटो काढू शकतो व एसएमएसने पाठवू शकतो. याबाबत आमच्याकडे सगळ्या अधिका-यांनी चर्चा केली व लोकांना सांगितले. परवाच मला एक बाई भेटल्या त्या म्हणाल्या, आम्हाला आठ दिवस भरपूर पाणी दिले म्हणून मी माझी टाकी बांधली ती साफ केली, कोरडी केली व त्यात अडगळीचे सामान टाकले. आत्ता महिनाभरात पाण्याची बोंब चालू झाली. पाणीच येत नाही. मी तिला म्हणाले, परत टाकी साफ कर व चालू कर. २४ तासातले ४ तास सुद्धा पाणी मिळेनासे झाले आहे. आख्या

शहराचे काय होणार. झोपडपट्टीतील पाण्याबाबत कोण लक्ष घालणार. स्थापत्य विभागाकडून आत्तापर्यंत २६ टक्के खर्च झाला आहे. साधारणतः ३५ ते ४० टक्के खर्च होईल. खरेतर रस्ते, पूल या खरेतर शहराच्या धमण्या, रक्तवाहिन्या आहेत. इतरही कामे असतात. छोट्या छोट्या गल्लीबोळातून रस्ता करण्यात आम्हाला इंटरेस्ट असतो. सर्वसामान्य गरीब लोकांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता व्यवस्थित असावा. त्यासाठी एवढा कमी खर्च झाला असेल तर का झाला याचा विचार आपणच केला पाहीजे. त्याचे स्पष्टीकरण आम्ही अजिबात करणार नाही. तुम्हीच याचा विचार केला पाहीजे. जागा नाही, जागा ताब्यात नाही हे फॅड मागील वर्षापासून निघाले आहे. तिथे ५०/५० वर्षांपासून आपल्या कामाची वहिवाट आहे, तिथे गटार आहे. गटारीचा बेस अर्ध्यातून आहे. त्यावर भिंती तुटून गेल्या आहेत. गटारी तुटून मोठी-मोठी डबकी तयार झाली आहेत. एवढ्या सुंदर शहरात मोठी-मोठी डबकी सुद्धा आहेत हे तुम्हाला विसरुन चालणार नाही. कारण काय तर त्यांच्याकडे मालकी हक्क नाही. तिथे इतकी वर्षे गटार वाहून आले आहे. दुरुस्ती करायला सुद्धा जागा आपल्या मालकीची पाहीजे. हे अति होते आहे. रस्त्याची वहिवाट आहे. रेल्वेच्या जागेत छोट्या-छोट्या झोपडपट्टया झाल्या आहेत. माणुसकीच्या दृष्टीकोणातून त्याबद्दल विचार करणार आहात का नाही. झोपडपट्टी स्थापत्य विभागाचे कौतुक करते. त्यांनी २५ वर्षांनंतर रेल्वे हद्दीतील झोपड्यांना छोटे रस्ते करायला सुरुवात केली आहे. ते फार भयानक परिस्थितीत हे लोक राहतात. अशा लोकांना माणुसकीच्या दृष्टीकोणातून सोयी दिल्याच पाहीजेत. यादृष्टीने सुद्धा विचार केला पाहीजे. पर्यावरणाबाबत रु.१,२०,००,०००/- इतर ठिकाणचा खर्च आहे. अभियांत्रिकी पर्यावरण विभागाने रु.८,१०,००,०००/- फक्त मोशी कचरा डेपोसाठी ठेवले आहेत. याठिकाणी मला सांगायचे आहे, जशी पुण्याची परिस्थिती झाली, तसे आपले न व्हावे, ही ईश्वरचरणी प्रार्थना आहे. नवीन किंवा जुने गृहप्रकल्प आहेत त्यांना एसटीपी कंपल्सरी करणे. हा त्यावरील मोठा उपाय आहे असे मला वाटते. शहरात मोठमोठ्या मोबाईल कंपन्यांचे टॉवर्स अनधिकृतपणे उभे आहेत. किती टॉवर्सला बिल्डींग परमिशन विभागाने परमिशन दिली आहे. किती अनधिकृत आहेत, त्याचे सर्वेक्षण कदाचित झाले असेलही मला माहित नाही. औद्योगिक मंदीमुळे, एलबीटीमुळे उत्पन्न कमी होते आहे. आपल्यासाठी हे उत्पन्नाचे मोठे साधन आहे. त्यावर मोठ्या प्रमाणात टॅक्स लावलातरी चालेल. झाडूवाल्यांपासून मोठमोठ्या अधिका-यांपर्यंत मोबाईल अत्यावश्यक झाले आहेत याकडेही लक्ष द्यावे. झोपडपट्टी पुनर्वसन ही चांगली योजना राबविली आहे. चिंचवडमधील वेताळनगर प्रकल्पाला भेट द्या. २००५ साली ही योजना सुरु झाली. २००५ ला जेएनएनयूआरएमचा निधी मिळाला. या विभागाअन्वये माझ्या वॉर्डातील उद्योगनगरीतील झोपडपट्टी या प्रकल्पाअंतर्गत आहे. परंतू इतके संथपणे व शांतपणे काम चालू आहे. याची या वर्षी मुदत संपली आहे. परंतू आदरणीय शरद पवार साहेबांच्या व नेत्यांच्या प्रयत्नांमुळे एक वर्ष मुदत वाढवून मिळाली आहे. म्हणून उद्योगनगरमध्ये झोपडपट्टीवासियांचे स्वप्न साकार होईल असे वाटायला लागले आहे. एक बिल्डींग उभी करायला बिल्डरला किती वेळ लागतो. त्याप्रमाणे आपल्याला किती वेळ लागला याचा लेखाजोखा तुम्ही करायचा आहे. एसआरए – त्याच्या जमिनीत झोपडपट्टी आहे. काही बिल्डरांनी किंवा जमिन मालकांनी खरेदी केलेल्या जमिनी आहेत. ते त्यांचे पुनर्वसन करणार आहेत. मला वाटत नाही, बिल्डर लवकर पुनर्वसन करतील. पिंपरी चिंचवडमध्ये एकाही झोपडपट्टीचे असे पुनर्वसन झालेले माझ्या पाहण्यात नाही. झोपडपट्टयांची इतकी दयनीय अवस्था आहे. आपण

सुविधा देतोय. तिथे धाक धपटशा दाखवून त्या झोपडपट्ट्या कशा उठतील याकडे या बिल्डर किंवा जमीन मालकांचे लक्ष आहे. यात एसआरएमध्ये लक्ष घाला. शहरातील मोक्याच्या जागा एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी पडल्या आहेत. त्यामुळे शहराला गालबोट लागते आहे. त्यांची दादागिरी रोखायची असेल तर महापालिकेने प्रकल्प राबवावा. मोक्याच्या जागा असल्यामुळे खाजगी बिल्डर पुढे येतील. असे याठिकाणी सांगायचे आहे. हॉकर झोन – हे सर्व झाले आहे. यात अत्यंत चुका झाल्या आहेत. प्रेमलोक पार्क ही नावाजलेली सोसायटी आहे. याच्या समोरच्या गार्डन समोर हॉकर झोन झाला आहे. जिथे-जिथे भाजी मंडईसाठी जागा रिझर्व्ह आहे तिथे आसपास हॉकर झोन करावे. स्थापत्य– पूर्वी गार्डन विभाग स्थापत्यमध्ये नव्हता. सिमाभिंत बांधणे. स्थापत्यची कामे गार्डन विभागाकडून होत होती. मागील वर्षात गार्डन व स्थापत्य विभाग जोडले गेले. त्यामुळे विभागाचे काम खूप मोठ्या प्रमाणात वाढले गेले. त्यामुळे कुठे-कुठे बघायचे. म्हणून पुन्हा जसे होते तसे करा. मागील वर्षाप्रमाणे वेगळे गार्डन व स्थापत्य असे विभाग असावेत. म्हणजे ते गार्डनकडे विशेष लक्ष देतील असे मला वाटते. एमआयडीसीतील ओपन स्पेस आहेत. एकतर ते आपल्या ताब्यात द्यावेत. ती कच-याची ठिकाणे झाली आहेत. उकिरडा, मोठमोठ नाले आहेत. नाहीतर जास्तीत जास्त झोपड्या झाल्या आहेत. आपण एकदा कल्पना द्या. शहराचे उद्योगांतले पाणी कमी करण्यासाठी एमआयडीसीने ज्या जागा ताब्यात दिल्या नाहीत तिथे काही प्रोजेक्ट राबवायचे. एमआयडीसीतून केमिकल मिश्रित पाणी नाल्यात, नाल्यांतून नदीत मिसळते आहे. मागील वर्षी आपण जिल्हा परिषदेला रु.३,००,००,०००/- दिले आहेत. पाणी शुद्धीकरणाचे यंत्र जिल्हाभर बसवण्यासाठी आपण रु.३ कोटी दिलेत. अजून अडीच/तीन कोटींची मागणी आहे. आपण एवढे पैसे देतो. खरेतर आपल्याकडे एवढे जास्त एसटीपी प्लॉण्ट आहेत. ट्रीटमेंट प्लाण्टमधील सांडपाण्याची बरीचशी प्रक्रिया पूर्ण होते. त्याठिकाणी लिकेज असेल, नवीन गावांत ड्रेनेज व्यवस्था नसेल असे फक्त १५ टक्के पाणी नदीत मिळत असेल. आपण एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करतोय. आपण एवढा पैसा जिल्हा परिषदेला द्यायचा याचा सुद्धा विचार करावा. मा.महिला व बालकल्याण विभागाचे बजेट चेक करा. मा.आशा शेंडगे ताईंनी खूप काही गोळा केले आहे. यातून काहीतरी निघेलच. महिला बाल कल्याण विभागाचे फक्त समाज सुधारणेचे कार्य आहे. या विभागातील अधिका-यांना ते जमत नसेल, त्याच वर्षाचे बजेट त्याच वर्षी खर्च होत नसेल, २००९-२०१० मधील शिवण मशीन अजून देता येत नसतील, त्या त्या वर्षाचे काम त्याच वर्षी होत नसेल तर ते जिथून आले तिथे त्यांनी परत जावे. महापौर साहेब, तुम्ही सुद्धा त्यांना सांगावे, तुम्ही जिथून आलात, तुम्ही तिथे जा. इथे आम्हाला काम पाहिजे आहे. गोरगरीबांना काय देता. महिला दहा/दहा वेळा विचारतात, चेकचे काय झाले. आम्हाला लाज वाटते. ज्या अधिका-यांना जमत नसेल तर त्यांना सूचना द्या. त्यांच्यावर कारवाई करता येत असेल तर त्यांच्यावर कारवाई करा. आम्ही मा.महापालिका सभेत बोलतो. मिनिटसमध्ये ते येते. यापुढे काही होत नाही. मागील मिटींगमध्ये मी हा मुद्दा बोलले होते. मी पुन्हा एकदा माझे मत मांडते, चाफेकर चौकातून चिंचवड स्टेशनकडे जाणारा महत्वाचा रस्ता आहे. तिथे विजयनगर झोपडपट्टी आहे. ५ वर्षापूर्वी रोड वाईडींगसाठी झोपड्या काढून त्यांना अजंठानगरला घरे दिली होती. तिथेच झोपडपट्टी आहे. फक्त अजंठानगरची घरे मात्र त्यांना मिळाली आहेत. ज्या अधिका-यांनी ही झोपडपट्टी काढायचे ठरवले, पोलिस संरक्षण मागवले, त्याचवेळी त्या अधिका-यांच्या बदल्या झाल्या. त्यामुळे सगळी घडी बिघडते. त्यामुळे कामे

विस्कळीत होतात. शक्यतो अधिका-यांची लवकर बदली करु नका. ५ वर्षांत राहिले तर कामे व्यवस्थित होतील. स्थापत्य विभागाबद्दल माझे हे म्हणणे आहे. बाकी इतर बदल्यांबाबतीत मी इंटरफेअर करत नाही. मोरया नगर झोपडपट्टी उठवली तर जेणेकरुन तिथले काम चांगले होईल. पिंपरी चिंचवडचे काम अभिनंदनास पात्र आहे. इतके उंच पूल, दीड किलोमीटरचा रस्ता कुठेही नाही. बाहेरील देशांत असे रस्ते आहेत. इथे असलेला सर्वांगसुंदर दुमजली पूल, ग्रेड सेपरेटर, उद्याने, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प योजना, स्वस्त घरकुल योजना, सायन्स पार्क प्रकल्प हे सगळे नावलौकिक वाढवणारे असे प्रकल्प आहेत. एकच वाटते, बंद पाईप योजनेतून लोकांना पाणी आले असतेतर शहराला कमी पैशांत व शुद्ध पाणी मिळाले असते. पुढील २५ वर्षांत शहराला पाणी कमी पडू नये म्हणून आमचे नेते मा.अजितदादा पवार यांनी आंदर मावळ व भामा आस्केड इथले पाणी पिंपरी चिंचवडसाठी राखून ठेवले आहे. पुढील २५ वर्षे काळजी करायचे कारण नाही. आपल्याला पाण्याचा प्रश्न भेडसावणार नाही. नुसतेच राष्ट्रीय स्तरावर बक्षीस मिळवलेले नाहीतर तशीच कामेसुद्धा झाली आहेत. आयुक्त साहेब, आपण आमच्या या गौरवात तशीच भर टाकावी, आपणही तसेच काम करावे असे मला वाटते.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आयुक्त साहेब श्री.राजीव जाधव, महापालिकेच्या पहिल्या महापालिका सभेला आले, मी त्यांचे सर्वांच्या वतीने स्वागत करतो. आपल्याकडे पद्धत आहे, कमिश्नर यांना सेण्ड ऑफ देऊन पाठवतो. आपण केला नाही. माझी विनंती आहे, परदेशी साहेबांचा सेण्ड ऑफ फंक्शन आयोजित करा. परदेशी साहेबांसारखेच आपण डिसिप्लीनला जास्तीत जास्त महत्व देणार असे मी ऐकले आहे. मी एक उदाहरण देतो, पान क्र.८१ मध्ये प्र.क्र. वाल्हेकरवाडी रावेत रस्ता डांबरीकरण करणे रु.७० लाख अंदाजपत्रकीय रक्कम आहे. सन २०१४-१५ चा अंदाजे रक्कम रु.२ लाख आहे. असे अनेक आयटम आहेत. तिथे अंदाजपत्रकीय रक्कम पाच लाख/पन्नास लाख/पंचवीस लाख असे दिले आहेत. दुसरे कॉलममध्ये सन २०१४-१५चा अंदाजपत्रकात रु.२ लाख/रु.३ लाख दिले आहेत. एखाद्या रोडसाठी रु.२६ लाख लागत असतील तिथे तरतूद रु.२ लाख असेलतर हा रोड करायला किती वर्षे लागतील. कामाचे वर्क एस्टिमेट जर रु.२६ लाख असेल, तरतूद रु.२ लाख दिले असेल तर दीड लाखाचे टेंडर काढू शकतो. मग काम कसे होईल या माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. Because it is a very serious matter. मिनिमम ५० टक्के कॉस्ट इथे पुरवतात. नवीन कामाला कामाच्या एस्टीमेटच्या अगेंस्ट १० टक्के ते २० टक्के रक्कम/बजेट प्रोव्हाईड केले असेलतर ती कामे कशी होणार? एकतर सांगा, ५० टक्के तरी रक्कम तरतूद करुन ५० टक्के टेंडर काढू शकता. नाहीतर जेवढी अंदाजपत्रकीय रक्कम आहे, तेवढे टेंडर काढायची प्रोव्हिजन आहे तेवढे काम करायचे,नंतर सप्लीमेंटरी बजेट करायचे. How do you going to do this? एकूण भांडवली खर्चासाठी रु.९३४ कोटी तरतूद होती आणि त्याच्या अगेंस्ट आत्तापर्यंत रु.२५९ कोटी खर्च झाला आहे. म्हणजे ३० टक्के सुद्धा खर्च झालेला नाही. फक्त मार्च महिना बाकी आहे. विभागवार भांडवली खर्च गोषवारा बघितला तर स्थापत्य विभागाचे २३४ कोटींपैकी ६४ कोटी इतकी कामे झाली आहेत. पर्यावरण अभियांत्रिकी ३४ कोटी तरतूदीच्या अगेंस्ट २.९४ लाख खर्च झाला आहे. स्थापत्य उद्यान विभागावर रु.२२ कोटी खर्च झाला आहे. म्हणजे ३.३३ टक्के इतकाच खर्च झाला आहे. जे.ई., ॲडीशनल सिटी इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर प्रत्येक

प्रभागात प्रत्येक वॉर्डासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध असून सुद्धा २५ टक्केच कामे होतात. It is a shameful act. ऍडमिनिस्ट्रेशनची याच्यापेक्षा वाईट परिस्थिती कुठेच असू शकत नाही. प्रायव्हेट कंपनी असती तर शंभर टक्के परफॉर्मन्स मागितला असता. अधिका-यांना घरीच जावे लागते. आपल्याकडे असे आहे का. अकाऊंटॅबिलिटी नावाची काही गोष्टच नाही. आपण मोठ-मोठ्या स्किम चालू करतो. नेत्यांना बोलवून स्किम चालू करतो. महापौर म्हणतात आम्ही हे करणार, आम्ही ते करणार. महिलांसाठी खर्च किती झाला तर रु.३ कोटी. रु.३३ कोटी तरतूद असताना अनेक स्किम्स् महिलांसाठी आणल्यात. पण त्या योजना महिलांपर्यंत पोचल्या पाहीजेत. तुम्हाला शरम वाटते का नाही? रु.३ कोटी खर्च केलेत. गेल्या वर्षी असेच परफॉर्मन्स होते. यावर्षी असेच आहे. मग बजेट कशासाठी करताय? तुम्ही आम्हाला कोणाला घाबरु नका. तुम्ही आयएएस अधिकारी आहात. ज्यावेळी मी १९८६ ला निवडून आलो होतो, त्यावेळी दोनच एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर होते. त्यावेळी ८० टक्के ९० टक्के कामे होत होती. आज २५ एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर आहेत. यांना काय कामे आहेत? आम्ही लोकांना काय सांगायचे. पाच वर्षांपैकी दोन वर्षे अशीच गेलीत. बाकी ३ वर्षे आहेत. आणि तुम्ही बजेट असे केले आहे. २४ लाखाच्या कामासाठी दोन लाख/तीन लाख. Something is very wrong. आपण एकिकडे बेस्ट सिटी म्हणून ऍवॉर्ड आणलाय. आपला परफॉरमन्स काय आहे. यावर्षी प्रॉपर्टी शोधण्यासाठी सर्वेक्षण केले आहे. त्यावेळी ८१,००० नवीन प्रॉपर्टीज् सापडल्या आहेत. यातून रु.४० कोटी मिळू शकतात. काही मिळकती २००५-२००६ ला, काही २००७ला बांधल्या होत्या. आपण रेट्रोस्पेक्टिव्ह टॅक्स घेऊ शकत नाही. त्यांना ज्या दिवशी नोटीस पाठवतो, त्या दिवसापासून टॅक्स लावला आहे. मागील १०/१५ वर्षांपासून सर्च करुन या मिळकतींवर टॅक्स का लावला नाही. ही आपली जबाबदारी आहे. वेळोवेळी सर्वे करुन फाईंड आऊट केलेतर अजूनही अशा कित्येक मिळकती सापडतील. अति.आयुक्त यांच्या टिमचे मी अभिनंदन करतो. पण हे काम व्यवस्थित झालेले नाही. एलबीटी ३५० कोटी लॉस म्हणताय. मी डॉ.माने साहेबांकडे बसलो होतो. त्यावेळी बघितले, त्यांनी चार/पाच प्रकारच्या नोटीसा तयार केल्या होत्या. त्याप्रमाणे नोटीस पाठवून फॉलोअप करत असूनही अनेक लोक पॉलिटीशनचे प्रेशर आणून अजूनही एलबीटी भरत नाहीत. अजून त्यांनी यंत्रणा मागवली आहे का. लोक मागितले होते. आपण त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन दिलेले नाही. मग ३५० कोटी कुठून वसूल करणार. आयुक्त साहेब, त्यांना इन्फ्रास्ट्रक्टर उपलब्ध करुन द्या. त्यानंतर वसुलीसाठी पाठिमागे लागू शकतो. स्कोप आहे. आपल्याकडे नवीन गावे आली आहेत. त्यांच्याकडे २० टक्के काम झाले असेल. आपण त्यांना वर्षानुवर्षे शब्द देत आलो आहोत, तुम्हाला ती सुविधा देऊ, ही सुविधा देऊ. नवीन १४ गावे ताब्यात घेण्यासाठी विचार चालू आहे. त्यांच्या मनात हीच शंका आहे, ते म्हणतात आम्हाला तुमच्याकडे यायचे नाही. तुम्ही काही डेव्हलप केलेले नाही. नवीन गावे आलीत, त्यांच्याकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन सुविधा देण्यात याव्यात. एमपीएससी, युपीएससीबद्दल गेले ३/४ वर्षांपासून ऐकतोय. माझीसुद्धा इच्छा आहे की, आपल्या भागातले विद्यार्थी चांगल्या पोस्टवर जावेत. कोचिंग उपलब्ध नाहीत. पुण्यातले श्री.धर्माधिकारी यांना इथे बोलवा. ते स्वतः क्लास चालवतात. त्यांच्या चाणक्य क्लासमध्ये ब्युटीफुल लायब्ररी आहे. त्यांना फक्त आपण हॉल उपलब्ध करुन द्यायचा. त्यांना इथे येण्यासाठी विनंती करावी. तसेच श्री.ब्राह्मणकर म्हणून गृहस्थ आहेत. त्यांच्या क्लासमध्ये डायरेक्ट टेक्निकल फिल्डमध्ये जाण्यासाठी, इंडियन एअरफोर्समध्ये जाण्यासाठी

मार्गदर्शन केले जाते. माझा मुलगा सुद्धा त्यांच्या क्लासमध्ये जाऊन पास झाला आहे. त्यांचेही क्लासेस आपल्या शहरात सुरु केले पाहीजेत. ते आपल्या मुलांना ट्रेनिंग द्यायला तयार आहेत. याबाबतीत मी देखील कित्येक वेळा विनंती केली आहे. म्हणून एमपीएससी, युपीएससी बरोबर मिलिटरी एज्युकेशन देण्यासाठी क्लास चालू करण्यासाठी ते पुण्यातून इथे यायला तयार आहेत. त्यासाठी तरतूद केली पाहीजे. अनेक कामे कॉंट्रॅक्ट पद्धतीने चालू आहेत. कॉन्ट्रॅक्ट पद्धत प्रायव्हेट कंपनीत सुद्धा आहे. एक माणूस करोडो कमवतो आणि कामगारांना अर्धपोटी ठेवतो. कॉन्ट्रॅक्टर काय करतो, चेक त्या मुलाच्या नावावर काढतो. त्याची सही घेतो. बँकेत जाऊन कॅश करतो नऊ हजार रुपये आणि त्या मुलाला देतो पाच हजार रुपये. त्या मुलांना रु.४,०००/- देतो, त्यात त्यांचे पोट तरी भरु शकते का? ही आपली ऍडमिनिस्ट्रेटिव्ह रिस्पॉन्सिबिलिटी आहे. तीन हजार पेक्षा जास्त लोक कॉंन्ट्रॅक्टवर काम करतात. Why we cannot recruit? तीन लोक पैसे कमवतात. बाकी २९९७ लोक अर्धपोटी राहतात. प्रभागनिहाय एक याप्रमाणे नागरी सुविधा केंद्र सुरु करणार आहोत. ते सुरु करा. १००/१५० तरी लोक कामाला लागतील. तुम्ही कॉन्ट्रॅक्टरची मुले कामाला ठेवणार, कशाला. त्यापेक्षा तुम्ही डायरेक्ट त्या मुलांबरोबर कॉंट्रॅक्ट करा. भक्ती-शक्ती चौक बीआरटी रस्ता करण्यासाठी ४/५ वर्षांपासून चर्चा करतोय पण अजूनही हा रस्ता झाला नाही. फाईल वरखाली होत होती. पण हा प्रोजेक्ट आत्तापर्यंत झालेला नाही. २४ तास पाणीपुरवठा – सन २०११-१२ मध्ये २४ तास पाणीपुरवठा करणार असे म्हटले होते. मला वाटले पुढील वर्षी होईल. आज दोन-अडीच वर्षे झालीतरी अजून २४ तास पाणीपुरवठा झालेला नाही. २४ तास करण्यासाठी ज्या सुविधा लागतात, ते काम सुरु झाले आहे. रस्त्यात १०/१५ फूट खोदाई करतात व रस्ता तसाच सोडून देतात. १८० ठिकाणी लिकेज रिपेअर केले आहे. मग ताबडतोब डांबरीकरण करायला नको का? आत्ता म्हणतात, जूनमध्ये करणार आहोत. पाण्यासाठी लांबलचक रस्ता खोदाई करतात. खोदाई झाल्यानंतर ताबडतोब ते बंद झाले पाहीजे. परवा ३ ऍक्सिडंट झाले. प्रत्येक वर्षी पाणी पुरवठ्यासाठी १० ते ११ कोटी तरतूद लागते. काम मात्र ३० टक्के सुद्धा होत नाही. स्काडा सिस्टीम – स्थायी समितीमध्ये यावर बोंबाबोंब झाली होती. कॅन्सल झाले होते, ते परत फायनल केले आहे. स्काडासाठी एकंदरीत २ वर्षे १० कोटी तरतूद केली होती ती लॅप्स झाली होती. या वर्षी परत प्रोव्हिजन केली आहे. या वर्षीचे हे पैसे पुढील वर्षी कॅरीफॉरवर्ड होत नाही. त्याच कामासाठी परत परत प्रोव्हिजन करतो. पुढील वर्षी नवीन काम काढू शकतो. काम का होत नाही. अधिका-यांना विचारले तर ते म्हणतात, या कमिटीने अडकवले, या कमिटीने रिजेक्ट केले. कुठेतरी समन्वय पाहिजे. कामे होत नाहीत. टॉप प्रायोरीटी देऊन ही कामे व्हायला पाहीजेत. अनेक मोठ्या कामांत एस्कलेशन देतो. एका कामाला ५ वर्षे मुदत दिली असेलतर त्या कालावधीत कामे व्हायला पाहीजेत. त्या पिरियडमध्ये काम होत नाही. ६/७/८ वर्षे काम चालते. दरवर्षी एस्कलेशन कशाला द्यायला पाहीजे. कोणतेही काम ३ वर्षांमध्ये पूर्ण झाले पाहीजे. याचा खुलासा अधिका-यांनी केला पाहीजे. ठेकेदाराने मुदतीपेक्षा जास्त वेळ घेतलातर त्याला एस्कलेशन द्यायची आपली जबाबदारी नाही. कामे वेळेवर झाली असतीतर बाकी पैसे वाचले असते. कोणताही अधिकारी एवढे करप्शन करणार नाही. कोणतातरी पॉलिटीशन/लिडर त्याच्या पाठिशी असतो. जगदाळे सस्पेण्ड झाले. त्यांच्या पाठिमागे जो मनुष्य होता, त्याच्यावर काहीच कारवाई झाली नाही. प्रॉपर्टी टॅक्स बील मे/जूनमध्ये देतो. ६ महिन्यांत भरले नाहीतर दर महिनाप्रमाणे २ टक्के पेनल्टी होते. एखादा मनुष्य बील भरु शकला

नाहीतर त्याला १२ टक्के व्याज भरावे लागते. वर्षभर डिले केलाकर २४ टक्के व्याज होते. कुठेतरी २४ टक्के व्याज असते का? प्रत्येक महिना पेनल्टी येते. This is very wrong. जो भरु शकत नाही त्याला फार पेनल्टी पडते. माझ्या वॉर्डात प्रभाग क्र.१४ प्राधिकरणमध्ये हॉस्पिटलसाठी प्लॉट पडला आहे. अनेक वर्षांपासून विनंती करतोय, छोटी महापालिकेची बिल्डींग बांधा, हॉस्पिटल करा. ते म्हणतात, तुमच्या भागात कस्टमर येणार नाहीत. माझ्या भागातही गरीब लोक राहतात. माझ्या भागात हॉस्पिटल बांधावे. अनेक वर्षांपासून ऐकतोय, कुठे फाईल मिळत नाही. फाईल शोधून काढायला आम्हाला १० दिवस लागतात. फाईल कुठे आहे माहित नाही. रु.५१ लाख रुपयाचे डांबरीकरणाचे टेंडर होते. कटारिया या पार्टीने कुठे-कुठे डांबरीकरण करायचे. ती फाईल कुठे आहे हे अजून माहित पडत नाही. अशा अनेक फाईल्स आहेत. फाईल ट्रॅक होत नाही. यात अधिका-याकडे फाईल गेली का ते आम्हाला माहित होत नाही. दहा दहा दिवस फाईल ट्रॅकिंगला लागतात. फाईल ट्रॅकींग केलेच पाहीजे. फाईल कुठल्या टेबलवर आहे, कुठे गेली आहे ही माहिती मिळालीच पाहीजे. तुम्ही फक्त गोषवारा करताय. उद्यान विभाग – हे होपलेस डिपार्टमेंट आहे. मी कमिश्नर साहेबांना एका बगिच्यासाठी, लॉनसाठी रिक्वेस्ट करुन घेऊन गेलो होतो. त्यांना दाखवले लॉन कसे आहे. त्यांनी दुरुस्तीची ऑर्डर दिली. त्याचबरोबर लॉनमध्येच झाडे लावून टाकली. १५० लोकांनी सही करुन ऍप्लिकेशन केले. लॉन चांगले दिसतेय, कमी कशाला करताय. आत्ता म्हणतात, अर्धे लॉन करणार आहोत. तुमच्या सिस्टीममध्ये कॉर्पोरेटर नाहीत का. फक्त अधिकारी आहेत का. अनेक वेळा प्रश्न पडतो टक्केवारी कितीही करा आम्ही मध्ये येणार नाही. १५० लोकांनी सही करुन दिली. ही झाडे काढून टाका. आत्ता तिथे ज्येष्ठ नागरीकांचे ऑफीस आहे. हजारो ज्येष्ठ नागरीक तिथे येत जात असतात. प्रत्येक जण माझा कान धरतो. मी म्हणालो, मी विनंती केली आहे. लेटर दिले होते. कोणतीही गार्डन दुरुस्त करा. कोणताही कमिश्नर या विभागाकडे बघत नाही. स्थापत्य विभाग मोठ्या प्रोजेक्टस् मध्ये दुरुस्ती करतो. प्रत्येक गार्डन घ्या. बघा लॉन कसे मेन्टेन केले आहे. किती बोंब मारतो. एका ठेकेदाराला ५०/५० गार्डन्स् देताय. प्रत्येक गार्डनमध्ये २/२ माणसे ठेवायला पाहीजेत. तो प्रत्येक गार्डनमध्ये माणूस ठेवत नाहीत. ग्रुप ठेवलेला असतो. आज या गार्डनमध्ये दोन तास, उद्या त्या गार्डनमध्ये दोन तास. शंभर लोकांचे पैसे घेऊन पन्नास माणसे सुद्धा तो ठेवत नाही. कामे होत नाहीत. कोणत्याही गार्डनमध्ये लॉन व्यवस्थीत मेंटेन करत नाही. याला कारण अधिकारी आहे. कोणता अधिकारी किती वेळा कोणत्या गार्डनमध्ये व्हिजिट करतो. ऑफिसमध्ये बसून बीले साईन करुन पैसे घ्यायचे एवढेच काम आहे. आपल्याकडे जे.ई. राबराब राबतो. डेप्युटी अधिकार असून काही करणार नाही. एक्झिक्युटीव्हला कुठेही जायची गरज नाही. जसे सुरगुडे साहेबांनी उत्तर दिले होते, ही फाईल माझ्यापर्यंत येत नाही. म्हणून मी दोषी नाही. त्याचे ३ टक्के मात्र माझ्याकडे आले. ज्या अधिका-यांनी भ्रष्टाचार केला, चुकीचे काम केले, त्या अधिका-यांवर परदेशी साहेबांनी ऍक्शन घेतली आहे. ६० लोकांची डी.ई. चालू आहे. तुम्ही कोणाच्या तरी पुढा-याने लूट करु देऊ नका. तुम्हाला देव सुद्धा माफ करणार नाही. ज्यादिवशी परदेशी साहेबांची बदली झाली, त्यादिवशी सस्पेण्ड केलेले जे अधिकारी हॉटेलमध्ये बसून मस्त दारू पित बसले होते. त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. नाहीतर पुढील ३ वर्षांत कोणताही अधिकारी तुमचे ऐकणार नाही. अशी परिस्थिती व्हायला नाही पाहीजे. यात जास्त लक्ष द्या. विकास तर व्हायलाच पाहीजे. बीआरटी रोड – एका साईडला गाडी जाण्यासाठी पार्टीशन लावले आहेत. पण तिथे फार कमी जागा

आहे. बीआरटी रोडसाठी प्रोव्हिजन, जाळी बसवली आहे. फूटपाथ फार मोठे आहेत. एवढे कशासाठी देतो आहोत. त्यातले २५ टक्के फूटपाथ ठेवून बाकी बीआरटी रोडमध्ये ॲड करुन टाका. अनेक ठिकाणी बीआरीटी मध्ये पार्टीशननंतर परत फूटपाथ आहे. तो पाठिमागे घ्या. तरच रस्ता मोठा होणार आहे. कॉन्ट्रॅक्टरला जास्त सुविधा मिळू शकणार नाही. जाता जाता एवढेच सांगायचे आहे, डेव्हलपमेंटच्या दृष्टीने तुम्ही यावेळी जूनमध्ये टेंडर काढायला सांगा. मा.विधी समितीत विषय आणून जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये सगळी कामे पूर्ण करुन ऑक्टोबरमध्ये वर्कऑर्डर दिल्यानंतर ऑक्टोबर एण्डपर्यंत कामे सुरु व्हायला पाहीजेत. नाहीतर अनेक ऑर्डर डिसेंबरमध्ये इश्यू झाल्या आहेत. वर्क ऑर्डर डिसेंबरमध्ये मिळेल. अधिका-यांनी खोटे सांगितले, वर्क ऑर्डर देऊन टाकल्या. आता कॉन्ट्रॅक्टर काम करणार नाही. दोन अडीच महिन्यांत सगळी कामे होणार का? मग २५ टक्के, ३० टक्के बिलो कामे होतात. म्हणून टेंडर वेळेत निघाले पाहीजेत. वर्क ऑर्डर वेळेत काढल्या पाहीजेत. आयुक्त साहेब, जाता जाता तुम्हाला पुढील ३ वर्षांसाठी शुभेच्छा देतो.

**मा.बाळासाहेब तरस** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बजेटवर चर्चा करत असताना अनेक सहका-यांनी याठिकाणी नवीन समाविष्ट गावांवर चर्चा झाली आहे. मुंबई इथून येत असताना माझा प्रभाग प्रथमच आहे, प्र.क्र.१८ किवळे विकासनगर. प्रथमच नगरसेवक झाल्यानंतर गेल्या दोन वर्षांत नगरसेवक म्हणून इथे पूर्णपणे असमाधानी आहे असे मला म्हणायचे आहे. गेल्या दोन वर्षांत परदेशी साहेबांशी अनेक वेळा पत्रव्यवहार करुन सुद्धा एकदाही किवळे विकासनगरला एकदाही भेट न देणारे आयुक्त म्हटलेतरी वावगे होणार नाही. प्रत्येक वेळी अधिका-यांना अनेक वेळा फोन करुन त्यांची मिटींग लावणारे आयुक्त, अनधिकृत बांधकामे जोरदारपणे पाडणारे आयुक्त, ग्रामिण भागाला भेट न देणारे, पत्रव्यवहार करुन सुद्धा न येणारे आयुक्त म्हणून माझा गेल्या दोन वर्षांचा अनुभव आहे. किवळे विकास नगरला लागून कँटोनमेंट बोर्डाचा बहुतेक भाग आहे. डि.पी. झाल्यानंतर किवळे विकास नगरचा बराचसा महापालिकेचा भाग कँटोनमेंटमध्ये गेला आहे. परंतू तिथले नागरीकांना सिद्धार्थनगर असेल, मामुर्डी असेल, आदर्शनगर असेल त्यांना महापालिका कोणत्याही सुविधा देत नाही. ड्रेनेज व्यवस्था नाही, रस्ता नाही. ब्लॉक बसवले नाहीत. तरीसुद्धा ते टॅक्स पेअर आहेत. आपण त्यांना सुविधा पुरवू शकत नाही. त्यांच्याकडून आपण टॅक्स वसूल करतोय. देहूरोडवरुन येणारा प्रमुख नाला याचे सांडपाणी थेट पवना नदीत येते आहे. त्याची लांबी जवळजवळ चार ते साडेचार कि.मी. आहे. सन २०१३-१४ मध्ये त्याची तरतूद असलीतरी जागेवर एकाही रुपयाचे काम झालेले नाही. पहिला हा नाला शंभर फूटाचा होता. आत्ता जागेवर फक्त ५ फूटाचा राहीलेला आहे. अनेक वेळा रु.३९,९९,६५०/- ची तरतूद केली. जागेवर पाच रुपयाचे सुद्धा काम झालेले नाही. असे अनेक प्रश्न त्या भागात आहेत. विशेषतः आदर्श नगर, साईनगर, आझाद नगर व मामुर्डी इथे तीन हजार लोकवस्तीचा भाग आहे. तरीही एकही शाळा नाही. आरक्षणे ताब्यात घेण्याची कोणती प्रोव्हिजन झालेली नाही. किवळे विकासनगरला किती टक्के ड्रेनेज व्यवस्था झाली हे अधिका-यांनी जाहीर करावे. उत्तम नगर भागात १५/१६ वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीच्या काळात पीव्हिसी लाईन टाकली होती. ही पीव्हीसी लाईन अद्यापपर्यंत तीच आहे. पालिकेने तिथे नवीन लाईन टाकली नाही. उत्तमनगर हा २५० लोकवस्तीचा भाग आहे. तिथे महापालिकेच्या स्ट्रीट लाईट अजून गेल्याच नाहीत. स्ट्रीट लाईट काय भाग असतो ते माहितच नाही. बाकी ठिकाणी

मोठमोठे हायमास्क दिवे लागले आहेत. परंतू माझ्या प्रभागात छोटा दिवा सुद्धा लागलेला नाही. आज महापालिकेच्या अर्थसंकल्पावर बोलत असताना कोटी कोटींची उड्डाणे मारतो. प्रत्यक्षात हजारो हजारो रुपये तिथे पोचतात का नाही याचा सुद्धा उल्लेख झाला पाहीजे. आमच्या भागात अधिकारी कधी येतात, कधी येत नाही. तिथे सुपरवायझर फिरतात. कारण हा सर्वात शेवटचा भाग आहे. ७/८ कि.मी.चा प्रभाग आहे. एकावेळी १५/२० कि.मी. फिरुन होते. कोणी तिथे पोहोचतच नाही. चुकून नगरसेवक झाल्यासारखे वाटतेय. माझ्यासारखे अनेक नगरसेवक झाले आहेत, सगळ्यांना असेच वाटते आहे. काही बोलायला अडचण वाटत असेल. काहींना वाटते, नगरसेवक झालोय तर ५ वर्षे होऊ द्यात. एखादे पद तरी मिळेल. बाकी पद मिळण्यापेक्षा सामान्य नागरीकांना सुखसुविधा मिळणे मला महत्वाचे वाटते. त्याठिकाणी विश्वासाने काम करण्यासाठी आपल्याला जनतेने निवडून दिले आहे. त्यांची कामे होत नसतीलतर त्याचा उपयोग काय? जुन्या अधिका-यांच्या हाताखालून बरेच नगरसेवक गेलेले असतात. त्यांना कामकाजाचा ४/५ वर्षांचा अनुभव असतो. नगरसेवकांनी विचारले तर ते म्हणतात, टेंडर निघतेय, वर्क ऑर्डर थोड्याच वेळात येते आहे. ४ महिने पावसाळ्यात पूर्ण जातात. उर्वरीत दोन महिन्यांत काम. तिथल्या नगरसेवकाला विश्वासात न घेता कामे चालू आहे. आत्ता प्रभागात प्रथमच डि.पी. रोडचे काम गेल्या वर्षी चालू झाले. त्यांचे चारही डि.पी. रोडचे काम बंद आहे. अमुक एका शेतक-याने हे दिले नाही, ते दिले नाही, डांबरीकरण करुन दिले नाही. बांधकाम व्यावसायीकाच्या इथे मात्र डांबरीकरण चालू आहे. मी सांगतो, इथे केले पाहीजे तिथे लक्ष देत नाही. सर्वसामान्य नागरीकांच्या घरावर पोचणारा रस्ता खडीमुरमाच्या रस्त्यातून जातो, याकडे प्राधान्याने पाहीले पाहीजे. माझी आपल्याला नम्र विनंती राहील की, आपण किवळे-विकासनगरला भेट द्यावी. नाल्याचा प्रश्न असेल,ड्रेनेजचा प्रश्न असेल अजून निर्णय झालेला नाही. तुम्ही गहुंजे स्टेडियमचे लगेच करुन घेतले. १८ मी. रस्ता तत्काळ होतो. गहुंजे स्टेडियम महत्वाचे आहे, माझ्या प्रभागातील नागरीक महत्वाचा नाही. माझा प्रभाग दाट लोकवस्तीचा भाग आहे. २०,००० लोक राहतात. ग्रामपंचायत काळात जेवढा रस्ता होता, तेवढाच राहतो. कोणी सांगते, कोर्ट मॅटर आहे, हा भाग रेड झोनमध्ये गेला आहे. रेड झोनमध्ये ३० टक्के भाग गेला आहे. तिथे कोणतेही काम झालेले नाही. नवीन नगरसेवक असल्यामुळे बनवण्याची पद्धत, उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. पदाधिका-यांना बनवायची पद्धत चांगली माहित आहे. नवीन तरतूदीमध्ये बसस्टॉप आहे, मुता-या असतील, वाचनालय असेल, स्विमिंग टॅंक असेल, एक रुपया सुद्धा तरतूद केलेली नाही. या कामासाठी ५० लाख, त्या कामासाठी दीड कोटी. सन २०१४-२०१५ला एक रुपयासुद्धा दाखवलेला नाही. परंतू मला वाटते, महापौर साहेब व आयुक्त साहेबांनी मिटींग घेऊन नवीन समाविष्ट गावांना जवळजवळ दोन कोटी देऊन विकास साधायचा प्रयत्न केला होता. सहा महिने गेले तरी काहीच झाले नाही. किवळे विकासनगरला घरे पाडण्यासाठी मशीनरी खरेदीसाठी रु.२४ लाख तरतूद दाखवली आहे. मुख्य रस्ता किवळे गावठाण गेले सात/आठ वर्षांपासून खड्डे असलेले रस्ते डांबरीकरणाच्या प्रतिक्षेत आहेत. अधिकारी काय म्हणतात, अनेक प्रभागांत एकाच ठेकेदाराची कामे चालू असल्यामुळे, त्याला अनेक कामे मिळाल्यामुळे तुमचे काम जरा लांबणीवर पडले आहे. आम्ही गप्प रहायचे का. पुन्हा फोन करायचा साहेब याचे काय झाले. दहा/दहा वेळा सांगतो. तेव्हा तिस-या वर्षी काम चालू झाले. खड्डे खडी मुरुमाने बुजवले गेले. आत्ता पेव्हींग ब्लॉकने खड्डा बुजवला. तरी हा रस्ता झालेला नाही. नुसतीच कोटीच्या कोटी

उड्डाणे, आशिया खंडातली श्रीमंत पालिका आहे, हे पारितोषिक मिळाले, ते पारितोषिक मिळाले. हे करण्यापेक्षा सामान्य वर्गाच्या कामांकडे लक्ष दिले पाहीजे. वेळ न घालवता टेंडर तत्काळ कसे होईल ते लक्ष देऊन अधिकची कामे झाली पाहीजेत.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज सभागृहापुढे २०१४-२०१५चे बजेट आले आहे. मा.विलास नांदगुडे यांनी सांगीतले होते, पंधरा दिवस आधी बजेटचे पुस्तक सगळ्या नगरसेवकांपुढे पाहिजे होते. आम्ही नवीन नगरसेवकांनी बजेटचे पुस्तक बघायचे म्हणजे अबकडपासून सुरुवात करावी लागते. आमच्या पक्षनेत्या मा.मंगलाताई कदम यांनी आमची कार्यशाळा घेतली. त्याबद्दल मी त्यांची खूप खूप आभारी आहे. आज अशी प्रथा आहे, नगरसेवकाने आपला अहवाल वॉर्डापुढे मांडायचा असतो. त्याने ही ही कामे केली, या कामांसाठी तरतूद केली, केलेली तरतूद प्रत्यक्ष प्रभागात न्यायची असते. परंतू तरतूद झाली असून सुद्धा कामे झाली नाहीत हा अहवाल कोणाकडे देणार? आज खूप वर्षांपासून शहराचा विकास बघतोय, वॉर्डाचा विकास बघतोय. गेले दोन वर्षे संथ गतीने विकास चालू आहे. परदेशी साहेब आल्यानंतर त्यांनी स्कॉडची निर्मिती केली होती. त्याबाबत एक उदाहरण सांगते. माझ्या प्रभागात शंकर शेट्टी उद्यान आहे. तिथे अर्ध्यात वॉल कंपाऊंड आहे. मी उद्यानात चकरा मारत असताना वॉल कंपाऊंडचे काम चालू असल्याचे दिसले. अधिका-यांकडे चौकशी केली की, या वॉलचे काम कोणी करायला सांगितले. तेव्हा त्या अधिका-यांनी सांगितले, स्कॉडचे अधिकारी उद्यानात आले होते. त्यांनी उद्यानात एक हजार लिटर पाण्याच्या टाकीचे काम करायला सांगितले होते. हे ऐकून मला खूप आनंद झाला. पिण्याच्या पाण्याची सोय करा म्हणून मी गेले वर्षभर तक्रार करत होते. उद्यानात शौचालय आहे. त्यावर टाकी आहे. त्यात पाणी जात नव्हते. त्यामुळे शौचालय स्वच्छ होत नव्हते. ज्यावेळी स्कॉडने पाहणी केली, त्यावेळी त्यांना वास आला नाही का. त्यांनी फक्त भिंतीचे काम करायला सांगितले. तिथे फक्त भिंतीचे काम झाले. तिथे तरतूद कुठून झाली. हे काम बंद केल्यावर टाकीचे काम झाले. माझ्या प्रभागात काळभोरनगर इथे नगरपालिकेच्या शाळेत नगरपालिकेच्या परीक्षा वारंवार होत असतात. जे अधिकारी तिथे चकरा मारतात त्यांना वारंवार तक्रार केली होती. त्या शाळेचे वॉल कंपाऊंडची भिंत पडकी आहे. परंतू कोणी लक्ष दिले नाही. तरतूद असून सुद्धा ते काम झाले नाही. ही वॉल कंपाऊंड पडली. तरतूद असून सुद्धा कामे होत नाहीत. छोट्या-छोट्या कामांतून शहराचा विकास होत असतो. नगरसेवकांच्या छोट्या छोट्या तक्रारींकडे लक्ष द्यावे. पीएमपीएल बाबतीत सांगते, आपण त्यांना बजेट देतो. बजेटमधून रक्कम देतो. त्याबदल्यात काहीतरी काम करुन घ्यावे. पीएमपीएलच्या बसची फ्रिक्वेन्सी नाही. बस स्टॉप नाहीत. उन्हापावसात नागरीक उभे राहतात. मागील वर्षी बजेट होत असताना बजेटमध्ये तरतूद व्हावी असे सांगितले होते. वायसीएम हा पिंपरी चिंचवडचा कणा आहे. पण तिथे बर्न वॉर्ड नाही, तो असावा. ब-याचशा महिलांना दुखापती झालेल्या असतात. आपल्याकडे क्रिडा संकुल आहे. तिथे सुरक्षा रक्षकच नाहीत. पैसे खर्च करुन विकसित केलेली क्रिडासंकुले, उद्याने आहेत. सुरक्षा रक्षक नसल्यामुळे ती व्यवस्थित कशी राहतील ही सूचना लक्षात घ्यावी. माझ्या प्रभागात हॉस्पिटलसाठी जागेचे आरक्षण आहे. त्यासाठी वारंवार फॉलोअप ठेवलेला आहे. बरेचसे लोक हॉस्पिटलचा उपयोग करुन घेतील. आपण याचा फॉलो अप घ्यावा ही विनंती.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब तुम्हाला विनंती करतो, नवीन लोकांना बोलायला पहिली संधी द्या. सन २०१४-१५ च्या बजेटच्या निमित्ताने आजपर्यंत याठिकाणी बराचसा ऊहापोह झाला आहे. खरेतर बाळासाहेबांनी गुरव पिंपळेची व्यथा मांडली. मी मा.क्रिडा समितीचा सभापती आहे. मला आपल्याला विनंती करायची आहे की, आस्थापना, क्रिडा विभागाला बजेट आहे. फक्त शालेय स्पर्धांसाठी बजेट वापरले. त्याव्यतिरिक्त बजेट वापरलेले नाही. व्यायामशाळा असेल, खेळाडू दत्तक योजना असेल, तिथे सदस्यांना न्याय मिळालेला नाही. बजेट आहे पण क्रिडा विभागात कर्मचारी काम करत नाहीत. बजेट खर्च केलेले नाही. रु.६० लाख इतके बजेट असूनही एक रुपयाचे देखील खर्च झालेला नाही. मग अधिका-यांना ही रक्कम घरी घेऊन जायची आहे का? गेल्या वर्षी व्यायामशाळा साहित्य खरेदीसाठी रु.७० लाखांचे बजेट असताना निव्वळ फक्त क्रिडा विभागाचे अधिकारी व क्लार्क यांनी काम न केल्यामुळे हे ७० लाख लॅप्स झाले आहेत. सन्मा.नगरसेवक मागणी करतात. अधिकारी व कर्मचारी बजेट लॅप्स करतात. जर साहित्य खरेदी न करुन सदस्यांना न्याय द्यायचा नसेल तर क्रिडा विभाग बंद करा. बजेट कशासाठी पाहीजे आहे. फक्त शिक्षकांना पॅकेज मिळाले पाहीजेत. स्पर्धा झाल्या पाहीजेत. शहरात व्यायामशाळा आहेत. त्यांच्यापर्यंत सुविधा जात नसतील तर मग बजेट का करायचे? या वर्षाचे किती बजेट खर्ची झाले याचा शोध घ्या नंतर तरतूद करा. आमची धूळधाण झाली आहे. क्रिडा विभागाचे बजेट खर्च होत नाही. एक रुपयासुद्धा खर्च केला जात नाही. माझ्याकडे १९९४चे आरक्षण आहे. विषय स्थायी समितीत, महापालिका सभेत विषय मंजूर असूनही अधिका-यांनी तरतूद फक्त रु.७ लाख टाकली आहे. मी कमी शिकलो असलोतरी मी या शहरात २५ वर्षांपासून राहतोय. काही अनुभव घेतला आहे. अशा पद्धतीने अधिका-यांनी काम करायचे का. दीड कोटी खर्च वाढला पाहीजे. तरतूद आहे. तरीदेखील रु.५०/६० लाखच खर्च करतोय. सभागृहात २८ तारखेला बजेटला मंजूरी देणार आहोत. बजेटमध्ये त्रुटी आहेत, त्या अधिका-यांनी सुधारुन घ्याव्यात. माझा आरोप आहे. माझ्या प्रभागातील बजेट करताना कोणत्याही अधिका-यांनी मला विचारले नाही काम काय करायचे आहे, मला विश्वासात घेतलेले नाही. अधिकारी रोज माझ्या प्रभागात बघायला येतात का. इथे खड्डे पडले आहेत, इथे नाला खचला आहे. आमचा अधिकार आहे का नाही. फेरबजेट करत असताना आमच्या प्रभागातील कामे, लोकांचे प्रश्न आम्हाला सोडवायचे आहेत. आम्हाला कोणी अधिका-याने का विचारलेले नाही. बजेट करताना अधिका-यांनी नगरसेवकांना विश्वासात घ्यावे. कोणती कामे महत्वाची आहेत त्यांना प्रायोरीटी द्यावी. जास्त निधी टाकलातर त्याला आमचा विरोध नाही. दोन वर्षांत एक रुपयासुद्धा खर्च होत नाही. शहराला त्यातून काय फायदा आहे. प्रभागाला काय फायदा आहे. २ वर्षे का लागली होती. १९९४ चे आरक्षण आहे. निव्वळ फक्त अधिका-यांना पाठिशी घातले आहे. मुलांना खेळायला क्रिडांगण नाही. तरतूद आहे तरी तरतूद खर्च होत नाही. अशा पद्धतीने झालेतर सभागृहातील आमची ५ वर्षे अशीच निघून जातील. पण जनता आम्हाला दारात उभे करणार नाही. मी बिनविरोध निवडून आलोतरी लोक म्हणतील सुटायचे बघा. बजेट व्यवस्थित मिळाले तरी बजेट खर्च करता आले नाही. गेल्या बजेटमध्ये श्रीकर परदेशी साहेबांनी ३० टक्के कपात केल्यामुळे २०१३-१४ मध्ये आमच्याकडे शंभर रुपयातला पाच रुपयेसुद्धा विकास झालेला नाही हे छातीठोकपणे सांगतो. फक्त बीआरटीएस रोड आहे तिथे मोठ्या वॉर्डांचाच विकास, छोट्या वॉर्डात विकास नाही. जिथे ४०० कोटी तिथे कामाला प्राधान्य पहिले. आमच्या वॉर्डांसाठी २/३

कोटी. नगरसेवकाचे काम झाले नाहीतरी चालेल. आपण लक्ष द्या. माझ्यासारख्या अनेक प्रभागांबाबत बजेटमध्ये त्रुटी राहील्या आहेत. आम्हाला दोन/चार दिवसांचा वेळ द्या. फायनल मंजुरी देऊ. आम्ही ज्या सूचना करु त्यांचा समावेश या बजेटमध्ये व्हावा अशी विनंती करतो. आज विनंती करतो, बजेट आज मंजूर न करता चार दिवस उशीरा बजेट मंजूर करा. पण या आर्थिक वर्षात आमच्या सूचनांचा त्यात समावेश व्हावा अशी विनंती करतो.

**मा.अश्विनी मराठे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभा सुरु झाल्यापासून आपण एकच ऐकतोय, ग्रामिण भागाकडे दूर्लक्ष झाले आहे. तशीच अवस्था आमच्या भागात सुद्धा आहे. आम्हाला तरतूद खूप कमी दिली आहे. कदाचित आम्हाला डावलण्याचा प्रयत्न झाला आहे. तरीसुद्धा माझी आपल्याला विनंती आहे की, आपण यात जास्तीत जास्त लक्ष घालावे. आमची कामे कशी करता येतील, टेंडर प्रोसेस कशी गतिमान करता येईल याकडे लक्ष द्यावे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आजच्या या महापालिकेच्या बजेट संदर्भात घेतलेल्या स्पेशल मिटींगसाठी मा.महापौर साहेब तुमचे खरेतर अभिनंदन. नाहीतर नेहमीच्या महापालिका सभा असल्यासारखे भरभर उरकायचो. पुणे महानगरपालिकेत ४/४ दिवस बजेटवरील चर्चा चालते. चर्चा कितीवेळ चालली याला महत्व नाहीतर त्या चर्चेतून फलनिष्पत्ती काय झाली याला महत्व आहे. आयुक्त साहेब,आपण या महापालिकेत नवीन आला आहात. तुमचे मनापासून स्वागत करते. आम्हाला कळत नाही, नगरसेवक पदी असलेली मंडळी जुन्या नगरसेवकांनी नवीन नगरसेवकांचा मान ठेवावा. जुन्या नगरसेवकांना अजून काही कळालेले नाही महापालिका तर नवीन नगरसेवकांना कधी कळणार. आम्ही इथे यायचे, कुत्र्यासारखे भुकायचे. निघून जायचे. तुम्ही एकाही प्रश्नाचे उत्तर देत नाही. ज्या-ज्या विभागांच्या प्रश्नांवर इथे नगरसेवकांनी बोट उचलले आहे, त्या-त्या विभागाच्या प्रमुखांनी त्या त्या विषयाचा खुलासा केला पाहीजे. बजेटचे पुस्तक पहिल्यांदा छापतात नंतर चर्चा करायला संधी मिळते. उलटी गंगा वाहतेय. मग चर्चा ४ तास केली काय, १० तास केली काय १ तास केली काय चर्चा केल्यानंतर बजेट मंजूर केल्यानंतर केली तरी काय किंवा सरसकट मंजूर केलेतरी काय फरक पडणार आहे. एवढे आपल्या हातात असेल, अधिका-यांना कोणतीही जबाबदारी नसेलतर उपयोग काय ? मी किती वेळा बोलले, किती प्रश्न विचारले काय , कोणावर काय आक्षेप ठेवला त्याचा काय उपयोग आहे का? माझी आपल्याला विनंती आहे की, आयुक्त साहेबांनी ब-याच नगरसेवकांचे प्रश्न लिहून घेतले असतील विभाग प्रमुखांनी खुलासा केला पाहीजे. तरच नगरसेवकांचे समाधान होईल. त्यांच्या सुद्धा बोलण्याला कुठेतरी किंमत आहे. बजेट मिळत नाही म्हणून आरोप होत होते. खरेतर विरोध पक्ष म्हणून आमचे नगरसेवक चिंचवडसारख्या भागातले नगरसेवक असे म्हणत असतील तर खरोखरच बजेट खर्च होत नाही. मा.श्रीकर परदेशी साहेबांनी काय केले, तर त्यांनी बजेट खर्च करायला विरोध केला नाही. ९० कोटींचे ओपनिंग बजेट राहिलेले आहे. आत्ता मार्चमध्ये निविदा ओपन होत आहेत. म्हणजे शंभर टक्के बजेट खर्च झाले. यावर नगरसेवक म्हणत असतील बजेटच खर्च झाले नाही. म्हणजे एकतर आपलीच बुद्धीमत्ता कमी आहे. बीले दिली आहेत, वर्कऑर्डर दिली आहे. टेंडर पास झाले. एखाद्याला केवळ बदनाम करण्यासाठी तर बोलत नाही ना? निश्चितपणे नवीन नगरसेवकांच्या वॉर्डात शंभर टक्के असे घडले असेल. तिथे कामे करता आली नाहीत. म्हणून काय कुठेतरी काही खर्च करता

आला नाही असा याचा अर्थ आहे का? शंभर टक्के बजेट खर्ची झाले आहे या म्हणण्याला अर्थ नाही. खरेतर आम्हाला सदस्यांनी आत्ता सांगितले, वर्षात मंजूरी देणार आहोत. पहिल्यांदा ठरले होते. बजेट मंजूर करत असताना मला खरेच प्रश्न पडतो की, आपण शहराला योग्य न्याय देतो का? हे बजेटचे पुस्तक तीन दिवस आधी आम्हाला मिळाले. ते वाचत असताना नवीन मोठे जाड पुस्तक काल संध्याकाळी आले. हा काय घोळ आहे. आता काय करायचे. एवढ्या मोठ्या पुस्तकाचे ११५० पानांच्या पुस्तकाचे काय करणार? काल सुट्टी असल्यामुळे भोसले साहेबांना फोन कसा करायचा म्हणून आज सकाळी त्यांना फोन केला. अंदाजपत्रक क्र.३चे पुस्तक पाठवून दिले होते. त्यात नेमके काय बदल केले गेले. एकतर १५ दिवस आधी पाठवायचा नियम असताना, तशी तरतूद असताना सुद्धा दोन दिवस आधी पुस्तके पाठवली. काल संध्याकाळी ८.३० वा. अंदाजपत्रक क्र.३चे पुस्तक घेऊन कर्मचारी आले. मी सकाळी विचारले त्यावेळी साहेबांनी मला सांगितले, पान क्र. ११५४,११५५,५७७-,५७८ ते ५७९, विद्युत विभाग, ५८०, ९९५, ९९६ सार्वजनिक सुरक्षितता यात वॉर्ड क्रमांक लिहिला नव्हता म्हणून पुस्तक परत छापून आणले आहे. सगळे पुस्तक परत छापले का नाही मी विचारले. ते म्हणाले, आपण फक्त ॲड केले आहे. मला वाटते, मी हे पुस्तक पूर्ण वाचले आहे. अनुक्रमणिका बदलली आहे म्हणजे हे पुस्तक परत छापले आहे. नंबरींग बदलला म्हणजे हे पुस्तक परत छापले गेले आहे, अशी अक्षम्य चूक प्रशासनाकडून होत असेल तर त्याचा दंड कोणाला द्यायचा? तुम्हालाच दिला पाहीजे. अधिकारी म्हणून निश्चितपणे ज्यांच्याकडून चूक घडली असेलतर त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे. खरेतर बजेटचा अभ्यास करत असताना विभागाचा होणारा खर्च ढोबळमानाने मांडण्यात आला आहे. गेल्या वर्षी सूचवलेल्या तरतूदींपैकी नेमका किती खर्च झाला, काय खर्च करण्यात आला. मागील वर्षी जशी धावपळ करत होते तशी धावपळ यावर्षी केली पाहीजे होती. चौथा शनिवार असल्यामुळे शनिवार रविवार सुट्टीत गेला आणि आज बजेटवरील चर्चा हेडच्या दालनात माहिती कुणाकडून घ्यायची. जे कोणी नगरसेवक बोलत असतील त्यांनी अभ्यासपूर्वक बोलले पाहीजे. मते स्पष्ट मांडता आली पाहीजेत. म्हणून आपण किमान ज्या दिवशी बजेट मिटींग होते त्या दिवशी बोलवले नाही पाहीजे. विभागप्रमुखांकडून माहिती घेत होते. मागील वर्षाप्रमाणे अर्धवट माहिती द्यायची हा देखील प्रकार प्रशासन का करते मला कळत नाही. त्यांना वाटते, सगळे नगरसेवक मूर्खच आहेत. यांना काय कळते. मघाशी एका नगरसेवकांनी सांगितले, डिस्टींक्शन मिळवणारा मनुष्य आयएएस होतो. जो काही होऊ शकत नाही तो पुढारी होतो. राजकारण्याने आपली जागा ओळखायला शिकले पाहीजे. जो कोणी असेल, जहागिरदार असेल त्याला आपल्याकडे यावे लागते ही आपली खरोखर ताकद आहे. ज्याने त्याने आपआपल्या ताकदीचा वापर ख-या अर्थाने केला पाहीजे. या ताकदीचा वापर सभागृहात आपण करतो का हा सुद्धा फार मोठा विषय तुमच्याकडे आला म्हणजे तो काहीतरी वाईट शोधणार असे न समजता प्रामाणिकपणे त्यांना माहिती पुरवली गेली पाहीजे. खरेतर महापालिकेचा आलेख अत्यंत चढता आहे. सन २०१०-११ च्या महापालिकेच्या उत्पन्नात रु.१३१६ कोटींची त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन सन २०१३-१४ च्या बजेटनुसार रु.२०२४ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. करसंकलन असेल, बांधकाम परवानगी असेल, जकात असेल, परवाना विभाग असेल या विभागांकडून महापालिकेचे जवळजवळ उत्पन्न ८५ टक्के इतके मिळते. मागील वर्षी जकात ऐवजी एलबीटी लागू करण्यात आली. ज्यावेळी एलबीटी लागू करण्यात आली, त्यावेळी आम्ही सुद्धा जकात दर

समानीकरणाला विरोध केला होता. त्यावेळी आम्ही सांगीतले होते, हे दर लागू करताय. पहिले दर चालू ठेवत असताना तुम्ही दुसरे लागू करा. परंतू एखादा विषय पूर्णपणे बाजुला करायचा व दुसरा विषय सुरु करायचा यात कुठे ना कुठेतरी गफलत होणार होती, आणि ती झालीच. जकात गेली, आणि एलबीटी आली. आज एलबीटीतून रु.७७० कोटी उत्पन्न वसूल झाले आहे. जवळपास ७४ टक्के उत्पन्न वसूल झाले आहे. अजून मार्च महिना यायचा आहे. एलबीटीमुळे उत्पन्न घटले असे सगळ्यांचेच म्हणणे आहे. या मताशी मी अजिबात सहमत नाही. ज्यावेळी जकात समानीकरण जाहीर केले त्यावेळी हे उत्पन्न कुठेतरी कमी होणार हे आमच्या सगळ्यांच्याच लक्षात आले होते. तरीसुद्धा आपण दर समानीकरणाचा विषय शासनाकडे पाठवला. मा.महापौर साहेब, एकतर औद्योगिक क्षेत्रात आलेली मंदी, लोकांना रोजगार नाही, कंपन्या इथून शिफ्ट होत आहेत. चाकण, रांजणगाव, कुरकुंभ इथे कंपन्या जात आहेत. अशा वेळेस जकात समानीकरणाचा विषय आला. आणि आयत्यावेळी उपसूचना दिल्या गेल्या. त्यामुळे महापालिकेला खूप मोठा आर्थिक फटका बसला. महापालिकेच्या आर्थिक हिताविरोधात उपसूचना असेल किंवा सूचना असेल तर ती कलम ४५१ अनुसार विखंडीत करण्याची मागणी आपण शासनाकडे करु शकतो. त्याऐवजी त्याची अंमलबजावणी केलीत ते अत्यंत चुकीचे होते. एकीकडे उपसूचना अशी घेऊ नये म्हणून आम्ही सभागृहात वारंवार मागणी करतो. मी ऐकले की, आपण सुद्धा बजेटमध्ये, स्थायी समिती सभागृहात १ ते १५ उपसूचना दिल्या. माझ्याकडे टाईप करायचे काम चालू आहे. मी नंतर देतो असे आपण सांगितले. नगरसचिवांकडे मी व मा.आशा शेंडगे वारंवार पाठपुरावा करत होतो. आम्हाला सूचना द्या. ज्या आजतागायत मिळाल्या नाहीत, अशा उपसूचना घेत असाल तर शीस्त लावायची वेळ आपल्या स्वतःवर आहे. महापौर साहेब, खरेतर उपसूचना चांगल्या सुद्धा असतील, त्या सुद्धा समोर आल्या पाहीजेत. नेहमी वाईटच उपसूचना आहे असे गृहीत धरुन चालणार नाही. या उपसूचना सभागृहातून यायला पाहीजे होत्या. त्यातून विषय यायला पाहिजे होता. त्या उपसूचना दिल्यात का नाहीत याबाबत अजूनही आम्ही संभ्रमात आहोत. खरेतर जकात असताना जकात जकात नाक्यावर जमा होत होती. परंतू आत्ता एलबीटी आल्यामुळे जवळपास ५० दिवसांचा अवधी मिळाला आहे. मघाशी मी डॉ.माने साहेबांकडून माहिती घेतली. जवळपास १५० कोटींची तूट आत्तापर्यंत आहे. एप्रिल अखेरपर्यंत भरुन निघणार आहे. परंतू ज्या उपसूचना दिल्या होत्या. त्याच्या फेरसमानीकरणाची तूट रु.२७० कोटी ही कधीच भरून निघणार नाही. महापालिकेच्या आर्थिक हिताविरोधात असल्यामुळे आपण गरज वाटेल तशी उपसूचना घ्या. अशा जकात समानीकरणाच्या सूचना आल्या होत्या. त्या शासनाकडे विखंडीत करायला पाठवाव्यात. आपल्याला केवळ रु.७२ कोटी उत्पन्न अपेक्षित होते. एलबीटी आल्यापासून ३२३५८ अकाऊंट आपल्याकडे आले आहेत. एलबीटीमुळे उत्पन्न कमी झाले म्हणून कांगावा करायचा, किंवा त्यावर आगपखड करायचे कारण नाही. आम्ही विरोधी पार्टी म्हणून विरोध केला आहे. त्यातील जाचक अटींना आम्ही विरोध केला होता. एलबीटीला विरोध केला नव्हता. कंपन्यांकडून नोंदणी झाली आहे. विरोध असता तर ३२३५८ अकाऊंटची नोंद झाली नसती. आम्ही विरोध करतो म्हणून त्याचे भांडवल केले गेले. आम्ही त्यातील अटींना विरोध करत होतो. रोज उठून पुस्तक घेऊन तुमच्या दारात तपासणी करण्यासाठी यायचे याला विरोध करत होतो. खरेतर महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील नियमावलीतील तरतुदीनुसार आयुक्तांना उपसूचना दिली असेलतर आयुक्तांची उपसूचना घ्यायची कोणतीच तरतूद

नाही. मा.नगरसचिव जगताप साहेब म्हणून तुमचे सुद्धा कर्तव्य आहे. ही बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणून द्यायची आहे. आयुक्तांनी तोंडी उपसूचना देऊन स्वतः कायदा तोडला असेलतर आमच्याकडून काय अपेक्षा करणार? आम्ही तुम्हाला चुका दाखवायलाच बसलो आहोत. तुम्ही किती वाकताय तेवढे तुम्हाला वाकवणार आहोत. कारण दहावीचे वर्ष संपल्यानंतर मुलं जशी उंडारतात तसे कायद्यात बडग्यातून नगरसेवक व अधिकारी सुद्धा सुटले आहेत. शिस्त केव्हाही चांगलीच पण अतिशिस्त नको. पण शिस्तीचा बडगा उगारला नाहीतर त्याचा परिणाम तुम्हाला, आम्हाला, सगळ्यांनाच भोगावा लागणार आहे. तुम्हाला कुठे उत्तर द्यायची गरज पडत नाही. नगरसेवक म्हणून आम्हाला पाच वर्षांनंतर नागरीकांपुढे लेखाजोखा मांडावा लागतो. खरेतर यावर्षी करसंकलन विभागाने रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे. उद्देश्यापेक्षा ६० टक्के अधिक महसूल महापालिकेला मिळाला आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात या विभागाकडून रु.४०० कोटी उत्पन्नाची अपेक्षा आहे, ती कशामुळे केलेली आहे. त्यांच्या उत्पन्नातील वाढ कशामुळे झाली आहे. उत्पन्नात वाढ वसुलीमुळे झालेली नसून अनधिकृत बांधकामांवरील दंड/शास्ती यातून जी वसुली झाली आहे. त्यातून ही रक्कम जमा झाली आहे. या विभागाचे कौतुक करावे का त्यांच्या कार्यक्षमतेवर ठपका ठेवावा अशा द्विधा मनःस्थितीत मी आहे. परवाच्या मा.महापालिका सभेत अनधिकृत बांधकामांवर दुप्पट दंड आकारु नये म्हणून ठराव मंजूर केला आहे. त्यामुळे करसंकलन विभागाच्या उद्देशाला सुद्धा सुरुंग लागला आहे. आत्ता ब-याच सदस्यांनी सांगितले, डॉ.श्रीकर परदेशी यांनी मिळकतींचे फेरसर्वेक्षण केल्यामुळे सुमारे ८१,००० अनधिकृत मिळकती उजेडात आल्या. त्यांच्याकडून नोंदवून करवसुली करण्यात येणार आहे. खरेतर या मिळकती कधी बांधल्या गेल्या हे ठरवण्याची वेळ येणार आहे. त्यांना दंड लावतो, या ठरावाला त्यावेळी विरोध असणार आहे. खरेतर वादाची ठिणगी तिथेच पडणार आहे. आपल्यासाठी हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. मिळकतींची कर वसुली करावी लागणार आहे. त्याची पुर्नतपासणी करावी लागणार आहे. त्यानुसार कर दंडाची रक्कम आकारावी लागणार आहे. एकिकडे मागील वर्षी मा.श्रीकर परदेशी यांनी सगळ्या नोंदी थांबवल्या होत्या. आत्ता फेर सर्वेक्षण करतोय. एखादी मिळकत २००२ची असेल, २००८ नंतरच्याही मिळकती सापडल्या आहेत. १९९०च्या मिळकती सापडल्या आहेत. या सर्वांसाठी कोणतेतरी एक धोरण ठरवावे लागणार आहे. २००८ नंतरचे बांधकाम असेलतर ते पाडायचे का त्याआधीचे असेलतर ते रेट्रोस्पेक्टिव्ह वाढवून दंड घेऊ शकतो का यावर सभागृहापुढे धोरण निश्चित करावे लागणार आहे. खरेतर आयुक्त साहेब तुमच्यावर मोठी जबाबदारी आली आहे. तुम्हाला हे आव्हान पेलावे लागेल. अधिका-यांना व आम्हाला यावर विचार करावा लागत असेलतर ते त्यांचे यश होते. ते चुकीचे काम करु देत नव्हते. चुकीच्या कामाला कधीच पाठिंबा देत नव्हतो. आज मिळकत नोंदणीमध्ये फार मोठा भ्रष्टाचार होणार आहे. खरेतर मिळकत धारकांकडून मिळकत कर वसूल करताना बँड वाजवून कर वसुली करायची कारवाई चालू होती. परंतू सभागृहाने असे करायला मनाई केली आहे. छोट्या-छोट्या मिळकती हजार दोन हजार थकबाकी असतील तर त्यांच्याकडे न जाता मोठमोठ्या संस्थां कंपन्यांवर जप्तीची कारवाई आणा, नोटीस पाठवा. त्यांच्याकडून कराची रक्कम वसूल केली पाहीजे. हे वसूल करायचे धाडस व मानसिकता दोन्हीही प्रशासनाकडे पाहीजे. परंतू भ्रष्टाचाराने बरबटलेले प्रशासन ही मानसिकता व धाडस दाखवेल का याबद्दल मनात फार मोठी शंका आहे. बांधकाम परवानगी विभाग हा जास्त उत्पन्न मिळवून देणारा विभाग आहे. या विभागाने उद्देश्यापेक्षा रु.६०

कोटी जास्त उत्पन्न मिळवून दिले आहे. त्यांचे लेखाशिर्षामध्ये बांधकाम परवानगी विभागाकडून आकारली जाणारी फी, विकास शुल्क व प्रशमन शुल्क यात आहे. पालिकेकडून जुन्या बांधकामांवर लावण्यात येणारा प्रिमियम व विनापरवाना बांधकामाच्या दंडाचा यात समावेश आहे. या व्यतिरिक्त आकारण्यात येणारी दंडाची रक्कम वेगळ्या लेखाशिर्षावर नोंदवली जात नसल्याची तक्रार मी गेल्या ६ वर्षापासून सभागृहात करते आहे. वारंवार लक्षात आणून दिले आहे की, सगळे प्रशमन शुल्क वेगळे असले पाहीजे. याठिकाणी बांधकाम परवानगी विभागात किती भ्रष्टाचार करते हे आज वेगळे सांगायला माझ्या सारख्याची सुद्धा गरज असणार नाही. प्रशमन शुल्क आकारायला त्या विभागातील विभाग प्रमुखाला, जे.ई.ला पूर्णपणे अधिकार आहे. हे खरे असले तरी परंतू दंड किती आकारला, किती स्क्वे.फूट बांधकाम नियमित होते, प्रशमन शुल्क कशासाठी लावले आहे याची नोंद जरुर केली पाहीजे. यांची चोरी जर पकडायची असेल तर त्यासाठी वेगळा लेखाशिर्ष केला पाहीजे. मी तुम्हाला छोटेसे उदाहरण देते – जोते तपासणी दाखला मागणी केल्यानंतर महापालिकेचा जे.ई. असेल/ विभागप्रमुख दुरुस्ती करतो, जोत्याचे बांधकाम नकाशाप्रमाणे नाही. मी तारखेनुसार देऊ शकते. दर १५ दिवसांनी सांगितले जाते. पुढील १५ दिवसांत प्रोजेक्ट, त्याचा नकाशा मंजूर होतो. जोता म्हणजे काय? इमारतीच्या पायाचे बांधकाम नकाशाप्रमाणे नसेल, असे लिहित असतील तर त्यांनी १५ दिवसांत डुप्लीकेट नाव तयार केले आहे का? इथेच भ्रष्टाचार आहे. म्हणून याची सुद्धा कालमर्यादा आपण ठरवावी लागणार आहे. स्थापत्य विभागाने विचार केलातर मंजूर नकाशाप्रमाणे जोत्याचे बांधकाम नसेलतर १५ दिवसांत दुरुस्ती करणे अत्यंत कठीण आहे. महापालिका जादू करते. किती विनापरवाना बांधकामे झालीत हे अधिकारी ठरवत असल्यामुळे इथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराला वाव मिळतो. आपण यातून उत्पन्नाचा खूप मोठा स्त्रोत गमावतोय. दिवसेंदिवस खर्च वाढतोय. उत्पन्न कमी होत चालले आहे. उत्पन्न वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहीजेत. सन २०१०-११ ला पाणीपट्टीतून मिळणारे उत्पन्न सुमारे रु.५१ कोटी होते. सन २०११-१२ ला सार्वत्रिक निवडणूका लागल्यानंतर हेतूपुरस्सर पाणीपट्टी वसुलीकडे दूर्लक्ष केले गेले. सन २०११-१२ ला पाणीपट्टीतून मिळणारे उत्पन्न रु.२० कोटींनी घटले. वसुली फक्त रु.३१ कोटींची झाली. सन २०१२-१३ मध्ये ४९ कोटी वसुली अपेक्षित होती. सन २०१३-१४ मध्ये रु.५१ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले होते. प्रत्यक्षात रु.४८ कोटींची वसुली झाली आहे. मिळकतींचे फेर सर्वेक्षण केले त्यात ८१,००० नवीन मिळकती असतील तर तेवढेच नळ जोड सुद्धा आढळलेले असले पाहीजेत. का सगळ्यांनी विहिरी खोदल्या आहेत का, बोअरवेल खोदले आहेत? इतके नळ जोड आढळत नसतील तर का आढळून येत नाहीत याचा तपास करावा लागणार आहे. यातून सुद्धा चांगले उत्पन्न मिळणार आहे. वसुलीच्या उद्दीष्टाच्या मानाने उत्पन्न केवळ रु.५० कोटींच्या घरातच दिसते. इथे प्रशासनाचे कुठेतरी चुकते आहे. ४ वर्षे एकसारखेच उद्दीष्ट ठेवून तुम्ही चिंचवड, वाकड भागात गेलात तर पलक झपकते तशा मिळकती वाढत आहेत. तिथे लोकसंख्या वाढली तर मग आपले उद्दीष्ट रु.५० कोटींच्या पुढे का जात नाही? त्यापुढे सुद्धा जावे लागणार आहे. गेली ४/५ वर्षे एक बॅड प्रॅक्टीस झाली आहे. अनधिकृत बांधकामांची. या बांधकामांना अधिकृत नळजोड दिलेत का तर नाही. प्लंबर कोणी असेल तर खालच्या माणसाने ते जोडून दिले होते. पाणीचोरी प्रचंड प्रमाणात आहे. एक टँकर मागितला तर अधिकारी कुणाकुणाचे नाव सांगतात. परवा दापोडीत माझ्या कार्यकर्त्याच्या घरी वास्तुशांती होती. १५ मिनिटसुद्धा पाणी राहीले नाही. दापोडी प्रभाग माझा

प्रभाग क प्रभागाशी निगडीत आहे. त्याने सांगितले, ताई टँकर पाठवायला सांगता का. टँकर शेवटपर्यंत दिलाच नाही. मागील वर्षी गवळी माथा पंपिंग स्टेशन वरुन टँकर भरुन मोशी टोलनाका, चाकण हद्दीत पाणी कसे पुरवतात याचे माझ्याकडे व्हिडिओ क्लिपींग आहे. १/२ दिवस नाहीतर १५ दिवस शुटींग केले होते. असा टँकरने पाणीपुरवठा केला आहे. एकिकडे टँकर देण्यासाठी प्रभागाचे कारण सांगता, गावात दोन ड्रम भरण्यासाठी नागरीकांकडून माल काढायचा. दुसरीकडे सांगतात, आम्ही असे करतच नाही. ही क्लिपिंग मी तुमच्याकडे देणार आहे. यावर आपण काय कारवाई करणार याकडे माझे लक्ष लागले आहे. सगळ्या बिल्डरांची बांधकामे चेक करा. त्यांच्याकडे लोकांनी पाण्यासाठी किती कनेक्शन्स, कोणी मागवली होती. आपल्याकडे किती पैसे भरले आहेत. हे पाहिलेतर यातून पाण्याची चोरी लक्षात येईल. जो नियम पाळतो त्यालाच नियम पाळायला सांगतो. जे नागरीक प्रामाणिकपणे कर भरतात त्यांच्यावर वसुलीचा तगादा लावतो. जो पाणीपट्टी भरत नाही त्याच्याकडे दूर्लक्ष करतो. बीलांची आकारणी वेगळी होते. २०१० ला मीटर बसवले आणि २०१२-१३ ला बील पाठवले. ३०,००० लिटर पुढे स्लॅब गेलातर पाण्याचा रेट बदलतो. जी बाब मी केलीच नाही, चूक केली नाही, त्यासाठी सुद्धा दंड लावतात. बील भरा नाहीतर नळ कनेक्शन तोडून टाकतो. आपण हुकूमशाही पद्धत लावली आहे. करदाता नागरीक याच्या जीवावर सगळे उठतात. २४ बाय ७ पाणी यासाठी नवीन बजेटमध्ये तरतूद केली आहे. २ महिने पण झाले नाहीत. दापोडीत आम्ही रस्ता अडवला होता. हंडामोर्चा काढला होता. शहराच्या किती भागांत पाणी एक तास सुरळीतपणे येते ते बघा. ज्या दिवशी मीटर बसवले, त्यावेळी मा.दिलीप बंड साहेब आयुक्त होते. त्यांनी सांगितले, २४ तास पाणी देणार म्हणून, मीटर बसवायचे म्हणून विषयाला मंजूरी घेतली होती. २००७ पासून २०१४पर्यंत आलो तरीपण २४ तास पाणी देता आले नाही. तुम्ही २४ तास पाणी देऊच शकणार नाही. परंतू हे करत असताना ज्या भागात खरेच पाणी मिळत नाही. कुठे पहाटे ३.०० लाच पाणी येते, कुठे दुपारी २.०० ला पाणी येते, कुठे अर्धा तास पाणी देतो. त्यातही आपली मिजास खूप आहे. फूल प्रेशरने पाणी सोडत नाहीत. ड्रेनेजचे पाणी त्यात मिक्स करतो. एक ना अनेक तक्रारी यात आहेत. खरेतर जे नागरीक व्यवस्थित कर भरतात. त्यांच्या नळ जोडाचे कनेक्शन मीटर काढून नेले आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, त्यांचे नळ जोड परत जोडून दिले पाहीजेत. सर्वसाधारण नागरीक एक रकमी रक्कम भरु शकत नाहीत. त्यांचे बजेट कोलमडते. या व्यतिरिक्त उत्पन्न वाढीचे आणखी स्त्रोत तपासले पाहीजेत. महापालिकेचा आकाशचिन्ह व परवाना विभाग झोपलेलाच आहे. शहरात अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात फ्लेक्स लावले जातात. त्याची प्रक्रिया सुटसुटीत केलीतरी महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. अनधिकृतपणे फ्लेक्स लावले असतील तर त्यांना दंड मारा. राजकीय दबाव असेल किंवा प्रशासनाचे दूर्लक्ष असू दे त्यात पूर्णपणे कारवाई झाली पाहीजे. भूमि जिंदगी विभाग - भूमि जिंदगी विभागाकडे आपल्या अनेक राजकीय दबावापोटी ज्यांना भाड्याने मिळकती दिल्या आहेत त्यांचे भाडे कसे आकारले आहे हा फार मोठा विषय आहे. महापौर साहेब, २०१३-२०१४ च्या बजेट पुस्तकामध्ये उत्पन्नाच्या ५२ टक्के रक्कम सुमारे ११०० कोटी ईडब्ल्यूएस, एसआरए, जेएनएनयूआरएमच्या प्रकल्पांसाठी ही रक्कम वापरण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. खरेतर तुमचे सगळे प्रकल्प फसलेले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी २९६ कोटींची तरतूद करण्यात आली होती. यामध्ये सेक्टर २२ मध्ये विठ्ठलनगर, मिलिंद नगर, अजंठानगर, लिंकरोड

पत्राशेड या प्रकल्पाचा समावेश आहे. अकार्यक्षमता व बोगस सल्लागारांमधील विखंडीत संकल्पना यांच्या संगनमताने २००७ पासून वर्क ऑर्डर दिल्यानंतर गेल्या ६ वर्षांत ३० टक्के सुद्धा काम झालेले नाही. एकूण १८७०० गाळे बांधण्यात येणार होते. त्यापैकी ६५ टक्के सेक्टर २२ मध्ये बांधण्यात येणार होते. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुणे जिल्हाधिका-यांनी सेक्टर २२ पूर्णपणे रेडझोनमध्ये येते हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सेक्टर २२चा प्रकल्प गुंडाळावा लागणार आहे का यात काही शंका उरलेली नाही. आपण नवीन रिट पिटीशन दाखल केले आहे. दूर्देवच आहे आपण रिट पिटीशन दाखल करतो व आपणच हजर होत नाही. इतिहासात पहिल्यांदा घडले आहे महापालिका विरुद्ध केंद्र शासन. प्राधिकरण विरुद्ध केंद्र शासन असा दावा घेतला आहे. दोन्हीही संस्था हायकोर्टात हजर होत नाहीत. तुम्ही नागरीकांची फसवणूक करताय. भूलथाप देताय. आम्ही त्यांच्याशी भांडतोय. खरे सांगितले तर लोकांना पटत नाही. मी दिसायला कुरुप आहे. पण कोणी मला म्हणाले की तुम्ही सुंदर दिसताय तर ते खरे मानते. पण माझा खरा चेहरा मला कोणी सांगितले तर ते मला पटत नसेलतर तो माझ्या मानसिकतेचा विषय आहे. सेक्टर २२ च्या केसमध्ये पहिल्यांदा कोर्टात हजर व्हायला शिकले पाहीजे. उरलेली ६५ टक्के झोपडपट्टी पुनर्वसन योजना संपूर्ण प्रोजेक्ट होणे शक्य नाही. मा.पठाण मॅडम यांनी सांगितले, वेताळनगरला येऊन बघा. किती संथ गतीने काम चालू आहे. तुमचे म्हणणे खरे आहे. ते जेएनएनयूआरएमच्या मुदतीत पूर्ण होईल याची खात्री वाटत नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी करण्यात आलेली २९६.२५ कोटींची तरतूद फसवी आहे. पाणीपुरवठा टप्पा १ – बंद पाईप लाईन योजना ३१०.५१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शेतक-यांवर केलेल्या अमानुष गोळीबारामुळे ही योजना बंद पडली आहे. शेतक-यांची बाजू समजून न घेतल्यामुळे या प्रकल्पाला या वर्षी हाती घेता येईल का याची शक्यता फारच कमी आहे. यासाठी केलेली रु.३१०.५१ कोटींची तरतूद फसवी आहे. ५५० कोटी इथेच झालेत. त्याचे काहीच करणार नाही. कारण न देता आल्यामुळे तरतूद दाखवावी लागते आहे. ३,००० कोटींचे बजेट होते. त्यात खर्च काय केला हे जर सदस्य विचारत असतील तर त्याचे बायफरकेशन आपल्याला करता आले पाहीजे. जेएनएनयूआरएम प्रकल्पाचा फंड किती. त्याचा डिपीआर केंद्र शासनाकडे पाठवलातर त्या डिलचे काम आपण करु शकतो. हे सांगायचे काम आपले आहे. नवीन नगरसेवक असतील, जुने नगरसेवक असतील आम्हाला बजेट पूर्णपणे कळत नाही. पुढील वर्षी आपण कार्यशाळा घ्यावी. बीएसयूपी, एसआरए व पाणीपुरवठा या योजना करण्यात आल्या असल्यातरी २९६.२५ + ३१०.५१ म्हणजे ६.६ कोटींची तरतूद खोटी व फसवी आहे. बीएसयूपी योजना यात २५ ते ५० कोटी वगळून खर्च करतो. कामच चालूच नाही. खरेतर मागच्यांनी केलेल्या चुका निस्तरण्यात प्रशासनाचा खूप वेळ जातो आहे. त्यामुळे शहरातील मूळ गरजांकडे दूर्लक्ष झाले आहे. विशेष योजनेत पुणे पिंपरी चिंचवड मनपाच्या संयुक्त विद्यमाने महानगर क्षेत्राकरिता रु.५ कोटी मेट्रोसाठी तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा रिंग रेल्वे असेल, ट्राम रेल असेल रिंग रोड असेल याची घोषणा करण्यात आली. दोघांचे काय झाले ते आजपर्यंत कळालेने नाही. मा.दिलीप बंड म्हणाले होते, सगळ्या नगरसेवकांना दुबईला घेऊन जातो. शहर बघा कसे आहे ते दाखवायला. दाखवायला गेला कधी, त्याचे पुढे काय झाले ते कळालेच नाही. महापालिका डि.पी.त ३५ SCTR ट्रॅफिक समस्या निश्चितच सुधारेल. परंतू डिपीत २०/२० वर्ष तरतूद केलेले रस्ते ताब्यात घ्यायचे नाहीत. आणि नको त्या ठिकाणी पैसा खर्च करायचे. मघाशी माहिती घेतली.

१०० कोटी तरतूद करतो. आणि खर्च किती करतो. ५९ कोटी जागा ताब्यात घेण्यासाठी खर्च करतो. सगळीकडे टीडीआरचा महापूर आला आहे. नवीन भागातील नगरसेवक आत्ता तुमच्यावर कडाडले आहेत. सत्ताधारी पक्षाचे पण व विरोधी पक्षाचे पण. इथे मनगटशाही आहे. जो जसं वाकवतो तसे अधिकारी सुद्धा वाकतात. नवीन नगरसेवक असल्यामुळे त्याचे इथे काहीच चालू देत नाहीत. एकिकडे १०० कोटी खर्च होत नाही. दुसरीकडे १०० कोटींचा टी.डी.आर. एका महिन्यात पास करतो. हा विरोधाभास नाही का. आमचे काही म्हणणे नाही. टीडीआर द्यायचा तो द्या. कोणती तरतूद कशासाठी ठेवता. झिरो तरतूद ठेवा. सगळ्यांना म्हणा या आम्ही टीडीआर द्यायला मोकळे आहोत. महापौर साहेब खरेतर ट्राम वे, रिंग रोड, बीआरटी या योजना म्हणजे सल्लागारांच्या खिशात पैसे घालण्यासाठी केलेल्या व्यवस्थित योजना आहेत. अगदी फसव्या योजना आहेत. पुणे-मुंबई हायवे याचे सेफ्टी ऑडीट केले नव्हते. म्हणून मी मागील वर्षी आयुक्त साहेबांना व्हिडिओ क्लिपिंग आणून दिले होते. तुम्ही रु.५ लाख खर्च केले. तिथे अपघाताची शक्यता किती जास्त आहे. गाड्यांचा मर्ज इन, मर्ज आऊट हे आकड्यांनिशी पटवून दिले होते. त्यानंतर आयुक्त साहेबांनी त्याप्रमाणे आय.आय.टी.पवई यांच्याकडून सेफ्टी ऑडिट केले होते. मला दूर्दैवाने हे सांगावे लागते आहे की, त्यांना यावर तोडगा काढता आला नाही. इथे इन्फ्रास्ट्रक्चर उभे आहे. ६१ मी.चा आधीच रस्ता केला आहे. त्यापेक्षा जास्त घेऊ शकत नाही. तुम्ही फुटपाथ द्यायलाच पाहीजे. आज तुमचा फुटपाथ नाही, सायकल ट्रॅक नाही. हे काही नसतानाही आज बीआरटी रस्ता करायचा हट्ट प्रशासन धरुन बसले आहे. या सगळ्या रस्त्यांमुळे एखादे कुटूंब उध्वस्त होणार आहे. या अंदाजपत्रकात नवीन गावांसाठी कोणताही विशेष उपक्रम, भरीव प्रकल्प किंवा योजना नाही. तसेच बजेटमध्ये एकाही नवीन अद्ययावत इंग्रजी शाळेची तरतूद केलेली नाही. इंग्रजी माध्यम शाळांपुढे पालक रात्र रात्र थांबलेले असतात. महापालिका म्हणून आपले सुद्धा कर्तव्य आहे. करदात्या नागरीकांसाठी चांगल्या संस्था किंवा शाळा इथे बोलवल्या पाहीजेत. इथे यासाठी अधिक तरतूद केलेली नाही. भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठा योजनेची नवीन योजना हाती घेतलेली नाही. भामा आस्केडमधून पाणी घेणार म्हणून वारंवार घोषित केले होते. पण पाणी कधी आणणार? महापौर साहेब आपली कारकीर्द संपेल. त्यात अनेक गोष्टींचे क्रेडीट तुम्हाला मिळेल. शहरात वापरात येणारे पाणी, औद्योगिक वापर, गार्डन, वॉशिंगसाठी मोठ्या प्रमाणात वापरले जाते. मैला शुद्धीकरण प्रकल्पातून शुद्ध केलेले पाणी नदीत सोडले जाते. पाण्याची एकही योजना सर्वसामान्य नागरीकांसाठी नाही. पुर्नवापराची एखादी योजना तयार करणे महापालिकेचे कर्तव्य नाही का. मग ग्रीन बिल्डींग करा, रेन हार्वेस्टींग करा. त्यासाठी सूट देऊ हे सगळे करण्यापेक्षा पाण्याच्या पुर्नवापराची एखादी योजना करणे हे महापालिकेचे मूळ कर्तव्य आहे. यापासून आपण दूर जाता कामा नये. बजेटमध्ये झोनिपु स्थापत्य कडून भांडवली कामासाठी ८.३६ कोटी तरतूद करण्यात आली आहे. सर्वात श्रीमंत महापालिका व बेस्ट सिटी पुरस्कारप्राप्त महापालिका असताना एकिकडे तारांगणसाठी रु.१६ कोटी खर्च करतो, दुसरीकडे आपल्या महिला भगिनी रस्त्यावर उघड्यावर बसतात. रस्त्यावर शौचाला बसून तारांगण बघायचे का? कार्यालयांत महिलांच्या शौचालयांची व्यवस्था नाही. काही ठिकाणी पाडले गेले आहेत. शहरातील ७१ झोपडपट्ट्यांमध्ये लोकसंख्येच्या निकषानुसार ४२६२ सिटस् ची गरज असताना २२००च सिटस् उपलब्ध आहेत. २०१४ सिटस् ची आवश्यकता आहे. आपण किती वेळा ४२६२ सिटस् ची मागणी उठून करायची. एकिकडे आम्हाला

बेस्ट सिटी पुरस्कार मिळवला याचा उदो उदो करता. एमआयडीसी भागात कंपनीवाले त्यांच्या कंपन्या घेऊन जात आहेत. कामगारांना जॉबची खात्री सांगत नाही, इतकी वाईट अवस्था आहे. एकिकडे करदाता नागरीक असतील, झोपडपट्टीतील नळजोड शंभर टक्के तोडले पाहीजेत. त्यांना साफसफाई कर लावा, मीटरने पाणी द्या, त्यांना शौचालये द्या. त्यांच्याकडून सुद्धा टॅक्स वसूल करतो. राहत्या जागेचे भाडे घेतात, त्यांना सुविधा देणे आपलेच काम आहे. झोपडपट्यांतून अंडरग्राऊंड ड्रेनेजची व्यवस्था केली पाहीजे. त्यांच्याकडे घरांतून शौचालये बांधायची सक्ती केली पाहीजे. रस्त्यावर बसणा-यांची संख्या कमी होईल. वायसीएम पाठिमागे जा हीच परिस्थिती आहे, माझ्या दोन्ही वॉर्डात हिच परिस्थिती आहे. शहरातील कोणत्याही झोपडपट्टीबाहेर जा, हीच अवस्था आहे. कोणी हौसेने रस्त्यावर बसतो का. आनंदाने बसत नाही. त्यांचे दुःख जाणून घ्यायला, बजेटमध्ये तरतूद करायला पैसा नाही का. करायला वेळ सापडली नाही का करायची मानसिकता नव्हती याचे कारण शोधले पाहीजे. स्थापत्यविषयक कामे, समाजमंदीर, सांस्कृतिक केंद्र, आंगणवाड्या यासाठी ८.४४ कोटी इतकी तरतूद केली आहे. ती न केलेली बरी. आम्ही तुमच्याकडे मागायला येत नाही. आमच्यावर मेहेरबान होण्यापेक्षा त्या भागाला जेवढे बजेट द्यायचे होते तेवढे देखील बजेट दिले नाही. आम्ही त्या भागाचे प्रतिनिधित्व करतो. जीव तुटतो म्हणून बोलते. माझी सुद्धा पाळेमुळे झोपडपट्टीतली आहेत. म्हणून तुम्हाला सांगते. त्यांची शौचालय व्यवस्था केली पाहीजे. सायन्स पार्कसाठी १६.२५ कोटी इतकी भरीव तरतूद केलीच आहे. यातून ज्ञानात भर पडते. माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी रु.२० लाख इतकी तरतूद केली होती. प्राथमिक साठी ४० लाख व माध्यमिकसाठी ४० लाख असे सायन्स पार्कसाठी रु.६० लाख आपण दिले. तारांगणला उत्पन्न मिळते. मग इथून पैसे काढायचे, तिथे टाकायचे काय कारण आहे. ते आपले विद्यार्थी आहेत. त्यांना फुकट प्रवेश दिला पाहीजे. आपल्या महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आपणच सोय करायची कोणती सोय करतोय. या प्रोजेक्टवर एकदा येऊन बघा. कोणासाठी सोय केली आहे. म्हणून तारांगणसाठी केलेली १६.२५ कोटी तरतूद यासाठी का बोलावे लागले. एकिकडे आपला आलेख उंचावत असताना शहर झोपडपट्टीमुक्त होत असताना शहरातील नागरीक शौचालयासाठी रस्त्यावर बसतो. त्यांना तारांगण सपाटीवर बसून बघायला लावायचे का. महिला बालकल्याणसाठी रु.३८.८७ कोटी इतकी तरतूद केलेली आहे. गेले ५/६ वर्षात महिला व्यवसाय प्रशिक्षणासाठी सुमारे रु.५१ कोटी खर्च केलेले आहेत. अडीच लाखापेक्षा अधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. शहराच्या लोकसंख्येचा विचार केलातर ३ १/२ लाख कुटूंबे आहेत. महिला प्रशिक्षण योजनेअंतर्गत खर्च देण्यात आला आहे. महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढीचे गोड नाव देऊन खर्च करण्यात आला आहे. कुटूंबे किती, प्रशिक्षण दिलेल्यांची संख्या किती याचे गणित बसवले पाहीजे. महिलांना प्रशिक्षण द्या. प्रशिक्षणार्थी ते स्वतःच्या नावावरच घेतात का ते बघा. महिलांना फोर व्हिलर ड्रायव्हिंग शिकविले पाहीजे. चार वर्षापूर्वी नयना पुजारीवर झालेल्या आघात, आयटी. कंपनीत काम करत असताना तिच्यावर झालेला बलात्काराची घटना बघता मी त्यावेळी देखील सभागृहामध्ये महिलांना ड्रायव्हींगचे प्रशिक्षण सुरु करण्याविषयीचा विषय ठेवला होता. सर्वसामान्य महिलांना यातून उत्पन्न मिळणार आहे. आय.टी. पार्कमध्ये नोकरी करणा-यांमध्ये महिलांची संख्या जास्त आहे. महिलांना टॅक्सी चालवायचे प्रशिक्षण द्या. टॅक्सी घेण्यासाठी तुम्हीच कर्ज द्या. मा.उल्हास जगताप इथे सभागृहात बसले आहेत. आम्हाला परमिशन दिली नाही, नाकारले

होते, असे त्यांनी आम्हाला सांगितले होते. आमची पुन्हा इच्छा आहे, महिलांना ड्रायव्हींगचे प्रशिक्षण सुरु करण्यासाठी आपण काहीतरी करावे. फोर व्हिलर ड्रायव्हींगसाठी काही वेगळे शिक्षण असावे लागत नाही. अडाणी माणूस देखील निश्चित चांगली गाडी चालवतो. स्लममध्ये राहणा-या महिलांना याचा सगळ्यात जास्त फायदा होणार आहे. महिलांना रिक्षा चालवायला देखील परमिशन देत नाहीत. ही परमिशन सुद्धा मिळाली पाहीजे. मुंबई महापालिकेने महिलांना टॅक्सी चालवण्याची योजना राबवली आहे तर आपल्याकडे का होऊ शकत नाही. ज्या योजनांवर काही खर्च करु शकत नाही. ते तुम्ही आजच सांगितले पाहिजे, जवळपास ६५० कोटींची कामे करणार नाही. या बजेटमध्ये वजा केले पाहीजे. पुढील वर्षी याचे उत्तर देताना तुमच्या नाकी नऊ येणार आहेत. बजेट खरेतर म्हटलेतर खूप चांगले आहे. मी मा.श्रीकर परदेशी यांची फार मोठी फॅन आहे. मी त्यांच्या बाजुचे निश्चित समर्थन करणारच. वाईट वागालतर ते तोंडावर बोलणार, चांगल्याच्या पाठिशी निश्चित उभी राहते. चुकालतर तेवढ्याच ताकदीने विरोध करणार. सत्ताधारी कितीही असू देत, आम्ही त्यांना पुरून आहोत. हायकोर्टाने आणलेले निर्णय असू देत. शास्तीबाबत राज्याचे कॉंग्रेसचे मा.मुख्यमंत्री यांनी माझ्या बाजूने दिलेले निकाल असू देत. या सगळ्यामध्ये मी खरोखर अभिनंदन करेल आयुक्त साहेबांनी खरोखर चांगले बजेट इथे आणले आहे. तुम्हाला सभागृहात सांगते इथे काम करायचे असेल तर कायद्यानेच करावे लागणार आहे नाहीतर गाठ आमच्याशी आहे. शिवसैनिक म्हणून सांगतेय. मी कोणाचे ऐकून घेत नाही, हुकूमशाही ऐकून घेत नाही.

(मा.मंगलाताई कदम, पक्षनेत्या यांनी मा.सिमा सावळे यांच्या निवेदनावर आक्षेप घेतला.)

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी आपण सन २०१४-१५ च्या बजेटच्या संदर्भात मा.स्थायी समिती अध्यक्षांनी जे बजेट सादर केले आहे, या बजेटच्या अनुषंगाने आपण या सभागृहात पहिल्यांदा आला आहात. त्याबद्दल मी आपले स्वागत करतो. हे बजेट सादर झाले आहे. नगरसेवक म्हणून अनेक नवीन नगरसेवकांनी आपली व्यथा मांडली आहे. त्यांना त्यांच्या वॉर्डात खूप कामे करुन हवी आहेत. त्यांच्या नागरीकांच्या अपेक्षा आहेत. त्या पूर्ण होण्याच्या दृष्टीकोणातून खरेतर बजेटचा अभ्यास करणे गरजेचे आहे. खूप घाईघाईने बजेट मांडले आहे. मा.स्थायी समितीने सुद्धा जसे प्रशासनाने बजेट मांडले ते तसेच्या तसे सभागृहात आणले आहे. इथून पुढील काळात अशी चूक आपल्याकडून होऊ नये याची आपण दखल घ्यावी. मा.मंगलाताईंनी खूप चांगला पायंडा मांडला. सर्वांनी प्रशिक्षण घेतले. त्यात काय असले पाहीजे. नगरसेवकांनी द्यायचा प्रयत्न केला. मागील २ वर्षांत सर्वांचेच भाषणातून ब-याच गोष्टी लक्षात आल्या असतील. २ वर्षांत नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर ज्या अपेक्षा होत्या. प्रभागातील कामे व्हावीत म्हणून प्रयत्न करत होतो. काही अडचणींमुळे काम झाले नाही. सगळा खर्च झाला पाहीजे असे दिसतेय. आमच्या वॉर्डातली कामे झाली नाहीत. हा खर्च झाला या गोष्टीचे कारण काय. प्रशासनाने त्यांच्या घरी नेला नाही. मग हा खर्च कुठे झाला. तरतूद केली जात असताना प्रत्येकजण याच गोंधळात. काम कधी पूर्ण होते. प्रत्यक्ष पैसा कधी दिला जातो. गेले २/३ वर्षांचा कालावधी लागतो. मागील वर्षाचे बजेट, त्याच्या मागील वर्षाच बजेट कोणत्या कामांवर खर्ची पडले आहे. आधीच्याच कामांचे पैसे दिले आहेत. मागील २ वर्षांत ही कामे निघाली आहेत. अजूनही आमची टेंडर ओपन व्हायची होती. प्रत्यक्षात सुरुवात झाली नाही. जे सुरु झाले त्याच्यावरचे

कोणत्याही खर्चाचे पेमेण्ट दिले गेलेले नाही. २ वर्षाच्या कालखंडात असा प्रकारच्या विकास कामांची गती संथ राहीली आहे. मा.श्रीकर परदेशी यांनी खूप चांगली कामे केलीत. डिसिप्लीन लावली, शिस्त लावली. त्यांच्या कामाबाबत आम्ही समाधानी आहोत. विकासाला गती मिळाली पाहीजे. ती मंदावली आहे याचे कारण काय. अनधिकृत बांधकामासंदर्भात मुख्य स्थापत्य विभागाचे जास्त बजेट स्थापत्य विभाग खर्च करते. याठिकाणी अधिका-यांना प्रत्यक्षात त्या विभागासाठी न्याय देता आला नाही. त्यांना अनधिकृत बांधकामासंदर्भात काम करावे लागले. जे.ई. पोलिस स्टेशनला जात होते. एफआयआर दाखल करत होते. त्यामुळे २ वर्षे हा प्रॉब्लेम झाला होता. त्यांना प्रत्यक्ष काम करता आले नाही. ही अडचण निर्माण झाली. त्यामुळे आमच्या सगळ्यांची अपेक्षा आहे, इथून पुढील काळात वॉर्डातली कामे व्हावी. विकासाला गती मिळावी अशी अपेक्षा प्रशासनाकडून आहे. आयुक्त साहेब इथे नव्याने आले आहेत. यापूर्वी त्यांनी अनेक ठिकाणी काम केले आहे. खालच्या पदापासून आयुक्त पदापर्यंत काम केले आहे. त्यामुळे त्यांना छोटे छोटे बारकावे माहित आहेत. इथून पुढील काळात टेंडर प्रोसेस फास्ट कशी होईल ते पहा. डिले होतो आहे. याच गोष्टीची कारणे आपण शोधली पाहीजेत. त्या काळाच टेंडर प्रोसेस अतिशय फास्ट झाली होती. त्यावेळी टेंडर सबमिशन व्हायच्या संध्याकाळी किंवा २/३ दिवसांत टेंडर ओपन व्हायचे. लवकर कार्यवाही झालीतर लवकर वर्क ऑर्डर निघायची. कामाला गती मिळत होती. मागील काळात पिंपरी चिंचवड शहराचा जो विकास झाला तो समोर आहे. पिंपरी चिंचवड शहर अतिशय झपाट्याने वाढलेले शहर आहे. सगळ्यात फास्ट ग्रोईंग सिटी म्हणून या शहराकडे पाहिले जाते. पुणे शहरापेक्षा पुढे गेले आहे. महाराष्ट्रातच नव्हेतर देशातील अनेक शहरांपेक्षा जास्त प्रमाणात विकास झाला आहे. केंद्र सरकारने या महापालिकेला जेएनएनयूआरएमचे फंडस् दिले आहेत. मा.शरदराव पवार यांच्या प्रयत्नांतून, राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या प्रयत्नांतून, आपल्या पिंपरी चिंचवड शहराचे नावे जेएनएनयूआरएमच्या लिस्टमध्ये आधी नव्हते. परंतू पुणे शहराबरोबर पिंपरी चिंचवड शहराचे नाव टाकले. याचे श्रेय आदरणीय शरद पवार साहेब यांना जाते. ज्यावेळी मा.मंगलाताई कदम या महापौर होत्या, त्यावेळी आयुक्त श्री.दिलीप बंड यांनी खूप प्रयत्न केले होते. म्हणून खूप प्रमाणात फंडस् उपलब्ध झाले. त्यामुळे इथे मोठमोठे प्रकल्प उभे राहीले आहेत. ग्रेड सेपरेटर, उड्डाणपूल, ईडब्ल्यूएस मोठ्या प्रमाणात गरीब लोकांसाठी घरकुल योजना चालू आहे. अनेक मोठ्या योजना आवश्यक झालेल्या आहेत. याचे पूर्णपणे यश सर्वच पक्षांच्या नगरसेवकांचे आहे. पक्षाच्या नेत्यांनी यासाठी खूप प्रयत्न केले म्हणून पिंपरी चिंचवड शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. बेस्ट सिटी अवॉर्ड दिला गेला. देशातील उत्कृष्ट शहर म्हणून पुरस्कार देण्यात आला. याचे सर्व श्रेय प्रशासनाचे आहे, लोकप्रतिनीधींचे आहे. थोडासा काळ बदलला आहे. माझी आपल्याला व्यक्तिशः विनंती राहणार आहे, दरवर्षी बजेट करतो. बजेट करत असताना इथून पुढील काळात पुढील ५ वर्षे डोळ्यासमोर ठेवून बजेट केले पाहीजे. आयुक्त म्हणून शासनाला ३ वर्षाचा टाईम बॉण्ड असतो. किमान ३ वर्षे डोळ्यापुढे ठेवून काम करायचे. ३ वर्षांत शहरात कोणकोणते मोठे प्रकल्प करायचे. प्रभागातली कोणकोणती कामे करायची याचे टार्गेट कुठेतरी ठरवावे. येत्या ३ वर्षांत पिंपरी चिंचवड शहरात मोठे २५ प्रकल्प करायचे आहेत. प्रत्येकाला वाटते, माझ्या वॉर्डात गार्डनचे आरक्षण, प्लेग्राऊंडचे आरक्षण आहेत, ती विकसीत झाली पाहीजेत. टार्गेट ठेवून काम केलेतर एक दोन आरक्षणे घोषित केली तर प्रत्येक प्रभागातून ५ वर्षातून ६ आरक्षणे विकसित होऊ शकतात. पिंपरी

चिंचवड शहरात पूर्वी चार पाच ग्रामपंचायती मिळून नगरपालिका झाली. नंतर त्याची महानगरपालिका झाली. मोठ्या प्रमाणात कारखानदारी झाल्यामुळे ही कामगार नगरी झाली. मूळ शेतक-यांनी जागा विकल्या. अशा प्रकारे हे शहर विकसित झाले आहे. नदी पात्र, पुणे-मुंबई रोड अलिकडील भाग व नदीमधील भाग, नदी पलिकडील भाग असा शहराचा ३ टप्प्यांत वेगवेगळ्या पद्धतीने विकास झाला आहे. नाशिक फाट्याचा उड्डाणपूल हा संपूर्ण शहरासाठी खूप अभिमानास्पद आहे. असे उड्डाणपूल मी परदेशात पाहीले आहेत. हा पूल पास करताना नाशिक फाट्यापासून कासारवाडी इथे येताना असे वाटते, आपण कुठेतरी परदेशात आलो आहोत. अतिशय नियोजनबद्ध विकास झाला आहे. नवीन समाविष्ट गावांमध्ये डि.पी. प्लॅनची अंमलबजावणी झाली पाहीजे. जुनी गावे भोसरी, आकुर्डी, निगडी, चिंचवड इथे जून्या काळात विकास झाला आहे. म्हणून इथे झालेला विकास व तिथे झालेला विकास यांतील फरक बघितला तर या नवीन भागांमध्ये जास्त लक्ष दिले गेले पाहीजे. ग्रामीण भागातील नगरसेवकांनी त्यांची व्यथा मांडली. तळवडे, चिखली पासून मोशी, डुडुळगाव, च-होली, दिघी इथपर्यंत खूप मोठ्या प्रमाणात विकास करायची गरज आहे. याच भागात लोक जागा घेताना दिसतात. बाकी शहरात बांधकामे होत आहेत. या भागासाठी खूप निधी द्यावा लागणार आहे. च-होली हे खूप मोठे गाव आहे. सगळ्यात मोठे गाव आहे. शहराच्या विकासाचा समतोल राखण्यासाठी या गावांना जास्त निधी दिला पाहीजे. नाशिक फाटा ते मोशी नॅशनल हाय-वे आपल्या ताब्यात आहे. माझी मागणी आहे की, या भागाचा पिंपरी चिंचवड महापालिकेने विकास करावा. कन्सल्टंटने त्याचे एस्टिमेट, ड्रॉईंग फायनल केले आहे. नॅशनल हाय-वे ताब्यात असल्यामुळे टेंडर काढले नाही. त्या तुलनेत मुंबई-पुणे हाय-वे इथे महापालिकेने चांगले काम केले आहे. त्यामुळे इथे फार मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. नाशिक फाटा ते मोशी इथे रस्ता केलातर प्रॉपर्टीची व्हॅल्यू वाढेल. या भागाचा विकास चांगला होईल. पुणे-आळंदी रस्ता अतिशय महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावरुन ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरपूरला जाते. हा रस्ता झाला तेव्हा पीडब्ल्यूडीच्या ताब्यात होता. या रस्त्याचे काम झालेतर, विकास झालातर या भागावर जो अन्याय झालेला दिसतो तो दूर होईल. हे करण्यासाठी प्रयत्न करावा. तुम्ही या गोष्टीचा विचार करावा. आज आपल्या मोशीमध्ये इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर आहे. जगातली कन्व्हेन्शन सेंटर्स आहेत त्यापैकी मोशी इथे एक होते आहे. मला अधिका-यांनी माहिती सांगितली की, इथे महिन्याला १० लाख फॉरेनर्स येणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात परदेशी नागरीक पिंपरी चिंचवड शहरात येणार असतील तर तिथे किती निधी टाकावा लागेल. किती रस्ते करावे लागतील याचा विचार सुद्धा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केला आहे. चाकण इंटरनॅशनल एअरपोर्टमुळे या परिसरावर सगळ्यात जास्त ताण पडणार आहे. विशेषतः मोशीपासून पिंपरी चिंचवड शहराकडे येणारा रस्ता, पुणे-आळंदी रस्त्यावर ताण पडणार आहे. या भागासाठी आगामी काळात जास्त निधी टाकावा लागणार आहे. या दृष्टीकोणातून विचार करावा लागणार आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तीन नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प करण्यात आला आहे. त्याविषयी सभागृहापुढे प्रस्ताव मांडण्यात आला. त्यामध्ये इंद्रायणी नदीचा उल्लेख नव्हता. पण आमच्या पक्षाच्या नेत्यांनी नदी सुधार प्रकल्पात इंद्रायणी या नदीचा देखील समावेश केला. आगामी काळात इंद्रायणी नदीचा विकास पलिकडील नदी सुधार विकास प्रकल्पाबरोबर काम हाती घ्यावे लागणार आहे. त्या दृष्टीने अधिका-यांना सुचना कराव्यात.

स्टॉर्म वॉटरच्या ३ फेज पैकी पहिल्या टप्प्यातील पट्टा मंजूर झाला. प्रत्येक वेळी याच भागावर अन्याय होत आला आहे. आपण तशा प्रकारचे आगामी काळात याच भागातील ज्या ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टींना प्राधान्य द्यावे. याच परिसरात जास्तीत जास्त विकास कसा होईल या दृष्टीने विचार करावा. या बाबीं व्यतिरिक्त मुख्य उत्पन्नाची साधने आहेत. यात जकात विभागाचे उत्पन्न मुख्य आहे. जकात बंद होऊन एलबीटी सुरु झाली आहे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न घटले आहे. मागील काळात इतर महापालिकांचा विचार केलातर पहिल्या वर्षाचे उत्पन्न खूप कमी होते. दुस-या व तिस-या वर्षी कोल्हापूर इथे जकातीपेक्षा एलबीटीचे उत्पन्न वाढले होते. आत्ता जागतिक मंदी आहे. एमआयडीसीतील कारखानदारी अडचणीत आली आहे. त्यामानाने एलबीटीतून मिळणारे उत्पन्न फार कमी झाले नाही. या कारखानदारांसाठी काही केले पाहीजे. शासनाला सुद्धा काही गोष्टींवर विचार करुन शासन स्तरावर निर्णय घ्यावा लागणार आहे. कारखानदार जगला पाहीजे. यावर इथला कामगार पोट भरतोय. नोकरीच्या माध्यमातून, व्यवसायाच्या माध्यमातून टाटा मोटर्स सारख्या मोठ्या कंपनीमुळे इथे खूप मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला आहे. बजाज टेम्पो ही कंपनी तर जवळजवळ बंदच झाली आहे. पण टाटा मोटर्सच्या अनुषंगाने कारखानदारी चालू आहे. ती टिकली पाहीजे. यासाठी महापालिका स्तरावर प्रयत्न केला पाहीजे. या दृष्टीकोणातून यात लक्ष घालावे अशी आपल्याला विनंती आहे. अनधिकृत बांधकामासंदर्भात आपण पेपरमध्ये वाचलेच असेल. खूप काही गोष्टींना सामोर जावे लागले आहे. यापैकी काही लोक कोर्टात गेले. तेव्हा कोर्टाने आदेश दिला. आमच्या शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात मिळकती आहेत. त्या कोणी पाडल्या नाहीत. तत्कालीन आयुक्त श्रीकर परदेशी आल्यानंतर हे सगळे सुरु झाले. सगळ्या पक्षाच्या लोकांना खूप त्रास झाला आहे. सर्वसामान्य नागरीकाने स्वतःच्या कष्टांतून पै पै जमा करुन घर बांधले. त्यांच्या घरावर कारवाई व्हायला लागली तेव्हा सर्व पक्षांचे लोक एकत्र आले. अशा प्रकारे डायरेक्ट कारवाई करु नये. केवळ जी बांधकामे कधीच नियमित होऊ शकणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करावी. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात ठरले की टप्याटप्प्याने कारवाई झाली पाहीजे. प्रशासन व लोकप्रतिनिधी हे एका रथाची दोन चाके आहेत. त्याशिवाय गाडी व्यवस्थित चालणार नाही. आज निश्चितपणे विकास होईल. कायद्याच्या चौकटीत बसून निर्णय घेणार. खरेतर सत्ताधारी असलोतरी कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन कामे व्हावीत असा आग्रह आम्ही कधीच धरणार नाही. शहराचा विकास कसा करता येईल यासाठी सर्व पक्षांचा आग्रह असेल. बिल्डींग परमिशन – हा फार मोठ्या प्रमाणात उत्पन्नाचा नवीन स्त्रोत आहे. मागील काळात जेवढ्या प्रमाणात डेव्हलपमेंट चार्जेस, प्रशमन शुल्क, दंडाची रक्कम या माध्यमातून, स्क्रुटीनी फीच्या माध्यमातून जे उत्पन्न मिळते ते अजून वाढवू शकतो. पठाण साहेब एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर नव्याने बांधकाम परवानगी विभागात रुजू झाले होते त्यावेळी मी त्यांना सांगितले की शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होतात या मागचे कारण काय? अर्बन लॅण्ड सिलींग कायदा आहे. शेतक-यांनी त्यांच्या जागा विकल्या. कामगारांनी गरजेपोटी त्या विकल्या. लोकांनी घेतल्या. याला नागरीक जबाबदार नाहीत. तर संपूर्ण सिस्टीम जबाबदार आहे. शासन स्तरावर बदल अपेक्षित आहे. तसा प्रस्ताव पाठवला आहे. फ्रंट मार्जिन ठेवणे कंपल्सरी असलेतरी आपल्याला साईड मार्जिन, बॅक मार्जिनमध्ये रिलॅक्सेशन देता येऊ शकते. यातून छोट्या छोट्या प्लॉट धारकांचे स्वप्न साकार होऊ शकते. आपण याबाबतीत आयुक्त म्हणून सर्वजण तुमच्या बरोबर आहोत.

शासन स्तरावर पाठपुरावा झाला पाहीजे. शहरातील जवळपास ९० टक्के नागरीकांना त्यांची घरे अधिकृतपणे बांधता येऊ शकतात. पुन्हा अडचण असते, मागचा प्लॉट मोकळा असतो, पुढे घर झालेले असते. अशी व्यक्ती बिल्डींग परमिशन विभागाकडे येते तेव्हा तिची प्लॅन पास करु शकत नाही. प्लॉटवर जाण्यासाठी १० फूटांचा ॲप्रोच रस्ता असावा लागतो. रस्त्याच्या लांबीवर त्याची रुंदी ठरत असते. यावर सुद्धा सोल्युशन काढले आहे. याचा बारकाईने अभ्यास करा. तर बिल्डींग परमिशन विभागाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढेल. आपल्याकडील शंभर टक्के बांधकामे अधिकृत होतील. इथला विकास नियोजनबद्ध विकास होऊ शकेल. इन्फ्रास्ट्रक्चरवर जो ताण येतो आहे, तो येणार नाही. कर संकलन विभागाकडून खूप उत्पन मिळते आहे. बजेटच्या पुस्तकात दिले आहे. किती मोठ्या प्रमाणात सर्वे केला तर कितीतरी मिळकतींची नोंद नसल्याचे दिसून येईल. यातून निश्चितपणे आणखी उत्पन्न वाढेल. सर्व पक्षाच्या लोकांनी आग्रही मागणी केली. शास्ती/दंड लावला जातो आहे. तो खूप अन्यायकारक आहे. आम्ही नगरसेवक म्हणून सर्वांना सांगतोय की, दंड किंवा शास्ती भरु नका. मूळ रक्कमच भरा. नागरीकांना मोठ्या प्रमाणात टॅक्स थकवला आहे. नागरीक ते भरु शकत नाहीत. पक्षाध्यक्षांनी स्वतः सांगितले, जोपर्यंत अनधिकृत बांधकामासंदर्भात निर्णय होत नाही, तोपर्यंत नागरीकांना शास्ती किंवा दंड भरु नये. महापौर साहेबांनी देखील त्या प्रकारचा आदेश दिला होता. आम्हाला नागरीकांनी निवडून दिले आहे. त्यांच्यासाठी आम्ही शंभर टक्के भूमिका घेणार आहोत. त्यांच्या हिताच्या दृष्टीकोणातून भले आमचे पद गेले तरी चालेल, आम्ही कॉम्प्रमाईज करणार नाही. प्रॅक्टीकली विचार करा. जर एखादा माणूस वर्ग ४चा माणूस असेल त्याला रु.५०,०००/- इतके टॅक्सचे बील आलेतर तो ते कसे भरू शकतो. एमआयडीसीतले कारखाने बंद होत आहेत. कामगार टॅक्स भरु शकत नाहीत. मूळ अमाऊंट स्विकारायला सुरुवात करा. याबाबत जेव्हा निर्णय होईल, ज्यावेळी २००८ नंतरच्या बांधकामांचे नियोजन होईल, त्यातून जो मार्ग निघेल, तो निश्चितपणे नागरीकांच्या हिताचा असेल. त्यासाठी आम्हाला सहकार्य करावे अशी माझी मागणी आहे. किमान इथून पुढील काळात तरी या शहराचा विकास चांगल्या पद्धतीने व्हावा. टेंडर प्रोसिजर फास्ट कशी होईल याचा बारकाईने विचार करावा. मुख्य तीन विभाग इथे सुधारावे लागणार आहेत. क्रिडा विभाग – या विभागात मोजके २/३ च लोक असतील. बाकी कोणाचीच काम करायची मानसिकता नाही. हे १७ लाख लोकसंख्या असलेले शहर आहे. पुढील पिढीच्या दृष्टीकोणातून क्रिकेट, इतर खेळ हॉकी, फूटबॉल, कबड्डी असेल यांच्या स्पर्धा झाल्या पाहीजेत. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून उपक्रम झाले पाहीजेत. रिझल्ट ओरिएंटेड कामे होत नाहीत. महापौर चषक स्पर्धा होते. स्पर्धा झाल्यानंतर त्या खेळाकडे परत कोणत्याही प्रकारचे लक्ष दिले जात नाही. शहरात दिलिप वेंगसरकर ॲकॅडमी आहे. क्रिकेटची खूप चांगली संधी उपलब्ध आहे. आण्णासाहेब मगर स्टेडीयम हे अत्यंत चांगले स्टेडीयम आहे. तिथे वेगवेगळे खेळ खेळले जातात. आपण मुलांना अनेक चांगल्या संधी उपलब्ध करुन देऊ शकतो. हॉकी स्टेडीयमवर इंटरनॅशनल मॅचेस होतात. भोसरी इथे संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल उभे राहीले आहे. जागतिक लेवलचे ॲथेलेटीक्स पार्क केले आहे. त्याचा वापर त्या पद्धतीने होत नाही. क्रिडा विभागाचे पोस्टमार्टेम करायची गरज आहे. महिला बालकल्याण विभाग – या विभागातील काही अधिकारी बदलावे लागतील. स्टाफ बदलावा लागेल. प्रत्येक बजेटला तरतूद करुन सुद्धा तरतूद पूर्णपणे खर्च करत नाहीत. या विभागाकडे आपल्याला बारकाईने लक्ष द्यावे लागणार आहे. हा विभाग छोटा

असलातरी डायरेक्ट नागरीकांशी संबंधित असलेला विभाग आहे. कायदा विभाग – पिंपरी चिंचवड महापालिका आपल्या मॅक्झिमम केसेस हारते, या मागचे कारण शोधा. हा विभाग आपली केस कोणत्यातरी वकीलाकडे देतो. पुण्यामध्ये वेगवेगळ्या कोर्टात केसेस चालतात. महापालिकेकडून कायद्याचा अभ्यास करुन बजेट मांडले गेले पाहीजे. महापालिका टिकली पाहीजे, अशी भूमिका घेऊन काम केलेतर निश्चितपणे महापालिकेचे खूप मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान थांबेल. अनेक प्रकल्प कायद्याच्या चाकोरीत अडकले आहेत, त्यासाठी कायदा विभाग संपूर्णपणे जबाबदार आहे. बाहेरच्या वकीलाकडे जा, वकील अपॉईंट करा. त्यांच्याकडून केसेस फाईल झाल्या पाहीजेत. अतिशय बारकाईने अभ्यास करुन काम केले पाहीजे. नगररचना विभाग – हा महत्वाचा विभाग आहे. संपूर्ण शहराचा विकास होतो. डि.पी. प्लॅन नुसार प्रत्यक्षात नगररचना विभागाकडून अंमलबजावणी होत असते. महापालिकेची आरक्षणे ताब्यात घेण्यासाठी मागील काळात प्रयत्न कमी पडले होते. भूसंपादन करुन आरक्षणे ताब्यात घेतली जायची. आरक्षणे मोठ्या प्रमाणात ताब्यात घेता आली नाहीत. आरक्षण टाकलेल्या जागा ५/१० वर्षे झालीतरी ताब्यात घेत नाहीत. त्यामुळे पर्यायाने त्या जागा मालकाने गरजेपोटी त्यांच्या जागा विकल्या. अशी अनधिकृत बांधकामे होऊन २५ ते ३० वर्षे झाली आहेत. आज सांगितले जाते, महापालिकेच्या आरक्षणांवर घर बांधले आहे. यातील मुख्य चूक कोणाची आहे. आरक्षणे वेळेवर ताब्यात घेतली नाहीत. त्या जागांकडे बघत बसणार आहोत का. या अडचणीवर काही तोडगा निघेल या दृष्टीकोणातून योगायोगाने टिडीआर ची कन्सेप्ट आल्यामुळे अनेक आरक्षणे ताब्यात आलेली आहेत. केंद्र सरकारने नवीन कायदा केला. त्यामुळे जमिन मालकाला डबल मोबदला द्यावा लागणार आहे. त्यामुळे नगररचना विभागासाठी रु.१०० कोटींची जी तरतूद केली आहे ती पुरेशी पडेल असे वाटत नाही. येणा-या सुधारीत अर्थसंकल्पात नवीन संधी मिळेल त्यावेळी प्रयत्न करावे लागले. जर शहराचा नियोजनबद्ध विकास करायचा असेल तर उर्वरीत आरक्षणे ताब्यात घेऊन प्रभागातील नागरीकांच्या अपेक्षा आहेत. वॉर्डातली आरक्षणे विकसित करण्यासाठी, अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नगररचना विभागाला जास्तीत जास्त तरतूद द्यावी लागणार आहे. दुसरी चूक आहे नकाशा. मुळ नकाशा व आत्ता केलेला नकाशा यात मुळात विसंगती आहे. नगररचना विभागात त्रुटी आहेत. नागरीकांनी अधिकृत घर बांधण्याच्या दृष्टीकोणातून नगररचना विभाग स्ट्रीमलाईंन करावा लागणार आहे. पिंपरी चिंचवड शहरात काम करायची पद्धत अशी राहिली आहे. इतर महापालिकांमध्ये गेलाततर पिंपरी चिंचवड महापालिकेत विरोधी पक्षाच्या नगरसेवकाच्या वॉर्डातली कोणतीही तरतूद अडवली जात नाही. सर्वांना विश्वासात घेऊन काम केले जाते. सत्ताधारी असलोतरी आपल्या सगळ्यांना याचा अनुभव आहे. माझी सुद्धा तिसरी टर्म आहे. १२/१३ वर्षांपूर्वी मी सुद्धा विरोधी पक्षात होतो. त्यावेळी कोणी माझ्या वॉर्डातली तरतूद पळवली नाही. आम्ही सर्वांना विश्वासात घेऊन काम करतो. माझी विरोधी पक्षातील महिला भगिनींना विनंती आहे की, नागरीकांनी आपल्यावर विश्वास टाकला आहे. आपण 5 वर्षे एकत्रित काम करायचे आहे. आपण न भांडता एकमेकींना विश्वासात घेऊन काम केले पाहीजे. पुढील ३ वर्षांत विचार करुन काम केले पाहीजे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला ६ तासांनंतर बोलू देण्यामागे दोन हेतू असू शकतात. एकतर मी वैतागून निघून जावे. दुसरे असे असेल की मला बोलायला काही

शिल्लक राहू नये. माझ्या आधी बोललेले प्रति आमदार मा.अजितरावजी गव्हाणे अतिशय नम्र, सोज्वळ, सुशिक्षित, गोड सगळे गुण त्यांच्यात आले आहेत. मला याठिकाणी सुरुवात करावी लागेल की, डॉ.श्रीकर परदेशी यांनी हे बजेट तयार केले आहे. परंतू स्थायी समिती चेअरमन यांनी हे बजेट वाचायचे असते. ते मिटींग संपली तरी आले नाहीत. त्यांच्या एका सदस्याने बजेट वाचले. त्यांच्या नावाचाही नामोल्लेख झाला नाही. शिपायाचे नाव घेतले गेले. आपल्याला बजेट वाचताना घेतले गेले नाही. दुसरे म्हणजे आयुक्त साहेब, आपण याठिकाणी ज्या प्रकारे आला आहात. सगळ्यांच्या मनात प्रश्नचिन्ह आहे. परदेशी साहेबांची बदली ज्याप्रकारे झाली आहे. पेपरमध्ये बातम्या आल्या होत्या. त्यात एक बातमी लोकसत्ता पेपरमध्ये आली होती, आपण मा.सुनेत्राताई पवार यांच्या मैत्रिणीचे पती आहात.

**मा.महापौर** – विषयाला धरुन बोला.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, पुन्हा बजेटचा संबंध या सगळ्या गोष्टींशी आहे. भविष्य यावर अवलंबून आहे. म्हणून आम्हाला तेवढेच बोलणे गरजेचे आहे. शिवसेनेचे नाव काढले तर वाईट वाटत नाही. आत्ता अजितदादांचे नाव काढले तर वाईट वाटते. आमचा त्यांच्याशी परीचय नाही. आयुक्त साहेब ज्या प्रकारे इथे आले आहेत. परदेशी साहेब यांच्याबाबतीत ज्या काही गोष्टी झाल्या. त्यांनी प्रशासनात चांगले काम केले. अनधिकृत बांधकामाबाबतीत त्यांनी सगळ्यांच्याच भावनांबरोबर जो आदर अनादर केला. त्यामुळे सगळ्यांच्या मनात त्यांच्याबाबतीत रोष निर्माण झाला. मा.आयुक्त साहेबांचे काम चांगले होते. पारदर्शक होते. मात्र त्यांनी विकास कामांकडे दूर्लक्ष केले ही वस्तुस्थिती आहे. जेव्हा प्रत्येक नगरसेवकाचे भाषण बघालतर सत्ताधारी असेल विरोधी पक्षाचा असेल प्रत्येकाला विकास कामे पाहीजेत. सर्वांनी खंत व्यक्त केली आहे. सचिन तेंडूलकर ज्याप्रमाणे खूप चांगला बॅटसमन आहे. पण तो चांगला कॅप्टन नव्हता. त्याप्रमाणे परदेशी साहेब is a best administrative, but not a good Commissioner. ज्याप्रमाणे कामकाजाचे नियम असतात, बीपीएमसी ऍक्ट असतो, मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतात. त्याचे तंतोतंत पालन होणे जेवढे गरजेचे असते. त्याप्रमाणेच उत्तम प्रशासक, चांगला ऑफिसर तो असतो जो नियम असताना त्यातून वाट काढून, त्या नियमांवर मात करुन समोरच्या नगरसेवकाला समजावून सांगून त्या कामातून मार्गक्रमण करायला हवे होते. ते त्यांना जमले नाही. मी वैयक्तिक बोलते आहे. माझा नेहमी त्यांना विरोध राहीला. काविळ झालेल्या माणसाला जसे सगळे जग पिवळे दिसते. तसा परदेशी साहेबांना प्रत्येक मनुष्य एकाच एँगलमधून दिसत होता. प्रत्येक अधिकारी त्यांना एकसारखाच वाटायचा. त्यामुळे कामावर ताण झाला पण काम करायचे राहीले. त्याचा शोध घेतला पाहीजे. हे आमचे आकडे नाहीत. हे लेखा विभागाकडून घेतलेले आकडे आहेत. त्यात २१ फेब्रुवारी २०१४ पर्यंत स्थापत्य विभाग – ६५८ कोटी भांडवली खर्च अपेक्षित असताना १९० कोटी दाखवतोय. विद्युत विभागासाठी ५८१ कोटी भांडवली खर्च अपेक्षित असताना १६७ कोटी दाखवतोय. पाणीपुरवठा विभागासाठी १६२ कोटी भांडवली खर्च अपेक्षित असताना १६.२७ कोटी दाखवतोय. पी बजेटसाठी ५४५ कोटी भांडवली खर्च अपेक्षित असताना १०१ कोटी खर्च दाखवला जातो आहे. ९० कोटींची शिल्लकीपासून हे अंदाजपत्रक सुरु झाले असले तर या रक्कमा काय सांगतात. टेंडर प्रोसिजर उशीरा सुरु झाली. त्याचे बील देणे आवश्यक आहे. आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू शकते.

असे असताना आज हे बजेट मंजूर झाले नाहीतर उद्या आचारसंहिता लागली तर मग आमची पुढील कामे कशी होणार आहेत याचा खुलासा केला पाहीजे. ज्या गोष्टींवर चर्चा होते. बजेट म्हणजे काय. जसे घर चालवतो. घराला एक महिन्याचे बजेट लागते. इन्कम, त्यापुढे होणारा खर्च मुलभूत सुविधा पाण्यापासून, साफसफाई पासून प्राधान्याने ज्या गोष्टी केल्या पाहीजेत. त्यावर खर्च केला पाहीजे. टॉयलेट ब्लॉक्स नाहीत. नगरसेवकाची बोंब आहे. ५ वेळा निवडून आलेल्या नगरसेवकांची पण हिच बोंब असेल तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा हा निश्चित विषय आहे. महिला बालकल्याण विभाग असेल इथे वारंवार ज्या अडचणी येतात. ३२.४४ कोटींची तरतूद असताना ३ कोटी फक्त खर्च दाखवतो आहोत. याचा काय खुलासा आहे. आपण तरी खुलासा केला पाहीजे किंवा विभागप्रमुखांनी तरी केला पाहीजे. मागासवर्गीय योजनेसाठी २.७२ कोटींची तरतूद आहे. फक्त ३१ लाख इतकी रक्कम खर्च झाली आहे. अपंग कल्याणकारी योजनेत २.८० कोटी तरतूदीपैकी १.७३ कोटी इतके खर्च झाला आहे. बाकी सर्व योजनांबाबत पूर्ण ऊहापोह झाला आहे. सल्लागारांच्या चुकीच्या सल्ल्यामुळे बंद पाईप योजना २००८ ला सुरु झाली. ३५८.६२ कोटी खर्च अपेक्षित असताना आजही योजना सुरु करु शकलो नाही तर हा खर्च ५५० कोटींवर जाणार आहे. एकिकडे पैसा फुकट जाण्याचा हा मार्ग आहे. दुसरीकडे वॉर्डात एक हजार रुपये सुद्धा आणू शकत नाही. ही विसंगती आपण काढली पाहीजे. ही विसंगती काढण्यासाठी इक्वल बजेट टू ऑल वॉर्डस् असे केले पाहीजे. माझ्या शेजारील प्राधिकरणाच्या वॉर्डात मा.आर.एस.कुमार सारखे नगरसेवक ४/५ वेळा निवडून आले आहेत. प्राधिकरणात काम करायला जागा नाही. सगळी कामे पूर्ण झाली आहेत. मग दुसरीकडे नवीन गावांत कामे होत नाहीत. तिथे कामे पूर्ण झाली पाहीजेत. याचा अर्थ इथे कामच करायचे नाही का. आमच्या प्राधिकरणासारख्या विकसित भागातून सगळ्यात जास्त टॅक्स पेअर आहेत. अंतर्गत रस्त्यांचे दर वर्षी डांबरीकरण करावे लागते. लाखो रुपये खर्च करावे लागतात. त्यांच्या येणा-या बजेटमधून त्यांच्या हक्काच्या बजेटमधून अंतर्गत रस्ते सिमेंटचे केले गेले तर दरवर्षी होणारा खर्च वाचणार आहे. एकिकडे सिमेंटचे रस्ते व दुसरीकडे रस्त्याला डब्ल्यूबीएम सुद्धा नाही. यावर विचार व्हायला पाहीजे. नवीन गावांसाठी निश्चितपणे जास्त बजेट द्या. ब-याच नगरसेवकांनी आयुक्त साहेबांना आमंत्रण दिले आहे. परदेशी साहेबांना देखील दिले होते. ते आले नाहीत. जेव्हा आपण बघाल तेव्हा आमच्याकडे एक म्हण आहे नदीच्या आल्याड व नदीच्या पल्याड. मग नदीच्या आल्याड व नदीच्या पल्याड कोण आहेत याची नीट माहिती घ्या. त्या त्या ठिकाणी होणारा विकास, सभोवताली राहिलेला विकास याची कुठेतरी सांगड घालावी लागणार आहे. मा.अजित गव्हाणे एकदा डॉ.श्रीकर परदेशी यांना चिडून म्हणाले होते, तुम्हाला निवडणूक लढायची आहे का. पण तशी वस्तुस्थीतीच त्यांनी निर्माण करुन ठेवली होती. सारथीसारखा चांगला दुसरा उपक्रम महाराष्ट्रात नाही. महापालिकेचे नाव रोषण झाले आहे. पण त्याचे दूर्दैव असे झाले की, नगरसेवकांनी लेखी तक्रारी आयुक्तांकडे केल्या होत्या तरी त्यांचे काम झाले नाही. पण सारथीवर नागरीकांनी तक्रार केलीतर काम लगेच झाले. यातून निवडून आलेल्या नगरसेवकाचा अनादर होतो आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवर त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. स्वतः सारथीवर कंम्प्लेण्ट पुरी करायला त्यांच्यात कुठेतरी लोकप्रियतेची आस दिसून आली. आयुक्त साहेब, जेव्हा सारथीमध्ये महापालिकेच्या सुविधांव्यतिरिक्त उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड इ. चांगल्या सोयी निश्चितपणे केल्या. परंतू हा जो दुजाभाव आहे. सगळ्यांना एकाच नजरेतून बघायची त्यांची दृष्टी होती. आकस

होता. ऐकीव माहिती होती. मनात एक भिती होती. आता हे आचारसंहितेचे वर्ष आहे. आपण याठिकाणी आलात आणि ९० दिवसांची आचारसंहिता लागणार आहे. लोकसभा निवडणूक त्यानंतर विधानसभेची आचारसंहिता लागणार आहे. आज प्रशासकीय मान्यता गृहित धरून संबंधित विभाग यांना निविदा काढायला सांगीतले नाहीतर उद्या आचारसंहिता लागल्यावर ही कामे अडकू शकतात. नंतर पावसाळा येतो आहे. पुढील वर्षी आम्ही तुमच्यावर याचप्रकारे बोंब निश्चितपणे मारु शकतो. म्हणून सूचना अशी करतो की, कामांना त्वरित सुरुवात केली पाहीजे. आत्ता मा.सिमाताई सावळे यांनी उत्पन्नाचे स्त्रोत वाढवले पाहीजेत यासाठी खूप चांगल्या सूचना केल्या आहेत. लोकप्रतिनिधींचे हे कामच आहे. आम्ही पब्लिक बॉडी म्हणून काम करतो. ट्रस्टी म्हणून काम करतो. सदस्यांनी संस्थेची जबाबदारी घेतली पाहीजे. आम्ही केलेल्या सूचनांचा अंतर्भाव बजेटमध्ये करणार आहात का. हा महत्वाचा विषय आहे. आपण उद्घाटनांवर जयंत्या, पुण्यतिथ्यांवर लाखो करोडो रुपये खर्च करतो. फूल न फूलाचा खर्च मोजण्यासाठी सुद्धा कायदा आहे. आपण पुष्पगुच्छ विकत घेतो व आपल्याच लोकांना देतो. यासाठी लाखो रुपये खर्च करतो. बारीकसारीक गोष्टी आहेत. यावर देखील विचार केला पाहीजे. हॉकर झोनवर गेले १० वर्षांपासून चर्चा करतोय. परंतू अजूनही ते उपयुक्त झालेले नाही. अनधिकृत टप-यांमधून भुईभाडे सुरु केले असतेतर उत्पन्नाचे स्त्रोत वाढले असते. आम्ही आयुक्त साहेबांना सांगितले होते, अनधिकृत टप-यांचे सर्वेक्षण करा. त्यांच्यावर टॅक्स लावा. पण त्यांनी आल्या आल्या टॅक्स लावायचेच बंद केले. नंतर परत त्यांनी कुणी सांगितले का त्यांना वाटले त्यांनी सर्वेक्षण करुन एका घरावर दुसरा मजला बांधला असेल तर त्याला नवीन मिळकतीत धरले होते. एमआयडीसीच्या जेवढ्या कंपन्या आहेत. त्यात साईडला शेड मारलेले आहेत. या शहरात ४ संस्था काम करतात. महापालिका, एमआयडीसी, म्हाडा व प्राधिकरण. चार नियमांमध्ये कामकाज विभागले गेलेले आहे. त्यामुळे अतिक्रमणांवर कारवाई करताना कोर्टाच्या आदेशाप्रमाणे झटक्यात महापालिकेत कारवाई केली जाते. तेवढ्या प्रमाणात एमआयडीसीमध्ये कारवाई होत नाही. प्राधिकरणात होत नाही. असा दुजाभाव प्रामाणिक टॅक्स पेअर्सवर निश्चितपणे झाला आहे. ज्या ज्या सूचना सन्मा.सदस्यांनी दिल्या आहेत, त्या मी रिपिट करणार नाही. महापौर साहेब, आपल्याकडून हा विश्वास पाहीजे की, ज्या ज्या घोषणा शास्तीकराबाबत मा.अजित गव्हाणे यांनी केल्या. पूर्वीच्या मिटींगमध्ये यावर सदस्य बोलले. आता येणा-या निवडणूकीचे वर्ष आहे. जुलैपासून घोषणा चालू झाल्या आहेत. गल्लीबोळात घोषणा करतोय. असे होऊ नये की, ही घोषणावारी फक्त निवडणूका होईपर्यंत शास्तीकर गोळा करायला दिरंगाई व्हावी व निवडणूक झाल्यानंतर शास्तीकर व्याजासहीत वसूल करणार असालतर यासाठी तुम्हाला पूर्णपणे जबाबदार धरु. तुम्ही खुलासा केला पाहिजे. त्याप्रमाणे सूचना मांडली आहे. ते शक्य आहे का. शास्ती कराबाबत जो तिप्पट अन्यायकारक दंड लावला आहे. त्यात सवलत मिळणार आहे का. नाहीतर तुम्ही मारल्यासारखे करायचे त्यांनी रडल्यासारखे करायचे. हा सगळा ड्रामा होईल. नंतर येणा-या काळात नगरसेवकांना तोंड द्यावे लागणार आहे. यापूर्वी शासनाने यापूर्वी ठराव विखंडीत केला होता. याचे सुद्धा खुलासेवार सांगावे. इथे सांगता आले नाही तरी याचा आपण उद्या खुलासा केला पाहीजे. नुसतेच घोषणांनी जमणार नाही याची नोंद आपण घेतली पाहीजे. मा.डॉ.श्रीकर परदेशी यांनी मेडीकल कॉलेज वायसीएम मध्ये मोठ्या प्रमाणात मिटींगज् घेऊन प्रोजेक्ट सुरु केला होता. केंद्र सरकारकडे या कोर्सची परमिशन प्रलंबित आहे. त्या प्रोजेक्टचे पुढे

काय होणार ते होणार का नाही याचा खुलासा झाला पाहीजे. जे चांगले उपक्रम आहेत, जे निश्चितपणे सुरु राहीले पाहीजेत असे आमचे सगळ्यांचे मत आहे. याठिकाणी अनधिकृत बांधकामाचा महत्वाचा विषय सगळ्यांनाच भेडसावतोय. यासाठी डॉक्टरच होते परदेशी साहेब. म्हणजे कॅन्सरसाठी जे इंजेक्शन असायचे तेच इंजेक्शन ताप, सर्दी, खोकल्यावर देखील असायचे. ही वस्तुस्थिती आहे. ते वाईट आहे, चांगले आहे. एखादा पेशण्ट त्यांच्याकडे गेला तर तेच इंजेक्शन असायचे. पेशण्ट गेला नाहीतरी पेशण्टच्या घरी जाऊन इंजेक्शन दिले होते. आम्हाला जो थंडी ताप अनधिकृतमुळे आला होता. त्याच्याकडे लक्ष गेले नाही. मा.उच्च न्यायालयाचा निकाल असतो तो संपूर्ण राज्याला लागू पडतो. परंतू पिंपरी चिंचवडमधील काही नागरीक कोर्टात गेल्यामुळे इथे अडचण निर्माण झाली आहे. आपल्याला ज्या काटेरी मार्गावरुन आपल्याला जायचे आहे. जेवढे करु नका म्हणणार, तेवढे करा असेही म्हणणार. तुमची काटेरी वाट सुरु झाली आहे. यात काही गोष्टी क्लिअर राहील्या पाहीजेत. आम्ही संख्येनी कमी आहोत. पण मी स्वतः त्या गोष्टीवर भांडणार आहोत. फर्म राहणार आहोत. याचा सुद्धा महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण गांभिर्याने विचार करावा.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य तसेच सन्मा.पत्रकार बंधूभगिनी आज ३२ वे अंदाजपत्रक या ठिकाणी सादर केलेले जवळपास ११६० पानी अंदाजपत्रक या ठिकाणी स्थायी समितीकडून मा.महापालिका सभेकडे आलेले आहे. खरे तर या महापालिकेच्या सभागृहामध्ये जवळपास अनेक वर्षे मंजूरी देत असून त्या रकमा निविदा प्रक्रियेमध्ये सामिल होत नाही. गेल्या वर्षभराच्या कालावधीत उपसूचनांचा पाऊस पडला जातो. उपसूचना ग्राहय धरली जाते. उपसूचना ग्राहय धरण्यासाठी आयुक्तांना प्रेशर दिले जाते. व या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाकडून उपसुचनांच्या माध्यमातून शहराचा विकास केला जातो. अनेक सदस्यांनी सांगितले की, एका विशिष्ट भागाचा विकास होतो. व हा विकास एवढयासाठी होतो त्याला प्रशासन जबाबदार आहे. गेल्या वर्षभराचा जर कालावधी पाहिला तर गेल्या वर्षभरामध्ये पाचशे ते सातशे कोटी रुपयांच्या उपसूचना दिल्या आहेत. मा.आयुक्त साहेब आता या सभागृहामध्ये बोलत असताना अनेक सदस्यांनी सांगितले की, विकास कामे झाली नाही. विकासाच्या बाबतीत महापालिकेत मंजूरी मिळून देखील अनेक निविदा प्रक्रिया झालेल्या आहेत. मा.आयुक्त साहेब मी एक माहिती मागविली होती. याची जवळपास ५९२ कोटी रुपयाची तरतूद होती. आणि प्रत्यक्षात २४/२/२०१४ रोजी काम झाले. २०४ कोटी रुपयाचे काम झाले. मा.आयुक्त साहेब ही जर सगळी आकडेवारी पाहिली तर ३४३ कोटी रुपयांची तरतूद होती. परंतू ९७ कोटी रुपयाचे काम झालेले आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे जे बजेट केले व ज्या बजेटसाठी तरतूद ठेवण्यात आली ती प्रत्यक्षात काम होत नाही. आजही विशिष्ट कामाकडे लक्ष दिले जाते. आज महापालिकेची परिस्थिती चांगली आहे. मा.आयुक्त साहेब आज ७४१ कोटी ९३७ रुपये बॅलन्स आहे. तसेच ८२ कोटी ९५ लाख ५९ हजार ६५१ रुपये डिपॉझिट ठेवी केलेल्या आहेत. मा.आयुक्त साहेब महापालिकेचा खर्च करताना बँका नाही, संस्था नाही. महापालिकेच्या योजनांच्या माध्यमातून प्रत्येक नागरीकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. पण मा.आयुक्त साहेब काय परिस्थिती आहे सध्याची. गेल्या सहा महिन्यामध्ये निविदा प्रक्रिया झाली. या ठिकाणी आयुक्तांचा गवगवा झाला. मला वाटते आपण सोळावे आयुक्त आहे. या पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक आर.एस.कुमार व गौतम चाबुकस्वार या ठिकाणी आहेत. जवळपास मी बारा आयुक्त पाहिलेले आहे. व या बारा आयुक्तांचा कारभार पाहिलेला आहे. परंतू या कारभाराच्या बाबतीत कुणाला दोष देणार नाही. या महापालिकेत आयुक्त आल्यानंतर त्या आयुक्तांना मनाप्रमाणे कारभार करु देत नाही. जरी चांगले काम करण्याची इच्छा असेल, चांगली भावना असेल तरी मनाप्रमाणे कारभार करु देत नाही. पण भविष्यामध्ये काम करताना चांगले काम केले तर परिस्थिती चांगली राहणार आहे. तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे कारभार करावा लागेल. परदेशी साहेबांनी त्यांच्या मनाप्रमाणे कारभार केला. त्यांना योग्य वाटले तसा महापालिकेचा कारभार केला हे सांगतो. आशिष शर्मा चार वर्षे महापालिकेचे आयुक्त होते. त्यांनी त्यांच्या मनासारखा कारभार केला. तरी देखील कायद्याचे उल्लंघन केले नाही. आजही या महापालिकेत काम करीत असताना प्रेशरने काम करावे लागणार आहे. म्हणून तुम्हाला काम करीत असताना खूप दूरदृष्टीने काम करावे लागणार आहे. या महापालिकेतील परिस्थिती फार वेगळी आहे. ग्रामीण भागातल्या सदस्यांच्या अनेक मागण्या आहेत. समाविष्ट गावांनी मागण्या केल्या आहेत. त्यांना राज्यशासनाने टॅक्स केला. जवळपास बावीस कोटी टॅक्स माफ केला. व जवळपास चाळीस कोटी रु. बाकी आहे. मी सुरुवातीला सांगितले शहरातील कारभार करीत असताना दडपणाखाली कारभार करु नका. या महापालिकेत करदाता म्हणून जो आहे त्या करदात्याला न्याय मिळाला पाहिजे तो प्रामाणिकपणे कर भरतो. आणि जो कर बुडवितो, जो कर चुकवितो त्याचे घरापुढे बॅण्ड वाजला पाहिजे. आयुक्त साहेब खरच त्याचा बॅण्ड वाजला पाहिजे. जो प्रामाणिकपणे कर भरतो तो प्रामाणिक करदाता आहे. जो करदाता कर भरतो त्याचा देखील मान ठेवला पाहिजे. जो कर चुकवितो तो कर बुडवित असतो. तो महापालिकेला कर भरत नाही त्याला देखील शासन मिळाले पाहिजे. हे महापालिकेला कळले पाहिजे. ही चांगली योजना होती. जो कर भरत नाही त्याचा कर वसूल झाला पाहिजे. मा.आयुक्त साहेब या महापालिकेचा संपूर्ण कारभार होत असताना काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे. या महापालिकेमध्ये पुण्यतिथी, जयंती, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कोटयावधी रुपये खर्च केला जातो. विशेष म्हणजे काही बाबतीत खर्च केला पाहिजे. परंतू काही खर्चाची काटकसर केली पाहिजे. गेल्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद होती. आता दोन कोटी पंच्याहत्तर लाख रुपयाची तरतूद आहे. नगरपालिकेची ९० लाख रुपये तरतूद आहे. ज्या चौकांमध्ये सीसीटीव्ही बसविणेचे पोलीस यंत्रणेद्वारे करणार होते त्यासाठी २ लाख ६६ रुपयाची तरतूद आहे. मा.आयुक्त साहेब या सभागृहात सीसीटीव्ही वर अनेक वेळा चर्चा झाली. या महापालिका क्षेत्रामध्ये कायद्याचे उल्लंघन होऊ नये त्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही बसविले पाहिजे. गेल्या वर्षामध्ये तरतूद होती ती खर्ची का पडली नाही. जर तरतूद खर्ची पडली नसेल, सीसीटीव्ही बसविले नसेल तर आयुक्त साहेब आपण सुध्दा गांभिर्याने पाहिले पाहिजे. आम्ही खर्च करतो. खर्च करीत असताना या महापालिकेच्या क्षेत्रामध्ये पीएमपीएमएल पीसीएमटी व पीएमटी चे एकत्रिकरण होऊ नये अशी या महापालिकेच्या सभागृहामध्ये भूमिका बजावली होती. किती वेळा सांगितले या महापालिकेमध्ये पीसीएमटी आणि पीएमटीचे एकत्रीकरण करु नका. आणि जवळपास त्यासाठी दोनशे कोटी रुपये खर्च केले. आशिष शर्मा असताना गेल्या तीन वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये सांगितले होते व त्यांना ३५ कोटी रुपये दिले होते. आणि ३५ कोटी रुपये दिल्यानंतर या अंदाजपत्रकामध्ये तरतूद आम्ही ठेवणार नाही आणि इथून पुढे आपली जबाबदारी संपली, ती इथून पुढे दिड वर्षे. आणि शासनाने

सांगितले इथून पुढे त्यांना पैसे दयायचे नाही. आज जवळपास ४० कोटी रुपयांची अंदाजपत्रकामध्ये तरतूद आहे. ८२ कोटी रुपयाची तरतूद होती. आणि मला वाटते आयुक्त साहेब हा प्रश्न प्रशासनाचे वतीने सभागृहाची दिशाभूल करतात. या दोन्ही संस्था एकत्र केल्यानंतर त्याचा लाभ नागरिकांना होणार आहे. पण तो आज लाभ होत नाही. सुविधांचा लाभ होत नाही. व नागरिकांना सुविधा मिळत नाही. आज सुध्दा नागरिक उन्हामध्ये बस स्टॉपवर थांबतात. बस स्टॉप नीट नाही. बीआरटीसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली. त्यात कुणाचे भले होणार आहे. मी या ठिकाणी सांगतो या ज्या बसस्टॉप होणार आहे त्यामुळे रस्ता क्रॉस करता येणार नाही. याठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. आणि म्हणून आयुक्त साहेब आपण या सगळया बाबतीमध्ये अंदाजपत्रकाच्या बाबतीत निर्णय घेत असताना मूळ जो हेतू आहे, मूळ जे कारण आहे त्यापासून आपण दूर जातो. आज महापालिकेच्या भूसंपादनासाठी १०० कोटी रुपयाची तरतूद केली आहे. यामध्ये प्रत्येक प्रभागांमध्ये एक क्रिडांगण, एक उद्यान असावे व त्याचे भूसंपादन करता येईल. हे भूसंपादन केल्यावर कमीतकमी त्या भागातील नागरिकांना क्रिडांगण, उद्यान असावे. परंतू गेल्या दोन वर्षाचा कालावधी पाहिला. भूसंपादनच झाले नाही. ग्राऊंडच्या संदर्भात मी जाणार नाही. जागा ताब्यात घेऊन ग्राऊंड करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. मा.आयुक्त साहेब या अंदाजपत्रकामध्ये बंद पाईप योजनेची ३१० कोटी रुपये तरतूद आहे. आंध्र धरणातून पाणी घेण्यासाठी राज्यशासनाने परवानगी दिलेली आहे. परंतू माझा उलट प्रश्न आहे की, यासाठी महापालिकेचे कोटयावधी रुपये अडकून आहे. यायाठी महापालिकेने ठेकेदाराला, आपणाला माहीत नाही म्हणून पुन्हा उजळणी करतो. या बंद पाईप योजनेच्या बाबतीत सर्वाधिक वाटोळे केले असेल तर आयुक्त बंड यांनी केले. काम करण्याचा मोह त्यांना आवरला नाही. आणि योजनेचे वाटोळे करण्याचे काम बंडच्या चार वर्षाच्या कालावधीत झालेले आहे. आणि म्हणून त्यावेळेस बंद पाईप योजना ही सभागृहात आणली होती. त्यावेळेस ठामपणे विरोध केला होता. आणि सांगितले होते. जोपर्यंत जागेचे एक्वीजीशन होत नाही तोपर्यंत तुम्ही निविदा प्रक्रिया करु नका. निविदा प्रक्रियेची घाई केल्यानंतर निविदा काढली. संबंधित ठेकेदार यांना बंद पाईप योजनेमध्ये ९५ कोटी रुपये आपण आजपर्यंत संबंधित ठेकेदाराला दिले आहे. हा कुणाचा पैसा आहे. हा सामान्य जनतेचा पैसा आहे. आपण कोणत्या प्रकारे कारभार करता. अंदाजपत्रकात अधिका-यांच्या प्रशिक्षणासाठी तरतूद ठेवली आहे. अधिका-यांनी प्रशिक्षणाला जावू नये या विचाराचा मी नाही. ते दौरा करुन आल्यावर महापालिकेला फायदा किती मिळाला. प्रशिक्षणाचा लाभ महापालिकेला किती झाला हे बघितले पाहिजे. ज्या अधिका-यांनी दौरे केले, त्यांचे प्रशिक्षणासाठी महापालिकेने खर्च केलेला आहे. त्या अधिका-यांनी महापालिकेस सल्लागारासाठी कोटयावधी रुपये खर्च केले आहे. कोटयावधी रुपयांची बचत न करता खर्च केले आहे. एलबीटी विभाग हा उत्पान्नाचा स्त्रोत आहे. एलबीटीबाबत अनेक सदस्यांनी सांगितले आज महापालिकेचे अंदाजपत्रक करीत असून गेल्या वर्षीच्या खर्चाचे निवेदन आहे. आणि या वर्षाचे निवेदन दिले आहे. मा.आयुक्त साहेब या अंदाजपत्रकामध्ये फक्त आकडे बदलेले आहे. ही आकडेवारी अनेक वर्ष पाहत आहे. ही आकडेवारी पाहात असताना व अंदाजपत्रकावर बोलत असताना अनेकवेळा आकडेमोड करतो. पण प्रत्यक्षात दिसून मात्र येत नाही. आणि ते माझ्यासारख्या ते अनेक सदस्यांचे मत आहे. यावर्षी १०५० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित धरले आहे. १०५ कोटी रुपये कमी पडलेले आहे. एलबीटी वसुल केली. आकडेवारीमध्ये कमी झाले असले तरी करसंकलन

विभागाचे उत्पन्न वाढणार आहे. ते उत्पन्न चार कोटी रुपये उत्पन्न झाले आहे. गेल्या वर्षी २५० कोटी रुपये धरले होते. ३९० कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते. शास्ती कर शासनाने लागू गेला. ते उत्पन्न ८२ कोटी रुपये उत्पन्न मिळेल. शास्ती कर कोणी लागू केला, २९ डिससेंबर २००८ मध्य राज्यशासनाने शास्ती कर लागू केला. राज्यशासनाने लागू केल्यानंतर जी.बी.मध्ये घेणार. २००० पासून शास्ती कर वसूल करतो. गेल्या वर्षी शास्ती कराबाबत या महापालिकेच्या सभागृहामध्ये ठराव झाला. ती बातमी वृत्तपत्रात छापून आली. शास्ती कराबाबत सभागृहामध्ये दिशाभूल करतात. वृत्तपत्रामध्ये शास्ती कर घेऊ नये अशा शास्ती कराबाबत बातम्या छापल्या. या महापालिकेच्या सभागृहात शास्ती कर घेऊ नये म्हणून राज्यशासनाकडे पत्र पाठविले. आणि शासनाने तो नामंजूर करुन २००६ पासून मंजूर करावा असे डायरेक्ट महापालिकेला पत्र पाठविले. चुकीचे सल्ले सर्वसामान्य माणसांपर्यंत जातात. राज्यशासनाने शास्ती कर लागू केला. आणि जोपर्यंत राज्यशासन शास्तीकर लागू करीत नाही, तोपर्यंत राज्यात शास्ती कर तसाच लागू राहणार. सातत्याने वृत्तपत्रात या बातम्या येतात. दोन टक्के वसूली करणार आहे. त्यांना सवलत मिळणार आहे. राज्यशासनाने नागरिकांच्या बाबतीत गजनी पिक्चरसारखे दिले आहे. प्रामुख्याने या ठिकाणी असे निर्णय देतात. या प्रकारात महापालिकेत नागरिकांना चिरडण्याचे काम होत आहे. मतप्रवाह होत आहेत. ड्रेनेजबाबत नीताताई पाडाळे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले आहे. ड्रेनेज शुध्दीकरण होत नाही. ड्रेनेज लाईन केली आहे. ड्रेनेज करीता १८ कोटी रुपये २ लाख रुपये खर्च केला आहे. त्या ड्रेनेज लाईनची काळजी आपण घेत नाही. आज महापालिकेच्या जागेत नदीपात्राचे निम्मे ड्रेनेज आहे. २७ कि.मी.पर्यंत ड्रेनेज आहे. ड्रेनेजचे पाणी फिल्टर करतो. परंतू आयुक्त साहेब हे फक्त कागदावर दिसते. पवनानदी, इंद्रायणी नदी, मुठा नदी ही गटरगंगा झाली आहे. खर्च झाला त्याप्रमाणे आम्हाला उत्पन्न मिळाले पाहिजे. सर्वसामान्य माणसाला कर लावला आहे. सर्वसामान्य माणसाला वेटीस धरण्याचे काम करीत आलो आहे. म्हणून आयुक्त साहेब मला प्रामुख्याने सांगायचे आहे हे सर्व कर प्रामुख्याने त्या माणसांकडून घेत असताना त्यांच्या ज्या गरजा आहेत, त्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्यांचेकडे आपण दुर्लक्ष करतो. ही वस्तूस्थिती आहे. आताच सांगितले आहे हे अंदाजपत्रक मांडत असताना आयुक्त साहेब ३४०० कोटी रुपयाचे अंदाजपत्रक करत आहे. आणि हे अंदाजपत्रक करत असताना अ,ब,क,ड, इ व फ अशा सर्व प्रभागवाईजचे अंदाजपत्रक केले आहे. अ प्रभागाकरीता जवळपास ३३ कोटी, ३० कोटी, ४० कोटी रुपये प्रामुख्याने प्रभागांना दिले आहे. त्यामध्ये स्थापत्य विषयक कामाच्या किती निविदा दिल्या हे कधी पाहिले का तुम्ही. मा.आयुक्त साहेब चार चार महिने निविदा प्रक्रिया चालते. कशाला लागतात चार चार महिने. जर तुम्ही त्यांना अधिकार दिले, अधिकाराचे वाटप केले. आज १०० कोटी रुपयांचा बोजा महापालिकेवर झालेला आहे. कशासाठी हे केलेले आहे. सुरळीत काम व्हावे म्हणून, पण होते का ते काम. आयुक्त साहेब सुरळीत काम होत नाही. काम होत असताना सर्वसामान्य माणसाला हेलपाटे मारावे लागतात. फक्त चकरा माराव्या लागतात ही परिस्थिती आहे. आज जी उत्पन्नाची साधने आहेत ती बांधकाम विभाग असेल, करसंकलन विभाग असेल, परवाना विभाग असेल, त्यांचेकडे उत्पन्नाचे साधन आहे. त्या साधनांमध्ये आपण जास्त वेळ दिला पाहिजे. आम्ही पाणीपट्टीच्या संदर्भामध्ये सातत्याने सांगत आलो आहे. प्रत्येकजण याठिकाणी १०० टक्के पाणी वापरतो. पाणी येत नाही अशातला भाग नाही. त्याने कुठून तरी नळ चोरुन घेतलेला असतो. परंतू महापालिकेमध्ये आयुक्त डिग्गीकर असताना

सांगितले होते. त्यांनी एक योजना राबविली होती ती म्हणजे नळ शोधायचे. व त्याला देखील पाच कोटी उत्पन्न मिळाले होते. करसंकलनच्या बाबतीत जो शास्ती कर लागू झाला. गेल्या पाच गेल्या पाच वर्षापासून मी ओरडतो. शर्मा साहेब होते तेंव्हापासून सांगितले होते. तुम्ही या मिळकती सोडा, लोकांनी घरे बांधलेली आहेत, ही महापालिकेची जबाबदारी आहे. त्या मिळकतीची नोंद करायची. लोक का तयार नव्हते त्या मिळकतीची नोंद करायला, कारण आपलीच लोक सांगत होती पाच हजार दया नोंद करीत नाही. हा आपला सल्ला आहे. आता तो सल्ला महागात पडलेला आहे. याठिकाणी कर नाही. परंतू याठिकाणी बांधकाम झालेले होते. पाणी वापरीत असेल तर त्यांचे सगळया बांधकामाचे १०० टक्के त्यांचेकडून कर वसूल करा. गेल्या दहा वर्षापासून आम्ही सांगतो. मिळकत करामध्ये पाणीपट्टी घेतली पाहिजे. पुणे महापालिका मिळकत करामध्ये पाणीपट्टी एकत्र करते. अनेकवेळा सांगितले आपलेकडे पुणे महापालिकेसारखे कामकाज सुरु करा. पण काय कारण आहे हे आम्हाला कळले नाही. पाण्याचे समान वाटप झाले पाहिजे. बंड साहेब आयुक्त म्हणून आल्यानंतर त्यांनी २४ तास पाणी येणार असे सांगितले. व त्यावेळी टँकरवर खर्च होत होता दीड कोटी ५० लाख रुपये झाला होता. व ५२ कोटी रुपयांचे पाण्याचे मीटर बसविले होते. समान पाणी वाटप करावे, यासाठी सगळया यंत्रणा राबविल्या. पाणी यावे म्हणून सगळे यंत्रणा राबविली. पण आजही काही भागामध्ये फक्त एक तास पाणी येते. काही भागात २४ तास पाणी येते. गेल्या २० तारखेच्या मिटिंगमध्ये २४ तास पाणी देण्यासाठी ताथवडे विभागाला पाणी देण्यासाठी परत एकदा विषय मांडलेला आहे. माझे तुम्हाला जाहिरपणे सांगणे आहे की, प्रचंड प्रमाणामध्ये आपण २४ तास पाणी देऊ शकणार नाही. गॅरंटी देऊन सांगतो की, २४ तास पाणी देऊ शकत नाही. जर महापालिकेने २४ तास पाणी दिले तर मी नगरसेवक पदाचा राजीनामा देऊ शकतो. हे जाहिरपणे सांगतो. का सांगतो तर २४ तास पाणी देणार हे गेले दहा वर्षे ऐकतो. आणि हे दहा वर्षे ऐकत असताना त्यासाठी १०० कोटी रुपये खर्च केले आहे. पण २४ तास पाणी मिळाले नाही. माझ्या भागात तर दोन तास पाणी येत नाही. ५७ पाण्याच्या टाक्या बांधल्या. १६, १७ पाण्याच्या टाक्यामध्ये पाणी आहे. माझा उलट प्रश्न आहे की, पाणी पुरवठयाचा जो कोणी अधिकारी असेल, सल्लागार असेल त्यांनी सल्लागारावर १०० कोटी रुपये खर्च केले. जरी ते सन्मानाने मोठे असतील, शिक्षणाने कमी असतील तरी ते महापालिकेचा कारभार करुन मोठे झाले. या महापालिकेच्या सभागृहात अनेक वेळा सांगितले. हे असे केले पाहिजे, ते तसे केले पाहिजे. परंतू आपले हे ज्ञान आहे ते पुस्तकी ज्ञान आहे. विकाऊ आहे. पुस्तकी सल्ला देतात. माझी या सभागृहामध्ये बजेटच्या अनुषंगाने मागणी आहे. मा.आयुक्त साहेब सल्लागाराचा सल्ला तपासून पाहा. त्यांचा स्वार्थ आहे का? त्यांची टक्केवारी किती आहे हे तपासून नीट पाहा. सल्ला निश्चित घ्या. सल्ला घेऊ नये या मताचा मी नाही. जर चांगली माहिती मिळत असेल तर निश्चितपणे आपण सल्ला घेतला पाहिजे. मा.आयुक्त साहेब काही ठिकाणी उत्पन्नाची साधने आहेत. उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. त्याची तपासणी केली पाहिजे. आणि ही तपासणी करत असताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आपण या महापालिकेत काम करीत असताना आपण आर्थिक बचत कशी होईल त्या अनुषंगाने देखील विचार केला पाहिजे. शेवटी आपण महापालिकेत आल्यानंतर पहिल्यांदाच आयुक्त म्हणून अनुभव दांडगा आहे. इथपर्यंत माहिती घेतली. परंतू या महापालिकेत काम करीत असताना भविष्यात पाणी पुरवठयाच्या बाबतीत आपण जे उत्पन्न करतो तेवढे होत नाही. आपण पाणी पुरवठयावर किती

खर्च करतो. हे या अंदाजपत्रकात स्पष्ट आहे. आणि मग एवढया मोठया प्रमाणावर खर्च करीत असेल तर आपण आयुक्त साहेब पाहिले पाहिजे. आपण चांगल्या पध्दतीचे पाणी दिले पाहिजे. आपण चांगल्या प्रतीचे पाणी १०, १५ रुपयाला विकत घेतो. व या सर्व बारीक सारीक गोष्टीचा आपण विचार केला तर आपण चांगले काम करु शकतो. माझ्या माहितीप्रमाणे अनधिकृत बांधकामाचे दहा कोटी रुपयांचे उत्पन्न वाढेल. आणि हे उत्पन्न वाढत असताना आपण जो खर्च करणार आहे, त्या खर्चात देखील काटकसर केली पाहिजे. आपण वैद्यकिय विभागावर मोठया प्रमाणावर खर्च करतो. आम्हाला डॉक्टर आयुक्त मिळाले. जे डॉक्टर येतील ते त्यांचे नजरेने पाहतात. डॉ.आयुक्त यांनी सांगितले महापालिकेचे भोसरी येथे हॉस्पिटल करायचे. स.नं.९ मध्ये पार्किंग करायचे, आकुर्डीमध्ये हॉस्पिटल करायचे. पण आयुक्त साहेब किती खर्च होतो हॉस्पिटलवर. जवळपास वैद्यकिय विभागावर मोठया प्रमाणावर खर्च होतो. १०० कोटी रुपये खर्च होतो. आता तो जवळपास वैद्यकिय विभागावर ४५ कोटी खर्च केलेला आहे. जवळपास ८०, ८५ कोटी रुपये खर्च वाय.सी. एम. हॉस्पिटलवर होतो. मला उलट प्रश्न पडला आहे. जर या महापालिका क्षेत्रात एखादा माणूस आजारी पडला व त्याचा आरोग्य विभागावर खर्च करतात. आरोग्य विभागावर १०० कोटी रुपये खर्च करतो. आणि मग तक्रारी येतात. पवना नदी, मूळा नदी, इंद्रायणी नदी यांचे पात्र स्वच्छ करावे. डास मच्छरांचा त्रास होणार नाही. यावर आरोग्य विभागाने खर्च केला तर हा खर्च कमी होईल. एकीकडे आरोग्य विभाग बचत करतो. जर आपल्याला खर्च कमी करावयाचा असेल तर या शहरामध्ये आरोग्य चांगले राहिले पाहिजे. कचरा उचलला पाहिजे. नदीचे पात्र चांगले राहिले पाहिजे. अशी ही आपली संकल्पना आहे. याला मी पाठिंबा देतो. आणि ही संकल्पना चांगली असताना प्रामुख्याने मा.आयुक्त साहेब वैद्यकिय विभागावर खर्च करीत असताना सहा कोटी सोळा लाख रुपये कोर्सवर आपण करतो. शासकीय योजनेमध्ये १ कोटी रुपये खर्च केले आहे. कुटुंब नियोजनासाठी दोन कोटी साठ लाख रु.खर्च केला जातो. मी औषध खरेदीचे सांगत नाही. यासाठी जवळपास १२, १३ कोटीची तरतूद आहे. मा.आयुक्त साहेब मला एवढे सांगावयाचे आहे की, ज्या कारणासाठी हा खर्च कामी येणार आहे त्याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. शासकीय योजना असतील त्याची अंमलबजावणी करावी. शासकीय योजना असतील तर शासनाने आपल्याला फक्त गाईडलाईन दिल्या. आणि म्हणून त्या योजना करायच्या असे मात्र होता कामा नये. आपण सुलभ पध्दतीने सुलभ शौचालय साफ सफाई करणे. मी अनेक वेळा सांगितले आपण राज्यशासनामध्ये कारभार केलेला आहे. राज्यशासन एकीकडे योजना करते. आपण या योजनामध्ये हागणदारी मुक्त शहर करायचे. या महापालिकेच्या क्षेत्रामध्ये जेवढया स्मशानभूकी आहे त्या स्मशानभूमीचा परिसर पाहिला तर अतिशय दुर्गंधी आहे. ठराविक स्मशानभूमी सोडल्या तर त्या स्मशानभूमी अतिशय अस्वच्छ आहे. त्या ठिकाणी अंत्यविधीला गेलो की, नरकात गेलो की काय अशी परिस्थिती निर्माण होते. त्याठिकाणी महापालिकेचे शौचालय आहे काय? आपण त्या ठिकाणी वॉचमनवर अंदाजपत्रकात तरतूद ठेवली आहे. काही ठिकाणी महापालिकेचे असणारे शौचालयात नाक धरुन जावे लागते. का ही परिस्थिती निर्माण झाली? का हे होत आहे? याकडे कोणी बारकाईने पाहते का? याठिकाणी स्मशानभूमी जवळ नदीचे पाणी असते त्याला कोणी हात पण लावत नाही. एकीकडे शासनाच्या हागणदारी मुक्त गांव करायचे आणि दुसरीकडे चिंचवड येथील चाफेकर चौकाजवळ एल्प्रोच्या बाजूला एक झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीच्या बाजूला नागरिकांना तेथे शौचालय

नाही त्यांना शौचालय बांधा. नागरिकांना सुविधा देणे हे देखील पाहिले पाहिजे. ही आपली जबाबदारी आहे. एकीकडे आपण सांगतो की, शहर स्वच्छ करायचे आणि दुसरीकडे प्रामुख्याने दुर्लक्ष करतो. आयुक्त साहेब कच-यावर आपण कोटयावधी रुपये खर्च करतो. काही भागात कच-यासाठी कुंडया आहेत. काही भागात कुंडया सुध्दा नाहीत. परंतू कचरा उचलण्यासाठी ज्या गाडया आहेत त्या वेळेवर जात नाही. काही ठिकाणी दोन दोन दिवसांनी गाडया जातात. हा त्यांचा अहवाल आहे. आणि हा सर्व अहवाल होत असताना मा.आयुक्त साहेब आज चांगल्या ठिकाणी आपण कचरा टाकतो. तर त्यासाठी आपण एक वेगळी यंत्रणा उभी केली पाहिजे. तो सगळा कचरा एका ठिकाणी टाकला जातो. यासाठी यंत्रणा उभी करुन तो कचरा तात्काळ वेगळा केला पाहिजे. आणि त्यामुळे कचरा राहणार नाही. शहर स्वच्छ राहील. शौचालयाची परिस्थिती फार अवघड आहे. शौचालय चार चार दिवस तसेच असतात त्याकडे कोणी जातही नाही. आणि आपल्याकडे काय झाले आहे आयुक्त साहेब ही जी प्रभाग कार्यालये आहेत ती प्रमुख संस्थानिक झाली आहेत. प्रभाग कार्यालयात जे काम करतात ते प्रमुख व प्रभागातील संस्थानिक झाले आहे. प्रत्येक शाळेला एक हेडमास्तर पाहिजे पण प्रत्येक शाळेला शिक्षकांची संख्या कमी आणि हेडमास्तरांची संख्या जास्त अशी परिस्थिती झालेली आहे. डॉ.श्रीकर परदेशी यांनी सारथीच्या माध्यमातून हेल्पलाईन सुरु केली. हे चालू केले त्यामुळे झोपलेले जागे व्हायचे. काय केले मला काही कळले नाही. पण अशा कारभाराला विरोध करतो. पण अशा ठिकाणी आपण कारभार करतो. आपण याठिकाणी नोकरी करतो. आणि त्यासाठी आपण ३५ लाख रुपये मोबाईल फोन आणि २५ लाख रु. इंटरनेटवर आपण खर्च केले. व्हाय फाय साठी दीड कोटी रुपये खर्च केले. मी हे यांचेच सांगतो, माझे नाही सांगत. आपण हे एवढे सगळे करतो. एवढया सुविधा देतो. मग ज्या नागरिकांनी तक्रार केली असेल तर निवारण केले पाहिजे. एवढे सगळे का सांगतो या महापालिकेत कारभार करणारा कुठलाही आयुक्त राज्यशासनाचा असतो. तुम्हाला सांगितले की, हे काम करणार तर तुम्हाला लगेच फोन येणार. म्हणून तुम्हाला सांगतो मा.आयुक्त साहेब तुम्हीच सगळे करणार तर तुमच्याकडे सगळा ओढा येईल. याठिकाणी असीम गुप्ता आयुक्त होते. अतिशय ब्रिलियंट माणूस. मी या आयुक्तांना आयुक्त म्हणून सलाम करतो. शर्मा साहेब, असिम गुप्ता साहेब, प्रविणसिंह परदेशी अतिशय ब्रिलियंट माणूस. प्रविणसिंह परदेशी आयुक्त यांचेसारखे काम कुणाला येणार नाही. काही आयुक्तांनी काम करीत असताना सगळया अधिका-यांना बरोबर घेऊन काम केले. असिम गुप्ता यांनी २००५ साली एक योजना चालू केली. त्याची ३३कोटी तरतूद होती. या महापालिकेत तरतूद होत असताना – पाच कोटीची तरतूद होती. परंतू ही तरतूद वर्ग करण्यात आली. तरतुदी महापालिकेच्या सभागृहामध्ये अंदाजपत्रकात घेतात. आणि नंतर त्या तरतुदी वर्ग केल्या जातात. आणि ही वर्गवारी कोटयावधी रुपयांची असते. व त्या अंदाजपत्रकाची चर्चा होते. या अंदाजपत्रकाची मंगलाताई कदम, - महापौर असताना चर्चा झाली. पण या चर्चेचे फलित काही होत नाही. म्हणून आयुक्त साहेब माझे तुम्हाला सांगणे आहे, शाळा, मैदाने व्हावीत. शाळेत मुले शिक्षण घेत असताना शिक्षण मंडळाचे बजेटमध्ये सांगितले जाते. शिक्षण मंडळ माझ्या आवडीचा विषय आहे. आपण सातत्याने क्रिडा विभगाच्या बाबतीत गांभिर्याने घेतले पाहिजे. या महापालिकेत क्रिडा विभागावर ५० लाख रुपये खर्च केले. क्रिडा विभागाने तर अण्णासाहेब मगर स्टेडियमचे तर वाटोळे केले. एवढया मोठया स्टेडियमचे वाटोळे झाले आहे. आणि म्हणून आयुक्त साहेब दूरदृष्टीने काम करण्यासाठी आकडेवारी

वाचतो. तरतूद ठेवण्यासाठी आकडे दिसतात. आयुक्तांचे निवेदन वाचले. व हे निवेदन वाचल्यानंतर डॉ.श्रीकर परदेशी यांचा बारा कलमी कार्यक्रम वाचला. प्रत्येक आयुक्त येतो आणि एक कलमी कार्यक्रम होतो. तो कार्यक्रम कोणता होता तर पाण्याचे बोर्ड लावले. २४ तास पाणी येणार म्हणून दिलीप बंड आले त्यांचा एक कार्यक्रम होता. पहिल्याच दिवशी त्याची बातमी पेपरमध्ये छापून आली. अशा आयुक्तांनी कामच करु नये. सांगायचा उद्देश एवढाच की, केवळ प्रसिध्दी नको. या अंदाजपत्रकाबाबत तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. अंदाजपत्रकात अतिक्रमणाबाबत पाच कोटी तरतूद केलेली आहे. अतिक्रमणाची कारवाई होत असताना जी अनधिकृत बांधकामे झाली ती बांधकामे आम्ही करायला सांगितली नव्हती. आपण या गरीब माणसांना न्याय देऊ शकत नाही. राज्यशासनाने २०१२ साली कायदा केलेला आहे. कायदयाच्या चौकटीमध्ये या सगळया गोष्टी बसविलेल्या आहेत. याठिकाणी आपल्याला चांगले काम करता येईल. कायदा विभागाकडे लक्ष दयावे. दोन कोटी चाळीस लाख रुपये खर्च आपल्या केसेसवर होतो. मा.आयुक्त साहेब या सगळया गोष्टी करीत असताना भूसंपादन अधिकारी यांचे आस्थापनेवर खर्च किती येतो हे पाहिले पाहिजे व ही गोष्ट तात्काळ आहे. मी दुस-या गोष्टीकडे लक्ष वेधतो. महापालिकेच्या लाईटवर जवळपास वीस कोटी खर्च झाला आहे. दिवाबत्तीबाबत सांगायचे तर एकीकडे बचत करा म्हणून सांगायचे व दुसरीकडे आपण खर्च करायचा. म्हणून आयुक्त साहेब या गोष्टीची जाणीव ठेवली पाहिजे. खेळाडूसाठी अंदाजपत्रकात तरतूद आहे. खेळाडूंना त्याचा लाभ मिळावा. अनेक वेळा सांगितले की, जे प्रामाणिक खेळाडू आहेत त्यांना तो लाभ मिळाला पाहिजे. ई.गव्हर्नन्स संगणकसाठी अकरा कोटी तरतूद आहे. मा.आयुक्त साहेब या गोष्टीकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. ठेकेदारी पध्दतीने चौदा कोटी रुपये खर्च होतो. या महापालिका क्षेत्रामध्ये अशा अनेक मिळकती ठेवलेल्या आहेत व त्या मिळकतीबाबत अनेक वेळा सांगितले. अनेक ठेकेदार सुरक्षा व्यवस्थेचे काम पाहतात. या सुरक्षा व्यवस्थापकाला तो व्यवस्थित पगार देतो का नाही. ते काम करण्याचे किती पैसे देतात. मा.आयुक्त साहेब या सगळया गोष्टीचा उल्लेख करीत असताना मी एक गोष्ट सांगतो की, काही गोष्टी निश्चितपणे चांगल्या होईल. महापालिकेचा कारभार करीत असताना उड्डाण पूलाच्या बाबतीत आपण पे आणि पार्क करावे. त्यातून उत्पन्न चालू होईल. टप-या, हातगाडया यांचे उत्पन्न मिळेल हे पाहिले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी दंड चालू केला पाहिजे. दंड चालू केला तर रस्त्यावरील राडारोडा थांबू शकतो. तो दंड वसूल केला तर महापालिकेला उत्पन्न मिळेल. आपण जर सगळयात जास्त विचार केला तर महिलांसाठी चांगल्या प्रतीचे शौचालय, मुता-या केल्या पाहिजे. याबाबत अनेक वेळा आयुक्तांबरोबर बोलणे झालेले आहे. या महापालिकेत अनेक प्रकल्प केले. या प्रकल्पाची सर्वसामान्य नागरिकांना माहिती व्हावी. बोटक्लब, सर्पोद्यान असेल, सांगवीमधील शिवसृष्टी प्रकल्प असेल या सगळया पर्यटन स्थळांची प्रसिध्दी जास्तीत जास्त व्हावी. व या महापालिकेच्या क्षेत्रामधील तमाम नागरिकांना खास करुन विद्यार्थ्यांना या सगळया प्रकल्पाची माहिती मोफत देण्याची व्यवस्था करावी. या शहराची निर्मीती झाल्यानंतर अण्णासाहेब मगर यांनी खूप चांगले प्रकल्प केले आहेत. परंतू या शहरातील नागरिकांना याची माहिती नाही. जर त्यावर खर्च केला असेल तर त्याची माहिती व्हावी. व सर्वसामान्य माणसापर्यंत ती पोहोचावी. अन्न सुरक्षा कायदा केलेला आहे. आपली काही जबाबदारी आहे. या महापालिकेत अनेक मंगल कार्यालये आहेत. व त्या मंगल कार्यालयात अन्नाची मोठया प्रमाणावर नासाडी होते. आपल्या सुरक्षेच्या लोकांनी पाहिले

पाहिजे. अन्नाची नासाडी होता कामा नये. व त्यादृष्टीन आपण प्रयत्न केले पाहिजे. शहरामध्ये समान पाणी वाटप झाले पाहिजे. हे प्रामुख्याने केले पाहिजे. मैला शुध्दीकरण व नदीच्या कडेने डास मच्छरांबाबत गांभिर्याने लक्ष घातले पाहिजे. नदीमध्ये घाण पाणी जावू देऊ नये याकडे लक्ष दिले पाहिजे. पवनानदी, मुठानदी, इंद्रायणीनदी यांचे पात्र व्यवस्थित केले पाहिजे. नदीपात्र स्वच्छ केले पाहिजे. कारण ते या शहराचे केंद्रबिंदू आहेत. आंध्रचे पाणी येऊ दया. नदीचे पात्र बांधायला सुरुवात करा. तुम्ही हे काम करण्यासाठी सुरुवात करा. जसे अहमदाबादला बांधले आहे तसे बांधायला सुरुवात करा. या शहराचे आयुक्त म्हणून एक वेगळी ओळख होऊ दया. मा.आयुक्त साहेब एवढे रुपये खर्च होतात. आज या महापालिकेत चौतीसशे कोटी रुपयाचे अंदाजपत्रक होत असताना या शहराचे एक वेगळे काही तरी केले त्या दृष्टीकोनातून नदी हा प्रकल्प आपण राबविला तर या शहराचा आत्मा ही नदी आहे. या नदीचे पात्र हा आत्मा आहे. या दृष्टीकोनातून आपल्याला या सगळया गोष्टी करता येईल. पुन्हा एकदा आपल्याला मनपूर्वक धन्यवाद देतो. आणि या ठिकाणी मा.महापौर, मा.आयुक्त साहेब यांना मनपूर्वक धन्यवाद देऊन ज्यांचा ज्यांचा सहभाग या शहराच्या नुतनीकरणाला व या शहराच्या प्रगतीला झाला ते सर्व अधिकारी असतील कर्मचारी असतील, सन्मा.सदस्य असतील त्यांना माझ्यावतीने धन्यवाद देतो. अतिशय चांगले काम आपण या महापालिका क्षेत्रात केलेले आहे. शेवटचे बजेट सादरीकरण करीत असताना त्या अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत नियमामध्ये उल्लंघन होत असते. परंतू भविष्यामध्ये या नियमांचे उल्लंघन होऊ नये अशा प्रकारची आशा करतो आणि थांबतो.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब,कोरम चेक करा. माझी हरकत आहे. नगरसचिव यांनी सांगावे. हरकत घेतल्यानंतर कोरमचे काय करायचे असते ते सांगा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, कोरम नसेलतर बजेट पास करता येणार नाही व उपसूचना सुद्धा घेता येत नाहीत.

**मा.महापौर** – लोक येत आहेत.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, अनुसूची “ड” प्रकरण २ मधील नियम १फ नुसार, सभा चालू असताना कोणताही प्राधिकारी धरुन उपस्थित पालिका सदस्य संख्या एकूण सदस्यांच्या १/३ पेक्षा कमी आहे असे निदर्शनास आणण्यात आलेतर अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याला सभासदांना संयुक्तित वाटते अशी वेळ ठरवून अन्य दिवशी सभा केली पाहीजे. तहकूब सभेत हा विषय निकालात काढला पाहीजे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.नगरसचिव यांनी खुलासा करावा की, दुसरी मिटींग तहकूब झालीतर विशेष सभेसाठी कोरमची आवश्यकता आहे का?

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, इथे दादागिरी चालणार नाही. ही विशेष सभा आहे. सगळ्या सदस्यांच्या उपसूचना घ्याव्यात.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, गणसंख्येअभावी सभा यापूर्वी दोनदा तहकूब झाली असेल तर त्या सभेला कोरमची आवश्यकता राहणार नाही. विशेष सभा ही सभाच आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज पिंपरी चिंचवड शहराचे ३६०० कोटींचे बजेट चर्चेसाठी आणले आहे. खरेतर गेले १०/१२ वर्षांपासून मी या सभागृहात आहे. सन २००२ ची पहिली बैठक आठवतेय. महापालिकेचे बजेट २०० कोटींच्या आसपास होते. आज हिच महापालिका आज ३४०० कोटींच्या घरात आहे. म्हणजे आज दहा पटींपेक्षा जास्त बजेटचा आकडा झाला आहे. या निमित्ताने खरेतर ब-याच गोष्टींची चर्चा अनेक सदस्यांनी केली आहे. या बजेटची सगळी अंमलबजावणी करायचे काम आयुक्त म्हणून, प्रशासन प्रमुख म्हणून आयुक्त करत असतात. त्यावेळी त्यांना सुद्धा अनेक चांगल्या वाईट गोष्टींना सामोरे जावे लागते. खरेतर जाधव साहेब हे महापालिकेचे पहिलेच आयुक्त आहेत की, त्यांना आल्या आल्या एक/दोन दिवसांत त्यांच्यासमोर बजेटची आकडेवारी आली. कदाचित असे झाले असेल परदेशी साहेबांनी सगळी तयारी केली. फक्त पान बदलले, तुमचे नाव घातले. मला माहिती कळाली की, तुम्ही बराच वेळ सलग रात्रंदिवस बजेट बाबतीत अभ्यास केला आहे. त्यानुसार ज्या काही सुधारणा सूचवता येतील, ज्या काही चांगल्या गोष्टी देण्याचा प्रयत्न इथे केला आहे. मला आठवते तुम्ही स्थायी समितीमध्ये बजेट मांडताना म्हणाला होता, बजेट हे लाटांसारखे असावे. ते समोर सादर करतो, ते अतिशय टाईट नसावे. जेणेकरुन ते फ्लोटींग असावे. निधी उपलब्ध नसेलतर तो उपलब्ध करुन घेता येईल. परंतू आपली महापालिकेतील ही पहिलीच सभा त्यात बजेटची सभा आहे. मागील महापालिका सभेत आपण आयुक्त म्हणून हजर नव्हता. तुम्ही महापालिका अनुभवलेली नाही. ही विशेष महापालिका सभा दुपारी १.०० वा. पासून सुरु झाली असून आता १० तास झाले आहेत. प्रत्येक जी.बी. एवढा वेळ चालत नाही. त्यामुळे तुम्ही एवढे दडपण घेऊ नका. परंतू तुम्हाला प्रशासकीय कामाचा भरपूर अनुभव आहे. त्यामुळे तुम्ही महापालिका अतिशय व्यवस्थितपणे सांभाळाल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आकडेवारीबद्दल बोलायचे तर बरेच जण संभ्रमावस्थेत आहेत. आवश्यकता नसेल तिथे तरतूद केली गेली आहे. कदाचित ही प्रिंटींग मिस्टेक सुद्धा असू शकते. खातरजमा केलीतर खालची टोटल बरोबर आहे. हे होत असताना महापालिकेची जी उत्पन्नाची साधने आहेत. महापालिकेने मागील वर्षी जकात बंद केली आणि एलबीटी लागू केली. त्याचबरोबर करसंकलन विभाग असेल, बांधकाम परवानगी विभाग असेल, आकाशचिन्ह व परवाना विभाग असेल, अशा वेगवेगळ्या विभागांकडून आपल्याला महसूल प्राप्त होत असतो, त्यातून खर्च करत असतो. कमी जास्त प्रमाणात उत्पन्न अनुभवतोय. गेले काही वर्षांत जवळपास अडीच हजार कोटींची कामे करु शकलो. आणि शहराला चांगले रुप देऊ शकलो. कदाचित मा.बंड साहेबांमध्ये चुकीचा मार्ग दिसत असेल, चुकीच्या पद्धतीने अधिकारांचा वापर करणारा अधिकारी दिसत असेल, परंतू त्यांनी जी सुरुवात केली. अधिकारी येत असतात. जात असतात. कामे मात्र बंद होत नाहीत. त्यांनी सुरुवात केल्यानंतर आम्हाला केंद्र शासनाचे, राज्य शासनाचे फंडींग मिळायला सुरुवात झाली. आदरणीय शरद पवार आणि राज्यातून आदरणीय अजित पवार यांनी जे सहकार्य केले. त्यामुळे या शहराला हे नवीन रंगरुप दिल्याचे पाहतोय. मला मा.राजिव जाधव साहेबांना विशेष जाणिव करुन द्यायची

आहे की, तुम्ही ऐकले असेल हे शहर फार वेगाने विकसित होते आहे. शहराचा विकासाचा रेशियो ७२ टक्के आहे. या शहरात गेले १० वर्षांत १० लाख लोकसंख्या वाढली हे प्रमाण पाहीले तर ७२ ते ७५ टक्के फरक आहे. इथे उपलब्ध असलेल्या मुलभूत सुविधा, सर्व प्रकारची साधने याची उपलब्धता यामुळे या शहराला खरेतर यश आले आहे. मग हे शहर अनेक अंगांनी, ढंगानी वाढले आहे. कोणी गाववाल्याचे शहर म्हणतो, कोणी उद्यानांची नगरी म्हणतो, कोणी औद्योगिक नगरी म्हणतो. वेगवेगळे पैलू या शहराचे आहेत. आता या नगरीची वाटचाल सांस्कृतिक नगरीकडे असावी म्हणून आमचा प्रयत्न चालू असतो. वेगवेगळे पैलू पाहत असताना शहराची जडणघडण होत असते. कोणकोणत्या चांगल्या गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. शहरात कोणकोणत्या चांगल्या गोष्टी पाहीजेत याचा अभ्यास करायचा आहे. मला सूचना करायची आहे की, पुणे महापालिकेत ३ महिन्यांत एकंदर बजेट तयार होते. त्याची चर्चा संबंधित सर्व पक्षप्रमुख, सर्व पदाधिकारी यांच्याबरोबर केली जाते. ज्या-ज्या ठिकाणी अंदाजपत्रकात आवश्यक तरतूदी पाहीजेत, त्याची आकडेवारी पहिल्यांदा घेऊन अंदाजपत्रक तयार केले जाते. आपल्याकडे नेमके उलटे आहे. तुम्ही आमच्या मागणीप्रमाणेच काम केले पाहीजे. ही लोकल बॉडीची सिस्टीम आहे. तुम्ही बजेट सादर करताय. आम्ही ते मंजूर करतोय. उपसूचना घ्यायची का नाही. कोणाच्या उपसूचना अडवायच्या. हा माझ्यातला. वास्तविक हे बजेट सादर करताना आम्ही तुम्हाला उपसूचना दिली पाहीजे. उपसूचना दिली तरी तशा पद्धतीने काम होत नाही. हे तुम्हालाही, सगळ्यांनाच माहित आहे, कोणत्याही महापालिकेत मा.महापालिका सभा ही सुप्रिम सभा असते. तुम्ही दिलेला प्रत्येक निर्णय आमच्यावर बंधनकारक असणार नाही. तुम्ही काहीही निर्णय घेणार तरी तो तुम्हाला आमच्या समोर मंजुरीसाठी ठेवावा लागणार आहे. आम्ही ते मान्य केलेतरच तुमच्या निर्णयाला महत्व आहे. त्यामुळे या बैठकीच्या निमित्ताने मी हे सांगू इच्छितो की, महापालिका सभा महापालिकेची सुप्रिम असते. आपण घेतलेला कोणताही निर्णय या महापालिकेवर बंधनकारक करण्याआधी आमची मान्यता घ्यायला हवी. एकंदरीत महापालिकेत हे घडले जाणार आहे. शहर चांगले वाढतेय. कोणीही असू देत. शहरातील प्रत्येक नागरीकांचा निर्णय असू देत. किंवा कोणत्याही विभागातला असू देत. तुम्हाला आमच्या समोर यावेच लागणार आहे. भविष्यातील तुमची प्रमोशन असतील, तुमचे निर्णय पॉलिसी असतील ते चांगल्या पद्धतीने घ्याल अशी अंदाजपत्रकाच्या निमित्ताने अपेक्षा वाटते. आत्ताच परदेशी साहेब बदली होऊन गेलेत. त्यांच्याकडून ब-याच चांगल्या गोष्टी अनुभवल्या. प्रशासकीय शिस्त असेल, सारथी हेल्पलाईन असेल या वाखाणण्यासारख्या गोष्टी आहेत यात शंका नाही. परंतू शेवटी शेवटी जाता जाता नागरीकांचा वाजलेला बँडबाजा सुद्धा आम्ही विसरु शकत नाही. अनधिकृत बांधकामाबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करत असताना त्यांनी घेतलेले निर्णय, त्यात दुखावलेले नागरीक व आम्ही हे सुद्धा विसरुन चालणार नाही. हे होत असताना मघाशी सुलभाताईंनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला पिवळ्या नजरेतून, प्रत्येक व्यक्तीला एकाच चष्म्यातून ते बघायचे. मी करतोय ते खूप चांगले आणि समोरचा करतोय ते चुकीचे असे समजण्याचा त्यांचा चुकीचा दृष्टीकोण होता. परदेशी साहेबांकडून आम्हाला खरेतर चांगल्या कामाची सुद्धा अपेक्षा होती. परदेशी साहेबांना हजारो लोकांनी पाठिंबा दिला. हे सगळ्यांनी पाहीले पण केवळ प्रशासकीय कामकाज चांगले असणे म्हणजे काम चांगले असणे असे नाही. तुम्ही लोकांचे काम करण्यासाठी इथे आयुक्त म्हणून बसलेला असता. लोकांचे समाधान होत नसेलतर शंभर हजार लोकांच्या

कामकाज पद्धतीत बदल करा म्हणून सूचना येत असतीलतर तुम्ही सुद्धा लवचिकता दाखवली पाहीजे. वेगवेगळ्या पक्षातल्या लोकांसमोर गेले पाहीजे. त्यांच्या मागण्या समोर याव्यात. कुठे ना कुठेतरी ही ॲडजस्टमेंट करावी लागणार आहे. म्हणून त्यांना ही ॲडजस्टमेंट करता आली नाही. हे होत असताना आम्हालाही त्यांच्याकडून चांगली कामे करुन घेता आली नाही ही सुद्धा तेवढीच काळ्या दगडावरची रेष आहे. तेवढी त्यांची काम न करण्याची भूमिका होती. ती सुद्धा चुकीच्या पद्धतीची होती. आज या महापालिकेत बरेचसे आयुक्त येऊन गेले आहेत. मा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले, जसा राजा तशी प्रजा. नेता पण तसाच असायचा. बंड साहेबांनी विकास कामांना गती दिली. त्यानंतर महापालिकेची आर्थिक परिस्थिती खिळखिळी झाली, त्याला कंट्रोलिंग करायचे काम शर्मा साहेबांनी केले. कंट्रोलिंगबाबत त्यांचा किस्सा सांगितला, श्री.डिग्गीकर आयुक्त असताना त्यांनी व्हिजन २००५ योजना हाती घेतली होती. या महापालिकेला चांगल्या पद्धतीने करायचे असे सांगितले होते. त्या त्या परिस्थितीत महापालिकेची डेव्हलपमेंट होत होती. आज जी काही डेव्हलपमेंट होते आहे ती त्यानुसारच होते आहे. आज महापालिकेचे बजेट ३४०० कोटींपर्यंत पोचले आहे. माने साहेबांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. त्यांनी या विभागाचा चार्ज घेतल्यापासून चांगल्या प्रकारचा पॉझिटिव्ह व्ह्यू ठेवून व्यावसायिक, व्यापारी यांना सांगितले, त्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने गोडीगुलाबीने नोंदणी करा. चुकवू नका. नको त्या ॲक्शन घ्यायला लावू नका असे सांगितले. त्यांनी केलेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत म्हटलेतरी वावगे ठरणार नाही. आपली वसूली मागील वर्षी १२०० कोटी होती. ते काढू शकलो नाहीत. यामागे कारणे आहेत. जकात बंद झाल्यानंतर एलबीटी लागू झाली. गॅप पडली. तोटा होतो. त्यानंतर वसुली कमी होते. २५० कोटींचा तोटा सहन करावा लागला. केवळ एलबीटी लागली म्हणून तोटा सहन करावा लागला असे म्हणायचे कारण नाही. तोटा आहे, फक्त तोटा आहे. तो फक्त रु.१०० कोटी रुपयांचा कसा आहे. हे देखील त्यांनी मला सांगायचा प्रयत्न केला. आम्हीही समजून घ्यायचा प्रयत्न केला. शेवटी मार्केटचा परिणाम एलबीटी व जकातीवर अवलंबून नसतो. हा संपूर्ण बाजारपेठेवर परिणाम होतो. साहजिकच याचा फटका आपल्याला बसणार नाही. ज्या तरतूदी बजेटमध्ये अपेक्षित केल्यात त्या योग्य आहे का अयोग्य याचा विचार करणे गरजेचे आहे. आयुक्तांच्या निवेदनात ब-याच गोष्टी दिल्या आहेत. त्या गोष्टींवर बराच जणांचा माझासुद्धा आक्षेप आहे. उदा. वायसीएमसाठी अंदाजपत्रकीय रक्कम दाखवली रु.९.५० कोटी, तरतूद केली रु.१ कोटी रुपये. ९.५० कोटी ही तरतूद सुद्धा पी.जी. कोर्स या आवश्यक कामासाठी, कशासाठी. ऑलरेडी आपण ४०/५० कोटी एवढा खर्च वायसीएमवर करतोय. आपली बरीचशी रुग्णालये सांभाळतोय. आज परदेशी साहेबांना वाटले म्हणून त्यांनी आयुर्वेदीक दवाखाने बंद करुन टाकले. त्यांना वाटले ते योग्य, आम्हाला वाटले ते चुकीचे. असे समजणे चुकीचे आहे. ८० डॉक्टर्स उपलब्ध करायचे काम केले. डॉक्टरांची भरती केली. किती डॉक्टर्स उपलब्ध आहेत. त्यांची काय अवस्था आहे. कमिश्नरपेक्षा जास्त पगार डॉक्टर घेतात. सव्वा लाखाच्या घरात डॉक्टरचा पगार आहे. आम्ही विधी समितीत याला गेले ४ महिने मंजूरी देत नाही याचे कारण काय. ही वैद्यकीय विभागाची अनावश्यक भरती आहे. अनावश्यक कर्मचा-यांची कपात केली आहे. का, केवळ समोरच्याकडून अपेक्षित काम होत नाही म्हणून त्याला पदावनत करणे चुकीचे आहे. शहरात २० लाख लोकसंख्या झाली आहे. महापालिकेची व्याप्ती किती वाढली आहे. पुणे व पिंपरी चिंचवड या मेट्रोपॉलिटन सिटीज् आहेत. या दोन्ही मेट्रोपॉलिटन सिटी म्हणून

ओळखल्या जातात. केंद्र शासनाने जेव्हा जेएनएनयूआरएमची योजना लागू केली तेव्हा पिंपरी चिंचवडचे नाव कुठेही नव्हते. पवार साहेब नसतेतर आज आपण या सभागृहात ए.सी.मध्ये बसतोय. या सभागृहावर १४/१५ कोटी खर्च केला आहे. जुन्या सभागृहात फॅन लावून बसत होतो. आज इथे अशी आहे, इथे कुडकुडायला होते. इतकी चांगली परिस्थिती का आहे. आपल्याला शहरात काम करायला केंद्र शासनाचा निधी मिळाला. त्यावेळी त्या लोकांनी त्याची री बरोबर ओढली म्हणून शहरात विकास कामे झालीत. जे.ई., डेप्युटी असेल एक्झिक्युटीव्ह असेल विभागप्रमुख असेल त्यांना याचे शंभर टक्के श्रेय जाते आहे. त्यांनी त्याच्या त्याच्या पद्धतीने जास्तीत जास्त काम करायचा प्रयत्न करत होते. त्याचे फळ आपण आज इथे बघतोय. याचा शंभर टक्के अभिमान वाटतोय. पूर्वी आम्ही पुण्याचे असे सांगत होतो. आज मी पिंपरी चिंचवडचा आहे असे अभिमानाने सांगतोय. इथे पहिल्यांदा आलेला माणूस या शहराला कधी विसरत नाही अशी इथली परिस्थिती आहे. इथे असणारे मोठमोठे रस्ते, असणा-या सुविधा, रस्त्यांमुळे शहराला खरी ओळख निर्माण झाली आहे. नाशिक फाटा इथे गेलात तर तिथे असलेल्या जे.आर.डी.टाटा उड्डाणपूलाखाली गेलात तर या दुमजली पुलाच्या तुल्यबळ पूल देशात कुठेही नाही असा १०० कोटींचा पूल शहरात आहे. तो या शहराचे नाक आहे. केवळ एकच पूल नाहीतर येत्या काही काळात केएसबी चौकातील पूल असेल, सांगवी फाट्याचा पूल असेल, चिंचवडमधील पूल असेल इथे अनेक प्रकारचे पूल बघायला मिळतील. अंदाजपत्रकाच्या माध्यमातून ब-याच गोष्टी मार्गी लावणार आहोत. त्यात वेगवेगळ्या विभागांवर होणारा खर्च असेल, वेगवेगळ्या क्षेत्रात होणारा खर्च असेल, शहरात आकर्षित करण्यासाठी चांगल्या योजना असतील, त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गेल्या काही दिवसांत तुम्ही आम्ही पाहतोय, हे शहर विकसित होत असताना देशातील कायदा काही प्रमाणात कडक होत गेला आहे. भारतात थुंकायला देखील दंड आहे. आपण आपल्या घरात कसे वागावे या वागणुकीचे सुद्धा कायदे कानून ठरले आहेत. आपण किती कायदे पाळावेत. किमान शेजा-याला त्रास होणार नाही असे वागावे अशी मानसिकता राहू शकली तरी समाजासाठी काहीतरी करु शकलो असे म्हटले तरी वावगे होणार नाही. अनेक गोष्टी काही वर्षांत कायद्याने करायचा प्रयत्न होत आहेत. एखादा कचरा डेपोचा प्रश्न असू द्यात, प्रत्येक गोष्टीला चांगले वाईट चेहरे असतात. वेगळ्या नजरेतून बघतो. यात अनेक गोष्टी चुकलेल्या असतात. अनेक गोष्टी बरोबर सुद्धा असतात. शहराला एकच कचरा डेपो मोशी इथे आहे. काही दिवसांनी व्हिजीट देताल. बरीच वर्षे झाली कचरा साठतोय. कचरा डेपोसाठी दुसरी जागा शोधली पाहीजे. पाऊस पडणार असेल, वेगवेगळ्या डेव्हलपमेंट होणार असतील. रामकेला काम दिले होते ते अर्धवट अवस्थेत आहे. ५/७ वर्षांपूर्वी यासाठी रु.१५ कोटी खर्च करुन ते तसेच पडले आहेत. कचरा डेपोत गाड्या येतात. जुन्या कच-यातून त्यातून लिचड बाहेर येते. त्याची पर्यायी व्यवस्था होत नाही. छोट्या छोट्या गोष्टींना सामोरे जावे लागते. संबंधित विभागाला अडचणींना सामोरे जावे लागते. मी ४/५ वेळा जाऊन आलो आहे. जवळपास ५०० टन कचरा दररोज तयार होतो. त्याचे विकेंद्रीकरण झाले पाहीजे. कच-याची विल्हेवाट लावत असताना किरकोळ अमाऊंट ठेवून बजेटमध्ये अंदाज केलेला दिसतो. केवळ लॅण्ड फिलिंग करुन किंवा कचरा उलटा पालटा करुन चालणार नाही. मी मागील जी.बी.त उदाहरण सांगितले होते. जपान इथे कचरा डेपोच्या बाहेर चपला काढायला लावल्या होत्या. तिथल्या व आपल्या परिस्थितीत इतका फरक आहे. उद्याच्या काळात ही परिस्थिती आपल्याकडे व्हावी. कच-याचे अलगीकरण नाही, कचरा गोळा

करताना त्याची सिस्टीम पाहीजे. अशा पद्धतीने ताबडतोब कचरा गोळा केला पाहीजे. त्यांना सगळी आकडेवारी सांगायची खूपच हौस होती. एवढा एवढा खर्च झाला आहे. तुम्ही तुमची स्पेशालिटी दाखवा. पण आम्ही सांगतोय ते पण झाले पाहीजे. मागील आयुक्तांनी एवढे केले, मी एवढे केले. तुम्ही बिनधास्त सांगा माझ्याकडून होणार नाही. त्यामुळे आज याठिकाणी १५ टक्के मेडिकलवर खर्च करतोय. ५०० कोटी डिपॉझिट ठेवले आहेत. तुम्हाला लाज वाटली पाहीजे. एवढी मोठी महापालिका असूनही खर्च करु शकत नाही. आज २४ तारखेला १५० कोटींचे टेंडर सबमिशन होते. त्यांच्या इतिहासात त्यांनी एवढी कामे काढली नव्हती. त्यांच्या कालावधीत स्थापत्यच्या निविदांचे ३ वा. पर्यंत टेंडर सबमिशन होते. इतकी फास्ट प्रोसेस झाली. मागील जी.बी.त मंजूरी दिली. तुम्हाला दादांनी सांगितले होते. पुन्हा त्या टाळून, कोणालातरी बायपास करुन काम केले अशातला भाग नाही. एखादे काम करायचे असेल तर त्या पद्धतीने पुढे जायचे असेल तर पैसे खर्च केले पाहीजेत. तुमची अडवायची भूमिका नाही, विकासाची भूमिका नाही मग पैसे खिषात. याला काही अर्थ नव्हता. माझ्या त्यांच्याबरोबर कमीत कमी १० वेळा तरी वाद झाला असेल. मी म्हणालो, मी इथे वाद करायला आलो नाही. तुम्हाला बोलणारी फक्त १२८ तोंडे आहेत. आम्हाला एक एक मतदारसंघात २०,००० मतदार विचारणारे आहेत. इथे आलेला प्रत्येक मनुष्य किमान लाख लोकांना तरी ओळखतो. मी सांगवीतला आहे मग मी प्राधिकरणातली तक्रार सांगायची नाही अशातला भाग नाही. अशा अडचणी मांडल्यातर त्या सॉल्व्ह झाल्या पाहीजेत. एखादी मागणी केली असेलतर ती मान्य झाली पाहीजे. मी माझ्या वॉर्डातले एखादे काम सांगतोय आणि तुम्ही ते करायचे नाही. बजेटमध्ये तरतूद आहे. अर्थसंकल्पाला सक्षम समितीची मान्यता आहे. जी.बी.ची मान्यता आहे. त्या विषयाला विचार करुन कायद्याच्या चौकटीत बसत असेलतर ते मार्गी लावले पाहीजे. नकारार्थी भूमिका घेणे १०० टक्के चुकीचे आहे. ड्रेनेज विभागाची अत्यावस्थ स्थिती आहे. संपूर्ण शहराचा ९९ टक्के सुप्रिम कोर्टाच्या गाईडलाईन्स, ऑर्डर्स आहेत. मॅन्युअली मॅनहोल चेंबर साफ करु नये. त्यावर ऑर्डर झाली आहे. शहरात काम काढले. एकच काम असल्यामुळे निविदा नव्हती. त्या कामाची तक्रार होत नाही तोपर्यंत तेच टेंडर चालू ठेवा. त्यानंतर दुसरी निविदा काढा. असे काम करणारे आपल्याकडे २/३ असे कॉन्ट्रॅक्टर आहेत. निविदा प्रक्रिया, टेंडरमध्ये अशा अटी-शर्ती टाकल्या विचारू नका. सहा वेळा रि-टेंडर केले. आजसुद्धा तुम्हाला अत्यावश्यक सेवेतले गांभिर्य नसेल तर ही तिस-याच मेंटॅलिटीची माणसे आहेत. काही गोष्टींत कोणी कोणाच्या नुसार चांगल्या पद्धतीने निर्णय घ्यावा, हे संबंधित अधिका-याच्या मानसिकतेवर अवलंबून आहे. अनेक गोष्टींवर चर्चा झाली आहे. पाणीपुरवठा असेल, विद्युत असेल. विद्युत विभागामध्ये – मी जेव्हा स्थायी समितीचा चेअरमन होतो, त्यावेळी एक पॉलिसी केली होती. आमच्याकडे पैसे नव्हते. महापालिका डबघाईला आली होती. १५ कोटींचे रोडलाईटचे बील होते. आपण स्ट्रीट लाईटवर जेवढा खर्च करतो. त्यावर प्रपोजल होते. त्यावर गेले ४ वर्षांत कदाचित ७० ते १०० कोटी खर्च झाले असते. तेवढीच रक्कम कदाचित वाचली असती. आज एलईडीची निविदा काढतोय. त्यामुळे ३० टक्के बजेट कमी होते आहे. निविदा काढत असताना टेंडर ४५/४५ टक्के बिलो येते. म्हणजे कुठेतरी एस्टीमेट चुकतेय. या गोष्टी कुठेतरी टाळल्या नाही पाहीजेत. एकाच प्रकारचे काम ३८ टक्के बिलो, ४५ टक्के बिलो येत असेलतर आपण कुठेतरी एस्टीमेट अमाऊंट चुकीची काऊंट करतोय. हे माझ्यासारख्याला सांगायची गरज नाही. आज कोट्यावधी खर्च करायचे नियोजन केले आहे. १५/२० कोटी खर्च

वाचवून ३०टक्के बचत व्हावी. त्यातून फार बचत होईल. शहर नंबर एकचे शहर होईल. शहर फार मोठे होईल. अशातला भाग नाही. बजेट होत असताना आपण किरकोळ बजेट कुठेतरी वापरत असाल तर असे नियोजन पाहीजे. आजची परिस्थिती आहे. चुकीच्या पद्धतीने काम होते आहे. भविष्यात ब-याच गोष्टी पाहतोय. मागील आठवड्यात मुख्यमंत्री महोदय शहरात आले होते. मुख्यमंत्र्यांनी मेट्रोबरोबर मॉल ट्रेनचा उल्लेख केला. हिंजवडी, तळवडे, पुणे, आय.टी. सेक्टर इथे १०/१२ लाख कर्मचारी काम करतात. हिंजवडी व तळवडे इथे सकाळीची परिस्थिती पाहीलीतर कोणताही मनुष्य पीक पिरीयडमध्ये सापडला तर परत तिथे जायला नको म्हणतो. मेट्रो ही तिथे गेलीच आहे. ५/६ लाख लोकांची ये-जा करण्यासाठी वाहने, ट्रॅफिक त्याचे नियोजन, २/३ सिग्नल तिथे वाहने खोळंबतात. इतकी वाईट परिस्थिती आहे. परंतू २४ तास कर्मचारी काम करत असताना त्यांना सगळ्या सुविधा दिल्या पाहीजेत. त्यासाठी योग्य ती तरतूद केली पाहीजे. मेट्रोसाठी अंतर कमी असले तरी, दापोडी पासून निगडी पर्यंत पाहीजे. तर भविष्यात तुमच्या कालावधीत मेट्रो सुरु करण्यासाठी काही पण करुन दिल्ली मेट्रो, बीआरटीचा अभ्यास करा. आपण हिंजवडी फेज ३ व ४ पर्यंत मेट्रो गेली पाहीजे. जेणेकरुन वाहतूक व्यवस्था चांगली होऊ शकेल. भविष्य काळात हिंजवडी माण मारुंजेपर्यंतचा परिसर आपल्याकडे घेण्याचा विचार करतोय. हा परिसर चांगल्या प्रकारे विकसित झाला आहे. त्यावेळी त्यांना कोणताही टॅक्स नव्हता. आज ग्रामपंचायतीची परिस्थिती आहे, त्यांचे उत्पन्न कमी आहे. आपल्याकडे अशा प्रकारच्या कंपन्या इथे आल्यातर कमीत कमी ५० ते ६० कोटी मिळणार आहेत. आज अशी परिस्थिती आहे. आत्ता त्या कंपन्या टॅक्सफ्री राहीलेल्या नाहीत. केवळ पुण्यातून लाखो कोटींचा बिझनेस डॉलर्समधून होतो आहे. मग शहरवासियांना याचा फायदा होतो का नाही होत. शहराबाहेर कंपन्या पण ते लोक राहणारे इथे आहेत. पिंपळे सौदागर इथे बघा. कमीत कमी १०० कोटी टाकलेतर हा परिसर व्यवस्थित, चकचकीत होऊ शकेल. एकदम वेलप्लान्ड झोपडपट्टी विरहीत परिसर आहे. त्या परिसरात कोणी जागा विकली नव्हती. स्वतः शेतकरी राबत होता. आज तिथे चांगली डेव्हलपमेंट झाली आहे. तिथे गेल्यावर मुंबईला, दिल्लीला गेल्यासारखा भास होतो. किंबहुना फॉरेनला गेल्यासारखा भास होतो. तिथल्या नगरसेवकाने बापु काटे, नाना काटे यांनी स्वतः जागा डेव्हलप केल्या. चौक सुशोभिकरण केले. परदेशी साहेबांनी त्यांना करु दिले नाही. अशा पद्धतीने आम्ही शहराच्या विकासात हातभार लावत असतो. आज रावेत असेल किवळे असेल वाकड असेल, हा नवीन परिसर आहे. इथे जाऊन बघा, लोकांची मानसिकता असते, त्यांच्या घराशेजारी जर अनधिकृत बांधकाम होत असेल, झोपडी होत असेल तर लगेच लोक सारथीवर तक्रार करतात. इतके लोक आता अलर्ट झाले आहेत. त्यांना आपल्या शेजारी घाण नको असते, झोपडपट्टी नको असते, कोणत्याही प्रकारच्या अडचणी नको असतात. सारथीसारख्या योजनेचा गवगवा करतोय. आम्हाला या योजनेचा अभिमान आहे. परंतू शासन कसे आहे. ते बघू. महापालिका सभेत प्रस्ताव पाठवला आहे. सदस्यांना पण कळू द्या. पण काही नागरीकांना याला विरोध केला. हे काय इंटेलिजन्स ब्युरो आहे का. आज ही लपवण्यासारखी गोष्ट नाही. मी तक्रार केली असेल. किरकोळ तक्रारी कशासाठी दूर करायच्या हा प्रत्येक नगरसेवकाला अधिकार आहे. कधी काय चालते पहिले आम्हाला सांगितले पाहीजे. कोणी नाही म्हणायचे कारण नाही. बाकीच्यांनी इथे आम्हाला सांगायची गरज नाही. उद्याच्या काळात अशा प्रकारचे निर्णय घेतले जाणार आहेत म्हणून कोणत्या कामाला

किती विरोध होतो, किती नाही याचे सुद्धा साक्षीदार तुम्ही असाल. बजेटच्या पुस्तकावर बोलत असताना खाजगी जागा महापालिकेच्या ताब्यात आल्यानंतर त्याचा विकास कसा करावा.. ऑडिटोरियम बांधावे. शहरात अनेक बिल्डर आहेत. किती जागा ताब्यात घेतली. महापालिकेच्या ताब्यात जागा आल्याच पाहीजेत. फक्त एक रुपयाच्या भाडेपट्ट्याने जागा ताब्यात येते. तो वाद बंधनकारक आहे. या कामाचा खर्च आवश्यक आहे का, कशासाठी आले. आरक्षण ताब्यात आले असतेतर लोकांना उपयोगी होईल अशी वेगळी योजना करा. ऑडीटोरीयम केलेतर ते चार्जेबल होईल. गार्डन करा. ओपन करा. शहरात पर्यावरण खुलून गेले पाहीजे. सांगवी परिसरात २५,००० झाडे लावली आहेत. मूळा व पवना या दोन नद्यांचा संगम इथे आहे. परंतू ही झाडे शहरात कमी दिसतात. कदाचित संख्या जास्त आहे. शहर पर्यावरण पूरक व्हावे म्हणून प्रयत्न करत असतो. कासारवाडी पूलावर तुम्ही स्वतः होता. उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांनी सूचना केली होती. शहरात झाडांची संख्या वाढली पाहीजे. पर्यावरण जपले पाहीजे. शहरात झाडे कमी दिसतात. या सूचना आपल्यासाठी तितक्याच महत्वाच्या आहेत. आज खरेतर नगरसेवकांनी ब-याच गोष्टी बोलल्या आहेत. अग्निशामक विभागासाठी रु.५ कोटी तरतूद केली आहे. फायर ऍक्ट २००९ नुसार आपण काम करतो. श्री.किरण गावडे हे या विभागाचे प्रमुख आहेत. माझी त्यांना दिलेली १०/१५ पत्रे असतील. त्यांनी फायर ऍक्ट हा शब्द कधीच वापरला गेला नाही. आज बजेटमध्ये वापरला आहे. अग्निशमन कायदा या शब्दाचा वापर सुद्धा आपले लोक कधी करत नव्हते. आमच्यासारख्यांनी हे सांगायची गरज लागली नाही पाहीजे की, तुम्ही फायर ऍक्ट वापरा. मंत्रालयाला आग लागल्यानंतर शासकीय इमारतींचे फायर ऑडीट केले होते. तशा शासनाने सूचना दिल्या गेल्या. असे आपल्याकडे का होत नाही, कशामुळे होत नाही याचा सुद्धा लेखाजोखा तुम्ही पाहीला पाहीजे. फायर विभागाकडे चांगल्या पद्धतीने लक्ष द्या. इथे अनेक कर्मचारी आहेत. त्यांना योग्य त्या सुविधा दिल्या गेल्या पाहीजेत. जे कर्मचारी शहरात ज्या ज्या ठिकाणी अडचण तयार होईल तिथे ते जात असतात. प्रत्येकाला युनिफॉर्म असणे. पाण्यात जाताना वेगळा, आगीत जाताना वेगळा, रेग्युलर वेगळा, त्यांचे शूज असतील. हॅण्ड ग्लोव्हज् असतील. हेल्मेट असतील. या बाबी पुरवून त्यांना तेवढी सुरक्षितता सुद्धा दिली पाहीजे असे मला वाटते. परदेशी साहेबांनी केलेल्या दहा कलमी कार्यक्रमाबाबत खंत इथे व्यक्त केली. कपॅसिटी बिल्डींग करायचा त्यांचा प्रयत्न होता. निश्चितच कुठे ना कुठेतरी चांगले म्हणण्यासारखे आहे. काही ठिकाणी हे सुद्धा आक्षेपार्ह आहे. प्रत्येक आठवड्याला अधिका-यांचा सन्मान करणे. आमचे सगळेच अधिकारी सन्मान करायच्या मानसिकतेचेच आहेत. कॉम्पेटीशन लावल्याने कॉन्फिडन्स वाढतो. ही चांगली गोष्ट असली तरी त्यांच्या १० कलमी कार्यक्रमामुळे ब-याचशा अडचणी सुद्धा झाल्या. याचा सुद्धा अभ्यास करुन शंभर टक्के बजेट कसे मार्गी लावता येईल याकडे बघावे असे सांगावेसे वाटते. बिल्डींग परमिशन – हा चांगले उत्पन्न देणारा विभाग आहे. या विभागाकडून जवळजवळ २५०/३०० कोटी जमा होतात. यातून शहरातील बरीचशी कामे करत असतो. एका बाजूला एवढा पैसा कमवतोय. दुसरीकडे ई-गव्हर्नन्स यूज करणारी आपली महापालिका म्हणून गवगवा करताना काही वर्ष बघतोय. मी परदेशी साहेबांना पत्र दिले होते. त्यांना म्हणालो होतो, साहेब तुम्ही ईगव्हर्नन्स ईगव्हर्नन्स करताय. पण आपला कुठलाही विभाग दाखवा जो पेपरलेस आहे. एकही विभाग पेपरलेस नाही. बांधकाम परवानगी हा उत्पन्न देणारा विभाग आहे. इथे शहरातील व्यावसायिक, हायप्रोफाईल

प्रकारचे लोक येतात. इथे सबमिशनला कागदपत्रे जमा होतात. झेरॉक्स व ऑथेंटीकेट करण्यासाठी जमा करुन घेतो मी त्यांना सूचना केली, आपण ऑनलाईन प्लॅन सबमिट करुन घेतो. जेव्हा ऑनलाईन प्लॅन सबमिट केल्यावर जे.ई. ते व्हेरिफाय करतो. नंतर डेप्युटी इंजिनिअर करतो, एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर करतो. प्लॅन मंजूर झाल्यानंतर त्यांचा आर्किटेक्ट हार्ड कॉपी घेऊन येतो. मी जे.ई. असेलतर माझी सही घेऊन जातो. बिल्डींग परमिशनची चिठ्‌ठी घेऊन जातो. माझ्या बिल्डींगचा प्लॅन ५ माळ्यांचा आहे व मी ६ माळ्यांच्या बिल्डींगच्या प्लॅनवर सही घेतोय. लोकांकडून पैसे वसूल केलेतर. तो आर्किटेक्ट जे.ई. च्या ओळखीचा असेल तर तो जे.ई. सह्या देऊन टाकतो, शिक्का देऊन टाकतो. मी सूचना केली की, तुम्ही बीओटीवर देऊन टाका. तो चार्ज आकारेल. महापालिकेला रेव्हेन्यू मिळवून द्या. महापालिकेला उत्पन्न कसे मिळवावे यालासुद्धा चालना देणारी आम्ही मंडळी आहोत. पूर्वीचे दिवस गेले. ज्याप्रमाणे महापालिकेचा पैसा कशा रितीने येतो, त्याप्रमाणे महापालिकेचा पैसा कशा रितीने खर्च करायचा या मानसिकतेचे आम्ही नाही. म्हणून ही मेंटॅलिटी आमची असताना प्रशासनाकडून सहकार्य सुद्धा महत्वाचे आहे. ही अपेक्षा माझ्यासारख्याकडून होते आहे. असा विकास होत असताना नगररचना विभागाकडून भूसंपादन केले जाते. यासाठी १०० कोटी तरतूद केली आहे. आजच्या परिस्थितीत केंद्र शासनाचा लॅण्ड ऍक्विझिशन ऍक्ट नवीन आला आहे. त्याची अंमलबजावणी करायला सुरुवात केली तर हे १०० कोटी १५ दिवसांतच संपून जातील. एकूण परिसराच्या १० ते २० टक्के सुद्धा आरक्षण ताब्यात येणार नाही. पेड एफएसआय लागू केला पाहीजे, टिडीआर ला रेड कार्पेट दिले पाहीजे. केवळ २० टक्के जागा ताब्यात आहेत त्या डेव्हलप केल्या पाहीजेत. त्यात टीडीआर १५ टक्के आहे. लॅण्ड ऍक्विझिशन करुन केवळ १० टक्के जागा ताब्यात घेतली आहे. इतर सुविधांचा आपण वापर करत नाही. उदा. पेड एफएसआय, टीडीआर असेल. पाहिजे त्या प्रमाणात मार्केटमध्ये दिला जात नाही. बीआरटी कॉरीडॉरसारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पात ४० टक्के टिडीआर द्यायचा ठरले होते पण तुमचा प्रिमियम इतका भरमसाट होता. कोणी येत नव्हते. या अटी कुठेतरी शिथिल झाल्या पाहीजेत. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहीजेत. प्रशासकीय पाऊले उचलावी लागतील, ती इथे आपण उचलावीत. काही वर्षापूर्वी या शहरातून सांस्कृतिक महत्व होते ते संपवण्याचा प्रयत्न केला गेला. गणेशोत्सव पहिल्यांदा बंद केला गेला का तर पैसे वाचावेत म्हणून. गणेशोत्सव चालू होता तो परत चालू झाला पाहीजे. आपण आपल्या चालीरिती, आपली परंपरा, आपली संस्कृती, वारसा नाही जपलातर कुणी जपायचा. उद्या पैसा कुठेही वाचवू शकतो. २५ ते ३० हजार लोक उत्सवाचा फायदा घेत होते. असे उत्सव मोठ्या प्रमाणात केले पाहीजेत. हे शहर केवळ औद्योगिक नगरी राहीली नाही पाहीजे. सांस्कृतिक नगरी सुद्धा झाली पाहीजे. माझ्या उपसूचना गणेशोत्सव सुरु करा अशी असेल तर तो का बंद करावा. कशासाठी बंद करावा. याचा प्रशासकीय अधिकारी म्हणून विचार करावा लागणार आहे. अशा निमित्ताने तुम्ही कराल अशी अपेक्षा आहे. आपले शहर अनेक वर्षापासून विकसित होत असताना बरीच गावे समाविष्ट झाली. मोशी, च-होली, ताथवडे, पुनावळे, किवळे, रावेत असेल अजूनही काही गावे समाविष्ट होणार असतील. त्यासाठी भरीव तरतूद देणे फार गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात आपल्याला नवीन गावांसाठी विचार करुन योजना करावी लागेल. आज शहरात १२८ नगरसेवक आहेत. त्यांच्यात वेगवेगळे गुण आहेत. सगळे नमुने आहेत. त्यामुळे तुम्हाला यांची वेगवेगळी पात्रे काही दिवसांत अनुभवायला मिळतीलच.

हे होत असताना तुमच्याकडून कोणी दुखवू नये. शेवटी असे होणार नाही. काम करत असताना काम करतो तो चुकतो, करत नाही तो बिनचुक,बरोबर असतो. हे सगळे होत असताना आपल्या शहरात अनेक चांगल्या वाईट गोष्टींना सामोरे जावे लागेल. तुम्ही पूर्वी रत्नागिरी येथे कलेक्टर म्हणून होता. कलेक्टर असतानाची कारकीर्द व इथे आयुक्त म्हणून तुमची असलेली कारकीर्द यात बराचसा फरक जाणवत असेल. किमान ३०/४० सदस्यांचा लोंढा रोज तुम्हाला भेटायला येऊ शकेल. वेगळ्या प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागेल. तसे बघितले तर सगळ्यांचा काळ आला आहे. आचारसंहिता तोंडावर आली आहे. आचारसंहिता आहे म्हणून काम होऊ शकत नाही असे म्हणून टाळता येणार आहे. तुमच्याकडून चांगले काम करायची अपेक्षा आहे म्हणून तुमच्याकडे काम घेऊन येणार आहे. सदस्य म्हणून चांगल्या गोष्टींची मागणी करत आलो आहेत. भविष्यात तुमच्याकडून सुद्धा अपेक्षा आहे. तुमचेसुद्धा तेवढेच योगदान असावे. महासभेचा मानपान ठेवण्यासाठी, शहरासाठी माझे लांबलेलं दोन शब्दांचे भाषण संपवतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज दुपारी १ वाजल्यापासून ही बजेटची विशेष सभा चालू आहे. आयुक्त साहेबांची ही पहिलीच सभा आहे. आयुक्त साहेब तुम्हाला पहिल्याच दिवशी महापालिका ब-यापैकी समजले असतील अशी अपेक्षा करते. तुमचे स्वागत सर्वांनी केलेले असलेतरी मी पण सर्वांच्या वतीने तुमचे स्वागत करते. सकाळपासून बजेटवर चर्चा करतोय त्यामुळे पुन्हापुन्हा आकडेवारी रिपिट करावी असे वाटत नाही. महसूल खर्च किती, भांडवली खर्च किती, किती एलबीटी मिळणार, पाणीपुरवठ्यातून किती मिळणार, किती खर्च होणार, किती बीलांवर किती खर्च होणार आहे. मी गेले २२ वर्षे या सभागृहाचा अभ्यास केला आहे. म्हणूनच ही आकडेवारी खूप बोलल्यामुळे यातून फरक पडणार आहे असे वाटत नाही. मला हे निदर्शनास आणून द्यायचे आहे की, आम्हाला कोणतेही चुकीचे काम करायचे नाही. बजेटच्या पुस्तकात ज्या-ज्या चुका झाल्या त्या आम्ही तुमच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. ज्यावेळी किरकोळ दुरुस्त्या असतील तर तशा त्या होता कामा नये. ही छोटी गोष्ट आहे अशातला भाग नाही. बजेटबाबत कमिश्नर, अधिकारी लोक, जे.ई., नगरसेवकांकडून, प्रभागातून माहिती घेतात तेव्हा काय करावे लागेल ते बघतात. त्याप्रमाणे ब-याच दिवसांपासून बजेटचे पुस्तक तयार होते. खरेतर ही चुकीची प्रथा आहे. ज्यावेळी ३०० कोटी बजेट होते त्यावेळी स्थायी समिती अध्यक्ष बजेटमधून कमिश्नरांना कामे सूचवत होते. गेली ५/१० वर्षे झाली ही प्रथा बंद झाली आहे. म्हणून या मोठ्या चूका होतात. बजेट हे खरेतर सुटसुटीत असले पाहीजे. प्रत्येकाला एवढे मोठे पुस्तक देण्यात पॉईंट आहे का. प्रभागनिहाय बजेटचे पुस्तक द्या. ज्याला पाहीजे त्याला आख्खं पुस्तक द्या. काही लोकांना आपण ज्या प्रभागात आहोत, त्यांनी टोटल, प्रॉपर बजेट बघण्यासाठी द्या. भोसले साहेबांना सांगितले. ते म्हणाले आम्हाला आकडेवारी लवकर मिळालीतर आम्ही प्रभागनिहाय बजेट करुन देऊ शकतो. पुढील वर्षी सुधारीत बजेट करणार आहोत त्यावेळी दक्षता घेतली गेली पाहीजे असे मला याप्रसंगी वाटते. मला सांगायला आनंद वाटतो, आम्ही जरी सत्तेत असलोतरी आम्ही कोणतीही वाढीव उपसूचना एकसुद्धा देणार नाही हे सभागृहाच्या वतीने सांगते. आम्हाला यावर सार्थ अभिमान आहे. तरीसुद्धा वाढीव उपसूचना देऊन तुमचे बजेट कोलॅप्स व्हावे अशी इच्छा नाही. सर्व नगरसेवकांना ३ दिवसांचा, ४ दिवसांचा कालावधी दिला होता. वॉर्डातल्या कामांना दुरुस्ती करुन

पाहीजे होती. माझ्या वॉर्डातला प्रोजेक्ट आहे. त्याच वॉर्डात खर्च करायचा आहे. जर आम्ही त्यांना संधी दिली आहे. त्याच पद्धतीने इथे साधारण उपसूचना आहेत. असे सर्वांना सांगू इच्छिते. आपण आख्ख्या पिंपरी चिंचवड शहरात गेलात. मला वाटते आपण सकाळी पण मिटींग घेतली होती. त्या दृष्टीकोणातून आपले बोलणे झाल्याप्रमाणे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ करायचा जो अभिनव उपक्रम तुम्ही, आम्ही सर्वजण हाती घेणार आहोत. त्याचा शुभारंभ आपण उद्याच करावा. आख्खे शहर बघितले. बजेटचे नागरीकांना काही देणे घेणे नाही. एवढी ठोकळ्यासारखी पुस्तके घेऊन, याचे काही देणेघेणे नाही. आमच्या भागातला कचरा स्वच्छ झाला पाहीजे. आमच्या वॉर्डात प्लास्टीकचा ढीग दिसता कामा नये. स्वच्छचे लोक सकाळी लवकर वेळेवर कचरा घेऊन जात नाहीत. ते वेळेवर घेऊन जावेत. अशा माध्यमातून स्वच्छता अभियान उद्यापासून आपल्या अधिपत्याखाली, महापौरांच्या अधिकाराखाली, अधिकारी, सर्व पदाधिकारी व वॉर्डातले नगरसेवक यांच्या माध्यमातून अभियान राबवावे. आज सर्वसाधारण नागरीकांना काय पाहीजे. पाणी व्यवस्था पाहीजे, स्वच्छता पाहीजे, ड्रेनेज पाहीजे, रस्ता पाहीजे, पाणी स्वच्छ पाहीजे. हे शहरात देऊ शकाल मला वाटत नाही, सगळे जण बोलतात, याला कोणत्याही अधिका-यांनी विरोध केला नाही. डिग्गीकर साहेबांनी ३ वर्षे काढली, गुप्ता साहेब आले त्यांनी एकच वर्ष काढले. त्यावेळी अशी परिस्थिती निर्माण झाली असे वाटले नाही. बंड साहेबांना बरेच दिवस काढले. शर्मा साहेबांनी देखील बरेच दिवस काढले. श्रीकर परदेशी साहेबांना २ वर्षे मिळाली. त्यांना प्रमोशन मिळाले त्यामुळे ते बदली होऊन गेले. परंतू ज्यावेळी असिम गुप्ता साहेब १ वर्षात गेले त्यावेळी कुठेही अशी परिस्थिती झाली नाही. त्यावेळची बरीचशी मंडळी सभागृहात आहेत. त्या दृष्टीकोणातून कोणताही कमिश्नर कालावधी पूर्ण होण्याआधी गेला तर कोणाला आनंद झाला, हे ज्याचे त्याला माहित आहे. खाजगीत काय बोलतात, बाहेर कोण काय बोलतात. यावर आम्हाला देणेघेणे नाही. मा.श्रीकर परदेशी यांनी इथे चांगले काम केले. तितकेच मा.दिलिप बंड यांनी देखील चांगले काम केले. अधिका-यांकडून गोड बोलून काम करुन घेणे सदस्य म्हणून फार चांगले जमते. या मागे आमचे कोणताही हेतू नाही. ते लवकर गेले. आत्ता काय तुमचे वर्चस्व, तुमचा धाक. परदेशी साहेबांना मी सांगितले, कुटूंबावर धाक लावून चालत नाही. मुलांना, मुलींना ओरडतात. मुलगा म्हणतो वडिलांना मला ओरडले. किती वाईट घटना घडतात. आख्खे पिंपरी चिंचवड चालवाय़चे म्हणजे सगळ्यांनी किती चांगल्या पद्धतीने काम करायचे आहे. कोणाला वाईट म्हणायचे कारण नाही. हे सभागृह व शहरात दूरदृष्टी ठेवून काम करायचे आहे. बोलायला काय होते. नाव का म्हणून ठेवायची. अधिकारी जितके चुकले असतीलतर आम्ही सुद्धा तितकेच गुन्हेगार आहोत. ज्यावेळी अनधिकृत बांधकाम शहरात झाले, त्यावेळी अधिका-यांनी काय केले. ती आमची चूक होती, आम्ही सांगितले होते का. अनधिकृत बांधकाम करु नका, अनधिकृत नळ कनेक्शन घेऊ नका हे सांगायचे काम प्रशासनाचे होते. आम्ही मुळात सांगणार नाही. आम्ही सांगितले तुम्ही करु नका. आम्हाला त्या कोणाच्या गोष्टी पापाचे भागीदार व्हायचे नाही. हे शहर चांगलेच व्हायला पाहीजे. राष्ट्रवादीचा संकल्प आहे, कोणतेही अनधिकृत काम करायचे नाही. जेव्हा एवढे झाले तेव्हा कोण लोक होते. आख्खी महापालिका खाली करावी लागेल. सगळ्यांनाच घरी पाठवावे लागेल. यापुढे एकही अनधिकृत बांधकाम झालेतर याला सभागृह जबाबदार नाही. इथून पुढे अनधिकृत बांधकामे वाढलीतर याला प्रशासन जबाबदार असेल. एकही नगरसेवक सांगणार नाही, आमचा पाठिंबा आहे. डोळ्यात तेल घालून, शांत डोके ठेवून काम केले

पाहीजे. निवडणुका आल्या की सगळेच म्हणतात, वाजायला लागलं की घुमायला लागतं. बोलायला सोप्पे असते. आम्ही हे करु आम्ही ते करु, आम्हाला सुद्धा सगळे करता येते. आम्हाला अनधिकृत जी.बी. चालवायची नाही. कोणी मागणी केलीतर माझ्याकडे त्याचे उत्तर आहे. आम्हाला सुद्धा सभेचे कामकाज अनधिकृत करायचे नाही. आता ३ तारखेला आचारसंहिता लागेल म्हणून विशेष सभेचे आयोजन केले आहे. मी १२ वर्षे शहरात वेगवेगळी कामे केली आहेत. आज एलबीटी असलीतर चांगली गोळा झाली आहे. व्यापा-यांना एलबीटी देण्यासाठी काहीही करावे लागेल ते करा. त्याशिवाय एलबीटी गोळा होणार नाही. शहराचा विकास मग होणार नाही. ५०० कोटी उत्पन्न कमी होईल. आम्हाला सुद्धा वाटते कुठेही प्रशासनाचा गोंधळ होता कामा नये. म्हणून वाढीव उपसूचना देणार नाही. याचा अर्थ एलबीटी वसूल करायची नाही असा होत नाही. एलबीटी दर्जेदार पद्धतीने वसूल झाली पाहीजे. घराच्या कराबाबतीत कुठेतरी चांगले निर्णय घेतला पाहीजे. एकदा नोटीस द्या, दोनदा द्या, वसुली होते. मला वाटत नाही. महापौरांनी सांगितले, लोकांच्या दारात न सांगता जाऊन बॅण्ड वाजवू नका. लोकांना काय वाटते. पण वसूली होणे पण गरजेचे आहे. ५ वेळा सूचना देऊन टॅक्स दिला नाही. नाही दिलेतर आपण काम करु शकणार नाही. पाण्याचे सुद्धा तसेच आहे. अनधिकृत नळ कनेक्शन सुद्धा तितकेच आहेत. तिथे कोणाची यंत्रणा आहे. कशाला दोन यंत्रणा लागतात. त्यांनीच पाण्याचा सर्वे केला पाहीजे. जसा मिळकतींचा सर्वे केला होता. २ वेगवेगळ्या यंत्रणा कशासाठी राबविल्या पाहीजेत. आम्ही गेले १५ दिवसांत एक सुद्धा सांगितलेले नाही. एकाही नगरसेवकाने फोन करुन सांगितलेले नाही, तुम्ही हे करु नका. शहराच्या दृष्टीकोणातून एक झाड जरी वाळले असले, येताना जाताना दिसलेतरी आमचे नेते आम्हाला काय म्हणतात, शहरात अजिबात झाडे दिसत नाहीत. तुमचे लक्ष का नाही. ते तुमच्यासमोरही बोलले आहेत. शहरासाठी एकही झाड न वाळू देणारा आमचा नेता आहे. या दृष्टीने संकल्प करायचा आहे. कशा पद्धतीने करायचा आहे. जो ग्रामिण भाग आहे. तिथे अंडरग्राऊंड ड्रेनेजला प्रायोरीटी द्या. ते करावेच लागेल. एकदा गटाराची लाईन टाकणार, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणार, पाण्याची लाईन टाकणार. एका वेळेला ३ कामे करणार. जेसीबीचा खर्च वाचेल. शहरात शंभर टक्के अंडरग्राऊंड झाले पाहीजे. शहरात शंभर टक्के पाण्याची लाईन झाली पाहीजे. तिथे खर्च होतो. आज परिस्थीती आहे, १०० फूटांवर दुसरे घर. मग इथे कर, तिथे कर. तुमचे लिकेज होणार आहे. शहराचे नियोजन असले पाहीजे, शहराचे मॉडेल तयार असले पाहीजे. महापौर मॅडम सुद्धा सगळीकडे गेल्या आहेत. मी परदेशात ज्या ज्या सिटीत जाऊन आले, तिथे एक रस्ता शंभर वर्षापूर्वी केला होता. तो बघितल्यानंतर वाटले, जर्मनीत जर १०० वर्षापूर्वी रस्ता टिकू शकतो तर आपल्याकडे का टिकू शकत नाही. आपण रस्ता करतो, परत एखादी लाईन टाकतो. त्याची लाईफ तिथेच संपते. ॲग्रीमेंट करतो त्यात लिहीलेले असते, या-या कि.मी.मध्ये रस्ता खोदला तर त्याची वॉरंटी संपेल. का अधिकारी खोदू देतात याला आम्ही जबाबदार राहणार नाही. ज्या दिवशी रस्ता खोदला त्याच दिवशी त्याची वॉरंटी संपते. मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले, वॉर्डातली कामे दीड वर्षे थांबवली. मॉडेल वॉर्ड केलातर आमचे नुकसान झाले. अधिका-यांनी काय केले मॉडेल वॉर्ड करायचा म्हणून काहीच केले नाही. रस्ता करायचा नाही, फुटपाथ आत्ता करायचा नाही, टॉयलेट दुरुस्तीचे काम करायचेतर वॉर्डातले काम निघेलच. ते इतके खराब आहेत. त्याची दुरुस्ती करुन उपयोग नाही. त्याला पाण्याचे कनेक्शन नाही. अधिका-यांना एकदा बोलवून सांगा. त्यांना विचारा. एकत्र

मिटींग घ्या. अतिक्रमण विभाग असेल – नगरसेवकाने सांगितले, या रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे त्याचे काय करणार. मी फोटो दाखवते. अधिकारी म्हणतात, काय करणार आमच्याकडे गाडीला ड्रायव्हरच नाही. ही जबाबदारी आमची आहे का. कोणाची जबाबदारी आहे. पगार घेणार कोण, काम करणार कोण. अधिकारी सांगणार, गाडीला ड्रायव्हर नाही. आपलाच अधिकारी जाऊन सांगतो, आज अतिक्रमणचे स्कॉड येणार आहे, पटापट उचला. आम्ही गेलो की परत या. अतिक्रमणचे स्कॉड गेल्यावर पुन्हा १ तासात टप-या उभ्या राहिल्या तर त्या अधिका-याच्या पगारातून कपात करा. अधिकारी सांगणार, नगरसेवकाने सांगितले होते. कसे स्वप्न पूर्ण होणार आहे. काही स्वप्ने बघूच नका पूर्ण होणार नाहीत. सगळ्यांची साथ लागले. इथला नगरसेवक म्हणणार नाही. फुटपाथ त्याच्या पुढे, त्याच्या पुढे. नागरीकांना जाण्यासाठी रस्ताच नाही. याला कोण कारणीभूत आहे. आम्ही म्हणतो का गरीबाच्या पोटावर पाय द्या. नगरसेवकांना विश्वासात घ्या. दाखवा, कुठे हॉकर झोन करायचा. गाड्या कुठेतरी उभ्या राहील्या पाहीजेत. गार्डन म्हटलेतर तिथे भेळीची गाडी असलीच पाहीजे. नगरसेवकांना विचारुन ठरवा. वॉर्डात अनधिकृत नंतर बघू, ठिकाण ठरवू. हातगाडी, टपरीवाले, फ्रूटवाले, भाजीवाले हे शंभर टक्के प्रॉफीट कमवतात. पिंपरी चिंचवड मधील नागरीक कोणत्या न कोणत्या कोप-यातला आहे. फळे विकली, भाजी विकली नंतर त्याची घाण तिथेच टाकून जातात. भाजीवाल्यांना जागा आखून द्या. दर महिना २,००० भाडे आकारा. त्या वॉर्डाच्या मेंटनन्सचा खर्च त्यातून निघून जाईल. याचा कोणी विचार करत नाही. यांना फुकट खायची सवय झाली आहे. आपल्याला कचरा साफ करायला लावतो. रस्ता सुशोभिकरणाचे त्या माणसाने मेंटेनन्स चार्जेस घेतलेले असतात. तो मेंटेनन्स करतो का नाही हे बघायचे काम आमचे आहे का. आम्ही सांगत असतो, इथे खूप भिकारी बसलेले असतात. आपण सुंदर झाडे लावतो. तिथे झोळ्या लटकलेल्या आहेत. हे काय आहे. हे आमचे काम आहे का. महिला लहान मुलांना घेऊन दिवसभर उन्हातान्हात उभ्या राहतात. भिकारी हटाव मोहीम आपण करु शकत नाही. बाल कायद्यानुसार मुलांकडून भिक मागवणे गुन्हा आहे. आपले अधिकारी गप्प बसतात. गप्प बसायचा पगार यांना देतो का. त्यांच्यावर कारवाई करा. बाल कायद्यानुसार कारवाई करा. कसे रोडचे सुशोभिकरण व्यवस्थित राहील. कशी उड्डाणपूलाखाली व्यवस्था राहील. परमेश्वर कृपेने त्यांच्यावर वेळ आहे त्यांचे सुद्धा ठेकेदार आहेत. तुम्ही एकदा व्हिजिट द्या. त्यांच्याकडे पार्सल येते. दारुच्या बाटल्या येतात. महिला असेल, पुरुष असेल ते दारु पितात. ही सत्य परिस्थिती आहे. कोण आहे ते बघा. कसे शहर सुशोभिकरण करणार. चॅलेंज आहे. करु शकत नाही. चुकीची कामे अजिबात करु नका. या किरकोळ गोष्टी आहेत. एकही बसस्टॉप राहीलेला नाही. त्यावरील लक्तरे पाहीलीतर अक्षरशः दुर्देव वाटते. प्रभागातले अधिकारी काय करतात. त्यांना फक्त ऑफीसमध्ये बसण्यासाठी नेमले आहे का. आरोग्यचे अधिकारी काय करतात. टाळाटाळ करुन किती दिवस चालायचे. चांगले निर्णय घेतले पाहीजेत. अनधिकृत फ्लेक्सपासून उत्पन्न मिळू शकते. आमच्यासारखे लोक कार्यक्रम असेलतर १० फ्लेक्स लावतात. आम्हाला सांगा, प्रत्येक प्रभागात ४ फ्लेक्स लावायचे असतील तर पैसे द्या. दवाखान्याचे बोर्ड, पार्लरचे बोर्ड, ठिकठिकाणी बोर्ड. यांच्यावर भाडे लावा. उत्पन्न वाढले पाहीजे. भाडे कोणतेही असू द्या. आख्या प्रभागाचा खर्च त्यातून निघणार आहे. आज तुम्ही काय केले आहे. बजेट बघितले नसेल. आम्ही बोलण्यात काय अर्थ आहे. तुम्ही केलेच नाही. ही जी खुर्ची आहे त्या खुर्चीने बजेट केले आहे. म्हणून तुम्हाला

नाही खुर्चीला सांगतो. हे बजेट नीटनेटके करायचे असेलतर या सगळ्या गोष्टी आपण बघितल्या पाहीजेत. गार्डन बघितले का, कोणते गार्डन चांगले आहे का. कोणती लायब्ररी चांगली आहे का ते सांगा. कोणती व्यायामशाला चांगली आहे का ते सांगा. एकही लायब्ररी चांगली नाही. शहरात चांगली वाचनालये नाहीत. आम्ही जाऊन सांगायचे, आम्हाला पुस्तक द्या. वॉर्डात कॅमेरे बसवा. बाकी खर्च कमी करा. म्हणजे लक्षात येईल स्वच्छता अभियान राबविल्यानंतर कोण घाण करतो. झाडू वाल्यांनी झाडू मारुन कचरा ठेवलातर तुम्हाला दंड पडेल म्हणून आम्ही सांगतो. आम्ही नागरीकांसाठी इतके कडक वागायचे. कचरा रोडवर आणून टाकायचा नाही. चव्हाण साहेबांना मी रोज फोन करते. मी म्हणते, तुमचा पगार आम्हाला द्या. रोज सांगावे लागते. इथे कचरा पडला आहे. राडारोडा उचलला नाही. विद्युतवाला काम करणार राडारोडा टाकणार. कसे करु शकणार, करु शकत नाही. तुम्ही प्रभागासाठी काय बजेट दिले आहे. मला नगरसेवकांनासांगताना दुःख होते, आम्ही वाढीव बजेट देऊ शकत नाही. सगळे दिवसभर भांडत आहेत. तिथे काही नसेलच ते कुठे आणून करतील. मोठा प्रोजेक्ट करु नका. पर्यावरण – २ वर्षे काम केले. तो देखील तुमचा विचार वेगळा. त्यांचा विचार वेगळा म्हणून व्यवस्थित काम करायला सुरुवात करा. पुस्तकावर किती कलम होते याला महत्व नाही. जो आहे तो सत्य कलमी कार्यक्रम करा. दुस-या दिवशी दुसरी योजना राबवा. तिस-या दिवशी तिसरी योजना राबवा. अधिका-यांना वाटले असेल श्रीकर परदेशी गेले आता आम्ही सुटलो. तसे होणार नाही. तुम्ही तसे करणार नाही. आम्ही तुमचे त्यांचे श्वास सोडू देणार नाही. आम्हाला शहर चांगले करायचे आहे. वॉर्डात चांगले काम करायचे आहे. मला वाटते, कोणाचेच कष्ट कमी करुन काय निष्पन्न होणार आहे. ३०० कोटींपासून आज २४०० कोटींचे बजेट आहे. महिलांच्या योजना असतील, पाणी बिल असेल आमची इच्छा आहे, शहरात येणारा नागरीक पाणी पिणारच. तुमच्याकडे नळ कनेक्शन असेलतर तो शेजा-याला मागणार का. पाणी पिणार नाही का. पाणी कनेक्शन तोडण्यापेक्षा जागेवर गुन्हा दाखल करा. जास्तीचा दंड घ्या. पण पाणी द्या. प्रत्येकाला पाणी दिले गेले पाहीजे. यासाठी एक काम करा, गुन्हा दाखल करा. अभय योजना राबविली गेली. काही उपयोग झाला नाही. प्रत्येकाला पाणी दिले गेले पाहीजे. २४ तास पाणी देण्यासाठी अधिका-यांचे काम चांगले आहे. २४ बाय ७ देण्यासाठी त्यांचे पाईपचे चेकींग चालू आहे. वॉर्डात चेकींग चालू आहे. लिकेज कुठे आहे का. ठिकठिकाणी आख्या रस्त्यावर ड्रिलिंग मारले आहेत. ठिकठिकाणी असे का पडले आहेत. मी पाणी पुरवठा विभागाला कंम्प्लेण्ट केली. त्यांनी सांगितले आम्ही लिकेज शोधतोय. कोणी ड्रिलिंग मारले. तुम्हाला कळत नसेल तर आपली कसली एजन्सी आहे. पाणी वाहतेय पण त्याला कळाले नाही. जाधव नावाचा जे.ई.आहे त्याला बोलवून दाखवले. हे प्रत्येक ठिकाणी घडणार आहे. लिकेज काढण्यासाठी ड्रिल मारुन त्याला समजत नसेल, आपण कशा पद्धतीने केले गेले पाहीजे. पीएमपीएलची सारखीच गोष्ट आहे. यांना दरवर्षी ४० कोटी द्यावे लागणार आहेत. तुमचे पीएमपीएलकडे लक्ष पाहीजे. नागरीक तक्रार करत आहेत. त्यांच्यासाठी काम करा. चार मोठे प्रोजेक्ट नका करु. मा.जगदीश शेट्टी म्हणाले, जाऊ दे ताई माझे बजेट मा.आर.एस.कुमार यांना देऊन टाका. दोन वर्षांपूर्वी मा.जगदीश शेट्टी चेअरमन असताना सर्वसामान्य नागरीकांना जे पाहीजे आहे, तेच द्या. केवळ रस्ताच नाहीतर, अंडरग्राऊंड ड्रेनेज या सगळ्या साध्या साध्या गोष्टी सेवा दिल्या पाहीजेत. आरोग्यचे काम चांगले पाहीजे. शहरात उद्याने पाहीजेत. मुलांना खेळायला ग्राऊंड असले पाहीजे. ग्राऊंडची काय अवस्था आहे. तिथे

सिक्युरिटी नाही. ग्राऊंड भाड्याने मागितले तर कोणालाही देऊन टाकतो. कोणतेही प्लेग्राऊंड भाड्याने देऊ नये. तरीसुद्धा प्रभाग अधिकारी देतात. सभागृहात ठराव करतात. तरीसुद्धा प्लेग्राऊंड भाड्याने दिले जाते. कारवाई केली पाहीजे. आपण त्याच्या मातीवर, पाण्यावर खर्च करतो. हजार रुपयांसाठी शंभर टक्के भाड्याने देतो. म्हणून बाकी सगळ्या गोष्टी सांगितल्या. पूल, पाणीपुरवठा असेल, पर्यावरणासाठी रु.८ कोटी ठेवले. आपल्याला गव्हर्नमेंटने दंड केला आहे. शहरात पर्यावरणाचे काम होते का. दंड का केला होता ते पहा. रु.१०/- दंड असला तरी तो दंडच आहे. याबाबतीत लक्ष घातले पाहीजे. नदीत प्रदूषित पाणी का जाते. जायला नाही पाहीजे. हे योग्य आहे का. आख्या आळंदीपर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन टाकली होती. या महापालिकेत काय पाहीजे ते घ्या. शहराच्या दृष्टीकोणातून, सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीकोणातून करा. आम्ही तुम्हाला कधीही कोणत्याही गोष्टीला अडवणार नाही. फक्त सर्वसामान्य नागरीकांना तिथपर्यंत पाहिजे तेच द्या. बाकी दुसरे काही नाही. नगरसेवकांना मोठे प्रोजेक्ट नको आहेत. निवडणूका होऊन पूर्ण दोन वर्षे झाली आहेत. अजूनही २५ लाखांची कामे त्यांच्या वॉर्डात झालेली नाहीत, ती व्हायला पाहीजेत. मागील आयुक्तांनी देखील तेच सांगितले होते. त्यांनी शहरासाठी खूप काम केले होते. अनधिकृत बांधकामाला आमचा विरोध नाही. परंतू त्यांच्या जोडीला जेव्हा शर्मा साहेब होते. त्यावेळी बजेटबाबत परिस्थिती फार वाईट होती. त्यांनी महापालिकेची गाडी व्यवस्थित रुळावर आणली होती. तुम्हीही आणणार आहात. तुम्ही उगाचच इथपर्यंत आलात का,काहीतरी असल्याशिवाय. मा.दिलिप बंड यांनी काम केले. त्या काळात प्रोजेक्ट आला. आज करोडो रुपये जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून मिळाले. बीआरटी करावी लागली. २४ तास पाणी पुरवठा दिलाच आहे. केंद्र सरकारचा फंड आला त्यावेळी काही गोष्टी करायला बांधिल आहोत म्हणून ग्रेड सेपरेटर झाला. ऑटोक्लस्टर झाले, सायन्स पार्क झाले. चार चांगल्या गोष्टी झाल्या. पाण्याचे मीटर बसवणे सक्तीचे करायचे होते. आत्ता सभा तहकूब केलीतर काही फरक पडणार नाही. सकाळी ११.०० वा. सभा घेऊ शकते. परंतू माणूसकी, सभागृह सगळ्यांच्या संमतीने चालते. राष्ट्रवादीने कधीही कोणाला दुखावले नाही. लोकसभेत, राज्यसभेत बजेटबाबतीत काय करतात. आम्ही अधिका-यांना कधी सांगितले नाही, अमुक करा. या वॉर्डात झालेच नाही पाहीजे. इथे कात्री लावा असे सांगितले नाही. मेजॉरीटी असली तरी मस्ती कधीच केली नाही. आजही आमच्याकडे नम्रता आहे. दम सगळ्यांमध्ये असतो. इथे निवडून आलेले करोडो रुपये खर्च करुन आले असतील. दोन लाख खर्च करुन सुद्धा आले असतील. गरीबांतही दम असतो. मोठ्यांतही दम असतो. प्रत्येकाला बोलता येते. प्रत्येकाला सगळ्या गोष्टी करता येतात. राष्ट्रवादी पक्षाचे तत्व आहे. उतू नका मातू नका. सगळ्यांना बरोबर घेऊन काम करा. विरोधकांना सुद्धा बरोबर घेऊन काम करा. त्यादिवशी दादांनी सांगितले होते. मी व सगळे पदाधिकारी साक्षीदार आहोत. २४ बाय ७ पाणीपुरवठा विरोधकांच्या वॉर्डात बसून केला. तुमच्यासमोर काहीतरी उलटे पालटे करा, असे कधीच केले नाही. शहरात कुठेही दाखवायचे नाही. कुठे काहीही बोलत जातात. ५० वकील पडले आहेत. असे काही नाही, बिचारे कोट घालून बाहेर बसतात. समाजात वावरतो, समाजात चांगले काम करत असतात. तुमच हा शब्द मला आवडला, पाण्याला जसे वळण असेल तसे व्हायला पाहीजे. शहरातील लाखो लोकांसाठी योजना असतील. जो चालतो तोच ठेचकाळतो. ज्याला काही करायचे नाही, नुसतेच बोलायचे, तो काहीच करु शकत नाही. झोळ्या घेऊनच फिरतात. म्हणून कायद्याच्या चौकटीत बसून कसे काम करायचे ते शिकले पाहीजे. नगरसेवकांना

काम करायला ताकद व मुभा दिली पाहीजे. म्हणून पिंपरी चिंचवडमध्ये तुम्ही इथे आलात ते मनात ठेवू नका. कुठेतरी बिंबवले जाईल. आत्ता खुले सांगते, तुमच्यावर प्रेशर आणले जाईल, तुम्हाला आम्ही काही प्रेशर देणार नाही. तुम्ही आम्हाला प्रेशर द्या. कोणी प्रेशर दिलेतर पत्रकार परिषद घेऊन सांगा, राष्ट्रवादीकडून प्रेशर देतात. तुम्ही एक सांगितले, मी इथे बदली होऊन आलो आहे माझे काही नाही. हे व्यवस्थितरित्या सगळ्या गोष्टी असतील. नक्की चांगले घडणार आहे. हेकेखोरपणे केलातर तसेच होईल. बजेट हे बजेट असते. सगळ्या गोष्टींची आकडेवारी आहे. कायदा सल्लागारांबाबत सदस्य बोलले आहेत. हे बघून घेतले पाहीजे. आपण खूप मोठमोठ्या जकातीच्या केसेसे हारलेलो आहोत. कायदा सल्लागारांकडे माझा त्यांच्याकडे बघायचा दृष्टीकोण हा आहे. करोडो रुपयांच्या केसेस हारलेलो आहोत. वकीलांसाठी किती खर्च केला आहे. अधिका-यांना काही कामच राहीलेले नाही. कन्सल्टंट कशाला पाहीजे. त्यांच्यावर किती खर्च केला आहे, नक्कीच माहिती घेतली पाहीजे. आपले अधिकारी काय बुद्धू आहेत का. त्यांना काही कळत नाही का. त्यांच्याकडून काही गोष्टी घेतल्या पाहीजेत. काही जणांनी सभागृहात सांगितले, कन्सल्टंटची अशी परिस्थिती आहे त्यांना संध्याकाळी ७.०० नंतर उभे पण राहता येत नाही. त्या दृष्टीकोणातून तुम्ही लक्ष घातले पाहीजे. लोकांबरोबर जा, नगरसेवकांबरोबर जा. सगळीकडे बरोबर घेऊन फिरा. त्यांनाही वाटले पाहीजे. आमच्या वॉर्डात कमिश्नर यांनी व्हिजिट दिली, आमची ही कामे झाली. हेच नगरसेवक म्हणणार. अशा पद्धतीने ज्या काही दुरुस्त्या करायची गरज असेल, जे जे चांगले करता येईल त्या पद्धतीने काम करावे. आपण मला बोलायला संधी दिलीत त्याबद्दल मी आभारी आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १

दिनांक - २४/०२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/६/कावि/१५७/२०१४ दि.०७/०२/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६०६० दि. १४/०२/२०१४

मा.आयुक्तांकडून आलेले संदर्भ क्र.१ नुसारचे पुढीलप्रमाणेचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

अंदाजपत्रक “अ” “क” “प” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. | सन २०१४-१५ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | १८,७८,५१,८८,६०० | २१,०६,३०,४१,७०० |
| २) | एकूण खर्च | १७,८८,१६,७४,८०० | २१,०४,३४,३३,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ९०,३५,१३,८०० | १,९६,०८,७०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | २२,३२,१३,८०,७३० | २१,५८,०८,६३,७३० |
| २) | भाग-३ एकूण खर्च | २२,३२,१३,८०,७३० | २१,५८,०८,६३,७३० |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११,७६,१३,३६,९३६ | १२,९३,६९,५९,९३६ |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ४,९२,४०,४६,००० | १२,३०,८२,५०,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ६,८३,७२,९०,९३६ | ६२,८७,०९,९३६ |

त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे तयार करणेत येत असुन त्यास अंतिम स्विकृती देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

<u>अंदाजपत्रक “अ” “क” “प” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक</u>

| अ.क्र. | तपशिल | सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. | सन २०१४-१५ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ)१) | एकूण जमा | १८,७८,५१,८८,६०० | २१,०६,३०,४१,७०० |
| २) | एकूण खर्च | १७,८८,१६,७४,८०० | २१,०४,३४,३३,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ९०,३५,१३,८०० | १,९६,०८,७०० |
| ब)१) | भाग-३ एकूण जमा | २२,३२,१३,८०,७३० | २१,५८,०८,६३,७३० |
| २) | भाग-३ एकूण खर्च | २२,३२,१३,८०,७३० | २१,५८,०८,६३,७३० |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११,७६,१३,३६,९३६ | १२,९३,६९,५९,९३६ |
| २) | जेएनएनयूआरएम | ४,९२,४०,४६,००० | १२,३०,८२,५०,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण खर्च | | |
| ३) | अखेरची शिल्लक | ६,८३,७२,९०,९३६ | ६२,८७,०९,९३६ |

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

मनपाचे सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकातील “प” अंदाजपत्रक (महसूली) अंतर्गत झोनिपू स्थापत्य विभागाचे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे उपसुचना मंजूर करणेत यावी.

| पान क्र. | अ.क्र. | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १०५१ | १३८ | २०,००,०००/- | ४०,००,०००/- |
| १०५१ | १५२ | १०,००,०००/- | ४०,००,०००/- |

तसेच, पानांक १०५१, अ.क्र.१५२, कामाचे नाव – से.क्र.२२ प्रभाग क्र.१२ येथील कै. मधुकर पवळे हायस्कूल येथील शाळा परिसरातील झोपडपट्टी मधील कामांची देखभाल दुरुस्ती करणे. या कामाच्या नावाऐवजी से.क्र.२२ प्रभाग क्र.१२ येथील विलासनगर परिसरात स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती करणे असे दुरुस्त करण्यात यावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात बेघरांसाठी घरे या नविन लेखाशिर्षांतर्गत र.रु.१.०० कोटी तरतूद करणेत यावी. सदरची तरतूद करणेकामी **JnNURM** झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प या लेखाशिर्षामधील अंदाजपत्रक पानांक ९७८ अ.क्र.८ मधून र.रु.१.०० कोटी वर्ग करण्यात यावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात राजीव आवास योजना या नविन लेखाशिर्षांतर्गत र.रु.१.०० कोटी तरतूद करणेत यावी. सदरची तरतूद करणेकामी **JnNURM** झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प या लेखाशिर्षामधील अंदाजपत्रक पानांक ९७८ अ.क्र.८ मधून र.रु.१.०० कोटी वर्ग करण्यात यावे.

१) स्थापत्य ब क्षेत्रिय कार्यालय पान क्र.१७१ नविन कामे क्र.१ साठी अंदाजपत्रकीय रक्कम (१,००,००,०००) एक कोटी ठेवणे. पान क्र.१७१ नविन कामे क्र.१ साठी पान क्र.२१ वरील उपलेखाशिर्ष पुणे आळंदी रस्ता सी.डी.वर्क करणे. अ.क्र.८ चा ५६ मधून (२०,००,०००) २० लाख तरतूद वर्ग करणे.

२) पान क्र.१७३ अनु.क्र.३१ नालाट्रेनिंगसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,००,००,०००/- (एक कोटी ) ठेवणे.

३) पान क्र.१७४ अनु.क्र.२ गटर बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १,००,००,०००/- (एक कोटी) करणे. याच कामासाठी पान क्र.५२ अनु.क्र.२५ ब मधील पर्यटन विकास आराखडा या कामातून १५ मधून २५,००,०००/- (२५ लाख) तरतूद वर्ग करणे.

४) पान नं.२०१ अनु.क्र.३ दळवीनगर मधील फुटपाथ करणे व दुभाजक बसविणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम ५०,००,०००/- (५० लाख) करणे.

५) स्थापत्य विशेष योजना पान क्र.५१ वर अनु.क्र.२४ चा ४४ क्रमांकावर नविन लेखाशिर्ष करणे. तयार करुन कामाचे नांव - आरक्षण क्र.१९१ मध्ये मुलांचे खेळाचे मैदान विकसित करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम १,००,००,०००/- (एक कोटी) ठेवावी याच कामासाठी पान क्र.५२ अनु.क्र.२५ब मधील १४ तारांगण सायन्सपार्क या कामातून २५,००,०००/- (२५ लाख) तरतूद वर्ग करणे.

६) स्थापत्य विशेष योजना पान क्र.५२ वर अनु.क्र.२५अ मध्ये क्रमांक ८ वर नविन उपलेखाशिर्ष तयार करणे. कामाचे नांव – चिंचवड येथील आरक्षण क्र. २०१ वर नविन हॉकर्स झोन व दळवीनगर प्रभागातील बसस्टॉप विकसित करणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम १,००,००,०००/- (एक कोटी) ठेवणे व याच कामासाठी विशेष योजना पान क्र.४६ अनु.क्र.१६ चा १ रस्ता रुंदीकरणामधून रु.५०,००,०००/- (५० लाख) तरतूद वर्ग करणे.

दि.१४/०२/२०१४ च्या स्थायी समितीमध्ये सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. सदर नविन अंदाजपत्रकाची तपासणी केली असता ब प्रभागातील मुख्यालय अंतर्गत सन २०१४-१५ चे देखभाल दुरुस्तीची (महसूलीची) नविन कामांचा समावेश झाला नाही. परंतु सदरची खालील कामे सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात समावेश करणे गरजेचे आहे. त्यानुसार सदर कामांचा वाढ / घट चा तक्ता अंदाजपत्रकात समाविष्ट करावयाचा पान क्र. व अनु.क्र. नुसारची यादी सोबत सादर करणेत आलेली आहे. तरी सदर कामांचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात नविन देखभाल दुरुस्तीच्या कामात अंतर्भाव करणेत यावा. सोबत कामांचा वाढ / घट दर्शविणारा तक्ता –

## सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रकात ब प्रभागातील मुख्यालय अंतर्गत नविन महसुली कामांची यादी.

| अंदाजपत्रक ३ मधील पान क्र. | अंदाजपत्रकात द्यावयाचा अनु.क्र. | कामाचे नांव | सन २०१४-१५ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०१४-१५ चा मुळ अंदाज | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १११७ | ३३ | जलक्षेत्र क्र.बी/३ परिसरातील ताथवडे व पुनावळे भागात पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील लिकेज व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ० | १०,००,००० | ० | १०,००,००० | |
| १११७ | ३४ | जलक्षेत्र क्र.बी/५ परिसरातील वितरण व्यवस्थेतील लिकेजेस काढणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ३५ | जलक्षेत्र क्र.बी/७ परिसरातील श्रीधरनगर, सुदर्शननगर भागामध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील लिकेजेस काढणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ३६ | जलक्षेत्र क्र.बी/८ परिसरातील प्रभाग क्र.४२ पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील लिकेज व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ३७ | जलक्षेत्र क्र.बी/६ परिसरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती व लिकेजेसची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ३८ | जलक्षेत्र क्र.बी/३ व ५ ते ८ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणे. | ० | ५१,५०,००० | ० | ५१,५०,००० | |
| १११७ | ३९ | जलक्षेत्र क्र.बी/३ व ५ ते ८ मध्ये आवश्यकते नुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ४० | जलक्षेत्र क्र.बी/२ अंतर्गत पुनावळे येथील पाण्याच्या टाकीसाठी पाणीपुरवठा विषयक व स्थापत्य विषयक कामे करणे. | ० | १०,००,००० | ० | १०,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १११७ | ४१ | जलक्षेत्र क्र.बी/३ अंतर्गत ताथवडे येथील काळाखडक झोपडपट्टी येथील पाण्याच्या टाकीसाठी पाणीपुरवठा विषयक व स्थापत्य विषयक कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ४२ | जलक्षेत्र क्र.बी/७ मधील एल्प्रो पाण्याच्या टाकीखाली प्रिपेड टँकर फिलींग पॉईंटचे स्वाईप मशिन बसविणे. | ० | १२,००,००० | ० | १२,००,००० | |
| १११७ | ४३ | जलक्षेत्र क्र.ड/१, ड/३, ड/४ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणे. | ० | ३०,००,००० | ० | ३०,००,००० | |
| १११७ | ४४ | जलक्षेत्र क्र.ड/१ वाकड परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे. | ० | ५,५०,००० | ० | ५,५०,००० | |
| १११७ | ४५ | जलक्षेत्र क्र.ड/१ वाकड परिसरामध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ४६ | जलक्षेत्र क्र.ड/३ लक्ष्मणनगर परिसरामध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ४७ | जलक्षेत्र क्र.ड/४ थेरगाव परिसरामध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| १११७ | ४८ | जलक्षेत्र क्र.ड/४ थेरगाव परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे. | ० | ६,००,००० | ० | ६,००,००० | |
| **अंदाजपत्रकात समाविष्ट असलेली कामे –** | | | | | | | |
| अंदाजपत्रक ३ मधील पान क्र. | अंदाजपत्रक ३ मधील अनु. क्र. | | | | | | |
| १११५ | १० | पेठ क्र.२९ मध्ये टाकीकरीता आरक्षित असलेल्या जागेला सिमाभिंत बांधणे. (टाक्यांच्या अंतर्गत सुरक्षिततेसाठी लाभ होणार आहे) भाववाढ बील देणे बाकी आहे. | ० | १,००,००० | ० | १,००,००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १११५ | १५ | रावेत येथील अशुध्द जलउपसा केंद्राच्या परिसरात विद्युत विभागाकरीता स्विचींग स्टेशन बांधणे. | ० | २०,००,००० | ० | २०,००,००० | |
| | | **एकूण -** | | | | **२,००,००,०००** | |
| मुख्य अंदाजपत्रक क्र.१ मधील पान क्र. | मुख्य अंदाजपत्रक क्र.१ मधील अनु. क्र. | | | | | | |
| २२८ | १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निश्चित करणे त्यातील पाणीसाठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे. | ७,६३,७०,००० | ० | ७५,००,००० | ६,८८,७०,००० | |
| २२८ | २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका पाणीपुरवठा व्यवस्थेमधील गळती थांबविणेसाठी पाण्याच्या टाकीवरील मुख्य जलवाहिनीवरील स्लुईस व्हॉल्व व तदनुषंगिक कामे करणे. | २,००,००,००० | ० | ५०,००,००० | १,५०,००,००० | |
| २२९ | ८ | पिंपरी चिंचवड शहरासाठी तळवडे / चिखली येथे नविन १०० द.ल.लि.क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे. | २,००,००,००० | ० | ७५,००,००० | १,२५,००,००० | |
| | | **एकूण - ब** | **११,६३,७०,०००** | **२,००,००,०००** | **२,००,००,०००** | **११,६३,७०,०००** | |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय शहरी आरोग्य प्रकल्प शासनाने मंजूर केलेला आहे. सदरचे अभियान शहरी भागामध्ये राज्यशासनाचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केंद्र शासनाच्या **NUHM** योजने अंतर्गत आरोग्य केंद्रे स्थापन करणे, त्याचे **Relocation** करणे, मुलभूत सुविधा उदा.वीज,

पाणी, स्थापत्य विषयक कामकाज करुन देणे, तसेच फर्निचर, वैद्यकीय उपकरणे, औषधे उपलब्ध करणे यासाठी प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी सादर केला आहे. प्रकल्प मंजूर होऊन शासनाकडून निधी / अनुदान प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर योजनेसाठी सन २०१४-२०१५ र.रु.७,६३,७७,०००/- चे अंदाजपत्रक राज्य शासनास सादर करणेत आले आहे. तथापि या योजनेचा काही खर्च महापालिकेस करावा लागणार आहे.

मनपाचे सन २०१४-२०१५ मुळ अंदाजपत्रकामध्ये " **NUHM** " योजना हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करण्यात यावे. तसेच सदर लेखाशिर्षावर सन २०१४-२०१५ मुळ अंदाजपत्रकात " शासकीय योजनांची अंमलबजावणी " या लेखाशिर्षावर करणेत आलेल्या तरतूद र.रु.१,२०,००,०००/- मधून र.रु.२० लाख अंदाजपत्रकीय तरतूद वर्ग करणेत यावी.

**मा.श्रद्धा लांडे –** मा.महापौर साहेब**,** उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

पिंपरी चिंचवड मनपाच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकातील खालील कामांसाठी यापुढे दिलेल्या रकमांनुसार सुधारीत तरतूद करणेत यावी.

सदर तरतुदीमुळे होणारी र.रु.१५००००००/- ची पुस्तक क्र.३ मधील पान क्र.५२ वरील अनु. क्र. १० वरील प्र.क्र. १७ से.२६ मध्ये नाट्यगृह बांधणे या कामामधून सन २०१४-१५ च्या तरतुदीतून वर्ग करुन करण्यात यावी.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | वॉर्ड क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१३-१४ चा सुधारीत अंदाज | सन २०१४-१५ चा मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| १. | अ प्रभागातील विविध उद्यान व मैदानांत खुली व्यायामशाळा उभारणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | स.सा. | ९०,००,००० | ० | ५०,००,००० |
| २. | प्र.क्र.१७ मधील रस्त्याचे डांबरीकरण व चौकाचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक विकासाची कामे | १७ | ५,००,००,००० | ० | १,००,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | करणे. | | | | |
| | | | **एकूण** | | **१,५०,००,०००** |

पिंपरी चिंचवड मनपाच्या सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये खालील कामांसाठी त्यापुढे दिलेल्या रकमांनुसार सुधारीत तरतूद करणेत यावी.

सदरची वाढ ही पुस्तक क्र.३ मधील पान क्र.५२ वरील अनु. क्र. १३ मधील औद्योगिक संग्रहालय उभारणे या कामामधून सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रकातून र.रु.९,९२,०००/- वर्ग करुन करण्यात यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | सन २०१३-१४ साठीची उपसुचने -द्वारीची सुधारीत तरतूद | होणारी वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राधिकरण से.क्र.२६ गणेश तलावापासून संत ज्ञानेश्वर उद्यान संत तुकाराम उद्यानासाठी पाणीपुरवठा करणेसाठी लाईन टाकणे | १५६ | ५४ | ११,००,००० | ५,१२,००० |
| २. | प्रभाग क्र.१४ मध्ये खडीमुरुम व बीबीएम पद्धतीने डांबरीकरण करणे | ९२ | १३१ | १४,००,००० | २,८०,००० |
| ३. | नविन प्रभाग क्र.१४ मधील से.क्र.२६ मधील अंतर्गत रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे | ९३ | १४३ | २,००,००० | २,००,००० |

विद्युत विभागाचे पानांक ६०४ अनुक्रमांक २ येथील “से. २३ जलशुद्धीकरण केंद्र येथे सोलर पी.व्ही. सिस्टीमद्वारे वीजनिर्मिती करणे या लेखाशिर्षामधून सन १४-१५ चा मूळ अंदाज या लेखाशिर्षावरील र.रु.१ कोटी विद्युत विभागाचेच पानांक ५८२ अनुक्रमांक ६ येथील ” **“विविध रुग्णालय येथे सीसीटिव्ही यंत्रणा उभारणे” या लेखाशिर्षावर सन १४-१५ चा मूळ अंदाज येथील र.रु.१,६५,००,०००/- या लेखाशिर्षात वर्ग करुन सदर लेखाशिर्षावर एकूण र.रु.२,६५,००,०००/- एवढी तरतूद करणे.**

**तसेच विद्युत विभागाचे पानांक ६०४ येथील अनुक्रमांक ३ येथील** “मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारत येथे सोलर पी.व्ही. सिस्टीमद्वारे वीजनिर्मिती करणे“ **या लेखाशिर्षावरील ५० लक्ष एवढी तरतूद विद्युत विभागाचे दूरसंचार विभागाचे पानांक ५८२ येथे अनुक्रमांक १६ येथे नवीन उपलेखाशिर्ष निर्माण नाव** “विविध प्रभाग कार्यालय,रुग्णालय,शाळा व इतर महत्वाची मनपाची कार्यालये येथे सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे” सदर लेखाशिर्षावर सदरची र.रु.५० लक्ष एवढी तरतूद वर्ग करणे (सन १४-१५ करिता) तसेच त्यापोटी कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ३ कोटी एवढी ठेवणे.

दिनांक २४/२/२०१४ रोजीच्या मा.महापालिका सभेबाबतच्या कार्यपत्रिका क्र.२७ विषय १ साठी क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.६४ दापोडी – बोपखेल भागातील खालीलप्रमाणे विकास कामांच्या

अंदाजपत्रकीय रकमांस व तरतुदींस मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेबाबत कार्यवाही व्हावी ही विनंती.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | कामाची अंदाजपत्रक रक्कम | सन २०१४-१५ चा अंदाज | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील केसरीनगर येथे नाला बांधणे. | २५४ | ४१ | १८,००,००० | ५,००,००० | १०,००,००० | |
| २. | बोपखेल शाळेपासून रामनगर पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे | २७७ | १६५ | १,००,००,००० | २५,००,००० | ३५,००,००० | |
| ३. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील आळंदी फाटा ते गणेशनगर कॉलनी क्र.१ पर्यंतचा मुख्य रस्ता हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे. | २७७ | १६६ | १,००,००,००० | २५,००,००० | ३५,००,००० | |
| ४. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील गावठाण भागातील ठिकठिकाणी स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ३२२ | २३९ | १०,००,००० | --- | ५,००,००० | |
| ५. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील गणेशनगर मध्ये ठिकठिकाणी स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | ३२२ | २४१ | १०,००,००० | --- | ५,५०,००० | |
| ६. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ गुलाबनगर भागातील कॉंक्रीट पेव्हींग व गटर दुरुस्तीविषयक कामे करणे. | ३२२ | २४२ | १०,००,००० | --- | ५,५०,००० | |
| ७. | बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील अनधिकृत बांधकामे पाडणेसाठी वाहने पुरविणे | ३२२ | २४३ | १०,००,००० | --- | ३,००,००० | |
| ८. | बोपखेल येथे सेव्हरेज ट्रिटमेंट प्लाण्ट बांधणे | ७८९/ ७९१ | २ | ६,००,००,००० | ५०,००,००० | --- | ४९,००,००० |
| ९. | सेक्टर क्र.२३ जलशुद्धीकरण केंद्र येथे मायक्रोहायड्रो द्वारे वीजनिर्मिती करणे | ६०४ | १ | १,५०,००,००० | २५,००,००० | --- | १५,००,००० |
| १०. | दुर्गादेवी पवनचक्कीद्वारे वीज निर्मिती करणे | ६०४ | ४ | ५,००,००,००० | ५०,००,००० | --- | ३५,००,००० |
| | | | | | एकुण | ९९,००,००० | ९९,००,००० |

उपरोक्त विषयांकित कामास सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमांस व तरतुदीस मान्यता मिळणेबाबत कार्यवाही व्हावी.

मासुळकर कॉलनी प्र.क्र. २८ मधील आण्णासाहेब मगर स्टेडीअम येथिल स्थापत्य विशेष योजने अंतर्गत असून पान. क्र. १५ अनुक्रमांक ४.१ कामाचे नांव आण्णासाहेब मगर स्टेडीअमचा विकास करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु. ६० लाख तरतूद र.रु. १० लाख आहे. सदर कामाचे नांव आण्णासाहेब मगर स्टेडीअमचा विकास ऐवजी आण्णासाहेब मगर स्टेडीअम मधिल गिर्यारोहण भिंतीचे देखभाल व दुरुस्ती व आत्याधुनिक नूतनीकरण करणे असा उल्लेख करण्यात यावा.

लेखाशिर्ष विशेष योजना पान क्र. ५२ उपलेखाशिर्ष पर्यटन विकास आराखडा अनु.क्र. १२ कामाचे नांव बहिणाबाई प्राणी संग्रहालय स्थलांतर न करता आहे त्या जागेत बहिणाबाई प्राणी संग्रहालय विकसीत करावे असा बदल कामाच्या नावामध्ये करण्यात यावा.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील अंदाजपत्रक -३ सन २०१४-१५ मधिल पान क्र. ४६७ वरील अनुक्रमांक ५० मधिल उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव प्रभाग क्र. २ मधिल विकास आराखड्यानुसार तळवडे मुख्य रस्ता ते सहयोगनगर मार्गे रुपीनगर मुख्य रस्त्यास मिळणारा १२ मीटरचा रस्ता खडीमुरुम पध्दतीने विकसित करणे कामाची अंदाजपत्रकीय र. रु. १,००,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख) ची तरतूद केलेली आहे. सदर तरतूदमध्ये बदल करुन खालील विकास कामांसाठी वर्ग करावी.

१. प्रभाग क्र. २ त्रिवेणीनगर चे अंतर्गत सहयोगनगर –रुपीनगर येथिल स्वामी समर्थ हौ.सोसा. सिध्दनाथ हौ.सोसा. व लक्ष्मी हौ.सोसा.मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉकची कामे करणेसाठी ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार )ची तरतूद वर्ग करावी. नविन काम

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील अंदाजपत्रक -३ सन २०१४-१५ मधिल पान क्र. ४६७ वरील अनुक्रमांक ४८ मधिल उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव प्रभाग क्र. २ मधिल विकास आराखड्यानुसार तळवडे चिखली हद्द ते गणेश नगर येथे तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा १२ मीटर रस्ता खडीमुरुम पध्दतीने विकसित करणे तसेच अनुक्रमांक ४९ मधील उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नांव प्रभाग क्र. २ मधिल विकास आराखड्यानुसार तळवडे चिखली हद्द ते रुपीनगर मुख्य रस्त्यास मिळणारा २४ मीटर रस्ता खडीमुरुम पध्दतीने विकसित करणे दोन्ही कामाची तरतूद रक्कम प्रत्येकी १,००,०००/- (अक्षरी एक लाख) ची तरतूद आहे. सदर तरतूदमध्ये बदल करुन खालील विकास कामांसाठी वर्ग करावी.

१. प्रभाग क्र. २ त्रिवेणीनगर चे अंतर्गत म्हेत्रेवाडी येथील एखता व सिंहगड हौ.सोसा.मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉकची कामे करणेसाठी रु. ५००००/- (अक्षरी र.रु. पन्नास हजार )ची तरतूद वर्ग करावी. नविन काम

२. प्रभाग क्र. २ त्रिवेणीनगर चे अंतर्गत ताम्हाणेवाडी येथील संतकृपा हौ.सोसा.मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉकची कामे करणेसाठी ५००००/- (अक्षरी र.रु. पन्नास हजार) ची तरतूद वर्ग करावी. नविन काम

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ. क्र. | प्रशासनाने सुचविलेली सन२०१४-१४ ची तरतूद | वाढ | घट | सन २०१४-१५ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्र.क्र.२६ मोहननगर येथिल आ.क २८८ येथे सांस्कृतिक भवन समोरील आवारात बहुउद्देशीय इमारत बांधणे | **इमारत योजना** | १२४ | २१ | २५,००,०००/- | ०.०० | ५,००,०००/- | २०,००,०००/- |
| २. | प्र.क्र.२६ काळभोरनगर येथिल जलतरण तलावाच्या आवारात स्केटींग रिंग व लॉन टेनिस मैदानासाठी प्रेक्षक गॅलरी व त्याखाली चेंजिग रुम बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | **इमारत योजना** | १२५ | २९ | ०.०० | ५,००,०००/- | ०.०० | ५,००,०००/- |
| | | **एकुण** | | | **२५,००,०००/-** | **५,००,०००/** | **५,००,०००/-** | **२५,००,०००/-** |

वरील उपसुचना मान्य करण्यात यावी.

**मा.अनिता तापकीर –** मा.महापौर साहेब**,** उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

प्रभाग क्र. ६ मोशी अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष डांबरी रस्ते मधिल मुख्यालय पान क्र. ४२४ अनुक्रमांक १८ कामाचे नांव प्र.क्र.६ मोशी येथे शिवाजीवाडी येथिल रस्ते खडी मुरुमा व डांबरी करणे र.रु. ३५,००,०००/- हि कामाच्या दृष्टीने कमी आहे. तरी सदरची तरतूद कमी असल्यामुळे लेखाशिर्ष डांबरी रस्ते मधिल मुख्यालय पान क्र. ४२६ अनुक्रमांक ४५ कामाचे नाव प्रभाग क्र. ६ मोशी से.क्र. ६,९,११ मध्ये रस्ते डांबरी करणे तरतूद १५,००,०००/- ची तरतूद र.रु. १५,००,०००/- या प्र.क्र.६ मोशी येथे शिवाजीवाडी येथिल रस्ते खडी मुरुमा व डांबरी करणे वर वर्ग करणेत यावी.

प्रभाग क्र. १४ भक्तीशक्ती अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष स्थापत्य विशेष योजना पान क्र. ४० अनुक्रमांक १२१ कामाचे नांव भक्ती शक्ती चौक ते मुकाई चौक ४५ मीटर रस्त्यावर निसर्ग दर्शन सोसायटीजवळ रेल्वे लाईनवर उड्डाणपूल बांधणे या कामाची तरतूद र.रु. ५ कोटी मधून कामाचे नांव प्राधिकरण स्पाईनरोड चारलेन रस्ते भक्ती शक्ती चौक ते भेळचौक चारही लेन कॉक्रींटींग करणेत यावीत (नविन काम) यासाठी अंदाजे ५ कोटी खर्च अपेक्षित आहे त्यापैकी अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष स्थापत्य विशेष योजना पान क्र. ४० अनुक्रमांक १२१ या कामामधून १ कोटी तरतूद वर्ग करण्यात यावी.

प्रभाग क्र.४३ येथिल शास्त्रीनगर झोपडपट्टी येथिल नाल्यावर स्लॅब टाकणेकामी प अंदाजपत्रकामध्ये र.रु.२५,००,०००/- ची तरतूद करण्यात यावी. सदरची तरतुद करण्यासाठी फ अंदाजपत्रकातील मागासवर्गीय कल्याणकारी योजनाअंतर्गत अनु क्रमांक १० वरील कामाची तरतुद वर्ग करण्यात यावी.

प्रभाग क्र.४३ मधील महात्मा गांधीनगर झोपडपट्टी पिंपरी येथिल १२ सिटस् चे शौचालय पाडून तेथे २२ सिटस् चे दुमजली सुलभ शौचालय बांधणेकामी प अंदाजपत्रकामध्ये र.रु.४०,००,००० ची तरतुद करण्यात यावी. सदरची तरतुद करण्यासाठी फ अंदाजपत्रकातील इतर झोपडपट्टी वासियांसाठी सुधारणा अंतर्गत अनुक्रमांक ८९ वरील कामांची तरतुद वर्ग करण्यात यावी.

अंदाजपत्रक – ३ स्थापत्य विशेष योजना पान क्र.४१ अ.क्र. १२६ मधून मा.नांदगुडे यांच्या वॉर्डमधील वाय जंक्शन मधील २ कोटी ७५ लाख घट करण्यात यावी व खालील कामांवरती वाढ करण्यात यावी.

| पान क्र. | अनुक्रमांक | कामाचे स्वरुप | केलेली तरतूद | वाढीव तरतूद |
|---|---|---|---|---|
| ४०७ | ३ | पिंपळे निलख बाणेर पुलाजवळ उद्यान विकसित करणे | १,००,००० | २५,००,००० |
| ४०८ | ४ | पिंपळे निलख येथील पाण्याच्या टाकीशेजारील जागेमध्ये उद्यान विकसित करणे. | १,००,००० | २५,००,००० |
| १३ | ४ | विशालनगर पिंपळे निलख स.न.४० येथे मुळा नदीवर पूल बांधणे | २०,००,००० | २५,००,००० |
| १४ | ७ | पिंपळे निलख स्मशानभूमी ते औंध मुळा नदीवर पूल बांधणे | १०,००,००० | २५,००,००० |
| २६ | १२० | पिंपळे निलख येथील भाजीमंडई विकसित करणे आरक्षण क्र.३८० | १५,००,००० | २५,००,००० |
| २६ | १२१ | पिंपळे निलख येथे स.न. १३ पै १४ पै मधील विकास आराखड्यातील १४ मी. रस्ता विकसित करणे. | १५,००,००० | २५,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | १२२ | वाय जंक्शन ते वाघजाई हॉटेल रस्ता विकसित करणे | १५,००,००० | २५,००,००० |
| २६ | १२४ | आरक्षण क्र.३८० पासून २४ मी. रस्त्यापर्यंतचा, १२ मी. वि.आ. रस्ता विकसित करणे. | १५,००,००० | २५,००,००० |
| २६ | १२७ | विशालनगर येथिल सावित्रीबाई फुले उद्यानात शिल्प बसविणे**.** | १५,००,००० | २५,००,००० |
| २६ | १२८ | पिंपळे निलख येथील महादेव मंदीर परिसर विकसित करणे. | १५,००,००० | २५,००,००० |
| २३ | ८४ | आरक्षण क्र. ३७९ मध्ये जलतरण तलाव करणे | १५,००,००० | २५,००,००० |

**मा.संजय काटे –** मा.महापौर साहेब**,** उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये खाली नमूद प्रपत्र अ नुसार विविध दुरुस्त्या समाविष्ट असून उपसूचनेद्वारे सदर विषयामध्ये नवीन कामांचा समावेश, चालू कामातील दुरुस्ती, अंदाजपत्रकीय रक्कम किंवा उपलब्ध तरतूदी यातील बदल स्वीकारणेत यावेत तसेच यापैकी अंदाजपत्रकास किंवा सदर काम होणेसाठी आवश्यक बदल करणेत यावेत.

# प्रपत्र अ

## अंदाजपत्रक २०१४-१५

| घट | | | | | | वाढ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पान क्र. | अनु. क्र. | कामाचे नाव | उपलब्ध तरतूद रु. | करावयाची घट रु. | अ. क्र. | पान क्र. | अनु. क्र. | कामाचे नाव | उपलब्ध तरतूद रु. | करावयाची वाढ रु. |
| १. | ४० | १०९ | (अंदाजपत्रकीय रक्कम व तरतूद समान आहे) | १.७२ कोटी | ८५ लाख | १ | २४ | १०० | प्र.क्र.६० येथील सांगवी गावठाण, लक्ष्मीनगर, ममतानगर भागाचे मॉडेल वॉर्ड पद्धतीने विकसित करणे. | १० लाख | ९० लाख |
| २. | ४० | ११८ | सांगवी फाटा ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणे | १२ कोटी | १ कोटी | २ | २५ | १०५ | प्र.क्र.६० सांगवी येथे मुळा नदीकडील डी.पी. रस्ता विकसित करणे. | १० लाख | ५० लाख |
| ३. | ४६ | १९३ | दापोडी येथे मुंबई-पुणे रस्त्यावर FOB बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणे (अंदाजपत्रकीय रक्कम व तरतूद समान आहे) | १ कोटी | ५० लाख | ३ | २८ | १४४ | प्र.क्र.६० सांगवी स्मशानभुमीची स्थापत्य विषयक नुतनीकरणाची कामे करणे | २० लाख | ३० लाख |
| ४. | ४६ | १९९ | सांगवी-किवळे रस्त्यावरील EHV लाईनसाठी आवश्यक उपाययोजना करणे (अंदाजपत्रकीय रक्कम व तरतूद समान आहे) | ५० लाख | २५ लाख | ४ | २७९ | १९८ | वॉर्ड क्र.१०० मधील भूमिगत केबल, ड्रेनेजचे चर, खडी मुरुम करुन बी.बी.एम. करणे. | ०० | ५ लाख |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | ४५ | १८२ | औंध-रावेत रस्त्या वरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणे. (अंदाजपत्रकीय रक्कम व तरतूद समान आहे) | १.३० कोटी | ६० लाख | ५ | | नवीन काम | वॉर्ड क्र.९१ सांगवी येथे स्मशानभुमीचे स्थापत्य विषयक दुरुस्तीचे कामे करणे. | ०० | ३ लाख |
| | | | | | | ६ | | नवीन काम | प्र.क्र.६० सांगवी येथे मुळा नदीकाठचा घाट विकसित करणे व सुशोभिकरण करणे. | ५० लाख | २५ लाख |
| | | | | | | ७ | | नवीन काम | मनपा हद्दीतील खुले नाले गटर्स यांत्रिकी पध्दतीने साफ करणे. | ०० | ७५ लाख |
| | | | | | | ८ | १६ | ६ | प्र.क्र.६० सांगवी येथे स्मशानभूमी ते प्रियदर्शनीनगर पर्यंत पवना नदीकाठी संरक्षक भिंत बांधणे | १० लाख | १७ लाख |
| | | | | | | ९ | | नवीन काम | पिंपरी चिंचवड शहरात सांस्कृतिक जापासावी यासाठी गणेशोत्सव साजरा करणे. | ०० | २५ लाख |
| १. | ४१ | १२६ | --- | १० कोटी | १ कोटी | | | नवीन काम | प्र.क्र.५५ रहाटणी येथील स.न.८३ ते १२५ येथील १८ मी. डि.पी. रस्ता विकसित करणे. रु. १,००,००,०००/- | ०० | ५० लाख |
| २. | ४० | ११८ | --- | १२ कोटी | १ कोटी | | | नवीन काम | प्र.क्र. ५५ रहाटणी गावठाण येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास मेघडंबरी करणे. ५०,००,०००/- | ०० | २० लाख |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | ३२९ | ८४ | --- | २५ लाख | २० लाख | नवीन काम | प्र.क्र.५५ पिंपळे सौदागर येथील आरक्षण क्र. ३७१ ब उद्यान मधील उद्यानविषयक व विद्युतविषयक कामे करणे. अंदाजे २,००,००,०००/- | ०० | ५० लाख |
| | | | | | | नवीन काम | प्र.क्र.५५ पिंपळे सौदागर येथे आ.क्र.३६७ खेळाचे मैदान येथे विविध खेळासाठी मैदाने विकसीत करणे व प्रेक्षागॅलरी बांधणे, अनुषंगिक विकास कामे करणे. रु.१,००,००,०००/- | ०० | ५० लाख |
| | | | | | | नवीन काम | पिंपळे सौदागर भागातील HCMIR या रस्त्याच्या आरक्षित जागेसाठी चेनलिंग,फेसिंग व इतर अनुषंगिक कामे करणे यासाठी मनपा सन २०१४-१५ च्या विशेष योजना वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे. रु.५०,००,०००/- | ०० | ५० लाख |

पिंपरी चिंचवड मनपाच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकातील खालील कामांसाठी त्यापुढे दिलेल्या रकमांनुसार सुधारीत तरतूद करण्यात यावी. सदर तरतुदीमुळे होणारी र.रु.४,५०,००,०००/- ची पुस्तक क्र. ३ मधील पान क्र. ५२ वरील अनु. क्र.१० वरील प्र.क्र. १७ से.२६ मध्ये नाट्यगृह बांधणे या कामामधून सन २०१४-१५च्या तरतूदीतून वर्ग करुन करण्यात यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | सन २०१४-१५ चा मुळ अंदाज अंदाजपत्रकानुसार | उपसुचनेनुसार करावयाची तरतुद | होणारी वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पद्धतीने करणे (से.क्र. २६,२७,२७अ, व २८) | ११६ | १४७ | ३,००,००० | २५,००,००० | २३,००,००० |
| २. | प्र.क्र.१७ संत तुकाराम उद्यान येथे फुटपाथ पेव्हींग ब्लॉक व रस्त्याची दुरुस्तीची कामे करणे | ११६ | १४८ | ३,००,००० | १५,००,००० | १२,००,००० |
| ३. | प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते हुतात्मा चौकापर्यंतचे रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणे. | ११६ | १४९ | ३,००,००० | २५,००,००० | २३,००,००० |
| ४. | प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते भेळ चौकापर्यंतच्या रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणे. | ११७ | १५० | ३,००,००० | ३०,००,००० | २७,००,००० |
| ५. | प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते म्हाळसाकांत चौका पर्यंतच्या रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणे. | ११७ | १५१ | ३,००,००० | २०,००,००० | १७,००,००० |
| ६. | प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरातील नुतनीकरणाचे कामे करणे. | ११७ | १५२ | ३,००,००० | २५,००,००० | २२,००,००० |
| ७. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २८ मधील नुतनीकरणाचे कामे करणे. | ११७ | १५३ | ३,००,००० | ५०,००,००० | ४७,००,००० |
| ८. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २७ मधील नुतनीकरणाचे कामे करणे. | ११७ | १५४ | ३,००,००० | ४०,००,००० | ३७,००,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २७अ मधील नुतनीकरणाचे कामे करणे. | ११७ | १५५ | ३,००,००० | ४०,००,००० | ३७,००,००० |
| १०. | प्राधिकरण प्र.क्र.१७ रस्त्याचे सुशोभिकरणाची कामे करणे. | ११७ | १५६ | ३,००,००० | ३०,००,००० | २७,००,००० |
| ११. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २८ मधील पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणे. | ११७ | १५७ | ३,००,००० | ३०,००,००० | २७,००,००० |
| १२. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २७ मधील पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणे. | ११७ | १५८ | ३,००,००० | ३०,००,००० | २७,००,००० |
| १३. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २७अ मधील पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणे. | ११७ | १५९ | ३,००,००० | ३०,००,००० | २७,००,००० |
| १४. | प्र.क्र. १७ श्री ज्ञानेश्वर उद्यानामधील सिमाभिंतीचे नुतनीकरण करणे. | १५८ | ८८ | १,००,००० | ३५,००,००० | ३४,००,००० |
| १५. | प्राधिकरण प्र.क्र.१७ से.क्र. २७ मधील संत तुकाराम उद्यान नुतनीकरण कामे करणे. | १५८ | ९० | १०,००,००० | ५०,००,००० | ४०,००,००० |
| १६. | प्राधिकरण प्र.क्र.१७ संत ज्ञानेश्वर उद्यानामधील नुतनीकरण कामे करणे. | १५९ | ९६ | १०,००,००० | ३०,००,००० | २०,००,००० |
| १७. | प्राधिकरण से.क्र. २६ गणेश तलावापासून संत ज्ञानेश्वर उद्यान, संत तुकाराम उद्यानासाठी पाणीपुरवठा करणेसाठी लाईन टाकणे | १५६ | ५४ | -- | ३,००,००० | ३,००,००० |
| | **एकूण** | | | | | **४,५०,००,०००** |

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाशिक फाटा येथील भारतरत्न जे.आर.डी. टाटा उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणासाठी बसविलेल्या प्रकाशव्यवस्थेचे ५ वर्षांसाठी चालन, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाकरीता सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विद्युत मुख्य कार्यालयाकडील देखभाल दुरुस्तीच्या लेखाशिर्षामध्ये स्वतंत्र महसुली उपलेखाशिर्ष निर्माण करुन रक्कम रुपये ४५,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता व चालू वर्षी रक्कम रुपये १०,००,०००/- इतकी तरतूद विशेष योजना – सायन्स पार्कसाठी केलेल्या तरतुदीमधून (पृष्ठ क्र. ५३४, अ.क्र.१६) वर्ग करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नाशिक फाटा येथे दुमजली उड्डाणपूलाची उभारणीचे काम करणेत आले असून दि. १५ फेब्रुवारी २०१४ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांचे शुभहस्ते उदघाटन होऊन वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. सदर उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणाकामी एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन प्रकाश व्यवस्था केल्याने उड्डाणपुलाच्या सौंदर्यात भर पडून आकर्षक व भव्य दिसत आहेत. हा पूल महानगरपालिकेचा गौरवास्पद प्रकल्प ठरत आहे. त्यामुळे जनसामान्य नागरीक, पर्यटक यांच्यामध्ये हा प्रकल्प बहुचर्चेचा ठरला आहे. याठिकाणी केलेल्या आकर्षक प्रकाश व्यवस्थेचे चालन देखभाल, दुरुस्ती व सुरक्षेच्या कामासाठी अपु-या कर्मचा-यांमुळे निविदा काढणे आवश्यक ठरत आहे. तथापि या कामाचा अंतर्भाव मूळ कामात नसल्यामुळे या कामी स्वतंत्रपणे कामाची निविदा मागवून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन, आर्थिक उपलेखाशिर्ष तयार करुन काम करावे लागणार आहे. सदर कामाची तातडी लक्षात घेता निविदा कार्यवाहीसाठी आवश्यक बाब म्हणून स्वतंत्र महसूली उपलेखाशिर्ष निर्माण करुन कामाच्या खर्चास मा.महापालिका सभेकडून प्रशासकीय मान्यता मिळणे व तरतूद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाशिक फाटा येथील भारतरत्न जे.आर.डी. टाटा उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणासाठी बसविलेल्या प्रकाश व्यवस्थेचे ५ वर्षांसाठी चालन देखभाल व दुरुस्ती करणे या कामाकरिता सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विद्युत मुख्य कार्यालयाकडील देखभाल दुरुस्तीच्या लेखाशिर्षामध्ये स्वतंत्र महसूली उपलेखाशिर्ष निर्माण करुन रक्कम रु. ४५,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता व चालू वर्षी र.रु.१०,००,०००/- इतकी तरतूद विशेष योजना सायन्स पार्कसाठी केलेल्या तरतूदीमधून (पृष्ठ क्र. ५३४, अ.क्र. १६) वर्ग करणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रकात मान्यता देणेसाठी होणा-या दि. २४/२/२०१४ चे महासभेमध्ये खालीलप्रमाणे उपसूचना स्विकारून मान्यता मिळावी ही विनंती.

पुस्तक क्र. ३ पान क्र. ९७१ पाणीपुरवठा टप्पा-२ JNNURM अंतर्गत पान क्र. ४ कामाचे नाव एस-२ ते डब्ल्यु डी-३ टाकीपर्यंत ग्रॅव्हीटी मेन टाकणे (७०० मी.मी. ते ४५० मी.मी.) सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रकात र.रु.६० लाखाची तरतूद करण्यात यावी. सदर तरतूद पुस्तक क्र.१ पान क्र. २०७ वरील पाणीपुरवठा टप्पा – २ JNNURM मधील सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील शिल्लक र.रु.५,०५,२२,५६२/- मधून र.रु.६० लाख उपरोक्त कामासाठी वर्ग करणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. /अ.क्र. | प्रशासनाने सुचविलेली सन २०१३-१४ ची तरतूद | वाढ | घट | सन २०१४-१५ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रभाग क्र.५९ सांगवी मधुबन येथील आ.क्र.३१० मोकळी जागा विकसित करणे अंदाजपत्रकीय र.रु.३० लक्ष | स्थापत्य उद्यान | | | १५ लक्ष | १५ लक्ष | |
| २) | प्रभाग क्र.५९ मधील जलतरण तलावाचे सुशोभिकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.३० लक्ष | इमारत योजना | | | १५ लक्ष | १५ लक्ष | |
| ३) | प्र.क्र.५९ जुनी सांगवी येथिल जलतरण तलावाची खोली कमी करणे व स्थापत्य विषयक कामे करणे | इमारत योजना | | | १० लक्ष | १० लक्ष | |
| ४) | प्र.क्र.५९ करसंकलन इमारतीमध्ये युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका यासाठी फर्नीचर विषयक व स्थापत्य विषयक कामे करणे. | इमारत योजना | | | ५ लक्ष | ५ लक्ष | |

वरील कामांचा समावेश व तरतूद अंदाजपत्रकात करणे व खालील प्रस्तावित कामांमधून तरतूद वजा करुन वरील कामांसाठी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. /अ.क्र. | प्रशासनाने सुचविलेली सन २०१३-१४ ची तरतूद | वाढ | घट | सन २०१४-१५ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्र.क्र.५९ सांगवी येथील भाजी मंडईचे अद्ययावत नुतनीकरण करुन इमारत बांधणे | इमारत योजना | ३००/४२ | २५ लक्ष | ०.०० | १५ लक्ष | |
| २) | प्र.क्र.५९ सांगवी स्पाईसर पुल येथे | किरकोळ | ३०३/१११ | ०.०० | ०.०० | ५ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वागत कमान उभारणे. | दुरुस्ती | | | | लक्ष | |
| ३) | प्र.क्र.५९ इ. ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणे. | | ३२९/८९ | २५ लक्ष | ०.०० | १५ लक्ष | |
| ४) | लेखाशिर्ष विशेष योजना प्र.क्र.५९ मधुबन येथील मुळा नदीवर मधुबन सोसायटी येथे नागरीक व मुलांकरीता नौकाविहार (बोटक्लब बांधणे) | विशेष योजना | १५/१० | १० लक्ष | ०.०० | १० लक्ष | |

प्रभाग क्र.३३ गवळीनगर अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष – स्थापत्यविषयक कामे करणे, मुख्यालय पान क्र. ४३६, अनु. क्र. ४३६ मधील कामाचे नाव – भोसरी प्र.क्र. ३३ गवळीनगर मधील सर्वे नं. स.न. २०० येथील खेळाचे मैदान विकसित करणे. अंदाजपत्रकीय तरतूद ६०,००,०००/- तरतूद, ३०,००,०००/- मधून ३,००,०००/- घट करुन खालील नवीन कामावर प्रत्येकी १ लाख वर्ग करणेत यावेत.

१. भोसरी प्र.क्र.३३ गवळीनगर येथील भोसरी आळंदी रस्त्याची देखभाल दुरुस्तीची कामे करणे. र.रु.१,००,०००/- ची तरतूद वर्ग करणेत यावी.
